गुणलुब्धाः स्वयमेव संपदः

महाराष्ट्र–कुटुंब–माला.

पुष्प १ लें.

# मजूर

संपादक व लेखक

नारायण विनायक कुळकर्णी

मार्च सन १९२५

किंमत १ रुपाया.

॥ श्रीदत्त ॥

# महाराष्ट्र-कुटुंब-माला.

( उद्देश व नियमपत्रक )

संपादक

## नारायण विनायक कुलकर्णी.

प्रकाशक

विठ्ठल रामचंद्र खाडिलकर

मालक ' श्रीदत्त एजन्सी, ' ३९१ नारायण पेठ पुणें शहर.

[ श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स ]

# विनंति.

१ आपल्या 'महाराष्ट-कुटुंब-माले' ची ही उद्देश व नियम-पत्रिका आपण लक्षपूर्वक वाचा, आणि आपल्या मित्र मंडळीस वाचण्याची शिफारस करा.

२ 'महाराष्ट-कुटुंब-माला.' आपल्या घरीं बोलवा, व आपल्या मित्रांच्या घरीं बोलविण्याची कृपा करा.

३ 'महाराष्ट-कुटुंब माले' स आपली म्हणा, व तिच्याकरितां शक्य असेल तें ध्यानांत धरून साह्य करा.

४ 'महाराष्ट्र-कुटुंब-माला.' सेवातत्पर व कार्यक्षम करणें सर्वस्वी तिच्या चाहत्यांच्या महाराष्ट्र-कुटुंबियांवर अवलंबून आहे.

५ 'मालेची विचारपूस व 'माले' ला बोलावणें उद्यां करूं म्हणावयाचें मनांत न आणितां '**आजच**' म्हणा व लगेच 'मालेला' कार्ड टाकाच.

॥ श्रीराम ॥

# महाराष्ट्र-कुटुंब-माला.

गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ।

## उद्देश पत्रिका.

महाराष्ट्र कुटुंबाचें सद्यःचित्र निरनिराळ्या बाजूंनीं कसें आहे, तें चित्र-पूर्वीं कसें होतें; व पुढें कसें दिसावें, व असावें अशी जाणत्या महाराष्ट्रा-ची आशा व इच्छा आहे, हें मालेंत येणाऱ्या निरनिराळ्या पुस्तकांतून 'आरशां'त पाहिल्याप्रमाणें दाखवावें, हा मालेचा प्रधान उद्देश ठेवण्यांत आला आहे. मालेंतील प्रत्येक पुष्याचा कटाक्ष,महाराष्ट्र कुटुंबाची स्वस्थिति कशी आहे, व सुस्थिती कशी होईल हें दाखवितांना, कुटुंबांतील भेसूर, हिडीस, व विलक्षण विकृत स्वरूपाची यथातथ्य किंवा अवास्तव चर्चा करून किळस उत्पन्न होईल, असें दाखविण्यापेक्षां, होमीओपाथीच्या गोडी व गुणांत जशा गोळ्या असतात, त्याप्रमाणेंच निवड करण्याकडे असेल.

जी मधली स्थिति नेहमीं श्रेष्ठ दर्जाचा समाज निर्माण करते, किंवा अवनतीचा खाडा गांठते, ती महाराष्ट्राची मधली स्थिती आज कशी आहे, ती दुसऱ्याच्या चुका दाखवून स्वतःकडे श्रेष्ठत्व घेऊन, अवन-तीचा अवलंब अधिक करीत आहे, कीं स्वतःच्याच चुका जाणून, असलेला आपला चांगला गुणांशवाढीस लावून श्रेष्ठ दर्जाचा मार्ग पत्करीत आहे, याबद्दलची वाङ्मयीक चर्चा कांदबरीद्वारा करावी, हेंही एक प्रस्तुत मालेचें वैशिष्ठ्य आहे.

अत्युच्च कल्पनांच्या वातावरणांत भरभसाट भराऱ्या मारणें, किंवा आपल्याच असत्या नसत्या दुर्गुणांचा उकिरडा उकरीत बसणें, या दोहीं-हूनही 'महाराष्ट्र कुटुंबा'ची जशी आहे तशी परिस्थिती उद्‌बोधक

दृष्टीनें रंगविणें, हेच महाराष्ट्र-कुटुंब-मालेला मानवणारे आचार व विचार आहेत.

महाराष्ट्राच्या मधल्या स्थितीनें आपल्याहून श्रेष्ठ, किंवा आपल्याहून कनिष्ठ स्थितीनें आपल्या बाबतींत काय काय चुका केल्या आहेत, याचें प्रदर्शन करण्याच्या मोहांत पडण्यापेक्षां, ही 'माला' मधल्या स्थितीची चूक किंवा दिशाभूल होत आहे, व थोड्याशा सत् प्रयत्नांनीं मधली स्थितीच कार्यक्षम व आदरणीय कशी होऊं शकेल; या प्रकारची कादंबरी चित्रें-सादर करील.

मालेची सेवा घेणें, तिजवर आपुलकीचें प्रेम ठेवणें, तिला रांगती चालती करण्यासाठीं, आस्थेनें हातभार लावणें, वगैरे गोष्टी महाराष्ट्रानेंच उत्साहानें व तत्परतेनें करावयास पाहिजे आहेत.

तरी मालेचा परामर्ष घेण्याची प्रत्येक महाराष्ट्रीयांस सविनय विनंती आहे.

सर्वांचा नम्र.

**विठ्ठल रामचंद्र खाडिलकर.**

मालकः-' श्री दत्त एजन्सी, ' ३९१ नारायण पेठ

पुणें शहर.

# महाराष्ट्र--कुटुंब--माला.

## ( नियमपत्रक. )

१ महाराष्ट्र-कुटुंबाला सदभिरुचीपोषक होईल असें कादंबरी वाङ्मय प्रसिद्ध करणें हा ' माले'चा उद्देश आहे.

२ वर्षांतून चार पुस्तकें काढण्याचा संकल्प असून मालेचें कोणतेंही पुस्तक कमींत कमी १५० पासून जास्तींत जास्त २०० पानांचें असेल.

३ मालेचें कोणतेंही पुस्तक अंतरंगास शोभेसेंच बाह्यांगानें सुबक करण्याची शिकस्त केली जाईल.

४ मालेचे कायम वर्गणीदार होणारांस मालेचें प्रत्येक पुस्तक किंमतीच्या पाऊण पटीनें मिळणार असून, मालेची प्रवेश फी फक्त एक

रुपया ठेवण्यांत आली आहे. प्रवेश फी भरल्यापासून पुढें प्रसिद्ध होणारें मालेचें पुस्तक या नियमाप्रमाणें पाऊणपट किंमतींत मिळेल. मालेच्या कोणत्याही पुस्तकाची किंमत एक रुपायाहून कधींच अधिक असणार नाहीं.

५ " मजूर " ही मालेची पहिली कादंबरी आहे. या पुस्तकावरून मालेचें अंतर्बाह्यांग कोणत्या प्रकारचें आहे, याची मालेच्या आश्रयदात्यांस पूर्ण कल्पना येईल.

६ मालेचें हें ' मजूर ' पुस्तक शके १८४७ चैत्र शुद्ध प्रतिपदेस ( ता. २५ मार्च १९२५ इ. या दिवशीं ) प्रसिद्ध होईल.

७ वर्गणीदारानें मालेचें एकादें पुस्तक नाकारल्यास यादींतून त्याचें नांव काढण्यांत येईल. आणि फिरून बारा आणे भरल्याखेरीज वर्गणीदार समजलें जाणार नाहीं.

८ ज्यांना मालेचे वर्गणीदार व्हावयाचें असेल त्यांना येत्या वर्ष प्रतिपदेपर्यंत प्रवेश फीचा रुपया भरण्याची अवश्यकता नाहीं. ही विशेष सवलत ठेवण्यांत आली आहे. आज नुसतीं नांवें नोंदवावींत. मालेचें पहिलें पुस्तक निघाल्यानंतर ही सवलत रद्द आहे.

९ मालेच्या कायम वर्गणीदारांखेरीज इतरांस मालेचीं पुस्तकें मिळतील, त्यांस पुस्तकाची भर किंमत पडेल.

१० मालेचे मुख्य संपादक, सुप्रसिद्ध ' माईसाहेब ' नाटकाचे कर्ते रा. रा. नारायण विनायक कुळकर्णी, हे असून, पहिली ' **मजूर** ' कादंबरी त्यांच्याच ओजस्वी लेखणींतून उतरली आहे. मालेंत मालेच्या ध्येयाला साजतील अशा इतर विद्वान्, प्रतिभावान्, लेखकांच्या कादंबऱ्या मालेच्या संपादक व सल्लागार मंडळांकडून पसंत करवून प्रसिद्ध करावयाच्या आहेत.

११ मालेशीं पत्रव्यवहार करावयाचा पत्ता " रा. रा. विठ्ठल रामचंद्र खाडिलकर ' मालक श्री दत्त एजन्सी, ' ३९१ नारायण पेठ पुणें शहर" हा आहे.

—'मालेंत' जाहिराती घेण्याची व्यवस्था केली आहे. सबंध 'पेज' जाहिरात देणारांस प्रत्येक वेळीं १० रुपये, अर्धा पेज सहा रुपये, पडतील. कायमच्या जाहिराती देणारांनीं स्वतंत्र पत्र व्यवहार करावा.

---

# महाराष्ट्र-कुटुंब-माला

## पुष्प पहिलें.

## " मजूर. "

लेखक—'**माईसाहेब'कर्ते ना. वि. कुळकर्णी.**

[ या कादंबरींत कुलशीलवान्, शिक्षीत, पण गरीबीच्या परिस्थितीमुळें एका तरुणाला मुंबईसारख्या ठिकाणीं गिरणींतून 'मजूर' म्हणून राबावें लागतें, त्या नीच कोटींत, त्याचे, व त्याच्या आईचे, लहान भावंडांचे अतोनात हाल झाले, तरी त्या सर्वांना तोंड देऊन, कुलशील न सोडतां, सचोटीनें, ध्येयाला धरून, ईश्वराला स्मरून वागून, "**प्याद्याचा फर्जी कसा होऊं शकतो,**" याचें चटकदार चित्र या कादंबरींत वाचकांस वाचावयास मिळेल. ]

## पुष्प दुसरें.

## " कसे दिवस जातील ? "

लेखक—**आनंदी तनय**

[ आपला महाराष्ट्र शेतकी प्रधान आहे. शेतकरी शेतवाडी सोडून पोटाच्या पाठीमागें लागून मुंबईसारख्या बकाली-अवाढव्य शहरांत जातो. त्यामुळें त्याची, त्याच्या कुटुंबाची काय दैना होते. स्वतः जगण्याचें, व कुटुंबाला जगविण्याचें खरें साधन, बकाली वस्तींत हमाली करण्याचें नसून, खेडगांवातल्या स्वतःच्या शेतीवर राबण्यांचेंच आहे. गरीब, अडाणी,

निरक्षर, शेतकरी वर्गास शेतकी सोडून जावें लागणें हेंच त्यांस कसें जिवंत मरण असतें, तेंच तो वर्ग आपल्या 'शेती'वर कसा शोभतो, जगतो, वैभवांत राहतो, व दुसऱ्यासही वैभवांत ठेवण्याला समर्थ होतो, याचें सुंदर शब्द-चित्र प्रत्येक सहृदय वाचकांस प्रसंगानुसार, हंसवील, रडवील, विचार करायला लावील; व गोड मित्राप्रमाणें उन्नतीचा उपदेशही करील! या पुष्पाचा वास तामसी उन्मादक नसून उद्बोधकतेचा उल्हास प्रतीत करणारा आमोददायी असल्याबद्दल वाचकांची खात्री पटेल.]

## पुष्प तिसरें.

### " शिपाई "

### लेखक—बाबाग्रज.

['ठोशास ठोसा लावयाचा, ठोशास बोसा ( गाल ) द्यावयाचा नाहीं, हें महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यकालीं असलेंच पाहिजे. आज मात्र तसें नाहीं. आज महाराष्ट्र आपला जातिवंत " शियाई " बाणा विसरला असावा असें ह्मणण्यास पुष्कळ आधार सांपडतात. कारणें कांहींही असतील. तसेंच सामर्थ्य असून शांत राहणें हें निराळें, व सामर्थ्य नसल्यामुळें एका श्रीमुखांत भडकविली असतां, भीतीनें दुसरा गाल पुढें करणें वेगळें. महाराष्ट्रांत सध्या पूर्वोक्त प्रकार कमी दिसत असून उत्तरोक्तच अधिक अनुभवास येत आहे. परंतु यामुळें साहजीकच या कमकुवत देह व मन याचा अनिष्ट परिणाम देहावर, मनावर, त्याचप्रमाणें घरावर, समाजावर होणें स्वाभाविक आहे, व तो टाळला, तर काय होईल; आपल्याला मग जग कसें दिसेल, आपण जगाला कसें दिसूं. याचा ठसठशीत ठसा याच कादंबरींत लेखकानें उठविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.]

## पुष्प चवथें.

### ले.—श्रीनिवास बी. ए.

### " जीवन कलह. "

[सामान्य मनुष्य परिस्थितीनें, धंद्याच्या, नौकरीच्या पाठीमागें लागल्यानंतर, त्याचे हालहाल कसे होतात. त्याच्या तारुण्यांतील सात्विक महत्वाकांक्षा कशा लय पावतात, व त्यामुळें कसें तरी जगण्या-

पेक्षां मेलेलें बरें असें त्याला कसें वाटूं लागतें ? हा त्याचा अधोगामी ' जीवन कलह ' पाहून मनाला विषण्णता येते; पण प्रयत्नवाद्यांस त्यांतून-ही उन्नतीचें शिखर गांठण्याचा अचुक व बिनधोक मार्ग कसा दिसत असतो, याचें साग्र व सरस वर्णन वाचकांनीं याच पुस्तकांत वाचावें. ]

---


सुरू होणार ! सुरू होणार !!

# महाराष्ट्र-कुटुंब-माला

ता. २५ मार्च १९२५-चैत्र पाडव्या पासून सरूं.

## मालेचें पहिलें पुस्तक.

छपाई व कागद सुंदर
पृष्ठ संख्या. सुमारें, २०० ] **मजूर** [ लेखक-' माईसाहेब ' कर्ते **रा. नारायण विनायक कुलकर्णी.**

सदर कादंबरी प्रवेश फी एक रुपया भरून वर्गणीदार होणारास १२ आण्यांस मिळेल. इतरांस एक रुपया. [ ता. २५ मार्च १९२५ पर्यंत मालेचे वर्गणीदार म्हणून नांवें नोंदविणारास प्रवेश फी नाहीं. व प्रत्येक मालेचें पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल. ] वर्गणीदार होऊं इच्छि-णारांनीं नावें नोंदवावींत.

**विठ्ठल रामचंद्र खाडिलकर.**

**मालकः**— श्री दत्त एजन्सी, ३९१ नारायण पेठ
पुणें शहर.

गुणलुब्धाः स्वयमेव संपदः

महाराष्ट्र-कुटुंब-माला.

पुष्प १ लें.

# मजूर

संपादक व लेखक

नारायण विनायक कुळकर्णी

मार्च सन १९२५

किंमत १ रुपाया.

संपादकः—नारायक बिनायक कुळकर्णी.
प्रकाशकः—विठ्ठल रामचंद्र खाडिलकर.
मालक श्रीदत्त एजन्सी, ३९१ नारायण; पुणें.

महाराष्ट्र-कुटुंब-माला.

पुष्प २ रें.

लेखकः—आनंदी-तनय.

## " कसे दिवस जातील ? "

( ता. २५ जून १९२५ ला
प्रसिद्ध होईल. )

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले, सेक्रेटरी;
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स, ४३५ शनवार पेठ, पुणें.

# हरिः ॐ

ईश्वर प्रत्येकाला आयुष्यांत एकेकदां तरी संधी देतच असतो. ती संधि उघडे डोळे ठेऊन ज्याला साधतां येते, तो भाग्यशाली म्हणावयाचा' असें सिद्धांत वाक्य आहे. हीच प्रचिती 'महाराष्ट्र कुटुंब माला' सुरू करतांना ईश्वर आम्हाला पटवीत आहे. 'माले'च्या कल्पनेचा जन्म होऊन अवघे दोन महिने पूर्ण होण्याच्या आंत मालेचें सदर पुष्प आम्हांला आमच्या प्रिय वाचकांच्या सेवेस सादर करतां आलें आहे, यावरून ईश्वरानें संधि दिली, आणि आम्हीं ती साधली, असेंच निरभिमानतेनें व प्रेम भक्तियुक्त अंतःकरणानें म्हणण्यास आम्हांला आनंद वाटतो.

'माले'च्या कल्पनेचा जन्म होतांच तिला उचलून धरून तिचें संपादकत्व 'माईसाहेब' नाटकाचे कर्ते श्री. **नारायण विनायक कुळकर्णी** व श्री. **काशिनाथ नरसिंह केळकर**, बी. ए.(टिळक) यांनीं आपल्याकडे हौसेनें घेतलें. तसेंच 'माले'ला हरएक बाबतींत योग्य तें विचारसहाय्य देण्यास सल्लागार मंडळ सुविद्य, उत्साही, समंजस, आणि दिलदार असें मिळालें, हें मालेचें भाग्यच होय.

'मालें'त या वर्षांतील पुष्पांची नांवानिशीवार माहिती 'माले'च्या सोबतच्या माहितीपत्रकांत दिलीच आहे. त्याशिवाय आम्हांला येथें हेंही सांगून टाकण्यास हरकत वाटत नाहीं, कीं दुसऱ्या वर्षांचें पहिलें पुष्प मालेचे सहसंपादक श्री. बापूराव केळकर यांचेंच वाचकांच्या हातीं आम्हांला देतां येणार आहे. याचप्रमाणें महाराष्ट्रांतील विख्यात पदवीधर लेखकही आपापलीं पुष्पें 'मालें'त गुंफावयाला देऊन मालेला ऋणी करणार आहेत.

'मालेंत भावंडांच्या भेटी' हें एक सदर मुद्दाम ठेवण्यांत आलें आहे. मालेच्या तीन महिन्याच्या अवकाशांत जीं मराठी पुस्तकें बाहेर पडतील–जीं मालेच्या आटोक्यांत येतील, त्यांच्या सप्रेम भेटी नियामित नमूद करून ठेवण्यांत येणार आहेत. हा प्रकार आमच्या प्रिय आश्रयदात्यांना आवडेल अशी आम्हीं आशा करतों. पहिल्या पुष्पांत ज्यांच्या

भेटी दिल्या आहेत, तीं सर्वच भावंडें आमच्याकडे आलींच असें नाहीं, ज्यांचीं जेथें गांठ पडली, तेथेंच त्यांचा परामर्ष घेण्यांत आला आहे.

' महाराष्ट्र-कुटुंब-मालेवर सुरुवातीपासूनच सर्वांचें अतोनात प्रेम आहे. 'मालेच्या' जन्माची जाहिरात फडकून अल्प काळ झाला, तितक्या अवकाशांत आश्रयदात्यांच्या सप्रेम उड्या पडल्या. 'माले'चा ' मजूर ' शक्य तितक्या त्वरित, आणि ठरल्यावेळीं व शक्य तितका ' सुन्दर ' तयार करण्याचें काम मित्रवर्य श्री. रा. **गणेश काशिनाथ गोखले** सेक्रेटरी ' **श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स**' यांनीं तत्परतेनें, प्रेमानें, आपलेपणानें केल्या बद्दल मालेनें त्यांचें आजन्म ऋणीच राहिलें पाहिजे.

' माले'चा 'मजूर' प्रेसमधून फक्त आठच दिवसांत बाहेर पडल्यामुळें, आम्हीं किंवा 'प्रेस'नें कितीही दक्षता ठेविली तरी चुका राहणें अपरिहार्य झालें याकडे लक्ष देऊन प्रिय वाचक चुकांबद्दल क्षमा करतील असा भरंवसा आहे.

ईश्वरीकृपा, स्नेह्यांचें सहाय्य, आश्रयदात्यांचा सक्रिय वाढता उत्साहच आम्हांकडून हरिः ॐ म्हणून हा ' मजूर ' हातीं देण्यास लावून या शुभक्षणीं आम्हांला अपरिमित आनंद उपभोगावयाला लावीत आहे.

नूतन संवत्सरारंभाचा हा शुभक्षण 'माले'ला व मालेच्या सर्व हितचिंतकांना कल्याणप्रद होवो !

बुधवार. वर्षप्रतिपदा
१८४७
पुणें ३९१ नारायण, पुणें.

सर्वांचा नम्र
**विठ्ठल रामचंद्र खाडिलकर**

# मजूर

## प्रकरण १ लें

## आईचा आजार

" सुगंधा, सुगंधा, कुठें आहेस बाळ ! ये बरें, तहान लागलीय !– अयाई ! पाणी हवं आहे ! बाळ, झोंप कां लागली आहे ?–रत्नु, अरे रत्नु–"

आईची हांक ऐकून मी खडबडून जागी झालें ! तोंडावर अभ्यासाचें पुस्तक तसेंच उघडलेलें होतें. तें घाबऱ्या घाबऱ्या उठतांच पुस्तक एका बाजूला पडलें. तशींच उठून आईजवळ गेलें. आईला थोडें घाबरल्यासारखें झालें होतें. आईच्या उशाशीं जाऊन बसलें. तिच्या डोक्यावर हात ठेविला. डोकें बरेंच तापलें होतें.

" आई ! " मी हलकेंच हांक मारली. थोड्याशा हांका मारण्याच्या श्रमानें आईला ग्लानी आली होती. तिनें डोळे मिटले होते. माझा शब्द ऐकतांच आईनें डोळे उघडून माझ्याकडे पाहिलें.

" तहान लागलीय ग ! पाणी देतेस का थोडें ? अंगाची कशी तलखी होते आहे ! तोंडाला कोरड पडलीय जास्ती !—" एवढें म्हणून स्वस्थ राहिली. आईला जास्त बोलवेना.

" थांब हं आई ! थोडी साबूदाण्याची लापशी करून आणतें हं इतक्यांत ! उन्हाची वेळ आहे, त्यानें जास्त घाबरल्यासारखें झालें आहे." यावर आई कांहींच बोलली नाहीं.' मग लवकर तरी आटोप.' असें बोलण्याच्या ऐवजीं फक्त त्या अर्थानें तिनें माझ्याकडे पाहिलें. मी चुलीजवळ गेलें. चुलींत विस्तव पुरून ठेवलाच होता. उकरून काढला,

फुलवला. पातेली पाणी घालून वर ठेविली, साबूदाणा, साखर, दूध जवळ घेतलें. जितक्या लवकर लापशी होईल, तितक्या लवकर पाहिजे होती, म्हणून माझा जीव अगदीं खालीवर होत होता.

पुन्हा आईनें हांक मारली.

" आलें हं आई ! इतक्यांत लापशी घेऊन येतें. तोंपर्यंत तहान मार!–"

"रत्नु कुठें आहे ग ?–त्याला हांक मारायला सांगत होतें."

रत्नु चाळीच्या खालच्या मजल्यावर आपल्या सवंगड्याशीं खेळत होता. चुलीवरचें पाणी तापत होतें. तोंवर खालीं जाऊन रत्नूला बोलावून घेऊन आलें. त्याला आईजवळ बसायला सांगितलें. मुलखाचा अचपळ तो. घटकाभर कांहीं एके ठिकाणीं बसायचा नाहीं. आतां दिखील तसेंच झालें असतें, पण मी त्याला दटावून आईजवळ बसायला लावलें होतें. आईनें त्याला जवळ घेतलें. पाठीवरून हात फिरविला. " लुच्चा, अजूनसुद्धां माझ्याजवळ बसावसं तुला नाहीं का वाटत ?— उद्यां जर मी— " पुढचे शब्द आईच्या तोंडांतल्या तोंडांतच राहिले. पण त्याच वेळीं तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले ! तें पाहतांच माझ्या हृदयांत चर्र झालें ! माझ्या ध्यानांत येण्यापूर्वींच आईनें आपल्या हातांनीं डोळे पुसले. रत्नु आईच्याजवळून निटसण्याची खटपट करीत होताच. लापशी झाली, मी आईजवळ घेऊन गेलें.

" आई, लापशी घेतेस ना एवढीशी ?—ऊन ऊन आहे तंवर घे म्हणजे बरें पडेल ! "

" नको मला बाळ, तुझी लापशी ! "

" कां ग ?–तहान लागली आहे ना तुला ? लापशी घेतलीस म्हणजे तहानमोड होईल, नी मग पाणी प्यालं तरी चालेल !—"

" पण मला आतां पाणीसुद्धां नको !—"

" कां ?—"

" बाळ, रत्नूनें कांहीं खाल्लं आहे का ग ?–त्याला आज दूध दिलेंस का ?—"

" होय ! दूध देतें आहे !–आई, ताईटली मोठी वाईट आहे बघ ! ती मला आतांशा दूध देत नाहीं. मागितलं तरी नाहीं म्हणते. आईच्य ।

लापशीला हवें आहे म्हणते ! हट्ट घेऊन बसलों तर पीठ कालवून देतें ! मी दिलें तें आज लोटून ! मी आज ताईवर रागवलों आहें !—" मी बोलायच्या अगोदरच रत्नूनें आपला पाढा आईपुढं वाचला ! त्याचें तें बोलणें ऐकून आईच्या डोळ्यांतून घळघळ पाणी आलें !–पण ती हंसली!

" रत्नु, खरेंच ताई वेडी आहे ! पण तूं खुळा आहेस !–आतां किनई उद्यांपासून मी तुझ्या ताईला दूध द्यायला सांगत जाईन !–उद्यांपासून माझें दूध रत्नुला देत जा हं !–"

मी नुसतीच होकारार्थी मान हलविली. पण त्याच वेळीं आई नको म्हणाली, तरी लापशीचा चमचा भरून तिच्या तोंडाजवळ नेला. यावेळीं ती तक्याला टेंकून बसण्याऐवजीं निजली होती. मी चमचा भरून पुढें केल्यावर आईची इच्छा नव्हती तरी, पुढें आलेल्या चमच्याला नको म्हणाली नाहीं. तिनें अगोदर पाण्याचा गुळणा करण्यास पाणी मागितलें. थोडेंसे पाणी मी तोंडांत घातलें. तिनें गुळणा केला. मग मी पुन्हा लापशीचा चमचा पुढें केला तो तिनें तोंडांत घेतला. पण तो तोंडांतल्यातोंडांत घोळूं लागला. घशाखालीं उतरेना. मी दुसरा चमचा वर करून थांबलें. पण आईनें 'थांब' म्हणून हातानेंच खुणाविलें. तोंडांतील लापशी गिळण्यासाठीं आई एकसारखा प्रयत्न करीत होती, पण तिचा इलाज चालेना. शेवटीं घशाखालीं जाण्याऐवजीं तोंडांत गेलेली लापशी तोंडाबाहेर आली !–पुन्हां आईला चूळ भरण्यास तोंडांत पाणी घातलें—

" नकोच या वेळीं तुझी लापशी, सुगंधा !" आई उद्गारली. "अगदीं जुलूम होतोय बघ ! "

" बरें तर थोडें पाणी घे हवं तर ! " म्हणून मी पाणी पुढें केलें. दोन घोट पाणी मात्र घेतलें. पाणी घेतल्यावर किंचित्शी तिला हुशारी आल्यासारखी वाटली. मग तिनें नीट निजवायला सांगितलें. तिला नीट निजविलें. तिच्या आंगावरचें पांघरावयाचें बदललें आणि जवळ बसलें. रत्नु पायथ्याशीं कांहीं तरी खेळण्याच्या नादांत गुंतला होता. आईची वृत्ति नेहमींहून मला आज निराळी दिसत होती. तिची दृष्टी एकसारखी घरांतून इकडे तिकडे पहात होती. त्या पाहण्यांतला हेतू कळत

नव्हता ! त्या पाहण्यांत रोजच्यासारखा स्थीरपणा नव्हता ! माझ्या तर काळजानें ठाव सोडला. मला कांहींच सुचेना. कांहीं तरी बोलावें वाटे, पण तोंडांतून शब्दच उमटेना. आपली वेड्यासारखी आईच्या तोंडाकडे पहात राहिलें. आईच्या कांहींशा हेतूशून्य नजरेकडे पाहून-कां कोण जाणें-मला रडूं कोसळण्याच्या बेताला आलें. माझ्याच्यानें आतां राहवेना. आईशीं लगटून बसलें. तिच्या मानेला हाताचा विळखा घातला. आणि अगदीं रुद्धकंठानें विचारलें.

" आई !—आई ! —" पुढें माझ्यानें बोलवेच ना !

पण माझी ही स्थिति या वेळीं आईच्या ध्यानांतच आली नाहीं. किंवा माझी स्थिति लक्षांत येण्यासारखी आईच्या मनाची स्थिति नव्हती म्हटलें तरी चालेल. ' आईची अखेर वेळ ' तर आली नसेल ! असें मनांत येण्याबरोबर डोळ्यापुढें चक्करच आली ! क्षणभर मी डोळे मिटून तशीच पडून राहिलें. सावध झाल्यावर दूर सरलें. न जाणों, माझ्या अंतःकरणानें ठाव सोडला आहे, हें समजतांच, आईला अधिकच यातना होतील. अंतकाळीं आईच्या आत्मारामाला अधिकच क्लेश होतील. माझ्या डोळ्यांत पाणी पाहिलें तर रत्नुही मोठ्यानें रडायला लागेल. म्हणून निमूटपणें मी आंतल्या आंत रडें आवरलें. आईच्या आणि आईच्यापेक्षां माझ्याच मनाला थोडासा विरंगुळा वाटावा म्हणून एकादें श्रीरामावरचें गाणें म्हणावें असें मनांत आलें "गाणें म्हणूं का," म्हणून मी आईला विचारणार तोंच, आईनें हांक मारली—

" सुगंधा—"

" आई, मी इथेंच आहें ! "

" बाळ, आज तारीख किती ? "

" पांच तारीख आई ! "

" अन् वार ? "

" गुरुवार ! "

" वाजले असतील किती बरें ! "

" एक वाजून नुकताच गेला आहे ! "

" होय का ?—मग संतुरामाला गिरणींतून यावयाला बराच अवकाश आहे ! "

" होय ! "

" आज संतुरामाचा गेल्या महिन्याचा पगार हातीं येईल नाहीं ?"

" होय "

" सुगंधा ! "

" काय आई ?—आई, एकादें देवाचें गाणें म्हणूं का ? होईल का तुझी करमणूक ? "

" नको ! मी देवाचें नांव घेतेंच आहें ! पण बाळ, संतुराम लवकर नाहीं का ग यायचा ?—तुला त्याची गिरणी माहिती आहे का ?—"

" नसली तरी शोधून काढीन ! "

" मग तो लवकर आला तर बरें होईल ? "

" कां ग ?—"

" काय सांगूं तुला बाळ ! संतुराम ऑफिसांतून यायच्या आंत मी मेलें तर, मग माझी त्याची गांठ कशी बरें पडेल ?—मला त्याला दोन शेवटचे शब्द सांगायचे आहेत. त्याला डोळे भरून पाहावयाचें आहे ! तुला नी रत्नुला नीट संभाळायला सांगून, तुझ्या योग्य स्थळ तुला पाहून तुझ्या जन्माचं कल्याण करण्याची जबाबदारी त्याला समजावून द्यावयाची आहे ! आणखी—"

" आणखी काय ?—" मी मध्येंच म्हटलें, " आणखी काय !—आई, हें काय बरें भलतें सलतें बोलते आहेस. तूं जर असं म्हणायला लागलीस—असा धीर सोडलास तर कसें बरें होईल ! " असें म्हणतां म्हणतांच माझ्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहूं लागला !

"रडूं नको सुगंधाबाळ ! आतां रडून काय होणार ! जें व्हायचें तें चुकणार कोठून ! माझा आज कांहीं भरंवसा वाटत नाहीं. मला तरी तुमच्यासारख्या आवडत्या चिमण्यांना सोडून जावेसें वाटतंय का ! पण 'देवाजीच्या बोलण्याला मान दिलाच पाहिजे ! म्हणून म्हटलें संतुरामबाळ जर लवकर आला—"

" आई, अशी घाबरूं नकोस. तूंच अशी धीर सोडूं नकोस ! तुला किनई बरें वाटेल. डॉक्टरला आणूं का जाऊन !—" असें म्हणून डॉक्टरला हांक मारण्याकरितां मी अर्धवट उठलें देखील. पण आईनें तसेंच बसविलें.

" आतां डॉक्टर कशाला ? नी डॉक्टराला आणून त्यांना द्यायचें काय ? वेडी तर नाहींस तूं ? गरिबाला का कुठें डॉक्टर असतात ? शिवाय हें पाहिलेंस का ? माझे पाय गार पडत चालले आहेत. माझें मरण मला स्पष्ट दिसूं लागलें आहे. नी आतां डॉक्टर कशाला ? बाळ, अशी घाबरूं नकोस ! धीर सोडूं नकोस. तूं माझी मुलगी आहेस. तुला असा धीर सोडणें शोभत नाहीं ! शिवाय तूं शिकलेली आहेस. शिकलेल्या माणसाला विचार करतां येतो ना ? आल्या प्रसंगाला तोंड द्यायला शिकावयाला नको का ?—"

आई हें कितीतरी आणि एकदम बोलली. पाण्याच्या दोन घोटांनीं तिला इतकें अवसान आलें होतें. त्या अवसानांत तिला जितकें बोलतां आलें, तितकें ती बोलली. नंतर बरीच जोराची तिला ग्लानी आली ! या वेळीं माझा धीर सुटला. क्षणार्धांत मला सारें ब्रह्मांड आठवलें. पांच वर्षांपूर्वी आमचे बाबा सोडून आह्मांला गेले. आज आई सोडून चालली. बाबांच्या दुःखाचा विसर किंचित् पडतो आहे तोंच पुन्हां हें परमेश्वर आमच्यापुढें काय वाढून ठेवतो आहे ! थोडा वेळपर्यंत मीं अगदीं गलित गात्र झालें ! मला कांहींच सुचेना. पण असें म्हणून कसें चालणार ?—गिरणींत जाऊन संतुरामाला बोलावून आणणें तितकेंच आवश्यक होतें. मी झटकन् अवसान धरून उठलें. रत्नु जवळ जाऊन त्याच्या तोंडावरून हात फिरविला. त्याचा मुका घेतला. आणि मी त्याला सांगितलें,

" रत्नु मीं इतक्यांत आपल्या दादाला घेऊन येतें, तंवर आई जवळून हलूं नको हं ! इथंच बसून खेळ बरें का ? "

हें सांगताना, व त्याचा मुका घेतांना माझे डोळे फिरून पाण्यानें भरून आले होते. मला जरा वेळ इकडचे तिकडचे देखील दिसेना ! माझ्या डोळ्यांतलें पाणी पाहून रत्नु गडबडला. त्यानें माझ्या गळ्याला मिठी घातली. " ताई, तूं कां ग रडतेस ? मी आज तुझ्यावर रागावलों,

म्हणून ? तुला ताईटली म्हटलें म्हणून ? तुझ्याबद्दल आईजवळ तक्रार केली म्हणून होय ? आतां तसें बोलणार नाहीं. तक्रार करणार नाहीं. अगदीं मुकाट्यानें आईजवळ तूं येईपर्यंत बसेन. पण तूं रडूं नकोस. तूं रडायला लागलीस म्हणजे मी पण रडेन !"

रत्नुच्या या बोलण्यानें माझी काय स्थिती झाली असेल त्याची, ज्याची त्यानेंच कल्पना करावी. त्याचें वर्णन करणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें काम आहे ! रत्नुला आईजवळ बसायला सांगितलें, नी संतुराम दादाला बोलावण्याकारितां त्याच्या गिरणीकडे निघण्यास तयार झालें. मी जायला उठलें. इतक्यांत आईनें फिरून डोळे उघडले, आणि 'संतुराम बाळ आला का?' असा मजकडे पाहून क्षीण स्वरांत प्रश्न केला. 'ही मी दादाला' बोलवायलाच निघालें आहें. ताबडतोब घेऊन येतें त्याला. रत्नु तोंपर्यंत तुझ्याजवळ आहेच. पाणी हवं आहे का तुला ?"

"होय. तेंच मी मागणार होतें."

या वेळीं एवढेंही बोलणें आईला अगदीं संकटाचें वाटलें. मी पाण्याचा प्याला तिच्या तोंडाला लावला. तिनें सावकाशपणानें पाण्याचे दोन तीन घोट घेतले. नंतर पुरे म्हणून सांगितलें. "आणि लवकर जा, जपून जा, संतुरामाला एकदम घाबरावयाला होईल, असें सांगूं नकोस. शांतपणानें त्याला घेऊन ये. माझ्याजवळ भगवद्गीतेची पोथी आणून ठेव. रत्नुला कांहीं खायला दिलें नसलेंस तर खायला देऊन जा. तो भुकेजला असेल !" आईनें सांगितलें तें मनःपूर्वक पण घाईनें उरकून मी अगोदर चाळीच्या बाहेर पडलें ! बिऱ्हाडाच्या बाहेर पडतांना देवाला अनन्यभावानें नमस्कार केला, त्याची करुणा भाकली. माझा भाऊ–संतुराम घरीं येईपर्यंत तरी माझ्या आईवर बरावाईट प्रसंग ओढवूं नकोस, अशी त्याच्याजवळ याचना केली. आणि निघालें. पण जायचें कुठें ? मुंबईला येऊन पांच वर्षें झालीं खरीं. पण दादा ज्या गिरणींत कामाला जातो, ती गिरणी कुठें आहे कशी आहे ? हें पाहिलें आहे कुणी ? आणि पाह्यचें कारण तरी काय ?–आपली शाळा, आपलें बिऱ्हाड, आणि शाळेंत झालेल्या दोन मैत्रिणींचीं बिऱ्हाडें! एवढीच काय ती माझी मुंबई ! पण आज दादाची गिरणी शोधून काढण्याची

वेळ आली. बिऱ्हाडाच्या बाहेर पडतांच प्रथम मनांत आलें कीं, तडक आपल्या वासंतीच्या–मैत्रिणीच्या बंगल्यावर जावें, तिला किंवा तिच्या घरांतील पुरुष मंडळींकडून गिरणीची माहिती विचारावी, नी मग गिरणीकडे जावें. पण पुन्हां वाटलें, "दुसऱ्याला, एवढ्या तेवढ्या करितां कशाला त्रास' पुन्हां तितका वेळ तरी कुठें आहे! त्या पेक्षां सरळ मार्ग म्हणजे स्टँडवरच्या पोलिसाला विचारावें, आणि असेंच वरचेवर विचारीत जावें. ट्रॅमनें जातां आलें असतें. कदाचित् लवकर जातां येऊन कमी त्रासांत व कमी वेळांत जातां आलें असतें; पण ट्रॅमला जातां येतां दोन आणे खर्च करण्यासही शक्य नव्हतें. अगोदर आज दोन आणे देखील नव्हते. आज संतुरामदादाचा पगार येईल तेव्हां घरीं पैसा दिसावयाचा! तोही तास अर्ध्यातासापेक्षां जास्त नाहीं. कारण तितक्या वेळांत गेल्या महिन्यांत केलेल्या उधाऱ्या, घरभाडें, किरकोळ देणीं, सामानाची बिलें, इत्यादि भागवायाचीं असायचीं! तीं सर्व भागवून रुपया आठ आणे हातांत उरलेच तर नशीब समजावयाचें! अगदीं देव पावला, असें वाटावयाचें! मजुरांच्या नशीबीं पैशाच्या सहवासाचा आनंद यापेक्षां जास्त वेळ कुठून येणार?–असो. सांगावयाचें कारण काय? तर दोन आणे ट्रॅमला देण्यापेक्षां–तेच दोन आणे आईला सोड्याची वगैरे बाटली आणल्यास उपयोगी पडले तर तें मला पाहिजे होतें. म्हणून मी ट्रॅमचा विचारही मनांत आणला नाहीं. तशीच विचारीत विचारीत जावयाचें ठरवून मी चालूं लागलें. मनांत देवाचा धांवा एकसारखा चालविला होता. उन्हाळ्यांतलें मुंबईचें ऊन्ह! डोक्याला आणि पायाला सारखेंच चटके देत होतें! पण छत्री, किंवा पादत्राण घेण्याची आमची ऐपत नव्हती! मजुरांच्या जगांत आमचा जन्म झाला होता. त्या आम्हांला शरीराच्या सुखाचीं साधनें मिळालीं नाहींत, तर त्यासाठीं कुरकुर कुणाजवळ करावयाची? कां करावयाची? तळपाय आणि मस्तक करपत होतें, तर आईच्या शेवटच्या स्थितीचें चित्र त्याहूनही आंत आगीचा भडका उडवीत होतें! आंतबाहेरचा हा भडका कळण्याइतकेंच नव्हे, तर सोसण्याइतकें माझें वय व ज्ञानही होतें! मला या बाह्य चटक्याचें कांहीं वाटत नव्हतें. छत्री किंवा पादत्राण नाहीं, याबद्दल दुःख होत

नव्हतें ! आम्हीं दरिद्री आहोंत. याचें देखील आम्हीं मनाला तितकेसें लावून घेत नव्हतों ! पण अशा दरिद्री स्थितींत, आम्हीं सुखासमाधानानें रहात असतांही देवाला व दैवाला पहावत नव्हते कीं काय कोण जाणें ! औषधाशिवाय आईला मृत्यू मारीत होता, माझ्या धाकट्या भावाला– लहान रत्नुला बालपणींच आईवांचून पोरका करित होता, मला, संतुराम-दादाला, लहान रत्नुला, प्रेमाची पांखर दूर करून, धनाच्या दारिद्याबरोबर. मायेच्या माणसांचेंही दारिद्य भोगावयाला लावण्याचा दैवाचा क्रूरपणा मला सहन होत नव्हता ! आणि त्याचें अत्यंत वाईट वाटत होतें! त्यानें आमच्या शरीरांतील शक्ति नाहींशी होत होत चालली होती! ज्यांच्या करतां शरीर कष्ट करावयाला कुणी नाहीं, ज्यांच्या श्रमाचें चीज करायला प्रेमळ मनें नाहींत, ज्यांच्या कसल्याही संकटकाळांत धनावर अवलंबून असणारीं साधनें धनीक तीं मिळवून देण्याचें मनांतही आणीत नाहींत, त्या आम्हां मजुरांचा जन्म तरी कशासाठीं ? देवा, आम्हांला असें जगवतोस तरी कशासाठीं ?–हा माझा नित्याचा प्रश्न याही असल्यावेळीं माझ्यापुढें उभा होताच ! त्या प्रश्नाला बाजूला सारून मी गिरणी जवळ करण्याच्या उद्योगाला लागलें होतें ! वाटेंत पहिल्या भल्या शिपायाला विचारतांच त्याला सांगतां आला तितका शक्य तितका–गिरणीकडे जाणारा रस्ता त्यानें समजावून सांगितला. मी त्याचे आभार मानून त्यानें सांगितलेल्या खाणाखुणा पहात झपाट्यानें निघालें.

---

## प्रकरण २ रें.

# प्रेमळ नेत्रकटाक्ष.

संतुरामदादाची गिरणी किती दूर होती कोण जाणें! धोबीतलावावरच्या आमच्या बिऱ्हाडांतून निघाल्यापासून मी एकसारखी चालत होतें. पोलिसानें सांगितलेल्या सर्व खाणाखुणा संपेपर्यंत कोणाला विचारिलें नाहीं, व कोणाला विचारावें लागलें नाहीं. नंतर दुसऱ्या एका पोलिसाला विचारण्याची पाळी आली. पहिल्या पोलिसाइतका हा सीधा दिसला नाहीं. मी दीनवाणीनें, मवाळकीनें विचारतांच तो "क्यां?" म्हणून खस्सकन् आंगावरच आला. पण शेवटीं त्यानेंही मार्ग सांगितला. सुसरीबाई तुझीच पाठ मऊ ह्मणत ह्याही पोलिसाला आशिर्वाद देत पुढें चाललें. पण चालायचें तरी किती? पाय अगदीं दमून, थकून गेले. अंगांतून घामाचे पाटच्या पाट चालले होते. श्रम करण्याची, कष्ट सोसण्याची पहिल्यापासून मला जरी संवय होती, अगदींच कांहीं ताटावरून पाटावर, नी पाटावरून ताटावर करण्यांत माझा जन्म गेला नव्हता, तरी त्या कष्टाला पण मर्यादा होतीच. त्यांतून सांगण्यासारखी गोष्ट नाहीं, पण या ठिकाणीं अंतःकरण उघडें केल्याखेरीज रहावत नाहीं. गेल्या तीन चार दिवसांत मला नी संतुरामदादाला खरोखरच अर्धपोटीं रहावें लागलें होतें. काय करणार? पगाराची तारीख जवळ आलेली. शिलकी धान्य संपलेलें. वीष घ्यायला देखील दिडकी जवळ नाहीं. कुणाकडे दिडकी अधेल्याकरितां तोंड उघडावयाची सोय नव्हती. एकाद्याकडे तोंड वेंगाडलें, आणि मिळविलें, तरी तें परत कशाच्या जिवावर करायचें? दादाचा जो कांहीं पगार येई, त्यांतच आम्हां चौघांचीं पोटें, कशींबशीं भागविल्याशिवाय गत्यंतर नव्हतें! मग महिन्याचे शेवटचे चार आठ दिवस आम्हां सगळ्यांना अर्धपोटीं राहण्याखेरीज काय उपाय होता? त्या अर्धपोटीं उपाशीपणामुळें मला फारच लवकर थकवा आला. पाय हलेनात. डोळ्यापुढें हिरवींपिवळीं चक्रें दिसायला लागलीं. मुंबईतल्या

रस्त्यांतला एवढा मोठा गोंगाट, जाणाऱ्या येणाऱ्या, ट्रॅम, मोटारीं, व्हिक्टोरिया, खटारें, बायसिकलीं, यांची आणि पायीं चालणारांचीही तशीच गर्दी; पण मला अगदीं शून्यवत् वाटत होतें! तो गोंगाट ती गर्दी, मला रंजवीत नव्हती, तशी त्रासही देत नव्हती. माझें शरीर संतुरामदादाच्या गिरणीकडे–दादाला बोलवायला चाललें होतें. आणि मन घरीं आजारी आईच्या सभोंवतीं घिरट्या घालीत होतें. अशा स्थितींत सभोंवतालच्या गर्दीची गंमत मला काय वाटणार? एकादे वेळीं अति गर्दीमुळें थोडावेळ खोळंबावें लागलें, तर त्रासदायक मात्र होत असे. अखेर एके ठिकाणीं तसेंच झालें. कुठेंसा विजेचा करंट एकाएकीं तुटल्यामुळें ट्रॅमगाड्या एकामागें एक अशा कितीतरी थांबल्या होत्या. त्यांच्या अड-थळ्यामुळें मोटारी, व्हिक्टोरिया, यालाही जायला वाट मिळणें कठीण झालें होतें, तर 'काय कसें?' म्हणून उगीचच चौकशी करणाऱ्या तमासगिरांचीही त्यांत भर पडली होती. त्यांतून मला आपला मार्ग काढणें मुष्कील झालें. तरीपण रेटीत रेटीत कसा तरी मार्ग काढलाच! पण त्या श्रमानें मी अगदींच थकलें. घेरी आली. आणि त्याच घेरींत मी धाड्-दिशीं रस्त्याच्या बाजूस शेवटीं पडलें! घेरी यायच्या वेळीं किंचित् शुद्ध होती. "आतां मला दादाची गिरणी कसची सांपडतें? आणि आईची अवस्था—" असेंच कांहींतरी अर्धवट विचार मनांत येत असतां घेरी आली. आणि स्मृति नष्ट झाली. त्या स्थितींत माझा वेळ किती गेला कोण जाणें! पण जेव्हां मी शुद्धीवर येऊन डोळे उघडले, तेव्हां माझ्या पासून थोड्याशा अंतरावर एक मोटार उभी होती. मोटारींतीलच कोणी थोर मनुष्य माझ्याजवळ येऊन मला सावध करण्याचा प्रयत्न करीत होता. माझी ती स्थिती पाहण्यास तमासगिरांची गर्दी फारशी जरी नव्हती, तरी अगदींच नव्हती असें नाहीं. अगोदर फारशी गर्दी होण्यासारखी मुंबईची स्थितीच नसतें. अगोदर रिकामा वेळ घालवायला तितका कोणाला वेळ असत नाहीं. त्यांतून माझ्याजवळ पूसतपास करणारा कोणीतरी समाजां-तला वरच्या दरज्याचा गृहस्थ होता! मग तेथें दुसरे कोणी कसे माझी दैना पहावयास थांबणार? असो. मी लवकरच डोळे उघडलेले पाहून मजजवळ उभा राहिलेल्या त्या गृहस्थास बरें वाटलें, असें दिसलें. त्याची

माझ्या हालचालीकडे एकसारखी बारीक पण तीक्ष्ण नजर होतीच. मला शुद्धीवर आणण्याकरितां त्या गृहस्थानें आपल्या मोटार ड्रायव्हरकडून जवळच्या तोटीचें पाणी आणून माझ्या मस्तकावर घातलें होतें. तोंडावरही थंड पाण्याचे हबके मारले होते. आणि म्हणूनच मला वाटतें मी शक्य तितक्या लवकर सावध झालें होतें. डोळे उघडले खरें, पण क्षणभर मी हतबुद्धच होतें. मी कोठें आहे ? वेळ कोणती आहे ? माझ्या सभोंवतीं हे लोक कां जमले आहेत, त्याचें मला ज्ञानच नव्हते ! माझी अगदीं दिशाभूल झाली होती. मी डोळे उघडले हें पाहून त्या सद्‌गृहस्थास जरी बरें वाटलें, तरी तो गृहस्थ एकदम कांहीं बोलला नाहीं. माझी स्मृति हलकें हलकें येऊं लागली. पूर्वस्थितीवर नंतर यावयाला मला फार वेळ लागला नाहीं. पूर्ण भानावर येतांच मी एकदम जाग्यावरून उठलें !— अगदीं चमत्कारिक रीतीनें समोरील सद्‌गृहस्थाकडे पाहिलें. त्या गृहस्थाचा चेहरा निरखून पाहतांच मला अतिशय आश्चर्य वाटलें. तो चेहरा ओळखीचासा वाटला. अगदीं खास-खास ओळखीचा परिचयाचा असा वाटला. पण प्रत्यक्ष या गृहस्थाला कधींच आणि कुठेंच पाहिल्याचें मला आठवेना ! मी त्याबद्दल माझ्या डोक्याला जितका जितका ताण देऊं लागलें, तितकें तितकें मन अधिकच घोंटाळ्यांत पडूं लागलें. मग मी तो नादच सोडून दिला. अगोदर या वेळीं मनाची घडी विसकटलेली होती. त्यांतून दुसरा तिसरा विचार करावयाला डोक्याला फुरसदही नव्हती ! मी उठून उभी राहिलें, आणि चालूं लागणार, तोंच त्या मोटारगाडीच्या मालकानें माझा तो बेत ओळखून मला थांबविलें; तो म्हणालाः—

" थांबा बाई, तुम्हीं कुठें जातां आहांत ? "

खरेंच ! मी कुठें निघालें होतें ? कुठें जाणार म्हणून त्या सद्‌गृहस्थाला सांगूं ? मी बोलत नाहीं, व जागचीही हलत नाहीं, असें पाहून तोच पुन्हा म्हणालाः—

" बाई, तुम्हीं कुणीही असा. मला माझ्या बहिणीसारख्या आहांत ! माझ्यापासून कसलीही भीति बाळगूं नका !–तुम्हीं उन्हांच्या तिरमीरीनें घेरी येऊन पडला होता. मला वाटतें, तुमच्या पोटांत देखील कांहीं नाहीं ! तुम्हीं अशा चालतच कुठें जाणार ? तुमच्या या घेरीनें तुमची

दिशाभूल देखील झाली आहे ! कृपाकरून आतां माझं जर ऐकाल—"

माझ्या चेहऱ्यावर काय फरक होतो हें पाहण्यासाठीं मध्येंच तो बोलतां बोलतां थांबला ! त्यावेळीं माझें असें माझेंपण फारसें माझ्याजवळ राहिलेंच नव्हतें. मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहतच राहिलें. माझी त्याचें म्हणणें ऐकायला फारशी ना नाहीं, असें पाहून त्यानें मला सांगितलें,

"आपणांला कुठें जायचें आहे तें मला सांगा. म्हणजे मी माझ्या मोटारींतून आपल्याला त्या ठिकाणीं पोंचवितों ! संकोच करायचें कांहीं कारण नाहीं. मोटार तुमच्या भावाची आहे असें समजा !–कुठें जायचें आहे तुम्हांला ?—"

"माझ्या भावाकडे !" मी सांगितलें.

"बसा तर मोटारींत ! राहतां कुठें तुम्हीं ?—"

"धोबीतलावावर !"

"धोबीतलावावर ? बऱ्याच लांब राहतां ! कांहीं हरकत नाहीं. तिकडे नेऊन पोंचवितों !"

"छे ! छे ! मला अगोदर धोबीतलावावर जायचें नाहीं. मी तिकडूनच आतां आलें आहें ! मला माझ्या भावाकडे जायचें आहे. मला फक्त रस्ता दाखवा म्हणजे मी जाईन ! मला आपली मोटार काय करायची आहे ?–आम्हीं गरीब माणसें—" मी म्हटलें.

"तें तूर्त राहूं द्या ! आपल्याला नुकतीच घेरी येऊन गेली आहे. अशक्तपणा वाढला आहे. आपला भाऊ कुठें असतो सांगा म्हणजे झालें !" त्याच्या या हुकुमी आवाजानें त्याच्या मोटारींत बसल्याखेरीज सुटकाच नाहीं, असें पक्कें कळून चुकलें. तोंडावर पाण्याचे हबके मारल्यानें बराच गारवा आला होता, पाण्याचे थेंब तसेच तोंडावर सुकत चालले होते. केसही अस्ताव्यस्त झाले होते. पदरानें तोंड पुसले. केस सावरून नीटनेटके केले !

"सांगतां ना तुमचा भाऊ कुठें असतो तें–संकोच किंवा भीति मुळींच बाळगूं नका, म्हणून एकदांच सांगितले आहे !"

"माझा भाऊ 'इच्छारामभाई–मिल्स'मध्यें असतो. त्याच्याकडे जायचें आहे !" मी सांगितलें !

" काय ? तुमचा भाऊ 'इच्छारामभाई—मिल्स'मध्यें असतो ?" आश्चर्यानें दोनतीन वेळां हाच प्रश्न त्यानें मला केला ! " तिथें काय करतो तो ?'!

" मिलमध्यें माझा दादा नोकर आहे !"

" होय तें खरें ! पण त्याचा हुद्दा काय ?"

" मजुराला हुद्दा असतो कीं नाहीं मला माहित नाहीं !-"

" काय ? तुमचा भाऊ गिरणींत मजूर आहे ?"

" होय ! मजुरांचा मोकदम—मोठा मजूर म्हणा वाटेल तर ! नाहीं तर हेंच नांव गोंडस दिसण्याकरितां 'सुपरवायझर' म्हणावें त्याला. ज्याला जसें आवडेल तसें त्याला सांगावें, असें माझा दादा नेहमीं म्हणतो !—"

" अस्सें !" म्हणून तो सद्गृहस्थ मनापासून हंसला. त्याला काय वाटलें कुणाला ठाऊक ! " बरें बसा तर खऱ्या मोटारींत ! तुमच्या मजुरमोकदम भावाला भेटायला, हा मोटारवाला मजूर घेऊन जातो आहे असें समजा ! बरें पण अशा अवेळीं—उन्हांतान्हांत भावाला भेटायची इतकी काय जरूरी पडली होती ? त्याचा चालू कामाचा तुमच्या भेटण्यामुळें खोळंबा व्हावयाचा ! शिवाय तुम्हांला इतका त्रास !—तुमची कांहीं हरकत नसली तर सांगा. नाहीं तर माझा कांहीं आग्रह नाहीं !"

" तें सगळं मला माहित आहे !" मी मोटारींत चढत म्हटलें. " एरव्हीं अशी उगीचच भेटायला दादाकडे गेलें असतें, तर दादा देखील माझ्यावर रागावला असता ! म्हणून दादा इकडे कामाला यायला लागल्यापासून मी चुकून देखील इकडे आलें नाहीं. पण आज अगदीं निरुपाय झाला, यावेंच लागलें !"

" कां बरें ? आजच अशी काय येण्याची जरूर पडली !—"

" आमची आई घरीं अंथरुणाला आज कित्येक दिवसांपासून खिळून आहे ! आज तिनें अगदींच धीर सोडला ! दादाला बोलावून घेऊन ये म्हणाली—म्हणून आलें मी !—घरीं आईची काय स्थिति असेल कोण जाणें !—मला घरून निघाल्याला किती तरी वेळ झाला !" हें सांगतांना

माझ्या डोळ्यांतून आपोआपच पाणी यावयाला लागलें. पण मी हें सांगतांच त्या सद्गृहस्थानें क्षणाचाही विलंब केला नाहीं. मोटार एकदम चालू केली! मी रडत असतांना एकदांच त्या गृहस्थानें माझ्याकडे पाहिलें! मीहि त्याच्याकडे पाहिलें! त्या वेळीं उभयतांची दृष्टादृष्ट होतांच मला निराळाच अनुभव आला! अंगांतून विजेचा झटका निघून गेल्यासारखें झालें! दया, प्रेम, अनुकंपा, सहानुभूति, हें सर्व त्या दृष्टींत एकवटल्याचा मला भास झाला! खरेंखुरें कांहींही असो, पण मला मात्र तसें वाटलें खरें! पुन्हां त्या गृहस्थानें मागें वळून पाहिलें नाहीं कीं, एक शब्दानें दुसरी कसली चौकशीही केली नाहीं. जरा वेळ गेला नाहीं तोंच मोटार थांबली! गिरणीच्या समोर मोटार उभी राहिल्याचें माझ्या लक्षांत आलें! ड्रायवरनें दार उघडलें. मी खालीं उतरलें. त्या सद्गृहस्थानें बोट करून गिरणीच्या मॅनेजरचें ऑफिस दाखविलें, आणि म्हटलें. "तिथें जाऊन मॅनेजरकडे चौकशी करा. म्हणजे ते तुमच्या भावाला भेटवतील, व घरीं जायला त्याला रजा पण देतील. मोटार तोंपर्यंत मी येथेंच उभी करितों. तुम्हांला व तुमच्या भावाला तुमच्या बिऱ्हाडीं नेऊन पोंचवितों! म्हणजे शक्य तितक्यालवकर तुमच्या आईला जाऊन भेटाल. आई पण काळजी करणार नाहीं!"

"नको! नको! खरेंच नको! मी दादाला घेऊन जाईन! इतके उपकार आम्हीं गरीबांनीं आपले फेडायचे तरी कसे? आपण खुशाल जा" मी एकदम म्हणालें.

"उपकाराची भाषा बोलूं नका म्हणून मी म्हटलें आहे ना?" तो गृहस्थ आर्जवून म्हणाला.

"होय खरे तें! पण माझा दादा अगोदर आपल्या मोटारींत बसायचा नाहीं. मीच इथवर बसून आलें म्हणून तो माझ्यावर रागवेल. आपल्याकारितां दुसऱ्याला तसदी द्यायची नाहीं, असें त्याचें अगदीं सक्तीचें सांगणें असतें! म्हणून म्हणतें! जा आपण खुशाल! देव तुमचें कल्याण करो!" इतकें म्हणून मी झटक्यानें मॅनेजरांच्या ऑफिसाकडे पाय वळविलें. पुन्हां तो भला गृहस्थ आणखी उपकारांच्या ओझ्याखालीं वांकवील, या भीतीनें मागें वळून देखील पाहिलें नाहीं.

चांगली पंचवीस तीस पावलें गेल्यानंतर मोटरचा हॉर्न वाजला. तेव्हां मोटार निघून गेली असें माझ्या लक्षांत आलें. बिचारा इतका वेळ आमच्यावर आणखी कसे उपकार करावें या विचारांत गढला होता. माझ्या कठोर वर्तनानें त्या उपकारकर्त्याचें मन खट्टुही झालें असेल, त्याला वाईट वाटलें असेल; कदाचित् माझ्या, व मी वर्णन केलेल्या दादाच्या स्वभावाच्या उर्मटपणाबद्दल—हो आमच्या स्वभावाला उर्मटपणांतच त्यानें ढकललें असेल—त्याला रागही आला असेल. कांहीं झालें असो मी तेथून निसटलें खरी !—

वरील सांगितलेला प्रकार किती थोडक्यावेळांत घडून आला होता ! मला वर्णन करायला किती तरी त्या मानानें वेळ लागला आहे. प्रत्यक्ष प्रकार चालला असतां जणूं काय मी स्वप्नमय आयुष्यांतच वावरत होतें असें मला वाटलें ! आम्हीं बोलून चालून गरीब मजुरांच्यामोलाचीं माणसें, गाड्या, घोडे, मोटारी ही आम्हांकारितां नव्हतच मुळीं ! आम्हांला त्या कशा मिळणार ! आम्हीं त्यांत बसतो तरी कशाला ? आणि बसवितो कोण ! मोटारींतून वावरणारा वर्ग धनिक—श्रीमंत—मजुरांचा तिरस्कार करणारा—मजुरांना पायाखालीं तुडविण्यांतच आनंद मानणारा असावयाचा, अशीच माझी दृढ समजूत. मी दादाबरोबर मुंबईस आल्यापासून शाळेंत कित्येक गरीब, श्रीमंत माझ्या मैत्रिणी झाल्या होत्या मी सर्वांशीं मैत्री ठेवी. पण श्रीमंत म्हटल्या कीं आपोआपच मला त्यांचा तिरस्कार वाटे. मी मनांतून त्यांची हेटाळणी करी. दादाच्या शिकवणीनें ती हेटाळणी कधीं बाहेर दाखवीत नसे इतकेंच ! पण आज धनिकाबद्दल मला उलटा अनुभव आला होता ! मोटारींतून वावरणारा श्रीमंत असलाच पाहिजे. बरें जर श्रीमंत तर त्यानें आम्हां मजुरांच्याबद्दल इतकी दया, इतकी सहानुभूति कां दाखवावी ? इतके श्रम व वेळ कां आमच्याकरितां खर्च करावीं ? याचा उलगडा माझा मला होईना ? दादाला हें सांगितलें तर त्याला काय वाटेल ? तो काय ह्मणेल? 'आईला सोडून तूं आलीसच कां ? ' असेंच म्हणून तो पहिल्यांदा मला वांकडें लावील, आणि रागवेल. मला त्यानें अलिकडे शाळेला देखील जायची बंदी करून आईजवळ अष्टौप्रहर बसायला सांगितलें

असतां, घाबरल्यास्थितींत वेडेपणानें आईला सोडून आलें. त्याबद्दल दादा काय म्हणेल ?–याच विचारांचा धुमाकूळ माझ्या डोक्यांत एक सारखा चालला होता. त्यांतच त्या गृहस्थानें माझ्याकरितां आपला वेळ कां मोडला ? आपल्या मोटारींत कां बसविलें ? मी कां बसलें ? मात्र त्यानें माझें नांव विचारलें नाहीं, मी त्याला त्याचें नांव विचारलें नाहीं. आतांपर्यंत–यापूर्वीं कधींही परस्परांची गांठ पडली नाहीं. या नंतरही पुढें कधीं गांठ पडण्याचा संभव व कारण नाहीं. मग त्यानें माझ्याशीं असें वर्तन कां केलें ? त्यानें माणुसकी दाखविली. यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. आणि त्याच्या वर्तनांत जास्त कांहीं असावें अशी मला तरी कां अपेक्षा असावी ? मोटारींतल्या माणसांतही माणुसकी असते, तेही मजुरांना माणसेंच समजतात. इतकें त्या गृहस्थाच्या वर्तनावरून पटलें तरी पुष्कळ नाहीं का झालें ? खरोखरच पुष्कळ झालें, या विचारांनीं माझें समाधानही पण झालें. त्या मनुष्याच्या प्रेमळ वर्तनानें, प्रेमळ कटाक्षानें, माझ्या पूर्वग्रहदूषीत मनावर बराचसा चांगला, व निराळा प्रकाश पडला. आणि दादा नेहमीं म्हणतो त्याप्रमाणें हे आपले दिवस सदैव असेच राहावयाचे नाहींत, यांत मला बरेंचसें सत्य दिसूं लागलें ! हो, अकारण उपकार करण्यास प्रवृत्त होणारीं त्या माणसासारखीं माणसें जर याच जगांत वावरताहेत, तर दादाचें म्हणणें खरें कां होणार नाहीं ?

या विचारांनीं माझ्या मनाला उत्तेजकता आली. हुरूप आल्यासारखा झाला. आज मजसारख्या गरीबाला अचानक मोटारींत बसायला मिळालें होतें, म्हणून माझा मलाच आनंदही झाला होता; व त्याबरोबर आपल्या अधिकाराचें अतिक्रमण मोटारींत बसण्यानें आपल्याकडून झाल्यामुळें मनाला मधूनमधून कसेंसेंही झालें होते. या प्रमाणें मानसाकाशांत ऊन्ह पाऊस सारखा चालू होता ! व पाय गिरणीच्या मॅनेजराच्या ऑफिसच्या अनुरोधानें चालले होते !

आतां मनाला एकच चुटपुट मधून मधून सतावीत होती. ती ही कीं या भल्या माणसाला आपण पूर्वीं कधीं पाहिलें नसतां हा चेहरा ओळखीचा कसा वाटला ? 'याला कुठें तरी केव्हां तरी पुष्कळ वेळां पाहिला

असावा,' असें कां वाटतें ? याचा उलगडा कसा व्हावयाचा! 'हा गृहस्थ कोण ! ' म्हणून दादाला तरी कसें विचारायचें ? त्यानें तरी त्याला कुठें पाहिला आहे ? असे विचारांचे हेलकावे चालले असतांच इच्छारामभाई मिलच्या मॅनेजरच्या दारांत मी जाऊन थडकलें. व हलकेच आंत डोकावून पाहिलें.

मॅनेजर खुर्चीवर बसले असून हातांत कसलें तरी वर्तमान पत्र होतें, व त्याच्या वाचनाच्या नादांत ते गर्क असल्याचें मला दिसलें !

मॅनजरचे ऑफिस गिरणीच्या मुख्य दरवाजाच्या आंतल्याच बाजूला होतें. नंतर बरेच मोठें मध्यें पटांगण असून पलिकडे प्रत्यक्ष गिरणीच्या इमारती होत्या. गिरणींतला धडधड खडखड आवाज दूरवर ऐकावयाला येत होता. पटांगणांतून इकडून तिकडे तिकडून इकडे माणसाची ये जा' चाल-लीच होती. मॅनेजर मजकडे केव्हां पाहतील या विवंचनेंत असतांच पटांगणांत वावरणाऱ्या माणसांकडे मी लक्ष लावून पहात होतें. हेतु इत-काच कीं न जाणों कामा निमित्त दादा फिरतांना दिसला, तर बरेंच झालें. मला पाहतांच तो होऊन इकडे येईल, व मॅनेजरला विचारण्याचा माझ्या-वरचा प्रसंग टळेल !

बराच वेळ झाला तरी तसें कांहीं झालें नाहीं. मॅनेजरचें डोकेंही वर्त-मानपत्रांतून वर निघेना. ' आतां काय करावें ? ' असा मला प्रश्न पडला. आपल्या आगमनाची व अस्तित्वाची जाणीव कशी द्यावी हेंही मला समजेना ! हलकेच ऑफिसांत पाय ठेवला, व आंतल्याच बाजूला एक लांबलचक बांक होतें, त्याच्या एका टोंकाशीं टेकलें, आणि मॅनेजर वर पाहण्याची वाट पाहूं लागलें.

देवाला माझी करुणा आली ! गिरणीचा भोंगा एकदम वाजूं लागला, त्यासरशी मॅनेजरच्या हातचें वर्तमानपत्र एका बाजूला सरलें; आणि ऑफिसांतल्या घड्याळाकडे मॅनेजरनें आपली दृष्टी वळविली, तों त्याला बांकावर बसलेली मी दिसल्यें !–

मॅनेजरनें मजकडे पाहतांच मी बांकावर बसलें होतें ती उठून उभी राहिलें!

मॅनेजरसाहेब किती तरी वेळ माझ्याकडे टक लावून हाते !

# प्रकरण ३ रें.

## मॅनेजर खुशालचंद.

मॅनेजर खुशालचंदांची शरीरयष्टी वेताच्या काठीसारखी किडकिडीत, उंचीनें बरीच जवळजवळ सहा फूट. वर्णानें निमगोऱ्याहून जास्त गौर! चेहरा चौकोनी, दृष्टी कावळ्याची, चंचलपणा, अधिकाराची हौस दर्शविणारी! चोंचीदार नाक! कान बाजवीपेक्षां लहानच, तोंडाला बेडौल करणारे. स्वारीला मिशा बोडण्यांतच भूषण वाटत असावें असें दिसलें. डोक्यावर साहेबी हॅट घालण्याची आवड दिसली. कारण या वेळीं जरी स्वारी बोडकीच होती व वाढलेल्या केसांचा भांग पाडून आपल्या चमत्कारिक डोक्याचें चमत्कारिक प्रदर्शन करण्यांत गढली होती तरी, समोरच्या टेबलावर साहेबी टोपी पडलीच होती! डोळ्यावर फुटका चष्मा चढविला होता! खरोखरीच दृष्टी साफ नव्हती, कीं फॅशन म्हणून चष्मा नाकावर चढविला होता, हें त्याचें त्यांसच माहीत! कोटपाटलून, बूट–तो सर्व जामानिमा ठाकसेठीक मॅनेजरच्या जागेला शोभण्यासारखाच होता! लांबलचक खालच्यावरच्या ओठांनीं युक्त असें तोंडाचें एंजीन स्टेट एक्सप्रेस–सीगारेटच्या साह्यानें धुराचे भपकारे सोडीत होतें! कपाळावर तिरस्काराच्या–त्रासाच्या—चढेलपणाच्या आठ्यांनीं या वेळीं महत्वाची जणूं काय मिटींगच बोलावली होती! मग काय नेहमींची स्वारीची सुरतच अशी, कीं आतांच्या वर्तमानपत्राच्या त्रासदायक माहितीनें हें स्वरूप नटविलें होतें, हें कळणें दुरापास्त होय! माझा दादा जर या वेळीं इथें असता, आणि तुझ्या मॅनेजरनें असा कां चेहरा केला आहे, म्हणून मी त्याला विचारलें असतें, तर इंग्लंडांत मजुरपक्षाचे पुढारी सर रामसे मॅक्डोनाल्ड मुख्य प्रधान झाले–म्हणून या सत्तेच्या कुत्र्यानें अर्धा दीड हात लांब जीभ बाहेर काढली आहे, आणि पोष्टाच्या पेटीसारखें तोंड करून मनांतला त्याविषयींचा तिटकारा सहन होईना म्हणून करवंदीचें जाळें कपाळावर पसरलें आहे! आजकाल इंग्लंडांत पार्लमेंटांत

मजुरपक्षानें जसा सर्वांवर जय मिळविला आहे, तसाच लवकरच 'इच्छा• रामभाई मिल 'मध्यें आम्हीं मजूर या मॅनेजरच्या अधिकाराला पायाखालीं तुडवून श्रेष्ठ होणार म्हणून, या बेट्यानें असा खेटरें मारल्यासारखा चेहरा केला आहे " अशा सारखेंच कांहीं तरी चमत्कारिक उत्तर दिलें असतें. असो !

अशा या तीन ठिकाणीं वांकड्या, नोगीच्या माकडछाप मॅनेजरला आपण स्वरूपसुंदरच आहोंत असें वाटत असे. जसा देह तसाच स्वभावही आहे, असें दादा त्याचा विषय घरीं निघाला असतां सांगे ! याच्या नकला, याची अधिकाराची ऐट, आवाज, वर्तन, या सर्वांची करमणुकीकरितां सुट्टीच्या दिवशीं दादा नेहमीं सोंगें आणी. ती स्वारी प्रत्यक्ष मी आज पाहिली. पाहतांक्षणीं स्वरूपाविष्करण तर तंतोतंत पटलें. आतां स्वभावाचा मासला बोलण्याचालण्यावरून कळावयाचा होता. त्याचेंही घोडामैदान दूर नव्हतें ! संतुरामदादा वर्णन करतो तसें बाह्यांगांत तर आहे, हें पाहूनच मला आंतल्याआंत हंसू आलें होतें !—

त्यानें माझ्याकडे पाहण्यांत, आणि मी त्याच्याकडे पाहण्यांत असा वेळ चालला होता. मला बोलायचें भान राहिलें नाहीं. आणि खुशालचंद मॅनेजरनेंही अजून बोलावयाला सुरवात केली नव्हती ! पण असें किती वेळ चालणार ? कुणीतरी बोलायला सुरवात करावयाला हवीच होती. मी माझ्या मनाची सांवरासांवर करून विचारणार तोंच मॅनेजरांच्या तोंडाची तोफ डागली जाणार असा रंग दिसू लागला. त्यानें तोंडांतली सिगारेट दूर केली; माझ्याकडे रोख लावला. कपाळावरील आठ्यांचा नकाशा बदलला. तिरस्कार, तुच्छता, अधिकाराची घमेंड, निर्लज्जपणा, डौल इत्यादिकांच्या विकारांनीं थोडा थोडा वेळ मॅनेजरांच्या मुखश्रीवर कसरत केली, आणि लगेच त्यापैकीं कोणत्याशा एका विकारानें मॅनेजरांच्या तोंडाची तोफ डागली ! तोफेच्या सरबत्तीबरोबर पुढील मुक्ताफळें माझ्या कानावर आदळलीं.

' ए भिकारणी, इथें कशाला उभी राहिली आहेस?—ही गिरणी आहे गिरणी ! इथें कांहीं माझें किंवा माझ्या बापजाद्याचें घर नाहीं, समज-

लीस ! चल हो चालती !–अरे अजून हलत नाहीं ! लोचट कुठली !–बॉय, ए बॉय, या भिकारणीला हांकलून देरे ! "

आतां बोलल्याशिवाय सोयच नव्हती ! मॅनेजराच्या बोलण्याचा शक्य तितका परिणाम मी माझ्या मनावर होऊं दिला नाहीं. निदान झाला तरी तो शक्य तितका करून तोंडावर दिसूं दिला नाहीं. मॅनेजरचा बॉय जवळपास नव्हता. तो येऊन मला बाहेर काढीपर्यंत मी 'काय कसें' बोलायचें त्याची जुळवाजुळव करीत होतें. मॅनेजरनें आपल्या बॉयला हांका मारण्याचा सपाटाच लावला होता. बॉय लवकर येईना म्हणून बुटाचे पाय फरशीच्या जमीनिवर, आणि हाताच्या मुठी समोरच्या लांकडाच्या टेबलावर आपटण्याचा त्यानें उद्योग आरंभिला होता. बॉय लवकर येत नाहींसा पाहून स्वारी स्वतःच जागेवरून उठली, पण जागेवरूनच ओरडून म्हणाली:—

" ए भिकारणी होतेस कीं नाहीं चालती ? तुला ऐकायला तरी येतें आहे कीं नाहीं ? का वेडीबिडी आहेस ? "

" मी भिकारीण नाही !"

" मग कोण आहेस ?–भिकारीण नाहीं म्हणे ! मॅनेजरनें तोंड वांकडे केलें.

" मी मजुराची बहिण आहें ! "

" मजुराची बहिण ?–बायको नाहींस का ? असशील बहिण ! मग ? इथें कशाला आली आहेस ?–तुझा मजूर भाऊ आहे कुठें ?–" मॅनेजर जसजसा माझ्याकडे न्याहाळून पाहूं लागला. तसतसा एकेक प्रश्न जास्त जास्त करूं लागला, व 'जा, चालती हो' हे शब्द हलके हलके त्याच्या तोंडांतून येईनासे झाले ! त्यानें आणखी तेंच विचारलें " कुठें आहे तुझा मजूर भाऊ !

" याच तुमच्या गिरणींत असतो !" मी माझा शांतपणा सोडला नव्हता !

" बरें मग ? त्याला भेटायचें आहे ? कीं त्याच्याबद्दल कांहीं तक्रार सांगायची आहे ?– त्यानें आपल्या पगाराचे पैसे दारूपाण्यांत खर्च केले. घरीं आणले नाहींत, हें का तुला सांगायचें आहे ? पण त्याला आम्हीं काय करणार ? आम्हीं पगार दिला म्हणजे सुटलों. मग आमच्यावर

जबाबदारी नसते, आणि आम्हीं तशी जबाबदारी घेतही नाहीं कुणाची! मॅनेजरांनी आपलें वाक्पांडित्य सुरू केलें.

"बाकी आजकालचे मजूर तसे फारच फाजील आणि उनाड झाले आहेत. घरीं दारीं कुणाच्याच कह्यांत ते राहात नाहींत! बेट्यांच्याकडून पगार न देतां चोवीस तास चोपून काम करून घ्यायला पाहिजे! बाकी तुझ्याजवळ हें बोलून काय करायचें?—हं मग सांग, तूं इथें कां आलीस?" तुझ्या भावाच्या संबंधानें—"

"तशी कांहीं माझी तक्रार नाहीं. फक्त—" मी त्याचें बोलणें तोडून बोलायला सुरवात केली, तर तितक्याच घाईनें मॅनेजरनें माझें बोलणें थांबविलें. व आपली चपटपंजरी सुरू केली. आतां याच्या भाषणाला वळसा देऊन दादाबद्दलची चौकशी करणें, आणि त्याला ताबडतोब घरीं घेऊन जाणें, मुष्कीलीचें वाटूं लागलें. मला थांबवून व जणुं काय मी पुढें काय बोलणार हें ओळखूनच त्यावर आपली मल्लीनाथी त्यानें चालूं केली —

"फक्त काय? तुझ्या भावाबरोबर याच गिरणींत तुलाही काम पाहिजे? आहेत, आमच्या गिरणींत बायकांही कामाला पुष्कळच आहेत. पण तुझ्या संबंधानें म्हणशील तर, तें कांहीं होईलसें दिसत नाहीं. आमच्या गिरणींत इतक्या बायका आहेत ना? पण तुझ्या शपथ तुझ्या सारखी देखणी एक देखील बाई नाहीं! अगोदर तुझा भाऊ, आणि तूं एकाच ठिकाणीं काम करणार असल्यानें कामापेक्षां बोलण्यांत जास्त वेळ काढाल. शिवाय तुझ्या सारखी देखणी पोरगी गिरणींत कामाला ठेविली, तर गिरणींतल्या एका तरी मनुष्याच्या हातून काम नीट होईल काय? हातांतल्या कामाकडे दुर्लक्ष करून प्रत्येकजण तुझ्या सुन्दर रूपाकडेच पहात राहील! आणि अशा रीतीनें गिरणींत कामाला ठेवायच्या माणसाची मी निवड करूं लागलों, तर आमची अक्कल गिरणी तेव्हांच मातीला मिळवील, नाहीं का? तेव्हां तसें कांहीं आम्हांला कामाला ठेवतां येणार नाहीं समजलीस? त्यापेक्षां तुझ्या भावाला महिन्या काठीं चारदोन आणे देण्याबद्दल सांगत असलीस, तर तुझ्या भावाच्या कामाची तितकी किंमत नसली तरी, केवळ तुझ्या सारख्या सुन्दर तरुणीच्या शब्दां-

करितां मी माझ्या अधिकारांत मी ती गोष्ट कबूल करीन समजलीस ?— यापेक्षां आणखी कांहीं तुला सांगायचें आहे का ?—"

वरील मॅनेजराच्या निर्लज्जपणाच्या बोलण्यानें मी जागच्याजागीं थिजूनच गेलें होतें. पण करायचें काय ? परिस्थितीनें मला तें निमूटपणें ऐकून घेणें भाग होतें. मॅनेजरच्या बाष्कळ बडबडीनें एक दोन घटकांपूर्वी मनाला आलेला उल्हसितपणा पार मावळून गेला होता !

या नंतर झाला यापेक्षां जास्त निर्लज्जपणा मॅनेजरच्या तोंडचा ऐकायला नको म्हणून मी एकदम दादाची चौकशीच करणार होतें, तोंच मॅनेजरचा इतका वेळ कुठें गेलेला बॉय आला. मॅनेजरचें लक्ष त्याच्याकडे गेलें.

" साहेब मला हांक मारिली ? त्या ह्यानें मला सांगितलें. सोड्याच्या बाटल्या पोंचवायला गेलों होतों—" मुलानें आपली कैफियत दिली.

"बरें तर!" आपला कांहीं त्याच्यावर राग राहिला नाहीं, हें एवढ्याच शब्दानें मॅनेजरनें त्याला दाखविलें.

" कांहीं काम आहे ?— " मजकडे पहात त्या मुलानें मालकाला विचारलें.

"ही तुला मालकीण कशी काय शोभेल ? म्हणून तुला विचारायला हांक मारिली होती !-पहा हिला. मला बायको, तुला मालकीण—आहे कीं नाहीं ठीक ? तिच्या दरिद्री खादीच्या फाटक्या कपड्याकडे पाहूं नकोस. उद्यां माझी झाल्यावर चांगल्या चुंगल्या कपड्यांनीं पहा मग कशी चमकेल?— सध्यां हिच्या नुसत्या रूपाकडेच पहा ! "

असें म्हणून त्या मुलाकडे आणि माझ्याकडे आळीपाळीनें पहात मॅनेजर मिस्किलपणानें फिदीफिदी हंसूं लागला. या वेळीं त्याचा मला इतका संताप आला होता कीं, एक जाऊन माकडाच्या श्रीमुखांत भडकवावी ! पण ती वेळ नव्हती ! आणि त्याक्षणीं माझ्याठिकाणीं तितकें त्राणही नव्हतें ! माझा चेहरा रागानें लाल झाला. या पुढें त्याला दुसरें तिसरेंही मुळींच कांहीं न बोलूं देतां एकदम त्याला विचारलें—

" मी माझ्या भावाला बोलवायला आलें. घरीं आमची आई अतीशय आजारी आहे. आत्तांच्याआत्तां माझ्या भावाला आजच्या दिवसापुरती

रजा द्या आणि आम्हांला घरीं जाऊं द्या कसे ?"–

हें बोलतांना मी त्याच्याकडे पाहिलेंही नाहीं. दाराच्या बाहेर पाहूं लागलें!-

" आई अजारी आहे ? "

" होय ! -"

" अजून मेली नाहीं काय ?–या मजुरांचे आई, बाप, भाऊ, काके, मामे, बरें नेहमीं नेहमीं यांच्या रजेच्या सोयीकरितां आळीपाळीनें आजारी पडायला तयार होतात ! मजुरांना हा गोतावळा इतका मोठा कसा असतो कोण जाणें ! तरी बेट्यांना खायला प्यायला असत नाहीं ! लवकरच ही नातलग मंडळी मरून तरी जायला पाहिजेत. यांच्यामुळें आम्हांला गिरणी मजुरांना वरचेवर रजा द्यावी लागते–कामाचा घोंटाळा होतो–मालकाचें नुकसान होतें ! आम्हांला जबाबदार धरतात ! याच्यापुढें मजूर कामाला ठेवायच्या आधीं त्याच्या गणगोताची पूर्ण चौकशी केली पाहिजे. मजुराला आया किती आहेत, बाप किती, भाऊ किती, बहिणी किती–बाकी हिच्या सारख्या एकदोन बहिणी असल्या तर तो मजुरी करायला येईल कशाला आमच्याकडे म्हणा !–काय रे बॉय ? तुला किती आईबाप आहेत ? खरें एकदां सांगून टाक. म्हणजे तुला माझ्या जवळ कायम ठेवायचें कीं नाहीं हें मला ठरवितां येईल–फारसे नाहींत ! ना आईबाप तुझ्या रजेकरितां वरचेवर अजारी पडायला ?–बाकी, या मुलीचा भाऊ गाढव दिसतो ! मजूरच तो ! त्याला काय अक्कल आहे? अक्कल असती तर असलें हातचें घबाड सोडून गिरणींत हमाली करायला कशाला मरायला आला असता !–पोरी, तुला राग येऊं देऊं नकोस. पण तुझा भाऊ बडा गद्धा असला पाहिजे !—"

" आपण माझ्या भावाला रजा देणार आहांत का ?"—मी अगदीं रडकुंडीस येऊन विचारलें !

" अग हो. तुझ्या भावाला रजा द्यायची आहे नाहीं का ?–तुमची आई खरी अजारी असो; नाहीं तर खोटी, तुझ्या सारख्या सुन्दर तरुणीनें खोटी सबब सांगितली तरी ती माझ्या सारख्यानें खरीच मानली पाहिजे! तुझ्या भावाला रजा काय उद्यांपासून पाहिजे ? बिनपगारी सुद्धां चार दिवसांपेक्षां जास्त देण्याची वहिवाट नाहीं, आमच्या गिरणीची !"

" रजा आज पासूनच पाहिजे आहे–आतांच पाहिजे ! " मी म्हटलें.

" मग आज रजेला काय करायचें आहे ? आज गिरणीला अडीच वाजल्यापासून सुट्टीच आहे ! आज पे-डे असल्यामुळे पगार करून सुट्टी दिली आहे ! " मॅनेजरनीं माहिती दिली.

गिरणीला सुट्टी झाल्यावर दादा कशाला थांबेल ? तो केव्हांच गेला असेल. या पशूनें आडवें तिडवें बोलण्यांत वेळ घेतला, तो मी येतांच सांगितलें असतें तर ?—आतां इथें थांबून काय करायचें आहे ? दादा घरीं देखील पोंचला असेल. बरें झालं, आई जवळ कुणीं नव्हतें. आम्हीं जाईपर्यंत. तो दादा अगोदरच गेला. पण आतां उशीर करून भागावयाचें नाहीं. आई नी दादा मला आणखी वेळ लागला तर जास्तच काळजी करीत बसतील ! मॅनेजराच्या ऑफिसांत थांबण्याचें कामच उरलें नाहीं. मी कांहीं न बोलतां मुकाट्यानें ऑफिसाच्या बाहेर पाय ठेवला. त्या बरोबर "अरे, मला न विचारतां निघालीस ? कांहीं रीतभात ठाऊक आहे कीं नाहीं ? बरें, तुझ्या भावाचें नांव नाहीं सांगितलेंस ? सांगून ठेव. मी तुझ्याबद्दल त्याला मुद्दाम विचारणार आहें ! काय तुझ्या भावाचें नांव?"

त्याला उत्तर द्यांयची माझी मुळींच इच्छा नव्हती. पण नाहीं बोललें तर पशू आणखी कांहीं बाष्कळ बडबडायचा, म्हणून बोलणें भाग पडलें·-

" माझ्या भावाचें नांव संतूराम !"

" कोण ? संतुराम—संतुराम !—म्हणजे आमचा मोकदम—सुपरवायझर का काय ? दॅट फेलो—यंग क्रीचर—संतु·-शार्प अँड क्लेव्हर लॅड ! ओह्हो ! तो का तुझा भाऊ ? तूं का त्याची बहिण ? मग मूर्खमुली पहिल्यांदा कां नाहीं हें मला सांगितलेंस ? तूं आमच्या संतुरामाची बहिण, म्हणजे माझीच की ग तूं ? काय गद्धा आहे संतु ! तुझ्या सारखी त्याला बहिण असतांना त्यानें मला कधीं सांगितलें नाहीं ! खरोखरच मी म्हणतों तें उगीच नाहीं ! संतू गद्धा, अजागळ, पशू, पाषाण, बेअक्कल, वाटेल तें म्हटलें तरी त्याच्या बाबींत कमीच पडणार आहे ! मुली, माझ्या बोलण्याचा राग मानूं नको हं. मी आपला सरळ, आणि मनांत येईल तें बोलणारा आहें ! चार अपशब्द बोललों तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं समजलीस !–तुझी आई अजारी असल्याबद्दल देखील कधीं संतू

बोलला नाहीं माझ्या जवळ ! जाऊं दे. झालें तें झालें ! उद्यां कामावर आल्यावर त्याचा कान पकडून विचारतों कीं अशा सोन्यासारख्य। बहिणीची काय दैना चालविली आहेस ! नाहींतर चल आतांच तुझ्या बरोबर घरीं येतों. तुझ्या आईची प्रकृती पाहायला मिळेल. बॉय, जा बरें व्हिक्टोरिया घेऊन ये ! तुमचं बिऱ्हाड कुठें गांवदेवीला का ?—"

" नाहीं. धोबीतलावावर—जेरमहालांत—तिसऱ्या मजल्यावर !—दत्तासाहेबांचे पोटभाडेकरी म्हणून आहोंत आम्हीं ! " मला इतकें उत्तर द्यावेंच लागलें.

" कांहीं हरकत नाहीं ! माझ्या बरोबर तुला गाडींतून नेतों ! " असें म्हणून स्वारी व्हिक्टोरियाची वाट पहात तोंडानें शीळ फुंकीत ऑफिसाच्या जागेंत इकडुन तिकडे येरझाऱ्या घालूं लागली. ही एक ब्यादच झाली ! नाहीं म्हणावं तरी पंचाईत ! होय म्हणावें तरी पंचाईत ! मॅनेजरच्याहातून तसें निसटणें आतां अशक्य होतें. त्याच्याच तंत्रानें घेतल्याशिवाय सोय नव्हती ! त्याच्या शिव्यांनीं दादाच्या किंवा माझ्या अंगाला भोकं पडत नव्हती. बरें, वाटेल तें जरी बडबडत होता, तरी दादाचें नांव कळतांच, त्याची भाषा, व आवाज, एकदम बदलला होता, हें माझ्या लक्षांत येऊन चुकलें होतें. दादाबद्दल त्याचें मत पण वाईट दिसलें नाहीं ! त्यामुळें माझा निम्मा जीव खालीं पडला, कांहीं जरी बडबडला तरी माझ्याशीं फाजीलपणा करण्याची त्याचीं छाती नव्हती, हें मी इतका वेळच्या त्याच्या बोलण्यावरून, आणि आजपर्यंतच्या दादाच्या सांगण्यावरून ओळखलें होतें. तेव्हां त्याच्याच तंत्रानें घरापर्यंत-त्याच्याच व्हिक्टोरीयांतून जायला माझें अर्धेअधिक मन तयार होत आलें होतें !

" तुझं नांव काय सांगितलेंस ? "

कांहीं तरीच विचारावयाचें म्हणून मॅनेजरनें विचारलें.

" मी माझें नांव सांगितलेंच नाहीं !—माझ्या भावाचें नांव सांगितलें !" मी उत्तरलें.

" बरें आतां सांग !—बरीच हुशार आहेस !—आतां विचारतों, आतां सांग !—"

" सुगंधा माझें नांव !—"

" सुगंधा ! छान! छान! फारच छान! तुझे आईबाप मोठे रसिक असले पाहिजेत! मग आमचा संतुच तेवढा कसा तुमच्यांत इतका अरसीक निघाला! मी तर म्हणतों, मी लवकरच गिरणीचा मालक होईन तेव्हां त्याला माझ्या गिरणीचा मॅनेजर करीन ! माझ्या गिरणीच्या मॅनेजराची बहिण अशा दारिद्र्यांत! अगदींच वेडा संतु! बाकी लग्न लागलें तरी आपण सुगंधा हेंच नांव कायम ठेवणार! आपल्याला आवडलें हें नांव!–"

जसा कांहीं याचा माझा वाङ्‌निश्चय होऊन सुद्धां गेला ! अधिकाराच्या तोऱ्यांत राहणाऱ्या माणसांचें नेहमीं असेंच असतें ! हाताखालच्या कोणाहीबद्दल, आणि कसेंही बोललें तरी, त्यांत आपण कांहीं चूक करतों, असें त्यांना वाटतच नाहीं ! पुन्हां आपली बाजू सांवरून धरायला, ' माझें आपलें सरळ–स्पष्ट, बोलणें असतें ! मला वाटेल तें मी बोलत असतों ! दुसऱ्यासारखें आंत एक बाहेर दुसरें–असें नसतें आमचें'–असें म्हणावयाची यांची तयारीच असावयाची ! असो. पण करायचें काय ? आपल्या बिऱ्हाडीं सोडीपर्यंत काय बोलेल तें ऐकून घेण्याशिवाय सुटका नव्हती ! शिवाय आतां जितक्या लवकर बिऱ्हाडीं जातां येईल, तितक्यालवकर जावयाला हवं होतेंच.

मॅनेजरची सारखी टकळी चाललीच होती. पण आतां विषय व आवाज जो एकदां बदलला तो बदलाच ! गाडी आली, आम्हीं दोघेही गाडींत बसलों गाडीवाल्याला 'धोबीतलाव' म्हणून सांगितलें. गाडी चालू झाली. मॅनेजर खुशालचंद सारखी बडबड करीत होता. मी त्याला ' हूं ' देखील म्हणत नव्हतें ! मोटारींतल्या गृहस्थाच्या वर्तनांत आणि या मॅनेजराच्या वर्तनांत काय फरक असावा, याची तुलना करण्यांत मन गुंतलें होतें ! दोघांनींही गाडींत बसविलें. दोघांच्याही गाडींत बसलें. पण दोघांच्याबद्दल मी विचार करीत होतें. माझ्या विचाराच्या व खुशालचंद मॅनेजरांच्या बडबडण्याच्या भरांत गाडी धोबीतलावावर केव्हां आली मला कळलेंहीं नाहीं. गाडी थांबली. मी गाडींतून उतरलें. मॅनेजरानें तितक्यांत काय विचार केला कोण जाणें ! तो गाडींतून उतरला नाहीं. मला म्हणाला, —

" मी उतरतों म्हटलें, पण आतां नाहीं उतरत. आतां उद्यां सकाळीं तुझ्या आईची प्रकृति पाह्यला मुद्दाम येईन ! संतुला सांगून ठेव !— उशीर झाला आहे. जातों आतां ! " असें म्हणून गाडीवाल्यास गाडी हांकण्यास सांगितलें.

मी तशीच माडीच्या पायऱ्या चढूं लागलें ! मला बाहेर पडल्याला किती वेळ झाला होता ! बाहेर पडल्यापासून काय काय चमत्कार तरी दादा करितां गेलें तों, दादा माझ्या अगोदर घरीं ! त्या दृष्टीनें माझा हेलपाटा फुकटच झाला होता !—' दादा काय म्हणेल ! आईची प्रकृति कशी आहे ? एवढेच विचार माडीच्या शेवटच्या पायरीवर आलें तेव्हां मजजवळ शिल्लक राहिलें ! तशीच घाईघाईनें मी माझ्या दाराकडे वळलें !

---

## प्रकरण ४ थें.

# दुःखांत सुख !

" अरे वा ! बबूताई !–अन् तूं इकडे कुणीकडे ? "

आमच्या बिऱ्हाडाच्या उंबरठ्यांत पाऊल टाकलें, नीं आंत पाहतांच माझ्या तोंडांतून वरील उद्गार निघाले ! बबूताई माझ्या शाळेंतील—क्लासांतील मैत्रीण होती. ती एका धनाढ्याची–श्रीमंताची मुलगी. ती आज आमच्या बिऱ्हाडीं. तेव्हां साहजीच मला आचंबा वाटला ! बबूताई आईच्या उशाशीं बसली असून संत्र्याची फांक आईच्या तोंडांत घालण्याकरितां म्हणून तिनें हातांत घेतली होती. जवळच्या बशींत एक संत्रें तसेंच, एक फोडलेलें होतें ! संतुदादा पश्चिमेच्या खिडकीजवळ ट्रंकेवर हातपाय ताणून बसला होता. कामावरचे कपडे त्याच्या अंगावर नव्हते. बदललेले होते. त्यावरून त्याला घरीं आल्याला बराच वेळ होऊन गेलेला होता, हें उघडच आहे. रत्नु दादाच्या पाठीवर पडून बबूताईनें खारीक कीं काय दिली होती, ती चघळीत पडला होता ! आईच्या तोंडांत संत्र्याची पहिलीच फांक अजून घोळत होती. मला पाहतांच सगळ्यांनाच बरें वाटलें. पण मला दादाकडे पाहण्याचें धाडसच होईना. मी आपली बबूताईला पाहतांच तिच्याशींच बोलावयाला सुरवात केली !

बाहेरून आलेले पाय होते. म्हणून मोरीवर जाऊन धुतलें नी आईच्या दुसऱ्या बाजूस जाऊन बसलें. आणि बबूताईला म्हटलें:—

" खरेंच बबूताई, आज तूं इकडे कशी आलीस ? "

" कशी म्हणजे मोटारींतून !–खालीं माझी मोटार नाहीं का उभी ?" बबूताई उत्तरली !

" अस्सं ! दरिद्यावर गंगाच लोटली म्हणायची ? "

" पण दरिद्री कसला वस्ताद ? गंगेचा लोट चुकवून आपण आपलें कोरडेच्याकोरडें दरिद्री राह्यचें म्हणून गंगेचा लोट येण्याच्या आधींच दरिद्री बाहेर पसार !–नाहीं बबूताई ? " दादानें संधी साधली !

"खरेंच केव्हां आलीस तूं ? आम्हां गरिबांच्या घरीं बरें यावेसें वाटलें?" मी दादाकडे पाहिलेंच नाहीं !

" आपण मुलुखगिरी करायला बिऱ्हाडाच्या बाहेर पडला, आणि त्या आल्याच पहा ! त्या येऊन चांगले तीन तास होऊन गेले !–" पुन्हां दादा बोलला !

" अरे बाळ, तिला कां बोलतोस ? मला जास्त घाबरल्यासारखें झालें, म्हणून मीच तुझ्याकडे बोलवायला तिला पाठविलें; म्हणून मी नाहीं का सांगितलें ? " आईनें सावकाशपणें बोलत माझी बाजू घेतली !

" तूं गेलीस नी मी आलें. गेल्या आठ दिवसांत तूं शाळेला आली नाहींस. आपली गांठ पडली नाहीं. कां शाळेला येत नाहींस हेंहीं कळेना. मला कांहीं चैन पडेना. म्हणून म्हटलें एकदां जावें तरी ! शाळा सुटली. माझी मोटर मला घ्यायला आलीच होती. मागें एकदां या बाजूनें मी जातांना तूं आपले बिऱ्हाड या बिल्डिंगमध्यें आहे म्हणून दाखविलें होतेंसच ! मोटर इकडून घ्यायला सांगीतली, नी तुला भेटायला वर आलें ! पण इथें येतें तों काय ? रत्नु त्या कोंपऱ्यांत खेळताखेळतां तसाच जमीनीवर पडून झोंपी गेला होता. आई मात्र दाराकडे डोळे लावून होत्या. त्यांना जरी बोलवलें नाहीं, तरी त्यांनीं मला खुणेनें जवळ बोलाविलें. मी जवळ आल्यावर " तुम्हीं आमच्या सुगंधेची मैत्रिण कां ? म्हणून विचारलें. मी होय म्हटलें, मग त्यांनीं बसायला सांगितलें. तूं साबूदाण्याची लापशी तशीच जवळ ठेऊन गेली होतीस. आईच्या मनांतून बोलायचें तर फार होतें. पण बोलायला शक्ति कुठें होती ? चुलीवरचें पाणी आणण्याकरितां त्या उठून तिथवर जाण्याची खटपट करूं लागल्या. पण माझ्या तें लक्षांत आल्यावर मी त्यांना उठूं न देतां मीच पाणी आणून दिलें. त्यांना 'लापशी'ही आग्रहानें जाईल तशी खायला चमच्याचमच्यानें घातली, नी पाणी दिलें. मग थोड्या वेळानें माझ्या मोटारडायव्हरला सांगून मार्केटांतून हीं फळें आणलीं–"

" इतकें जों होत आहे, तोंच अस्मादिकांची स्वारी इथं थडकली. पहातों तों माझ्यापुढें हें दृश्य ! पहिल्यांदा तर मला वाटलें मी माझी–

जागा चुकलों कीं काय ? कारण आमची ताई असा पोषाख कुठून कर-णार ? पण मी गोंधळांत पडलेला पाहून—व तेवढ्यांत आईनें हा माझा मुलगा.' म्हणून बबूताईनीं माझ्याचप्रमाणें गोंधळून जाऊं नये या करितां ओळख करून दिल्यावर बबूताईनींच मला थोडक्यांत पुष्कळ माहिती करून दिली. त्यांत आपली स्वारी अस्मादिकांना बोलवायला आमच्या हमालखान्याकडे चालती झाल्याचेंही बाहेर आलेंच !—बरें, पण आमचा हमालखाना सांपडला का तरी तुला ? "

" हो ! न सांपडायला काय झालें ? तुझी गिरणी झाली तरी ती मुंबईतच आहेना ? मनुष्याला तोंड असल्यावर दिल्लीला नाहीं का जातां येत ? मग मुंबईतील गिरणी शोधायला काय कठीण ?—"मी म्हटलें!

" अरेच्या ! बरीच शहाणी आहेस म्हणायची !—बबूताई, पाहिलेंत तुमच्या मैत्रिणीचें शहाणपण ? उगीच नाहीं, तिनें मुंबईतील आमचा हमालखाना हुडकून काढला ?—बरें पण त्या हमालखान्यांत तुझा संतु-दादा भेटला का ?—" दादानेंच विचारलें !

" हो ! अगदीं गेल्याबरोबर !—"मी उत्तरलें !

" हं ! मग तो काय म्हणाला ? " दादानें भिवया चढवीत विचारलें!

" तो म्हणाला कीं मी आतांच तुझ्यापुढें पगार हातीं घेऊन घरीं गेलों आहें ! " मी म्हटलें.

" शाबास ! तरी पण माझी बहिण आहेस ! होशील—होशील तयार होशील !"

आम्हीं बोलत होतों, आणि बबूताई एकसारखी हंसत होती ! तिला आमच्या प्रत्येक बोलण्याची मौज वाटत होती ! मध्येंच रत्नु दादाजव-ळून येऊन माझ्या मांडीवर बसला, आणि त्यानें बबूताईकडे बोट करून म्हटलें, " ताई, या आमच्या नव्या ताई ना ? भारी चांगल्या आहेत या ! यांनीं मला खाऊ दिला—हो खाऊ दिला. आणि किनई तूं जसा माझा मुका घेतेस, तसा यांनीं पण घेतला ! पण मी यांच्यावर रागावलों नाहीं ! ताई ! आतां तूं एक माझा मुका घे ?—" म्हणून रत्नुनें आपलें तोंड पुढें केलें. ही मध्येंच उपस्थीत झालेली रत्नुची बाल लीला पाहून बबूताईला आनंदाश्रु लोटले ! आईला यावेळीं पुष्कळच बरें वाटत

होतें. दुपारची चढाची वेळ निघून गेली होती. नेहमींहून तीन चार दिवस तिच्या पोटांत दूध देखील कमी गेलें होतें. मग अगोदरच अशक्त प्रकृतीवर इतका परिणाम झाला तर त्यांत काय नवल? पण या वेळीं आईला पुष्कळच बरें वाटत होतें. बबूताई हलके हलके संत्र्याच्या फांकी आईच्या तोंडांत घालीत होती. आणि ती पण घेत होती. आई आम्हां सर्वांकडे क्षीण डोळ्यांनीं पण समाधान वृत्तीनें पहात होती. आणि शांत चित्तानें आम्हां सर्वांचीं बोलणीं ऐकत होती! संत्र्याची एक फांक उचलून बबूताईनें आईच्या तोंडाजवळ नेली, आणि आई ती फांक तोंडांत घेत आहे, अशा वेळीं दादा मजकडे वळून म्हणाला, "ताई, हें दृश्य पहा! एका धनाढ्याची कन्या, एका अनाथ आईला तिच्या रुग्ण स्थितींत असें अमृतासारखें फळ चाखवीत आहे! दृश्य किती गोड आहे नाहीं? या आपल्या शत दरिद्री जागेचें, या मज-सारख्या मजुराच्या वस्तीस्थानाचें, त्याच्या या छोटया कुटुंबाचें, आणि या अशा कुटुंबांत केवळ तुझ्यावरील प्रेमाकरितां मलबारहिलवरील ऐश्वर्य-संपन्न बंगल्यांतून मालकी हक्कानें वावरणाऱ्या बबूताईसारख्या धनिक कन्येनें—असल्या जागेंत बसण्यांत आनंद मानावा. आमच्यांत मिसळण्यांत सुख मानावें! याचें शब्दचित्र कसें उठवशील सांग बरें!—बबूताई, आमची ही आजची अजागळ ताई पुढें मोठी लेखिका होणार आहे, तुम्हांला असेलच माहीत! आणि तेवढ्याचकरितां ती शिकते आहे—म्हणून मी तिला या वेळच्या—या स्थितीचें वर्णन करायला सांगितलें!—हं, बोल ताई—कर पाहूं वर्णन!—धोबीतलावावरील जेरमहालांतल्या तिसऱ्या मजल्यावरील एक अत्यंत लहान—अडचणीच्या कोपऱ्यांतील एक खोली—हं पुढें—"

"पुढें काय?—पुढचें वर्णन अगोदरच इतका वेळ केलें आहेसच कीं तूं! तेंच रात्रीं डायरींत लिहून ठेवीन म्हणजे झालें!" मी म्हटलें.

"खरेंच, सुगंधाताई, संतुदादाचें आतांचें बोलणें टिपून ठेव! याच्याइतकें दुसरें चांगलें वर्णन कुणालाच करतां यायचें नाहीं!" बबूताईनें माझ्याच म्हणण्याला पुष्टी दिली.

" तें कां ?–आणखी आमच्याच उसनवारीवर आपला लेखनसंसार चालविणार वाटतें ? वा ! मग चांगलीच लेखिका होणार तूं ! आतांच्या-सारखं वर्णन माझ्यासारख्या कुणीही सामान्य माणसानें करावें. पण लेखिकेचें वर्णन यापेक्षां निराळें पाहिजे. निराळ्या रीतीनें करतां आलें पाहिजे–दुसऱ्या प्रकारानें मी दाखवूं का करून ? पण मी तें तुला माझ्या परवानगीशिवाय तुझ्या डायरींत टिपून देणार नाहीं हं !–याच स्थितीचें चित्र लेखकाच्या लेखणीनें असें रेखाटतां येईल.—"

" अरे पण, " त्याला मध्येंच थांबवून आई म्हणाली, " तुम्हीं सारेच बोलता आहात तर खरें. पण नुसतेंच कसें बोलतां आहांत ! या आपल्या घरीं आल्या आहेत, सुगंधा बाहेरून भटकून दमून आली आहे, तूं आल्यापासून तसाच बसला आहेस ! तसेंच बोलायचें तें कांहीं तरी करून घेऊन ' खातखात ' बोलत बसा "

" याला म्हणतात आईचं अंतःकरण ! आम्हीं आपले चांगलें नुसतें बोलतच राहिलों आहोंत. पण बोलाचीच कढी बोलाचाच भात जेऊ-नीया तृप्त कोण झाला ?" ताई ऊठ ! चट्टदिशी नी कशा छानदारशा फोड-णीच्या लाह्या करतेस पाहूं या ! करीत करीत तुला ऐकतां येईल. खात खात आम्हांला बोलतां येईल !—लाह्याबरोबर आणखी कांहीं दुसरें करायचें असेल, तर तेंही कर ! आज माझा पगार झाला आहे ! आज आपण राजे–श्रीमंत–बादशहा आहोंत ! पुढची पांच तारीख येईपर्यंत सबंध नाहीं तरी अर्धपोटीं चैनींत राहावयाला कुणाच्या देवालाही भिणार नाहीं !–आणूंका आणखी कांहीं ? आज तर चैन करूं या ?—काय बबूताई, सुदामाच्या घरचे पोहे आवडतील कीं नाहीं ?– नाहीं तर आईनें खायचं नांव काढल्याबरोबर तुम्हीं आपल्या आमच्या ताईला म्हणायच्या " उशीर झाला बाई पुष्कळ ! जातें आतां मी !–हो, गरी-बाच्या आईला तुम्हीं फळफळावळ आणून दिलें, तिची सेवाचाकरी केली–त्या गरींबांच्या घरीं पोहे कसे घ्यायचे ? असें वाटायचें तुम्हांला!-" एवढें दादाचें व्याख्यान झाल्यावर बबूताई काय त्यावर बोलणार ! अगो-दर तिच्या मनांत असें आलें नव्हतें–आलें असतें तरी ती बोलली नसती,

आणि आतां तर काय ? चकारही निघणें शक्य नव्हता. दादाच्या बोलण्यानें हलवून खुंटा बळकट झाला होता ! मी दादाचें बोलणें चाललें असतांच चुलीजवळ जाऊन विस्तव चेतवायला लागलें होतें. बबूताईचें लक्ष दादाच्या बोलण्याकडे लागलें होतें. दादा पुढें केव्हां बोलूं लागेल, असें तिला झालें होतें ! गरीब काबाडकष्ट करणाऱ्या माणसांत अशीं हंसत खेळत गमतीच्या गोष्टी बोलत काळ कंठणारीं माणसें असतील, याची तिला कल्पनाही नव्हती ! आणि असणार तरी कुठून ? गरीबी ही चीज काय असते ? गरीबांचीं घरें काय असतात—याची चौकशी तरी करण्याचें बबूताईसारख्या गर्भश्रीमंत मुलींना काय कारण ? तिनें गरीबाची स्थिती उभ्या आयुष्यांत आजच आमच्या इथें पाहिली होती ! आमच्या बिऱ्हाडांत पाऊल घातल्यापासून सगळेंच कांहीं नवीन नवल वाटत होतें. प्रत्येक गोष्ट ती लक्षपूर्वक पहात होती, ऐकत होती ! 'सुगंधाताई' आपली मैत्रिण गरीबींतली आहे, एवढेंच तिला माहित. पण तिची प्रत्यक्ष गरीबी तिनें आज बिऱ्हाडीं येऊन डोळ्यांनीं पाहिली होती. खचीत् बबूताईला आज कल्पनेपेक्षां निराळ्या जगांत—स्वप्नसृष्टींतच वावरत आहोंत, असें वाटत असलें पाहिजे ! असो.

मी फोडणीच्या लाह्या करण्यांत गुंतलें, रत्नु हा हळूंच खेळण्याकरितां सगळ्यांचा डोळा चुकवून दाराच्या बाहेर पडला. बबूताई दादा बोलण्याची वाट पहात त्याच्या तोंडाकडे पाहात राहिली होती. दादा बेफिकीरपणानें तोंडानें शीळ घालीत बसला होता. अखेर बबूताईच्यानें रहावेना. दादाला बोलावयाला लावण्याकरितां ती म्हणाली " या खोलीचें वर्णन कसें केलें असतें तें सांगायचें राहिलेंच तितकें ! "

" Oh yes ! मला वाटतं लाह्या खातां खातां तें वर्णन करायचं होतें ! आतां करतों. कांहीं हरकत नाहीं !—ताई, ऐकते आहेस ना ? ऐक, पण ऐकण्याच्या नादांत लाह्यांची फोडणी बिघडवूं नकोस हो !—" असें म्हणून दादानें सांगायला सुरवात केली !

" संतु मजुराच्या राहत्या खोलींत पाय ठेवतांच काय दिसलें ? तर हिन्दमातेची शोचनीय स्थिति ! संतुची आई हीच कोणी हिन्दमाता ! तिच्या जवळपास कोणी नाहीं ! मजुरांची माय ती ! तिच्याजवळ कोण

असणार ! मजुर मुलें मजुरी मिळविण्यासाठीं तशाच स्थितींत मातेला ठेऊन बाहेर पडलीं आहेत. " " तिच्या मुली ' आईचा जीव ' भूकेनें, तहानेनें काळजीनें घाबरा झाला, म्हणून आपणही घाबरून जाऊन वेडेपणानें आपल्या मजूर भावाला शोधण्यासाठीं बाहेर पडल्या आहेत ! हिन्दभूमीचीं रत्नुसारखीं अज्ञान अर्भकें वस्तुस्थितीचें ज्ञानच नसल्यामुळें खुशाल खेळतां खेळतां झोंपी गेलीं आहेत ! " अगोदर भरपूर खायला प्यायला नाहीं, असलेलें खायला द्यायला जवळपास कुणी नाहीं ! हिन्दमातेच्या त्या वेळच्या नेत्रांत " आशा–निराशेची सारखी झटपट चालली आहे ! " " तोंच कुणी देवदूतिका हिन्दमातेच्या मुलाबाळांच्या पूर्वपुण्याईनें निगडीत होऊन–प्रेमाच्या आशेला गुंतून हिन्दमातेला शेवटची घरघर लागावयाचा वखत आला असतां अवतीर्ण झाली ! आणि ती मरत्या मातेची प्राणज्योत सतेज करण्याकरितां आपल्या हातांनीं खाऊं पिऊं घालूं लागली ! हिन्दमातेला थोडथोडी हुशारी वाटूं लागली ! ती एक एक शब्द बोलूं लागली ! तितक्यांत तिचीं मजूर मुलें मुली तिथें आल्या ! त्यांनीं तें दृश्य पाहिलें ! त्या देवदूतिका आपल्या आईला जगवीत आहेत हें पाहिल्यावर त्या मजूर मुलाला कोण आनंद झाला असेल ! त्याचें वर्णन करण्यास या वेळीं माझें तोंड–व हें वर्णन कोणी लिहील त्या वेळीं त्याची लेखणी असमर्थ असेल यांत नवल काय ?–वगैरे वगैरे ! "

इतकें बोलून दादा थोडा वेळ थांबला ! नंतर एकदम मोठ्यानें हंसला. त्यानें आह्मां सर्वांकडे एकदां पाहिलें ! तों माझ्या, आईच्या, आणि बबूताईच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या ! थोडा वेळ जाऊं देऊन दादा म्हणाला " कां कसें काय वर्णन केलें ?–लेखिकेला जमेलसें केलें कीं नाहीं ? "

" याचें सप्रमाण व साधार उत्तर म्हणजे आमच्या तिघींच्या डोळ्यांतील पाणीच देत नाहीं का ?—" मी दादाला म्हणालें !

" हेंच निर्व्याज, निर्मल, दिव्य जीवन आईला जगवील, वांचवील, आणि आईसुद्धां सगळ्यांना सुखाचे आनंदाचे दिवस दाखवील ! " बबूताईच्या तोंडून सहजोद्गार निघाले !

" तथास्तु ! " दादा म्हणाला !

माझ्या फोडणीच्या लाह्या तयार झाल्या होत्या. तीन बशांत घालून बबूताईपुढें दादापुढें बशा ठेवल्या. मी माझ्यापुढें बशी घेतली. इतक्यांत बाहेर खेळत असलेला रत्नुही आला. त्याला थोड्याशा त्याच्या बशींत घातल्या. सगळ्यांनीं खायला सुरवात केली ! खातांना 'आणखी कांहीं तरी बोला हो' म्हणून बबूताई दादाला म्हणाली.

"ही आमच्या आईच्या कीर्तनाची खिरापत बरं का !" दादा उद्गारला. बबूताईला खूप हंसू आलें !

लाह्या खायच्या झाल्यावर बबूताई जायला उठली ! पुष्कळ उशीर झाला होता. ती मला म्हणाली, "पुन्हां येईन मी ! आतां आईच्या समाचाराला नेहमीं येत जाईन !–पण आजपर्यंत तूं कांहीं कधीं आमच्याकडे आली नाहींस ! केव्हां येशील ? खरें म्हटलें तर मी तुला आज बोलवायलाच आलें होतें. आमचा भाई–माझा थोरला भाऊ–परवांच विलायतेहून आला. त्याला भेटायला माझ्या सगळ्या मैत्रिणी येऊन गेल्या तूंच येवढी राहिली होतीस. तूं यावेंस असें त्या दिवसापासून मला सारखें वाटत होतें, पण तेव्हांपासून तुझी माझी गांठच नाहीं ! मग केव्हां येशील सांग ? मी मोटार घेऊन येईन न्यायला !–संतुदादा, सुगंधाताईला घेऊन जायला आलें तर पाठवून द्याल ना ?–"

"हो, वाटेल तेव्हां ! माझें हो काय त्यांत जाणार ? चांगली तिला तुमच्या मोटारींतून मिरविण्याची ऐट तर माझ्याजवळ मारायला येऊं द्या कीं ?—" दादानें उत्तर दिलें !

"बरें झालें. ताईच्यामुळें तुमची आज ओळख झाली ! फार आनंद झाला मला ! तुम्ही याल का आमच्या बंगल्यावर !—" बबूताईनें दादाला विचारलें.

"नाहीं !" दादानें साफ उत्तर दिलें.

"कां ?" वाईट तोंड करून फिरून बबूताईनें विचारलें.

"थोरापासुनि दूर दूर फिरतो लाजोनि वस्त्राविणें !" दादानें तालासुरांत म्हटलें ! बबूताई यावर नुसतीच हंसली ! तिचें वाईट वाटणें कोठच्या कोठें मावळलें !

" तुह्मी आपल्या आमच्या ताईला घेऊन जात जा ! तिच्यावर लोभ केलात म्हणजे माझ्यावर केल्यासारखाच आहे ! ताई आणि मी कांहीं तीन नाहीं ! "

" आई, मी जातें हं आतां ! मी तुमच्या सुगंधाताईसारखीच तुह्मां-ला आहें ! तशीच माझ्यावर माया करा बरं का ?—तुह्मी आतां लवकर बऱ्या व्हाल ! मी आतां वरचेवर तुम्हांला पाह्यला येत जाईन ! माझी आई मला लहानपणींच सोडून गेली आहे. माझ्या सुगंधाताईची आई तीच माझी आई असें मी समजतें ! कराल ना माझ्यावर प्रेम ?—" आईनें यावर मंद हास्य करीत होकारार्थी मान हलविली ! " सुगंधाताई, संतुदादा," बबूताई आमच्याकडे वळून ह्मणाली, "मी सांगायला नकोच पण आईला यापेक्षां जास्त जपत जा बरें का ? वेळच्यावेळीं औषध, खायलाप्यायला, दिलें गेलें पाहिजे नाहीं का ? उद्यां मी आमच्या फॅमिली डॉक्टरला घेऊन येऊं का ?—"

" छे छे ! डॉक्टरला काय करायचें आहे ?—ह्मणजे आम्हीं डॉक्ट-राच्या फीला डरतों असें नव्हे ! पण आम्हांला डॉक्टर-वैद्य वर्ज अस-तात ! मजुरांना नेहमीं नॅचरोपॅथी मानवते ! शिवाय आमच्या आईची इच्छा मरायची असली तरी, सध्यां तिला फुरसद कुठें आहे मरायला ? तिच्या हातून कित्येक गोष्टी व्हायच्या आहेत. तिनें अजून कित्येक गोष्टी करायच्या आहेत. तिनें अजून कित्येक गोष्टी पहायच्या आहेत. तिनें अजून कित्येक गोष्टी दाखवायच्या आहेत !—माझ्या सुगंधाताईच्या दोन दोन मुलांना दोहोंकडे घेऊन आमच्या इनामदारीच्या गांवीं कडीपाटा-च्या झोंपाळ्यावर बसून मुलांना अंगाई गीतें तिला गायचीं आहेत ! आमच्या रत्नुच्या बायकोला, आणि रत्नुला मांडीवर बसवून त्यांच्या तोंडांत साखर घालावयाची आहे !— आमच्या आईला आपल्या नात-वाची वरात हत्तीवरून निघालेली आमच्या इनामगांवीं पहावयाची आहे! नाहीं का ग आई ? " हें अत्यंत गंभीरपणानें जरी दादा बोलत होता, तरी माझी व बबूताईची प्रत्येक वाक्यानें हंसून हंसून मुरकुंडी वळत होती !

बबुताईला थोडीशी शंका येऊन तिनें दादाला विचारलें:—" संतु-दादा, आपली अर्धांगी कुठें आहे ?— "

" माझी अर्धांगी माझ्या भावी श्वशूरांच्या घरीं !—माझ्या लग्नाचें पुष्कळ-ह्मणजे अर्धें तरी जुळलें आहे ! ह्मणजे लग्नाची अर्धी तयारी— मी, वर-तयार आहें ! वधूचें जमलें कीं, झालेंच शुभमंगल समजा ! "

" तशीच सुगंधाताईच्या लग्नाची पण कांहीं तरी व्यवस्था केलीच असेल ! " बबूताई हें विचारतांना हंसत होती, आणि आपल्याला आणखी हंसावयाला लागणार, म्हणून अपेक्षाही बाळगीत होती !—

" ताईला काय ? कोणीही चिंतुछाप वानर आपला संसार थाटायला खुषीनें वधूदक्षिणा देऊन घेऊन जाईल ! त्याची नाहीं मला काळजी ! बाकीं आम्हीं वधूदक्षिणा घेणार नाहीं आहों,-नाहीं तर भलताच गैरसमज करून घ्याल !—बरें आहे, बराच उशिर झाला आहे तुम्हाला. खालीं तुमचा ड्रायवर तुमची वाट पाहून पाहून कंटाळून डुकल्या घेत असेल. तुमचा बहुत व अमूल्य वेळ घेतल्याबद्दल आम्हीं क्षमा करतों तुम्हांला—या म्हणजे जाच आतां !" आतां तर बबूताईची मुरकुंडी वळली " वा ! वा ! बरें येतें हं ! रत्नु-येऊं ना रे ?— "

" अहो नव्या ताई, मी येऊं का तुमच्या मोटारींतून ?" रत्नु उड्या मारीत मोटारीकडे निघाला. पण तितक्यांत दादाचा डोळा मोठा झालेला पाहतांच जागच्याजागीं थबकला !—

" येतोस ? चल तर !--नाहीं तर ताईबरोबर उद्यां परवां ये हं !" बबूताई बोलत बोलत मोटारींत जाऊन बसली. मी दादा, पोंचवायला खालींपर्यंत गेलों होतों.

" सुगंधाताई, संतुदादा, तुमच्या इथें आलें, पण मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ? असा आनंद मी जन्मांत आजवर कधीं अनुभवला नाहीं ! गरीबींत इतका आनंद असतो, याची मला कल्पनासुद्धां नव्हती ! गरीब झाल्यावर जर नित्य इतका आनंद मिळणार असेल, तर मी गरीब व्हायला एका पायावर तयार आहें !—खरेंच तुम्हीं सगळे जण कित्ती-कित्ती चांगलें बोलतां !— "

" असें बोलणें, असें बोलण्यांत आनंद मानणें--आणि असा काल काढणें हेंच आमचें दुःखांत सुख--हाच आमचा गरीबींतला आनंद !" मी म्हणालें !

" खरें आहे ताई तुझें बोलणें." बबूताई ह्मणाली. तिची मोटार चालू झाली. मी व दादा परत वर गेलों !



## प्रकरण ५ वें.

# परिचय.

—:—

आम्हांला मुंबईला येऊन पांच वर्षें झालीं होतीं. आमचें मूळ गांव सातारा जिल्ह्यांत एक लहानसें खेडें आहे. तिथें आमचे वडील लहानाचे मोठे झाले. लग्नकार्यें होऊन आम्हीं सारीं मुलेंही बाबांना त्याच खेड्यांत झालों. आमचे बाबा उभ्या जन्मांत आपलें खेडें सोडून कुठेंही गेले नाहींत. त्यांनीं एक खाजगी शाळा काढून ती चालविली होती. अजूनही ती शाळा चालूंच आहे. आतां म्हणे ती शाळा सरकारच्या स्वाधीन चालत असते. याच शाळेच्या जिवावर आमच्या बाबांनीं आपला गरीबीचा संसार चालविला होता. बाबांच्या सहवासांत आईनें कितीतरी दुःखा-सुखाचे उन्हाळे पावसाळे पाहिले होते. बाबांचा स्वभाव मनमिळाऊ व महत्वाकांक्षी असे. आई त्यांच्या अनुरूप त्यांना मिळाली होती. गरीबींत समाधानानें, टापटिपीनें आणि बाबांच्या स्वभावाचा कल सभाळून राह्यचें कसें हें आईला उत्तम प्रकारानें कळून चुकलें होतें. म्हणूनच बाबांनीं प्रपंच चालवून, आला गेला संभाळून, आईचीं बाळंतपणें, सगळयांची दुखणींबहाणीं काढून थोडीशी जमीन खरेदी केली. आमच्या दादाला मॅट्रिक होईपर्यंत पुण्याला शिकायला ठेवलें. आणखी त्यांच्या मनांतून आपल्या हयातींत पुष्कळ गोष्टी करावयाच्या होत्या. आणि जगते वाचते तर त्यांनीं केल्या पण असत्या! तसें त्याचें वयही झालें नव्हतें! एन्फ्लुएन्झाची राक्षसी सांथ आली, आणि त्या सांथीनें आमच्या बाबांचा बळी घेतला! त्यांच्या इच्छा, महत्वाकांक्षा, साऱ्या जागच्याजागीं राहिल्या. आम्हीं अनाथ, पोरकीं झालों. बाबांनीं घेतलेली जमीन आमच्या तीन पोटांला पुरेशी नव्हती! तिची डागडुजी व्हावयाची होती. शिवाय ती पाण्याखालची नव्हती. तिच्यांत वीहीर वगैरे असती, तर तिच्यांत बागायत चांगल्या प्रकारची होऊन आमच्या कुटुंबाचा गरीबीचा चरितार्थ सुखासमाधानानें चालण्यासारखा होता! पण आज तशी

स्थिती नव्हती. बाबांच्या अकालीं मृत्यूनें आज स्थितीला ती जमीन देखील कित्येक वेळां असून अडचण, नसून खोळंबा—अशी वाटे ! कारण एखादें वर्ष पाऊस पडला नाहीं, कीं त्या जमिनीचा खंड थके. आणि तिचा सरकारी सारा दादाला आपल्या पगारांतून साठवून मुंबईहून पाठवावा लागे !

दादा मॅट्रिक झाला होता. त्याचेंही शिक्षण थांबलें. बाबांच्या पश्चात् बाबांच्या पावलांवर पाऊल टाकून निभण्यासारखें नव्हतें. म्हणून आईच्या सम्मतीनें आम्हां सर्वांना घेऊन नशीब काढण्याकरितां नव्हे तर पोटाच्या पाठीं लागून दादा मुंबईला आला ! मॅट्रिक माणसाला मनासारखी ती नौकरी कशी मिळणार ! चार दोन ठिकाणीं नौकरीसाठीं गेला असतां 'नकार घंटा' मिळून वर अपमानही सोसून घ्यावा लागला होता. एका ऑफिसांत तर दादाला एकानें म्हटलें "तुझ्यासारख्या लठ्ठंभारतीला कारकुनी पेशाची नौकरी हवी आहे कशाला ? शरीर कष्ट करून गोदी–गिरण्यांतून हमाली करशील तर काय बिघडेल ?—मजुरी करायला तुला लाज वाटते कीं काय ?—" यानंतर दादा नौकरी हुडकायला कुठेंही गेला नाहीं. 'आम्हीं मजूर—आम्हांला मजुरीच केली पाहिजे, पोटासाठीं मजुरी करायला कुणाची लाज ? नशीबीं असेल तर मजुरी करूनच मोठें नाहीं का होतां येणार ?' असें ठरवून एका गिरणींत एक मजूर म्हणून जाऊं लागला. ज्या गिरणींत तो आज तागायत होता ! तेथेंच तो आपल्या अकलेनें, कष्टानें, आणि प्रामाणिकपणानें मजुरांचा मोकादम झाला होता ! आतां त्याला 'मजूर' म्हणून घेण्यांतच भूषण वाटत असे. 'मजुरी कर म्हणणारा, त्याला गुरु आहे असें वाटे. आणि यांतूनच आपले सुखाचे दिवस दिसतील अशी त्याची खात्री होती. तो बाबांच्याप्रमाणेंच अत्यंत महत्वाकांक्षी असे. आपण कुणी तरी मोठें झालें पाहिजे. आणि केव्हां तरी होणारच असें तो नेहमीं म्हणे ! आपण मोठे व्हावयाचें, आपल्याबरोबर, आपल्या स्नेह्यासोबत्यांला, आप्त स्वकीयांना, शेजाऱ्यापाजाऱ्यांला आपल्याचसारखें मोठें करायचें, तरच आपण मोठे झाल्याचें सार्थक ! अशी दादाची विचारसरणी असे. आम्हीं मुंबईला आलों, त्या वेळेपर्यंत बाबांनींच घरीं

माझा मराठी पांचवीपर्यंतचा अभ्यास करून घेतला होता. आम्हीं मुंबईला आल्यावर दादानें मला अभ्यास सोडायला लावला नाहीं. 'चंदारामजी हायस्कुलांत' माझें नांव दाखल केलें. अनेक खटपटीलटपटी करून मला फ्रीशिप मिळवून दिली. माझा तेथें अभ्यास अगदीं निर्वेध चालला होता. सध्यां मी पांचव्या इयत्तेंत होतें. दादाला वाचायचा नाद सपाटून होता. इकडून तिकडून मिळतील तीं पुस्तकें आणून वाचायचीं. मिळतील तितकीं, मराठी, इंग्रजी, हिन्दी, गुजराथी वर्तमानपत्रें, मासिकें, वाचावयाचीं, आणि आपल्याबरोबर मलाही वाचावयाला लावावयाचीं. कित्येक वेळां मी वाचून आपण फक्त ऐकत असे. त्यामुळें मला आपोआपच चांगला वाचावयाचा नाद लागला होता. या वाचनाच्या योगानें स्वाभाविकच आजकालचें जग—देश, परदेश, स्वदेशस्थिति, लोक, वगैरेबद्दल पुष्कळच कळावयाला लागलें होतें. स्वस्थिति ध्यानांत यावयाला लागून कोणत्या पद्धतीनें वागण्याचा क्रम ठेवला असतां कधीं काळीं आपली स्थिती सुधारण्यासारखी येईल. हें समजूं लागलें होतें.

आम्हीं जेरमहालांत धोबीतलावावर तिसऱ्या मजल्यावर दत्तासाहेबांचे पोट भाडेकरी म्हणून राहिलों होतों, हें मागें एकदां आलेंच आहे. दत्तासाहेबांची आणि आमची गांठ अशीच कांहीं योगानें पडली. आम्हीं पहिल्यांदाच मुंबईला यायला निघालों होतों, त्यावेळीं एकदम मुंबईला जाऊन उतरावयाचें कुठें हा आमच्यापुढें महत्वाचा प्रश्न होताच! प्रथम आमच्या खेड्यांतील कांहीं मंडळी मुंबईस मजुरी करण्याकरितां राहिली होती, त्यांच्याकडे उतरावें, व चारदोन दिवसांत जशी सोय लागेल तशी करून घ्यावी, असें ठरविलें होतें. पण जेव्हां पुण्याला आम्हीं मुंबईला जाणाऱ्या गाडींत बसलों, तेव्हां कर्मधर्मसंयोगानें त्याच गाडींत—आमच्या डब्यांत दत्तासाहेब चढले! गाडी चालू झाल्यावर, दादा, व दत्तासाहेब यांच्यामध्यें, "तुम्ही कुठले, आम्हीं कुठले वगैरे मामुली विचारपूस झाली. हलके हलके बोलण्यावरून बोलणी निघून दादाकडून दत्तासाहेबांनीं सविस्तर हकीकत काढून घेतली. दादाला पुष्कळ बोलायला पाहिजे. दत्तासाहेबांची तीच स्थिती!

दोघेही मोकळ्या मनाचे ! त्यांत दादानें त्यांना आपली इत्थंभूत हकीकत सांगितली. दादा, आई, मी, रत्नु,–या वेळीं रत्नु चार पांच महिन्यांचा देखील नव्हता. बाबा वारले त्या वेळीं रत्नुची पांचवी पुजली होती ! - असो.—आम्हां सर्वांकडे पाहून दत्तासाहेबांनीं दादाला सांगितलें, तूं आमच्याकडे चल. माझ्या ताब्यांत बरीच जागा आहे. त्यांतली तुमच्यापुरती तुम्हांला देतों. आपला उद्योग पहा. उद्योगाचें जमलें, पैसे मिळायला लागले, म्हणजे, मग तुझ्या माझ्या सोयीसवडीप्रमाणें भाडें मी वसूल करून घेईन. तूं मुंबईला नवखाच आहेस. हीं दोन भावंडें, दुःखी कष्टी आई ! कुठें जाणार तूं !–मुंबईला जाण्यापूर्वींच मुंबईच्या राहण्याची अशा प्रकारानें अनायासें सोय लागलेली पाहून आम्हांला आनंद झाला. दादा तर दत्तासाहेबांचा जिगरदोस्त बनला. प्रत्येक लहानमोठ्या कामांत तो त्यांची सल्ला मसलत घेई व अजूनही घेतो. दत्तासाहेब मला मुलीप्रमाणें आणि दादाला मुलाप्रमाणें मानतात ! आईच्या ठिकाणीं तर त्यांची अनन्य भक्ति आहे ! दादाचा मूळचा उघडा, आनंदी, विनोदी स्वभाव—त्यांत दत्तासाहेबांची संगत मग काय विचारतां ? असल्याही गरीबींत आमच्या आनंदांत त्यामुळें वैगुण्य येत नव्हतें ! दत्तासाहेबांची कसलीशी एक व्यापारी फर्म आहे. त्यांचे वडिल बंधु विलायतेला गेले आहेत. आतांशा बाहेरच्या कामामुळें दत्तासाहेबही क्वचितच इथें असत ! त्यांच्या ऑफिसांतील मंडळी आहेत. पण त्यांचा तितकासा परिचय नाहीं. दत्तासाहेब आले म्हणजे विचारपूस करून–आईला धीर देऊन दादाला चार गोष्टी सांगून–रत्नुला कांहीं खायला–खेळायला देऊन, माझ्या अभ्यासाची चौकशी केल्याशिवाय सहसा जात नाहीं. त्यांच्याकडचीं सगळीं येणारीं वर्तमानपत्रें मात्र आम्हाला नेहमीं वाचावला मिळतात ! असो–

आमचीं इथें आल्यापासून पांच वर्षें अशा रीतीनें कशीं तरी वेडींवांकडीं गेलीं. त्यांत माझा इंग्रजी पांच यत्तेपर्यंत अभ्यास झाला. दादाला कष्ट पडत होते. पण तो नेटानें आणि चिकाटीनें काढीत होता. तो श्रीमंतांपासून दूर दूर राही. पण मजुरांतून मिसळे, त्यांच्या सुखदुःखाची चौकशी करी ! हवें नको पाही ! अडीअडचणीच्या वेळीं शरीरानें व

मनानें उपयोगी पडे ! त्यामुळें अलिकडे तर तो आपल्या गिरणींत–हाता खालच्या लोकांत फार फार आवडता झाला होता ! तो वरिष्ठाशीं अरेरावीनें वागत नसे, तरी नमूनही वागत नसे, कामांत चुकारपणा, हयगय, आळस, दिरंगाई, कीं कसूर, करायची नाहीं; दुसऱ्यानें केलेली खपवून घ्यावयाची. नाहीं. नेहमीं सगळयाशीं हंसत, या लोकांना हंसवीत, त्याचें काम चालावयाचें! दत्तासाहेबांला दादाचा हा बाणा पसंत पडे ! आपल्या गिरणींतल्या मजुरांचे संघ स्थापावयाचे. रात्रीं निजण्याच्या अगोदर त्यांच्याच आवडत्या गोष्टी म्हणजे भजन करावयाला त्यांना उत्तेजन द्यावयाचें; त्यांतच देशस्थितीबद्दल त्यांना गोष्टी समजावून द्यावयाच्या, कोणाला साक्षर बनविण्याचा प्रयत्न करा, कोणी त्यांतच दारू, बाहेर ख्याली, यांचा नादी असेल तर कधीं गोड बोलून, कधीं कशाचें आमीष दाखवून, कधीं धाक दपटशा घालून तर, कधीं चार चौघांत त्याच्या व्यसनाबद्दल थट्टा करून–फजीती उडवून त्याला त्यापासून परावृत्त करावयाचें ! कधीं कोणाच्या पोटावर मारावयाचें नाहीं. कधीं कोणावरचा राग कायम ठेवावयाचा नाहीं. अशामुळें दादा गिरणबाबूंचा जीव कीं प्राण होऊन राहिला होता ! या कारणानें, दत्तासाहेबांसारख्या अनेक चांगल्यांच्या सहवासानें दादाच्या महत्वाकांक्षेला अंकुर फुटूं लागला होता ! तो कधींकधीं घरीं रंगांत आला असतां आईजवळ बोलत बसला म्हणजे म्हणे, नी स्वदेशी मालाच्या गिरण्या माझ्या जिल्ह्यांत काढीन ! साखर, कागद, वगैरे तऱ्हेच्या गिरण्या काढीन ! किर्लोस्कर, ओगले, चितळे, टिकेकर, वेलणकर, वगैरे मोठाले कारखाने काढणारीं माणसें–माणसेंच आहेत कीं नाहीं आमच्यासारखीं ! त्यांनीं कारखाने काढले, मला तसें कां काढतां येणार नाहीं ? आजचा मजूर मी पुढें हजारों मजुरांचा पोशिंदा कां होणार नाहीं ? खात्रीनें होईन ! आणि आई तूच पाहशील ! अशा रीतीनें, स्वकियांच्या, स्वदेशाच्या, मी भावी आयुष्यांत उपयोगी पडेन. आणि बाबांच्या महत्त्वाकांक्षेला मधुर फळें आणून त्यांच्या उदरीं जन्म घेतल्याचें सार्थक करून दाखवीन ! ”

दादाची महत्वाकांक्षा जशी प्रगल्भ होत चालली होती, तसा त्यांच्या वर्तनक्रमांत ही फरक पडत चालला होता. तो महात्माजींच्या आज्ञ-

प्रमाणें घरींदारीं सारी खादीच वापरी —आम्हांला वापरावयाला लावी. दादाच्या थोड्या पगाराला महात्माजींची खादी उपकारच झाली होती. घरांतल्या दिव्याला कांच लावावयाची झाली,तर ओगल्यांची ! आपल्या खेड्याचें नांगर कोणाचा घ्यावा म्हणून कोणाचें पत्र आलें तर त्याला याचें उत्तर जायचें " किर्लोस्कर नागरच " वापर. काड्याची पेटी कशी कां असेना, पण चितळ्यांची घ्यायची कुणी स्नेह्यांपैकीं त्याला लुगडीं आणायला सांगितलीं तर तींहि टिकेकरचीं अगर गजानन मिलचीं ! असा दादाचा अगदीं कटाक्ष झाला होता. तो म्हणे माझ्या कारखान्यांतील साखर माझ्या कारखान्यांतला कागद, हिंदुस्थानांतल्या यच्चयावत् घरांतून घुसला पाहिजे !

माझ्या संबंधानेंही अशीच त्याची कांहीं तरी विलक्षण कल्पना होती. मी स्त्रीसमाज धुरीण झालें पाहिजे. मोठी थोरली लेखिका झालें पाहिजे, माझ्या हातून स्वदेश, स्वधर्म, समाज, यांच्या उन्नतीप्रीत्यर्थ सपाटून उत्तम प्रकारचें वाङ्मय निर्माण झालें पाहिजे. देशाला, स्त्रीपुरुषाला, उदयोन्मुख राष्ट्राला माझें वाङ्मय आदर्शवत् झालें पाहिजे ! थोडक्यांत म्हणजे मी कुणी तरी राष्ट्रकार्यधुरीण व्हावें. जशी दादाची इच्छा तशी मी होणार ही त्याची खात्रीच होतीं म्हणाना ?

रत्नुबद्दल तर काय पुसायलाच नको ! रत्नु म्हणजे प्रति रत्नाकर होणार आहे. पूर्वीचे शिवाजी, बाजी, किंवा आजकालचे लोकमान्य, महात्माजी, लालाजी, रवींद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस, यांच्या मालिकेंत रत्नाकरानें बसलें पाहिजे. आणि तो भावी आयुष्यांत स्वपराक्रमानें बसणार, असा दादाचा रत्नुबद्दल आत्मविश्वास होता !

दादाचीं नित्याचीं मनोराज्यें अशा प्रकारचीं असत !—पण चालू संसाराची परिस्थिती म्हणजे महिन्यांतून चार दोन दिवस तरी आम्हां सर्वांला अर्धपोटीं राहण्याखेरीज भागत नव्हतें !–त्या चार पांच दिवसांत आमच्यांतला घांस घांस कमी करून आम्हीं रत्नुला मात्र उपाशीं ठेवीत नसूं !–अशा वेळीं दादा म्हणे—असे उपास तापास काढलेच पाहिजेत. एवढी तपश्चर्या झालीच पाहिजे. ब्रह्मपद मिळवायचें तर असे लोखंडाचे चणे चघळलेच पाहिजेत ! दादा आपल्या विचारांत गर्क झाला म्हणजे

वस्तुस्थितीचा इतका कठोरपणा असला तरी त्याला त्याचें कांहीं वाटत नव्हतें ! सध्यां दादाचें वय अवघें एकोणीस वर्षांचें, माझें चौदा वर्षांचें, आणि रत्नु तर अवघा पांच वर्षांचा होता. खेड्यांत असतांनाची दादाची शरीरयष्टी राहिली नव्हती. कष्टानें आणि दगदगीनें त्याचें रूप पार बदलून गेलें होतें. आई मनाची खंबीर खरी; पण बाबांच्या अकालीं मृत्यूचा शोक तिला चांगलाच जाणवला होता. ती अलिकडे नेहमीं अजारी पडे ! या खेपेला तर ती चांगली दोन अडीच महिने आजारी होती. या दुखण्यांतून आपण उठणार नाहीं, असेंच ती अजारी पडल्यापासून म्हणत सुटली होती. तरी दादा, मी तिला सारखा धीर देत होतोंच. आम्हीं बोलूं लागलों म्हणजे ती गप्प बसे. पण ती केवळ आमच्या समजुतीकरितां. तिच्या चेहऱ्यावर तिला धीर आला आहे, असें कधी आम्हांला अलीकडे दिसत नसे !

आईला शक्य तितके हात पाय गाळूं द्यायचे नाहींत, आपण हातपाय गाळायचे नाहींत. तिला त्रास होईल, तिच्या अधु मनाला धक्का बसेल, असें आम्हीं आमच्या हातून चुकून ही होऊं देत नसूं. तिच्या समोर जें काय बोलासवरायचें, तें तिला थोडा तरी धीर येईल, तिच्या आमच्या विषयींच्या ज्या कांहीं आशा असतील, त्या आशा फलद्रूप होणार आहेत, आईच्या कल्पनेप्रमाणें आम्हांला ती स्थिति प्राप्त आतां लवकरच होणार आहे, अशा सारखेंच बोलत असूं. आईच्या आज्ञेबाहेर जायचें नाहीं. तिच्या जवळ लांडीलबाडी करावयाची नाहीं. प्रत्येक लहान मोठ्या गोष्टींत आईची सल्ला आणि आशिर्वाद घेतल्याखेरीज पाऊल पुढें टाकायचें नाहीं, असें जसें कांहीं दादाच्या वर्तनांत ठरून गेलें होतें,


अशी कांहीं सगळी आमच्या आयुष्याची कहाणी होती. कुणापुढें तोंड वेंगाडायचें नाहीं. कुणाच्या तोंडाकडे आशाळभूतासारखें ' आ ' करून पाह्यचें नाहीं. लोकाचें लुबाडण्यांत पुरुषार्थ मानायाचा नाहीं, लोकांच्या कुचाळक्या हातांतला उद्योग बाजूला सारून करण्यांत वेळ दवडावयाचा नाहीं. दुसऱ्याच्या योग्य अडचणीच्या वेळीं सहाय्याला, धांवण्यांत अंगचोरपणा मुळींच करावयाचा नाहीं. भेटेल त्याला जीवाचा जीवलग समजावयाचा नाहीं, कीं प्रत्येकाशीं जाणून बुजून किंवा न कळत

वैर बांधण्याची कल्पना मनांत येऊं द्यायची नाहीं, अशी अहोरात्र आम्हां भावंडांना आमच्या देवतातुल्य आईची शिकवण असे. आणि ती शिकवण आतां अगदीं आमच्या अंगवळणीच पडल्यासारखी झाली होती. आम्हांला आईच्या आज्ञेप्रमाणें वागण्यांत आनंद वाटत होता, व आम्हीं तसें वागतों, हें पाहून आईला नित्य सात्विक समाधानाचा लाभ होत होता. असो.

मुंबईला आल्यापासून पांच वर्षांच्या अवधींत नित्याच्या आयुष्यक्रमापलिकडे आजपर्यंत विशेष कांहीं झालें नव्हतें, तें आकस्मिक, आज एका दिवसांत, एका दुपारपासून घडून आलें होतें. आईचा आजार आज जास्त एकाएकी वाढला नसता, तर हेंही होत नव्हतें! पण, आज त्या मोटारींतल्या गृहस्थाची गांठ व वर्तन, दादाच्या इच्छारामभाई–मिलच्या मॅनेजरशीं तो संबंध, घरीं एका शाळेंतल्या मैत्रिणीचें कोट्याधिश असलेल्या मैत्रिणीचें अनाहूत आगमन आणि खऱ्या बाळमैत्रिणीला साजेसें तिचें वर्तन, हीं सर्व एका अवघ्या तीनचार प्रहराच्या अवधींत घडल्यामुळें त्या सर्वांचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला होता. रात्रीं निजेपर्यंत दुपारपासून घडलेल्या गोष्टींचीच सीनेमा फील्मप्रमाणें मनश्चक्षुपुढून पुन्हा पुन्हा चित्रें सरकत होतीं. बबूताई घरीं गेल्यावर आम्हीं जेव्हां वर आलों, तेव्हां दुपारपासूनची साग्र हकीकत माझ्या मनाच्या अभिप्रायासुद्धां दादाला नाहीं तरी तीनचार वेळां सांगितली. मी शक्य तितकी प्रत्येक हकीकत जशीच्या तशीच सांगण्याचा प्रयत्न करीत होतें. कारण मला भावी आयुष्यांत बडी लेखिका व्हावयाचें आहे हें मी विसरलें नव्हतें! दादा पण माझी सर्व हकीकत लक्षपूर्वक ऐकत होता. माझ्याचप्रमाणें मोटारगाडींतल्या माणसाची हकीकत सांगत असतां दादाला विस्मय वाटला, तर मॅनेजर खुशालचंदाच्या माकडचेष्टांचें वर्णन केलें तेव्हां तर तो पोट धरधरून हंसला.

रात्रीं झोपेंत मला दिवसाच्या हकीकतींचींच स्वप्नें पडत होतीं. कित्येक तर दादा म्हणत असतो, त्याप्रमाणें आम्हीं मोठे होण्याच्या मार्गाला लागण्याची हीच तर सुरवात नसेल!–मोटारींतल्या माणसांनीं

सक्रीय सहानुभूती दाखवावी, बबूताई सारखीनें आपण होऊन घरीं येऊन आईप्रमाणें आईची सेवाचाकरी करावी. हें कशाचें द्योतक? खास आम्हीं मोठे होणार! हींच सारीं त्या रात्रीचीं स्वप्नें! ती माझी रात्र अशाच साऱ्या सुखद स्वप्नांत गेली!



## प्रकरण ६ वें.

# मॅनेजरचा फेरा.

" संतू संतुराम, संतू–"

अशा कोणिशा दाराच्या बाहेर हांका मारल्या आणि दारावर टिचक्या मारण्याचा आवाजही ऐकायला आला. सकाळीं नवाची वेळ. दादा आणि रत्नु जेवायला बसले होते. मी वाढीत होतें. आई प्रातःकर्म उरकायला गेली होती. माझा हात खरकटा होता, तो धुवून दाराची कडी काढायला जाणार, इतक्यांत "संतू, संतुराम, आहेस का घरांत ?" म्हणून पुन्हां हांका आल्या. मी दाराजवळ जाईपर्यंत दादा मोठ्यानें " यस् यस् वेट् अ मिनिट ! " म्हणून म्हणाला. आम्हांला वाटलें दत्तासाहेब आले आहेत; म्हणून मी किंचित् दिरंगाईच करीत होतें. दार मुद्दाम उशिराउघडल्याबद्दल दत्तासाहेब माझ्यावर खोटे रागवायाचे. कांहीं तरी बोलावयाचे, आणि त्यांच्या त्या बोलण्यानें आम्हांला खूप मौज वाटायची, हें अगदीं ठरलेलें असे; ती मौज करण्याचा बेत होता, पण दादा आज कसल्या तरी तंद्रींत होता; नेहमींसारखा विनोदी लहरींत नव्हता. त्यानें चटकन् दार उघडायला सांगितलें म्हणून मी माझा बेत रहित केला आणि झटकन् जाऊन दाराची कडी काढली. दार उघडलें, तों दारांत काल पाहिलेले दादाच्या गिरणीचे ताडमाड उंचीचे खुशालचंद मॅनेजर !

" ओल्लो ! कोण, साहेब ? गुडमॉर्निंग ! गुडमॉर्निंग !—या आंत या असे ! "–दादानें मॅनेजरसाहेबांचें आगतस्वागत केलें. मी, माझी कल्पना चुकल्यामुळें माझ्याच ठिकाणीं ओशाळलें. आपली झटकन् चुलीजवळ जाऊन उभी राहिलें. पडदा थोडासा पुढें ओढून घेतला !

" जेवण चाललंय वाटतं तुझं !–" आंत येत मॅनेजर म्हणाले !

" होय साहेब, कसा तरी घाईघाईनें चार घांस पोटांत लोटतों आहें ! वेळेला चाकरीवर हजर झालें पाहिजे ना ? जरा उशीर झाला, तर आमचा दिवस खाडा व्हायचा ! ह्यः ह्यः ह्यः " दादा कृत्रिम हंसला. " बाकी, तो प्रसंगच आजपर्यंत आपण कधीं आमच्यावर येऊं दिला नाहीं म्हणा ! "

" होय ना ? मग झालें तर ! मी तसा कांहीं कुणाच्या पोटावर मारायचा नाहीं ! " मॅनेजर म्हणाले.

" हें काय आम्हांला माहीत नाहीं साहेब ? आपल्या गिरणबाबूपैकीं कित्येकांनीं आपण ओढलेल्या कोरड्याचे वळ उठलेल्या पाठी दाखविल्या आहेत मला. पण त्यांनीं पोटावर मारल्याची कधींच तक्रार केल्याचें मला आठवत नाहीं ! " दादानें हंसतच उत्तर दिलें !

" नॉनसेन्स ! संतू, तूं मोठा हा आहेस बोवा ! " मॅनेजर स्वतःची उडालेली तिरपीट सांवरीत म्हणाले.

मॅनेजर अजून उभेच होते. ते अगदीं अपटुडेट पोषाखांत–कोटपाटलूणींत होते. त्यांना तसें खालीं बसतां येणें शक्य नव्हतें. आमच्या घरीं कसलीच खुर्ची नव्हती. मॅनेजर नुसतें पहातच राहिले. दादाच्या तें लक्षांत आलें; पण त्याच्याही मनांतून मॅनेजरला थोडावेळ ताटकळवीत बसविण्याची हुक्की आली, म्हणून तोही कांहीं बोलला नाहीं. पण मग माझ्यावर खोटाच रागावून ओरडला.

" ताई, तुला कांहीं अक्कल आहे कीं नाहीं ? साहेब केव्हांचे उभे आहेत ? आपल्यासारख्या मजुरांच्या घरीं पूर्वपुण्याईनें आज केवढ्या मोठ्या महात्म्यानें पायधूळ झाडली आहे. आणि त्यांना बसायला द्यायचेंही तुला भान राहिलें नाहीं ? पाट दे तो. नाहींतर ती पलीकडची फाटकी सतरंजी आणून टाक !–अडाणी कुठली ! साहेब, एक्सक्यूज अं !–पण आपल्याला पाटावर किंवा तरटावर बसायला कसें येणार ? त्यापेक्षां ताई असें करीनास ? ती आपली ट्रंक आहे ना ? ती खुर्चीसारखी उभी करून तिथें आणून ठेव !–अग हंसतेस काय ? साहेब, आपली आमच्या गरीबाच्या घरची हीच खुर्ची समजा ! ताई, त्या ट्रंकवर त्या सतरंजीची घडी करून टाक बरें का ? "

दादानें हें सांगण्यापूर्वींच मी तें सारें केलें होतें. शिवाय ट्रंक साधारण भिंतीलगतच ठेविली. मॅनेजर त्यावर बसले तरी त्यांना भिंतीला टेंकायला यावें. या नवलपरीच्या खुर्चीवर मॅनेजर दादाच्या अत्याग्रहावरून बसले. न बसून सांगतात कुणाला ? नाइलाज होता, आमच्याप्रमाणेंच त्याचाही. आपण होऊन अनाहूत त्यांतून ते आमच्या इथें आलेले, तेव्हां नाखुष झाले, तरी बोलणार कसे ?

" छान ! संतू, तुझें डोकें देखील गड्या मोठें कल्पक आहे ! "

त्या अभिनव खुर्चीवर बसल्यावर जणूं काय त्यांत आपल्याला कांहींच वाटलें नाहीं, असें दाखविण्याच्या उद्देशानें मॅनेजरनें हंसत हंसत बोलायला सुरवात केली. बाकी मॅनेजरचा हंसरा चेहरा पाहतांनासुद्धां, पाहून हंसायला येण्यापेक्षां भीतिनें 'रामरक्षा' म्हणण्याची पाळी येण्यासारखी असे ! मॅनेजरला पाहिल्यापासून रत्नुच्या तर तोंडांतला घांस तोंडांत, आणि हातांतला हातांतच अशी स्थिति झाली होती. मॅनेजरच्या आगतस्वागताच्या गडबडींत आमचे कुणाचें त्याच्याकडे लक्षच गेलें नाहीं. मॅनेजरला पाहून रत्नुला तर खास वाटलें असावें कीं, तो दांडगाई करायला लागला, नीट जेवेना झोंपायच्या वेळेला फार रडायला लागला म्हणजे त्याला गप्प करण्यासाठीं, वळणावर येण्यासाठीं, मी किंवा आई " बागुलबोवाची, भुतांची भीति घालीत असूं, तो बागुलबोवा, तें भूत मूर्तिमंत आलें कीं काय ? आणि कां ? आपण कांहीं रडलों नाहीं, कसलाही हट्ट घेतला नाहीं, मग आमच्या घरीं बागुलबोवा कां आला ? ' असा विचार रत्नुच्या चिमुकल्या मनांत येणें कांहीं अशक्य नव्हतें ! मॅनेजरनीं तसल्याही खुर्चीची स्तुति केली. दादा प्रथम प्रथम त्यांच्या 'होस हो ' देऊं लागला होताच. त्यामुळें खुशालचंदाला चढून जायला फारसा अवकाश लागला नाहीं !

" वेल संतू, माझ्यासारखा मोठा माणूस तुझ्याकडे आल्याबद्दल, तुला, धन्यता, आणि मोठेपणा नाहीं वाटत ? " मॅनेजर मान ताठवून प्रौढीनें म्हणाले !

" अलबत् ! कां नाहीं वाटणार ? " दादा उत्तरला, " पण— "

" पण काय ? " मॅनेजरनें विचारलें.

" साहेबांची स्वारी कां-कशासाठीं इकडे फिरकली, आणि—" दादा पुढें घुटमळला.

" आणि काय ? " मॅनेजरनें चौकशी चालविलीच !

" साहेबांनीं माझ्याकडे येऊन मला मोठेपणाला चढविल्याचें सांगितल्याबद्दल झालेला आनंद व्यक्त कसा करावा, हेंच मला समजेना ! " दादा उद्गारला.

" नेव्हर माईंड ! " मॅनेजर दादाच्या त्याच वाक्यानें खुलून म्हणाले, " मी तुझ्या अजारी आईच्या समाचारासाठीं आलों आहें. तुझी आई काल अतिशय अजारी असल्याचें एकलें. कुठें आहे ती ? How is she now !-Where is she ? Is she alright ?—मला काल कळलें हें ! म्हणून मुद्दाम समाचारासाठीं आलों ! "

Many many thanks for your kind favour. " दादाही त्यांचे आभार मानून मोकळा झाला.

" बरें संतू, तुझ्या आईची खाणावळबिणावळ नाहीं ना ? हो, नसली म्हणजे बरें. नाहींतर ती बिचारी अजारी, जेवायला येणारे त्रास द्यायचे, नाहींतर पैसे बुडवून जायचे !—बहुतेक मजुरांच्या आया—बायका आपलें पोट बाहेर काढण्यासाठीं छोट्या छोट्या खाणावळी घालतात, असें मला माहीत आहे, म्हणून तुला विचारतों. नाहींतर सध्यांच्या स्थितींत तो एक तुझ्यामागें त्रास ! " मॅनेजरनें मुक्ताफळें उधळलीं !

" साहेब ! " दादा मॅनेजरकडे टक लावून बोलायला लागला. मला वाटलें दादा आतां काय बोलतो आहे, नी काय नाहीं ? असल्या घमेंडखोर सत्ताधाऱ्यांना, दुसऱ्याच्या अंतःकरणाची, परिस्थितीची, शीलाची कल्पनाच असत नाहीं, म्हणून तोंडाला येईल तें बडबडतात ! आतांच्या बोलण्याचा मला जर इतका विलक्षण राग आला होता, तर दादाला किती आला असेल? पण त्या वेळेपुरता त्यानें तो राग गिळला. दुसरा एकादा दादाच्या ऐवजीं तिथें असता, तर असल्या अपमानकारक शब्दाबद्दल त्यानें मॅनेजरचें टाळकेंच सडकलें असतें ! पण दादा अगदीं शांतपणानें—गंभीरपणानें म्हणाला—

" आम्हां मजुरांच्याबद्दल आपल्याला इतकी अपटुडेट इन्फरमेशन

असते, हें पाहून मी तर आश्चर्यानें थक्कच झालों! साहेब, माझी तर खात्री होऊन चुकली कीं, आपण जर इंग्लंडांत असतां, तर आपण मजुरपक्षाचे कैवारी, पुढारी म्हणून खात्रीनें सर राम्से मॅक्डोनाल्डच्याऐवजीं तुम्हींच मिनिस्टरच्या जागीं आला असता! पण हिंदुस्थानासारख्या हीन देशांत तुमच्यासारख्या रत्नाला जन्माला घालून ईश्वरानें मिनिस्टरच्या बाबतींत तुमच्या तोंडावर पालथा पायपोस मारला असें म्हणावें लागतें!"

"हॅः हॅः हॅः चालायचेंच!" दादाचा शालजोडींतला मॅनेजरला कळलाच नाहीं. फक्त मिनिस्टर होण्याच्या लायखीचे आपण आहोंत, इतकेंच त्यानें ऐकिलें. आणि स्वारी तेवढ्यांतच गुंगली. बाकीचे दादाचे शब्द मॅनेजरचे कान ऐकत होते, आणि डोळे व मन मला न्याहाळीत होतें!

"बरोबर, बरोबर, संतू, तूं म्हणतोस तें बरोबर! बाकी ब्रिटीश साम्राज्याचा नसलों, तरी इच्छारामभाई–मिलचा तरी मी मिनिस्टर आहेंच कीं नाहीं? झालें तर मग! आपण आपले त्याच्यावरच संतुष्ट असावें!—"

"साहेबांचा महत्त्वाचा वेळ नाहीं का मोडत?" दादा ब्याद टाळण्याकरितां खटपट करूं लागला. "माझें जेवण झालें, हातावर पाणी पडलें कीं निघतोंच!"

"छे छे! वेळाचें काय विशेष?–आपण बरोबरच जाऊं! माझ्याच गाडींतून घेऊन जातों तुला. संतू तुला आतां मोठा माणूस–बडा अदमी करायचें ठरविलें आहें मी! काल रात्रीं इच्छारामभाईच्या बंगल्यावर मुद्दाम जाऊन तुझी स्पेशल रेकमेंडेशन केली आहे मी! तुला आतां मोकदमाच्या जाग्यावरून काढून–वर ऑफिसांत, महत्त्वाचें, आणि जबाबदारीचें काम तुझ्यावर सोंपवायचें आहे! शेटजींची परवानगी घेऊन आलों आहें! अरे, एवढेंही करितां आलें नाहीं, तर मी गिरणीचा मॅनेजर–प्रधान कसला?–काय समजलास?–म्हटलें, तुझ्या आईच्या प्रकृतीची चौकशी करावी, ही आनंदाची बातमी सांगावी, आणि आज आपल्याच बरोबर आपल्या गाडींतून तुला घेऊन जावें!-Don't you think this is a glad news?–"

" Certainly so ! " दादा उद्गारला. त्यानें त्यावेळीं आनंदाची कोण घाई दाखविली. झटकन् दादानें माझ्याकडे पाहिलें. आणि म्हणाला, " ताई खुळ्यासारखी चेहऱ्याकडे काय पहात राहिली आहेस? साहेबांना—चहा-कॉफी-कोको-कांहीं तरी झटपट कर ! आटोप ! एवढें-सुद्धां का तुला सांगावें लागतें ?–साहेब, काय करूंद्या ? चहा म्हटलें--चहा!–कॉफी सांगितली, तर कॉफी, नाहीं तर कोको–आज सगळें आमच्या घरीं आहे !–वाजले किती पहा बरें ?–काय साडेनऊ ?–ताई, राहूं दे नाहीं तर ! साहेब, आज तुम्हांला ' गिरणींत'च चहापार्टी देऊं !

" चहापार्टीचें राहूं दे तूर्त. तूं मोठा झालास म्हणून आम्हींच तुला लवकर जंगी चहापार्टी देऊं. " मजकडे पहात पहात मॅनेजर म्हणाले. " आणखी, संतू, आज तुझ्याबरोबर मला बरेंच महत्त्वाचें बोलायाचें आहे ! आपण तें ऑफिसांत बोलूं समजलास. "

" ठीक आहे ! " दादानेंही संम्मति दिली. या वेळीं गप्प बसलेल्या मॅनेजरकडे टक लावून गर्भगळीत झालेल्या, आणि भीतीनें डोळ्यांत पाणी आणलेल्या रत्नुकडे दादाचें लक्ष गेलें.

" काय रे हें ? रत्नु रडतोस कां ? आणि जेवत नाहींस तो ? साहेबांच्या-कडे कां लक्षपूर्वक पाहतो आहेस ? भ्याला आहेस की काय त्यांना ? त्यांना कांहीं भ्यायचें कारण नाहीं ! अरे, ते आमच्या गिरणीचे साहेब आहेत, साहेब !–तूं काय त्यांना बागुलबोवा समजलास होय ? कां इस्पिकचा–एक्का ! का किलावरचा गुलाम !–हा वेड्या, जेव मुकाट्यानें !–साहेब, हा माझा धाकटा भाऊ ! भारी भित्रा आहे पहा ! तुमच्या सारख्याला तर भारी भितो. कोट, पाटलून, ती साहेबी टोपी पाहिली कीं लागलाच लपायला गुलाम ! त्यांतून तुम्हीं किडडिकीत असे उंच आहांत ना ? त्यामुळें साह-जीकच तो भिऊन गेला आहे !—"

" अस्सें ? हाः हाः हाः हाः ! Don't fear ! Don't fear ! संतू, तुझा भाऊ, तुझ्यापेक्षां लबाड होणार हां ! " मॅनेजर आज कोणा-विषयींच कांहीं वाईट म्हणत नव्हता !

" म्हणजे साहेब, मी लबाड आहें वाटतें ? वा ! चांगलेंच तुमचें हें

मला सर्टिफिकेट मिळालें म्हणायचें ? याच सर्टिफिकेटाच्या आधारावर का मला हायग्रेड देत आहांत ! " दादा म्हणाला.

" संतू, तुझी आई कुठें दिसत नाहीं ती ?–अजारी होती–आहे ना? ती तर कुठेंच दिसत नाहीं !–" मॅनेजरनें कोणत्या कीं कारणानें पुन्हां आईची चौकशी चालविली. कदाचित् त्याच्या स्वैर जिभेला आणखीं कांहीं स्वैरपणा गाजविण्याची लहर लागली असावी कारण पुढें आपणच दांत विचकीत म्हणाली, " कां पाठविलीस कालच आईला सोनापूरला ? –हंः हः ! "

" छे छे ! साहेब, आईची अजून तितकी तयारी नाहीं ! तिची इच्छा, अजून आपल्यासारख्या बड्याबड्यांचे फ्युनरल सेरिमनी पहाण्याची आहे!" दादानें पण मॅनेजरच्या फटकळपणावर चांगलीच मात्रा दिली. तरी त्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं !

दादाला मॅनेजराच्या आजच्या वर्तनाचा चमत्कारच वाटत होता. एवढा मोठा हुद्याचा माणूस माझ्याकडे कसा आला ? आला तो आला, इतका वेळ बसला आहे, अगदीं ऐसपैस बोलतो आहे, आपणही त्याच्या बाष्कळ बडबडीबद्दल चरचरीत व बिनदिक्कत डागण्या देत आहोंत, तरी त्या निमूटपणें ऐकून घेत आहे, यांतलें इंगीत काय ? आपली शेटजीकडे रेकमेंडेशन केली म्हणतो, ऑफिसांत महत्त्वाच्या जागेवर न्यायचें बोलतो—गादींतून अगदीं बरोबरीच्या नात्यानें वाग-विण्याची याची तयारी आज कां ? अशी कोणची एकदम यक्षिणीची-कांडी फिरली याच्या स्वभावावर–याचा दादाला कांहीं उलगडा होत नव्हता ! पण किती झाला तरी दादा तो ! हलके हलके कालच्या दिव-साचा माझ्या बाबतींत झालेला त्याला इतिहास आठवला. आजची त्याची बसण्याची, बोलण्याची थोडासा नेहमींहून दादाचा अधिक उद्दा-मपणाही सोसून घेण्याची त्याची प्रवृत्ति व तऱ्हा दादाच्या ध्यानांत याव-याला वेळ लागला नाहीं ! मॅनेजरच्या मनाची दादाला आजवर अगदींच ओळख झाली नव्हती. असें नाहीं. पण यावेळीं पहिल्या झटक्यासरशीं त्याच्या डोक्यांत वस्तुस्थितीचा प्रकाश पडला नाहीं, इतकी गोष्ट खरी ! पण त्याला दारांत पाहतांच माझ्या डोक्यांत मात्र चांगलाच उजेड पडला

होता ! माझ्याशीं मॅनेजरचें कालचें वर्तन मी शक्य तितकें जसेंच्या तसें जरी दादाला सांगितलें होतें, तरी प्रत्यक्ष माझ्या बाबतींत काढलेले हिडीस उद्गार मला दादाला जसेच्या तसे सांगतां आले नव्हते ! त्यामुळें काल म्हटल्याप्रमाणें मॅनेजर आमच्या घरीं 'येतों' म्हटल्याप्रमाणें 'येईलच' मला किंवा दादाला मात्र त्याला प्रत्यक्ष दारांत पाहीपर्यंत वाटलें नव्हतें ! इतका वेळ आमच्या येथें येऊन झाला, तरी कालच्या-प्रमाणें हवें तसें बोलण्याची, माझी चौकशी करण्याची, माझ्याशीं बोल-ण्याचा कोडगेपणा करण्याची त्याची तयारी दिसली नाहीं. कदाचित् दादाला ऑफिसांत महत्त्वाचें कांहीं सांगावयाचें आहे म्हणाला, तें माझ्याच संबंधानें असेल ! तो अधिकारलोलुप, निगरगट्टमनाचा, कठोर, व निर्लज्ज वृत्तीचा होता खरा, पण त्याचबरोबर ईश्वरानें त्याच्याजवळ त्याला अगदीं विसंगत खोलपणा, व स्वार्थाची दूरदृष्टी ही बहाल केली होती. आणि त्याच कांहीं गुणांवर तो आज एका गिरणीचा मॅनेजर म्हणून मिरवीत होता. असें म्हटल्यास माझी कल्पना अगदींच चुकली असें म्हणतां यावयाचें नाहीं. दादाच्या हें लक्षांत आलें होतें. दादानें माझ्याकडे पाहिलें, मीं दादाकडे पाहिलें ! मॅनेजरचा फेरा आमच्याकडे वळण्यांतला हेतु दोघांच्याही ध्यानांत आल्याचें दोघांना कळलें. आम्हां दोघांलाही थोडेसें हंसू आल्याखेरीज राहिलें नाहीं. पण मॅनेजराच्या लक्षांत आमच्या हंसण्याचें कारण येऊं नये, म्हणून आम्हीं दोघेही आमच्या हंसण्याचा संबंध आमच्या रत्नुच्या त्या वेळच्या भित्र्या अवस्थे-कडे जोडला !

दादाचें जेवण झालें ! दादानें घाईघाईनें कपडे चढविले !—आई नुकतीच तोंड धुवून औषध घेत बसली होती. नित्याप्रमाणें बाहेर जातांना आईला दादानें नमस्कार केला. मलाही थोडेसें खडसूनच "कालच्या-प्रमाणें आईला धांद्रटासारखें सोडून बाहेर कुठें जाऊं नकोस !" म्हणून सांगितलें, आणि 'चला साहेब, आज माझ्याकरितां फार तसदी घेत-लीत, आमच्यावर आज वाजवीपेक्षां जास्त मेहेरबानी दाखविलीत. आमच्या सारख्यांनीं आपले हे उपकार केव्हां कुठें फेडावयाचे ?" वगैरे म्हणत मॅनेजरला घराच्या बाहेर निघायला भागच पाडलें ! मॅनेजर माझ्याविषयीं

बोलावयाची अनुकूल संधि पाहत होता. ती दादाच्या माझ्या विषयींच्या बोलण्यानें त्याला आलीशी वाटली, आणि ती त्यानें साधलीही!

" संतू, हीच तुझी सिस्टर काल मिलमध्यें तुला बोलवायला आणि आई आजारी आहे म्हणून सांगायला आली होती. काल हिनें सांगेपर्यंत तुला कोणी आई-बहिण आहे हेंही मला माहित नव्हतें! Oh, Your sister is very cleaver and sweet! I liked her very much! हो, पण संतू Excuse me अं. मी हिला न ओळखल्या-मुळें कांहीं तरी भलतेंच माझ्या नेहमींच्या फटकळ स्वभावाप्रमाणें बोलून गेलों. तिनें सांगितलें असेलच! Don't be angree for that. Forget and Forgive! मी थोडासा वाजवीपेक्षां जास्त स्पष्ट आणि फटकळ आहें—"

" नेव्हरमाईंड! त्याबद्दल काय विशेष! आपल्या कालच्या दोनचार शब्दांवरूनच तिनें ओळखलें असलें पाहिजे कीं—" दादा सांगू लागला—

" काय ओळखलें? काय ओळखलें?" मॅनेजरला निराळीच आशा वाटून त्यानें मध्येंच विचारण्याची घाई केली!—

" दुसरें काय ओळखायचें?" दादा बोलला! " ब्रह्मदेव आपल्या जिभेला हाड घालायला विसरला हेंच—जाऊं द्या—चला! साहेब चला!-" दादा मॅनेजरला घेऊन बाहेर पडलाच! दादाच्या शेवटच्या सांगण्यानें मॅनेजरचा चेहरा जवळजवळ फोटो काढून घेण्यासारखा झाला होता. पण काय करणार बिचारा! आज तो मोठा मॅनेजर असला, दादावरचा सत्ताधीश असला, तरी त्याला दादाला खुष ठेऊन दादाकडून मला बायको म्हणून मिळवावयाची होती! तेव्हां त्याकरितां तरी त्याला धोरण पाहूनच वागावयाचें होतें! असो

मॅनेजरचा फेरा माझ्याकरितां होता हें उघडच होतें. पण मला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. मी त्याचा विचार केला नाहीं. कारणही पडलें नाहीं. दादा मात्र आज त्याच्याबरोबर त्याच्याच गाडींतून ऑफिसला गेला खरा!

दादा गेल्यावर, मी जेवलें. आईला खायला घातलें. आज आईला किंचित् बरें वाटत होतें. कालच्यासारखी तलखी वाटत नव्हती. तिच्या

प्रकृतींत आताशा वरचेवर असाच चढउतार होत असे. उष्टींखरकटीं झांकापाक करून अभ्यासाची पुस्तकें घेऊन आईच्या जवळ जाऊन बसलें. रत्नुला घटकाभर 'श्रीगणेशा' पाटीवर काढून देऊन अभ्यासाला बसविला.

आईच्या सांगण्यावरून तिच्या करमणुकीकरितां 'संतलीलामृत' वाचावयाला घेतलें. आईला कंटाळा येईपर्यंत वाचावयाचें असेंच ठरविलें होतें. एक तासभर वाचलें. वाचतां वाचतांच आईचा डोळा लागला. रत्नुही 'श्रीगणेशा' गिरावितांगिरावितां झोंपी गेला! माझे डोळे पण जड व्हावयाला लागले होते, तोंच अगदीं कालच्याच वेळेला बबूताई दार उघडून आंत आली!–



## प्रकरण ७ वें.

# बबूताईच्या बंगल्यावर.

" या तुम्हीं बबूबाई !–" मी हंसून बबूताईचें स्वागत केलें.

" आईला झोंप लागली आहे का ?–आज प्रकृती कशी आहे ? " बबूताईनीं अगोदर आईच्या प्रकृतीची चौकशी केली. आज येतांना बरोबरच बबूताईनें फळफळावळ, मनुका, वगैरे आणल्या होत्या. येऊन बसल्यावर आपल्या स्वच्छ रेशमी हातरुमालांतील, त्यांनीं बरोबर आणलेलें सगळें सोडलें. आणि एका ताटांत भरून ठेविलें.

" हें काय ? कशाला आजही आणलेंस बबूताई ? " मी म्हणालें.

" मी कांहीं तुझ्याकरितां नाहीं आणलें ! आईसाठीं आणलें आहे !" बबूताई उद्गारली !

" हो पण कां ?—

" कां म्हणजे ? मला वाटलें म्हणून ! त्यांत तुझें काय बिघडलें ? "

" बरें केलेंस ! " यापेक्षां मी तरी काय बोलणार ! अगोदरच कांहीं तरी म्हणून बोलायला गेलें होतें. तर योग्य उत्तरानें बबूताईनें मला गप्पच केलें.

आई पण इतक्यांत जागी झाली. बबूताई अगदीं बिनचूक आलेली पाहून तिला बरें वाटलें. फळें आणलेलीं तिनें पाहिलीं. " हें कशाला बरें आजही आणायला हवें होतें. " असें आईही बबूताईला म्हणाली. मला जसें बबूताईला सडेतोड उत्तर देतां आलें, तसें आईजवळ तिला थोडेंच बोलतां येणार होतें ? " उगीच आणलें झालें !" असें म्हणून थोडेसें हंसण्यापेक्षां बबूताई जास्त काय करणार ?

कांहीं वेळानें बबूताईनें कालच्याचसारखीं आईला फळें सोलून आग्रहानें खायला दिलीं. शाळेंतल्या, इकडल्यातिकडल्या बऱ्याच गप्पागोष्टी झाल्या. मग मधल्या वेळच्या आईच्या खाण्याची वेळ झाली. रत्नु जागा झाला. तो खायला-खायला म्हणून कडकड करायला लागला. मी

आईचें खायचें तयार करायला लागलें. रत्नुपुढें दुपारची दशमी–आणि लोणी ठेवायला लागलें, तर तो ऐकेना. त्याला वाटे कीं कालच्या या नव्या ताईनें आपल्याकरितां कांहीं तरी खायला आणलें आहे, तें द्यावें.– पण त्याच्याकडे जरा रागानें बघतांच, तो मुकाट्यानें पुढें ठेवलेली दशमी खायला लागला. बबूताईला विचारलें कीं " चहा करूं या का ? "

" कशाला ? " बबूताईनें मलाच उत्तरात्मक प्रश्न केला.

" प्यायला! चहाचा दुसरा कसला उपयोग आहे ?" मी जरा विनोद करण्याचा प्रयत्न केला.

" तसें नव्हे! मी म्हणत होतें, कीं आतां आपण दोघीजणी आमच्या बंगल्यावर जाऊं–तिथेंच चहा घेऊं ! म्हणून म्हटलें इथें कशाला ?–" बबूताईनें आपला हेतु व्यक्त केला.

" मग काय ? आमचा 'चहा' घेणार नाहींसच तर !–"

" मी असें म्हटलें आहे का पण ?–पण म्हटलें दोनदां चहाचें काय कारण ?"

" बरें तर! इथेंच घेऊं! तुझ्या तिथला नाहीं घेतला म्हणजे झालें!"

" बरें तुझ्या मनासारखें होऊं दे!"

" मग चलू या तर आमच्याकडे! आई, सुगंधाताईला आमच्याकडे घेऊन जाऊं का ?–लवकर परत आणून पोंचवीन!" बबूताईनें आईची परवानगी विचारिली.

" बबूताई, तुझ्या बंगल्यावर आजच कशाला येऊं ?–" मी विचारलें.

" मी तुझ्याकडे काल आज कशाला आलें ?" बबूताईनें प्रश्न केला.

" कशाला म्हणजे उगीचच !"

" मग झालें तर!–उगीचच तूं माझ्याकडे चलायचें आहेस!–मैत्रिणी मैत्रिणी एकमेकींकडे कशाला जात असतात!–तूं माझी मैत्रिण आहेस ना ?--मग चल तर माझ्या बरोबर!"

" बबूताई, मला श्रीमंतांच्या इथें जायचें कसेसेंच वाटतें ! " माझें वाटणें मी सांगितलें.

" हें काय सुगंधाताई, मी आमची श्रीमंती का तुला दाखवायला नेतें ? "

" पण श्रीमंतांच्या इथें गेल्यावर कसें वागायचें हें मला माहीत नाहीं–म्हणून जरा–" मी आढेवेढे घ्यायचा क्रम सोडला नाहीं. माझी समजूत कशी करायची हें बबूताईला समजेना.

" म्हणजे ग काय ? जशी आपल्या घरांत वागतेस तशाचि माझ्या इथें वाग !–म्हणे श्रीमंतांच्या इथें कसें वागायचें ? चल, मी शिकवितें तुला कसें वागायचें तें ! " बबूताईचा त्रासिक स्वर येऊं लागला–

" तसें नव्हे ग बबूताई ! मी गरीब तूं श्रीमंत–"

" पुन्हां तेंच ! तूं गरीब नाहींस मी श्रीमंत नाहीं. तूं गरीब तर मी गरीब–मी श्रीमंत तर तूं पण श्रीमंतच ! ताई, मैत्रिणीजवळ कां कुठें श्रीमंतगरीबपणा असतो ! मी माझ्या भाईला, तुझ्याबद्दल, रत्नुबद्दल, आईबद्दल, आणि आपल्या संतुदादाबद्दल कित्ती कित्ती सांगितलें आहे ! त्यानें तुला आणायला सांगितलें. मी आणायला आलें, तर तूं आपली अशी हुज्जत घालतेस ! माझ्या मनांतून आईला देखील आमच्याकडे घेऊन जायचें होतें. पण आई अजारी असल्यामुळें माझा इलाज नाहीं ! मी काल भाईला सांगितलें कीं, मी मला एक नवीन आई मिळविली आहे ! भाईला कित्ती आनंद झाला म्हणून सांगूं ! तूं म्हणतेस, पण आमच्या भाईला सुद्धां कांहीं श्रीमंतीचा डौल नाहीं ! आमचा भाई कित्ती साधा आहे ! आमच्या बाबांनासुद्धां तुला नी रत्नुला पाहून किती तरी कौतुक वाटेल! संतूदादा आमच्याकडे येणार नाहींत म्हणाले, पण त्यांना पण कधींना कधीं आमच्या इथें घेऊन गेल्याखेरीज राहणार नाहीं. बघशील तूं ! पण चलबाई, किती आढेवेढे घेशील. बोलण्यांत इथेंच सगळा वेळ जायला लागला. तुला परत आणखी आणून पोंचवायचें आहे. " एवढ्या मोठ्या बबूताईच्या व्याख्यानावर मी काय बोलणार ? आईनेंही ' जाऊन ये ' म्हणूनच सांगितलें.

" आजच यायला पाहिजे का ताई तुझ्याकडे ? " मी शेवटचेंच म्हणून विचारलें.

" दादा जातांना आईजवळून हलूं नको म्हणून सांगून गेला आहे!"

" सांगू दे ! संतूदादा घरीं आल्यावर त्यांना सांग–मी तुला घेऊन गेलें होतें म्हणून. माझें नांव सांगितल्यावर ते मुळींच रागवायचे नाहींत.

शिवाय मी त्यांना तुझ्यादेखतच तुला घेऊन जाणार आहें म्हणून सांगितलें नाहीं का? त्यांनीं पण कालच परवानगी देऊन ठेविली आहे! संतुदादाच्या रागाची भीति बाळगते आहेस, पण त्यांना कधीं रागावतां तरी येतें कां?—मला नाहीं वाटत त्यांना रागावतां येत असेलसें!" असें म्हणून दादाच्या नुसत्या आठवणीनेंच बबूताई हंसायला लागली! "चल ग चल लवकर! भारीच बाई विकट तुझा स्वभाव! तूं माझी मैत्रिण नसतीस तर अस्सा तुझा मला राग आला असता—"

"ताई, येतें मी. पण मला सांग, माझ्याबद्दल इतकें तुला हें कां वाटतें?" मी विचारलें.

"कां म्हणजे? माझें तुझ्यावर प्रेम आहे म्हणून!"

"काय माझ्यावर तुझें प्रेम?" आश्चर्य वाटल्यासारखें करून मी पुन्हां तेंच विचारलें.

"हो तुझ्यावर माझें प्रेम आहे! म्हणून तर इतकें हें सगळें!—" बबूताई रडकुंडीस आली.

"अरेरे!" मी उद्गारलें "मग मोठी वाईट गोष्ट झाली!"

"ती कशाची?" बबूताईनें रंजीस येऊन विचारलें.

"अग तुझें प्रेम अगदीं अनाठायीं जडलें! आपल्या दोघींत कुणीच पुरुष नाहीं! तूं किंवा मी पुरुष असतें तर तुझ्या प्रेमाचें सार्थक तरी झालें असतें!"

"संतुदादाचीच बहीण तूं!" बबूताई चेहरा खुलून येऊन म्हणाली. "तूं असें कांहीं तरी बोलायचें नाहीं तर कुणी?—रत्नु, चल, माझ्या मोटारींत बसून तुला यायचें आहे ना?—चल जाऊन बैस अगोदर!"

मी रत्नुला घेऊन बबूताई बरोबर तिच्या मोटारींत जाऊन बसलें. जातां जातांच घाईनें खाली दत्तासाहेबांच्या माणसाला "मी बाहेर जातें आहें परत येईपर्यंत आईची एक दोन वेळा चौकशी करा' असें सांगून ठेविलें. मी निघालों हें पाहून बबूताईला कोण आनंद झाला! मोटारींत बसायला मिळालें म्हणून रत्नुला तर किती मजा वाटत होती! मोटारींत सारखा नाचायला लागला होता तो. त्याला आवरतां आवरतां पुरे वाट झाली मला. "आज आम्हीं नव्या ताईच्या मोटारींत बसलों!" याचेंच

त्याला विलक्षण वाटायला लागलें. ' ताई, दादा घरीं आल्यावर आपण नव्या ताईच्या मोटारींत बसलों होतों म्हणून सांगायचें बरें कां ?–नव्या ताईची मोटार फारच छान आहे म्हणून! आईला सांगूं अं !—"

" बबूताई, " मी बबूताईला म्हणालें, " झालें तुझ्या मनासारखें.? माझें काय जातें, करतेसच जर तूं आम्हाला श्रीमंत—तर मी ग कां नको म्हणूं ? बबूताई, खरें सांग हं पण, माझ्यावर तुझें प्रेम कां ग आहे?"

" कुणास ठाऊक ताई ! तें मला दिखील कळत नाहीं ! पण आहे इतकें मात्र खरें ! आजपर्यंत मी असें प्रेम कधींच कुणावर केलें नाहीं, नी मला प्रेम करायला तुझ्यासारखी मैत्रिण पण मिळाली नाहीं ! " बबू-ताई अगदीं मनोभावानें बोलली !

" पण मी गरीब आहें ! "

" धनानें कीं मनानें ? "

" धनानें !–"

" मनानें नाहींस ना ? "

" कोण जाणें ! "

" खचित नाहीं ! ताई, तूं, तुझी आई, भाऊ, मनानें अत्यंत श्रीमंत आहांत ! आमची समजूत धनाच्या श्रीमंतीपेक्षां मनाची श्रीमंती श्रेष्ठ आहे–आणि तुम्हीं धनानें दरिद्री आहां–मनानें श्रीमंत आहां, म्हणूनच मी तुझ्यावर प्रेम करतें–मैत्रिण समजतें ! तुझ्या माझ्या मैत्रिचीं कारणें मला समजतात, ती एवढींच आहेत. आणखीही कांहीं असतील तीं मला कळत नाहींत ! "

बबूताईच्या या अंतःकरणाच्या बोलानें माझ्या हृदयाला अमृताचा सेक केल्यासारखा वाटला ! ताईबद्दलची माझी समजूत–प्रीती–भक्ती–भावना–सद्‌बुद्धि एकदम दुणावली ! माझ्या नेत्रांत आनंदाश्रु उभे राहिले ! मी ताईचा हात माझ्या हातांत घेतला ! घट्ट धरला ! आणि म्हटलें, " बबूताई, एक दोन शब्दांनींच तूं माझी जगाविषयींची समजूत बदलून टाकलीस ! खरोखरच साऱ्याच जगानें कांहीं पापानें पाय धुतलेले नाहींत. हृदयाच्या श्रीमंतीचीं—खऱ्याखुऱ्या माणूसकीचीं—

खऱ्याखुऱ्या दयामायेचीं माणसें जगांत आहेत, म्हणूनच जग चाललें आहे! ही समजूत ताई, तूं आज मला पटवून दिलीस!—"

" सुगंधाताई! किती अवघड बोललीस! इतकें अवघड मला बोलतां येत नाहीं, आणि समजतही नाहीं. तूं माझी मैत्रिण आहेस एवढं मला कळतें, नी मला तूं आपली मैत्रीण समजावेंस असें वाटतें!" बबूताई मोकळेपणानें बोलली!

" ताई, तूं माझी मैत्रिण आहेस–नी मी पण तुझी मैत्रिण आहें— इतकेंच नव्हे तर आतां आपण सख्ख्या बहिणी आहोंत!"

" खरेंच आहे! आपल्या दोघींची आई आहेच!" बबूताईचे पण डोळे आनंदाच्या पाण्यानें असें म्हणतांना भरून आले!

इतक्यांत मोटार बबूताईच्या बंगल्याच्या पोर्चमध्यें येऊन उभी राहिली! आम्हीं मोटारींतून उतरलों.रत्नुनें माझा एक हात धरला, बबूताईचा एक हात धरला, आम्हीं बंगल्यांत शिरलों. आंत शिरतांना माझी सहज वर नजर गेली–बंगल्याच्या पोर्चवर सुन्दर सोनेरी अक्षरांची " इच्छारामभाई टेरिसिस " अशी मोठी थोरली पाटी लावलेली दिसली! बंगल्यांत शिरत असतांच मी मनाशीं म्हटलें,"इच्छारामभाई टेरिसिस!" म्हणजे दादा ज्या इच्छारामभाई–मिलमध्यें कामाला जातो, त्या गिरणीच्या मालकाचा हा बंगला कीं काय?– मग बबूताई त्या मालकाची मुलगी!! आश्चर्यच म्हणायचें!"

हें मनांत आलें, पण मनांतल्या मनांतच ठेवलें! त्याचा उलगडा करण्याकरितां बबूताईला विचारण्याचें त्याच वेळीं मला धाडस झालें नाहीं, नी मी घाई पण केली नाहीं!

नवकोट नारायणाचाच बंगला तो! आंत जातांक्षणीं माझे तर डोळे दिपून गेले! क्षणभर मी भांबावून गेलें! रत्नुची तर त्रेधा तिरपीट विचारायलाच नको! ' ताई हें बघ! ताई, ती पाहिलीस कां गम्मत!' असेंच सारखेंच त्यानें सुरू केलें! बबूताई आतां पुढें होती! रत्नुनें तिचा हात सोडला होता. माझाच हात तेवढा घट्ट धरून ठेवला होता. प्रथम बबूताईनें सगळा बंगला फिरून दाखविला. दिवाणखाना, तिच्या वडिलांची बसायची जागा. भावाची बसायची–जागा. तिची स्वतःची

निजायबसायची–अभ्यासाची जागा–सगळें सगळें दाखविलें ! मग आम्हीं दिवाणखान्याच्या पलिकडच्या दालनांत गेलों. एका उंची–सुन्दर मखमालीच्या मऊमऊ कोचावर आम्हांला बबूताईनें बसविलें. ती पण आमच्याजवळ बसली ! यावेळीं बबूताईच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें विलक्षण तेज चमकत होतें ! रत्नुला तिनें जवळ ओढून, त्याचा मुका घेऊन विचारलें, " रत्नु, कसा आहे बंगला ! "

" छान आहे "

" कुणाचा आहे हा ? "

" तुमचा ! "

" आणि तुझा रे !–"

"आम्हीं मोठे झाल्यावर बांधणार आहोंत!-मग तुम्हीं याल आमच्या बंगल्यांत नव्याताई !" रत्नु उत्तरला ! या त्याच्या बोलण्याबद्दल बबूताईनें त्याचे प्रेमभरानें पटापट कितीतरी मुके घेतले !

" तुझे वडील कुठें दिसत नाहींत ते ?–" मी चौकशी केली.

" बाहेर गेले आहेत वाटतें ! नेहमीं नाहींत जात या वेळेला ! पण आजच गेले आहेत. "

" अन् तुझे विलायतेहून आलेले भाई ?"

" येईल आतां इतक्यांत !" बबूताई हें सांगते आहे, तोंच चहा, फराळाचें, एका चांदीच्या ताटांत घेऊन तिचा एक नौकर आला. चांदीची तपेली, पंचपात्री–मी आपली बबूताईकडे आणि आणलेल्या फराळाच्या जिनसांकडे टकमक पहातच राहिलें !

" बबूताई, हें ग काय ? मला कुणी देवीबिवी समजून तर मला नैवेद्याचें हें आणलें नाहींस ! हे षोडशोपचार मला ग कशाला ?–माझ्या तिथें एवढ्या करितांच चहा करूं दिला नाहींस वाटतें ?–"

" तसें नाहीं कांहीं ताई ! तुझ्या करितां म्हणून मुद्दाम असें कांहींच नाहीं. आमचें हें रोजचेंच असतें !" बबूताई माझी समजूत करूं लागली.

" एवढ्या करितां मी थोरामोठ्याकडे जायला कधीं उत्सुक असत नाहीं. ताई, मला हें आवडत नाहीं बघ !–ताई, अशाकरितां आमचा जन्म आहे काय ?"

" आहे! खास आहे ! नाहीं कशावरून ?–" ताईचा स्वर कातर झाला. रत्नु, फराळाकरितां, चहा घ्यायला उत्सुक झाला होता. पण माझी त्याला भीति वाटत होती. तो माझ्या मनाचा कल पहात होता !

" हं, आटप ताई, चहा निऊन चाललाय !--तुला आणखी किती तरी गोष्टी दाखवायच्या आहेत. पलिकडे मी स्वतः छोटासा बाग तयार केला आहे, तो तुला दाखवायचा आहे !--"

" भाई येताहेत ना ?—" मी प्रश्न केला.

" आपलें फराळाचें झाल्याशिवाय तो इथें यायचा नाहीं !–त्याच्या कडे आतां–तिकडे चहा–फराळच चालला आहे !—"

" मी हें घेतलें म्हणजे तुला बरें वाटेल ? "

" हो !—"

अगदीं नाइलाज होऊन, केवळ ताईच्या मर्जीकरितां मी तिथें फराळ केला. आमच्या इथें आम्हांला इतक्या तऱ्हेचें कधीं करितां येत नाहीं. आईला, दादाला, रत्नुला धड चांगल्यातऱ्हेचें सात्विक भरपूर अन्न मिळण्याची मारामार पडते. आमच्याकडून उलट असा परामर्ष दुसऱ्याचा घेण्यास आमच्यांत शक्ति नसते, त्या आम्हांला हें यथास्थित सेवन करण्याचा काय अधिकार ? हाच विचार ताईच्या प्रेमाच्या उपाहाराकडे अशा त्रासदायक रीतीनें पहावयाला लावीत होता ! जें आम्हांला दुसऱ्याला देतां येण्यासारखें नाहीं, तें दुसऱ्याकडून आम्हीं तरी कां घ्यावें ? ताईनें तरी घेण्याकरितां कां आग्रह करावा ? श्रीमंती मोहांनीं ' आम्हांला कां सतवावें ? हीच विचार मालिका डोक्यांत चालू होती. आमचा चहा झाला, जिन्यांत पावलें वाजलीं, ताई म्हणाली, " भाई आला. " तोंच बबूताईचा भाई आम्हीं बसलों होतों त्या दालनांत–आम्हांला–बबूताईच्या मैत्रिणीला पहावयाला आला.–बबूताईच्या भाईला पाहतांच, " अगबाई ! हे ते—" असा अर्धस्फुट आश्चर्योद्गार

माझ्या तोंडांतून निघाला. मी विजेचा झटका बसल्याप्रमाणें होऊन उठून उभी राहिलें !

"अरे ! ती ही !–" मला पहातांच भाईचाही असाच उद्गार बाहेर पडला !

आमचे दोघांचे असे एकार्थीच उद्गार ऐकून, व परस्परांना पाहतांच दोघांचीही जी स्थिती झाली ती पाहून, "तुला इतकें आश्चर्य कसलें वाटलें ? मी तुला सांगत होतें, तीच ही माझी मैत्रिण ! हीच माझी बहिण !–" बबूताई भाईला माझी ओळख करून देऊं लागली.

"असें का ?—काय चमत्कार आहे पहा !–बबूताई, काल ज्या मुलीची म्हणून मी तुला गोष्ट सांगितली—जी वाटेंत मूर्च्छित पडली होती नी जिला मी सावध करून मोटारींतून गिरणीपर्यंत घेऊन गेलों, तीच ही तुझी मैत्रिण !" भाईनें मजकडे पहात बबूताईला माझी कालची ताजी ओळख पटविली !

कालच्या संकटांतून सावध करणारा, आपल्या मोटारींतून गिरणी-पर्यंत नेणारा परोपकारी थोर पुरुष—मोटारींतला माणूस, तोच हा बबू-ताईचा भाई ! थोरांचें अंतःकरण खरेंच थोर असतें ! बबूताईच्या भाईला पाहिल्यावर काल त्याला पहातांच मला जें एक विलक्षण गूढ पडलें होतें, तेंही चटकन् यावेळीं उलगडलें ! भाईला कुठें तरी पाहिल्या-सारखें वाटत होतें—परिचय असावा अशी जी शंका येत होती, त्याचें निराकरण आतां झालें. कालपर्यंत भाईला जरी मी पाहिलें नव्हतें, तरी बबूताई माझी शाळेंतील मैत्रिण होती. तिच्या चेहऱ्यांत, व भाईच्या चेह ऱ्यांत विलक्षण साम्य होतें ! पाहिल्यासारखें वाटे तें त्यामुळें ! पण लक्षांत कसें येणार ? काल घरीं आल्यावर, व घरीं बबूताईला पाहिल्यावर माझ्या डोक्यांत तोच प्रश्न पुन्हां उद्भवायला पाहिजे होता. पण दुसरीच परिस्थिति निर्माण झाली, आणि मी तें त्या वेळेपुरतें विसरूनही गेलें ! पण आज सूर्य जयद्रथ समोरासमोर पाहतांच गूढ एकदम उकललें !

मग भाईला बबूताईनें आणखी माझी माहिती करून दिली. माझी हुशारी, माझ्या दादाचा गोड स्वभाव—आईची करुणाजनक स्थिति—गरीबींतही निर्व्याज आनंदांत राहण्याची आमची हातोटी—या सर्वांचें

वर्णन पुन्हापुन्हां भाईजवळ घोळून घोळून चालविलें होतें ! भाईही आपल्या बहिणीच्या बोलण्याकडे सकौतुक लक्ष देत होता ! वास्तवीक आमची सारी हकीकत तिनें रात्रीं आमच्याकडून येतांच भाईला सांगितली होती. पण आतां तीच हकीकत पहिल्याइतकीच प्रेमानें बबूताई सांगत होती; व भाई जशी कांहीं ही हकीकत पहिल्यानेंच बबूताईच्या तोंडून ऐकत आहोंत, अशा भावनेनें सप्रेम व सादर ऐकत होता !

ज्या गरीबाच्या मुलीला आपण संकटांत साह्य केलें, तिला आपल्या बहिणीनें मैत्रिणच केली—गरीबांशी मिसळण्यांत, त्यांच्या उपयोगी पडण्यांत आपल्यावरही आपल्या बहिणीनें ताण केली, याबद्दल भाईला जें कांहीं मनांतून वाटत असेल, त्याचें सात्विक चित्र यावेळीं भाईच्या चेहऱ्यावर खेळत होतें !

बबूताई माझ्या गुणाचें, शहाणपणाचें, शाळेंत तिला अभ्यासाला मदत करण्याच्या माझ्या तत्परतेचें, माझ्या लेखिका होण्याच्या महत्वाकांक्षेचें, दादा मला त्या बाबतींत प्रोत्साहन देत असतो त्याचें, भाईजवळ एकसारखें वर्णन करीत सुटली होती !

बराच उशीर झाला; आम्हीं घरीं यावयाला निघालों. बबूताईचा भाई आमच्याशीं फारच प्रेमळपणानें बोलला. रत्नुला त्यानें कांहीं चित्रें, खाऊ वगैरे दिला. पुन्हां वरचेवर यायला सांगितलें 'आपणही सवडीप्रमाणें बबूताईबरोबर तुमच्या तिथें येत जाऊं !' म्हणून कबूल केलें !

बबूताईनें मोटारींतून आम्हांला आमच्या बिऱ्हाडीं पोंचविलें.

संध्याकाळ झाली होती. दादा परत यावयाची वेळ झाली होती ! बबूताई निरोप घेऊन, व परत यईन म्हणून कबूल करून परत गेली ! मी रत्नुला घेऊन माडीवर आलें ! -

## प्रकरण ८ वें.

# कादंबरींतल्यासारखे योग !

आमच्या आयुष्यांतल्या चमत्कार युगालासुरुवात झाली होती असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं ! आईच्या जास्त आजाराच्या दिवशीं, व त्याच्या दुसऱ्याच दिवशीं ज्या निरनिराळ्या, एका मागून एक अनेक अशा, आमच्या नित्य क्रमाला पुष्कळशा विसंगत गोष्टी घडल्या, त्या आमच्या चमत्कार युगाला सुरुवात करण्यासारख्याच होत्या तर काय ? त्या दिवसापर्यंत ध्यानीं मनीं नसतां–आईच्या आजाराच्या निमित्तानें मला बाहेर पडावें काय लागलें, वाटेंत मूर्च्छा काय आली, भाईची मोटार त्याच वेळीं तिथें कां आली ? पुढें त्यानें माझ्याकरितां इतकें श्रमसायास-सहाय्य कां केलें ? आपल्या मोटारींतून गिरणीला कां पोंचविलें ? गिरणीच्या मॅनेजरचा जणुं काय मनुष्याचा मासलाच म्हणून कीं काय, तो एक फार्स काय उडाला ? घरीं येऊन पाहतें, तों शाळेंतली श्रीमंताची मैत्रिण कधींच नाहीं, ती काय बुद्धि होऊन आमच्या घरीं आलेली दिसली ! तिनें आईची सेवासुश्रुषा इतक्या मनोभावानें केली ती कां ? माझ्यावर, माझ्या दरिद्री छोट्या कुटुंबावर अकृत्रिम मायेचा वर्षाव करा-वयाला सुरवात केली ती कशासाठीं ? चमत्कारयुगाशिवाय हें असें संभवनीला कसें होईल ?

याच विचारांत माझें मन परिभ्रमण करूं लागलें होतें. चमत्कार युगाला सुरवात होऊन आतां चांगले तीन आठवडे लोटले होते; त्या दिवसापासून नित्य नवें कांहीं तरी घडतच होतें. मॅनेजरनें म्हटल्याप्रमाणें संतुदादाला त्या दिवशींच्या त्या दिवशींच मोकदमीवरून काढून वर ऑफिसांत महत्वाच्या जागीं आपल्या अधिकारांत नेमणूक करून दिली होती. रोजमुऱ्यांतही कांहींशी वाढ केली होती. त्या दिवसापासून आमचें बबूताईकडे, बबूताईचें आमच्याकडे सारखें येणें जाणें वाढतच चाललें होतें. गेल्या महिन्यांतली मजुरीच्या मोलाचीं माणसें आम्हीं या महिन्यांत दररोज

बबूताईच्या मोटारींतून हिंडावयाला लागलों होतों ! बबूताई, तिचा भाई, यांच्या आमच्यांत दाट घरोबा होत चालला होता. मॅनेजरचें आमच्याकडे येणें जाणें पण बरेंच वाढलें होतें. मॅनेजरनें दादाला बढती दिल्यावर माझ्या बद्दल दादाजवळ उघडच मागणी घालण्यास कमी केलें नाहीं. दादानें त्या बाबतींत त्याला कांहींच उत्तर दिलें नव्हतें ! "आम्हीं मजुरांनीं असली भलती महत्वाकांक्षा बाळगूं नये. आणि तुम्हींही आपला दर्जा सोडून मजुराच्या मुलीशीं संबंध जोडण्याचा कमीपणा पत्करूं नये" अशा सारखें थट्टेनें, गंभीरपणानें, उपहासानें, सरळ, स्पष्ट, पर्यायानें—सगळ्या-रीतीनें दादानें मॅनेजरला सांगून टाकलें होतें. पण कोणत्या कुमुहूर्तावर मी त्याच्या दृष्टीस पडलें होतें कोण जाणें ? दादाजवळ माझ्या विषयीं तो जास्तच जिकीर घालूं लागला होता ! दादानें त्याबद्दल त्याला एकदां दोनदां रागानें खडसावलें देखील ! 'अशा नीच हेतूनें जर मला तुम्हीं प्याद्याचा फर्जी करीत असाल, किंवा केलें असेल, तर तुम्हीं दिलेल्या मोठेपणावर अशीं लाथ मारतों ! मला माझी मोकदमीच पुष्कळ आहे ! बहिणीच्या मोबदल्यासाठीं लांचलुचपत म्हणून जर मोठेपणाची पदवी तुम्हीं पुढें केली असेल, तर धिःकार असो तुमच्या लांच देणाऱ्या मनो-वृत्तीला ! आणि त्याचा स्वीकार करायाला तयार होणाऱ्या मलाही ! अशा कडक शब्दानेंही दादानें खुशालचंद मॅनेजरला अनेकदां धिःकारलें होतें ! तरी त्याचा कांहीं परिणाम मॅनेजराच्या मनावर झाला नव्हता ! त्याला अधिकाराची धुंदी व घमेंड होती ! आपला अधिकार लोकांनीं मानलाच पाहिजे. आपण सांगूं तसें लोकांनीं, हाताखालच्यांनीं, स्नेह्या-सोबत्यांनींदेखील वागलेंच पाहिजे; हा त्याचा स्वभाव ! तो दादाचे शब्द कुठून ऐकणार ? त्याची खात्रीच होती कीं दादाकडून तो मला मिळविणारच !

दादाला तरी हें कां नको होतें ? खुशालचंद एवढ्या मोठ्या अवा-ढव्य गिरणीचा मॅनेजर, पोझिशनचा मनुष्य ! आपण होऊन दादाजवळ मला पाहिल्यावर माझ्याकरितां मागणी घालतो आहे, मग दादा त्याला कां झिडकारीत होता ? तर दादा त्याचें चारित्र अहोरात्र पहात होता. खुशालचंद सगळ्या दुर्गुणांचें, व्यसनांचें, नीचपणाचें, माहेरघर होता ! गिरणीतल्या

हजारो गरीब बायाबापड्या कामकरी–बायकांना तो आपल्या गोपी समजे ! जणुं काय निर्लज्जपणा, पाजीपणा, खुशालचंदाच्या पांचवीला पुजला होता ! खुशालचंदानें, दारूच्या नादांत, व्यसनाच्या–शहेरख्यालीपणाच्या नादांत आपल्या पहिल्या तीन बायकांना छळून छळून हालहाल करून, निजधामाला पाठविलें होतें. या साऱ्या गोष्टी दादाला माहित झाल्या होत्या ! त्याच्याशीं लगट करण्याची, दादाची तयारी नव्हती ! त्याला आपलें घर दाखवायचें म्हणजे आपल्या घरच्या पावित्र्याला बाहेर लोटावयाचें, पापाला घरीं बोलावून आणून त्याचें स्वागत करावयाचें, असेंच दादा समजत असे ! त्याच्या हाताखालीं दादा वागला होता, वागत होता; म्हणून आपली मर्यादा संभाळून शक्य तितकें दादा नेहमीं त्याच्याशीं वागत असे ! त्याचा हा स्वभाव असा असला तरी कामाला राक्षसासारखा होता. त्याची कामाची उरकशक्ति अतीशय दांडगी होती. त्याची कामाची शिस्त–आणि धोरण ही विलक्षण होतीं ! याच त्याच्या अंगच्या गुणावर आज कित्येक वर्षें गिरणीचा मॅनेजर म्हणून गाजत होता. आणि त्याच्या याच गुणानें गिरणीला उर्जीतावस्था आली होती ! मालकाचा नफा सालीना कोटीनीं वाढविला होता ! दादा हे त्याचे गुणही कबूल करी. पण तेवढ्या करितां त्यांच्याशीं संबंध यावा हें दादाला कधींच पटलें नाहीं ! खुशालचंद आमच्या घरीं आला तर दादाची तळपायाची आग मस्तकाला जात असे ! तरी पण अलिकडे सुट्टींच्या दिवशीं आमच्याकडे येण्याचा त्यानें परिपाठ ठेवलाच होता ! यायचें, आईची विचारपूस करायची, अचावचा कांहीं तरी बोलायचें, दादाला, मला, गाडींतून फिरायला चलायचा निलाजरेपणानें आग्रह करायचा, हें त्यानें चालविलेंच होतें ! अशी खूशालचंदाची आमच्या विषयीं हकीकत होती !

तर इकडे बबूताईच्या बाबतींत तर उत्तरोत्तर भेदभाव लोपत चालला होता ! भाई भेटत असे, आमच्या घरींही बबूताई बरोबर वरचेवर यायला जायला लागला होता ! बबुताईचे वडिलही मला ओळखायला लागले होते ! एकदोन दिवस मी बबुताईकडे गेलें नाहीं, तर तिचे वडील तिच्याजवळ चौकशी करीत कीं, " तुझी ती मैत्रिण कां आली नाहीं ! तिचा छोटा भाऊ तर मोठा चलाख आहे ! जा त्यांना घेऊन ये जा ! " आतांपर्यंत

मी व रत्नुच बबूताईकडे जात असे. दादा कधीं तिकडे आला नाहीं; त्याला यायला पण होत नसे! तसाच भाई आमच्याकडे येई, पण त्यालाही वरचेवर यायला होत नसे! कधीं तरी इकडे तिकडे जातांना—उभाउभी येत असे! आईशीं दोन प्रेमळ शब्द बोलायचे व "लवकरच बऱ्या व्हा! म्हणजे आम्हांला बरें वाटेल" असें बोलून जाई. भाई आमच्याकडे आला म्हणजे आम्हांला पंचाईत पडे! आमच्या दीडवीत जागेंत भाईला आणायची आम्हांला लाज वाटे. कित्येकदां तर खालीं दत्तासाहेबांच्या जागेंतच बसवून—तिथूनच भाईची बोळवण मी करीत असे. आमच्या जागेंत सामान तें काय असणार? अगदीं तात्पुरतेंच! पण मी तें शक्य तितकें नीटनेटकें ठेवीत असे. दादाला अजागळपणा, अव्यवस्थितपणा मुळींच खपत नसे! त्यामुळें सगळें जिथल्यातिथें ठेवण्याची चांगलीच संवय झाली होती! भाईला ती दीडवीत टापटीपीची जागा पाहून भारी गंमत वाटे; तो कित्येकदां बबुताईजवळ म्हणाला देखील कीं, सुगंधाताईच्या बिऱ्हाडांत जी व्यवस्था-नीटनेटकेपणा आणि स्वच्छता आहे, ती कांहीं आमच्या एवढ्या मोठ्या बंगल्यांत नाहीं! ती टीचभर मनोहर जागा तींत राहणाराला लक्षाधीश करील!"

भाई एवढा मोठा कोट्याधीश पण आमच्यासारख्या मजुरमोलाच्या माणसाशीं अगदीं समभावानें वागे! बबूताईला आमच्याशिवाय आतांशा चैन पडेनासें झालें होतें. पण या परिस्थितीनें आम्हीं हुरळून मात्र गेलों नव्हतों; किंवा स्वस्थिति विसरून गेलों नव्हतों! तशीच, या श्रीमंतांच्या परिचयाचा फायदा कशातरी प्रकारानें त्यांना थोड्यामोठ्या लाभाच्या आशेनें लुबाडण्यांत घ्यावयाचा, हें कधीं आमच्या मनांतही आलें नाहीं.

हें सर्व खरोखरच मला आमचें चमत्कार युग वाटत असे! गरीब श्रीमंतांच्या स्नेहाचे धागे जमायचे म्हणजे मला अगदीं कादंबरींतल्यासारखे योगायोगाप्रमाणें वाटत असत! मी दादाजवळ या माझ्या विचाराबद्दल शहानिशा करायला गेलें, म्हणजे तोही असेंच सांगेः—

"आपण गरीब असलों म्हणून काय झालें? आपण मोठे होण्याच्या लायखीचे आहोंत, आणि लवकरच मोठें होणारही आहोंत? आपल्याला आपले जे भावी सुखाचे दिवस येणार आहेत, त्याचीं हीं पूर्व चिन्हें आहेत. श्रीमंतांनीं आम-

च्याशीं स्नेह जोडण्यांत आम्हांला जसें भूषण वाटतें, तसेंच आमच्या स्नेहांबद्दल श्रीमंतांनाही धन्यताच वाटली पाहिजे, तरच स्नेहाचें सार्थक! एरव्हीं कसला आहे स्नेह? निव्वळ परस्परांची फसवणूक ती!— आपल्या आयुष्यांत अजून काय चमत्कार झाले आहेत? असे चमत्कार घडून येणार आहेत! आज जें स्थित्यंतर घडतें आहे, त्यावरून पुढें अजब चमत्कार घडणार आहेत, एवढीच आपल्या मनाशीं खूणगांठ आपण बांधावयाची असते!' असें दादा पुष्कळदां प्रतिपादन करी!

आमच्या चमत्कारयुगाला सुरवात झाल्यापासून दादाच्या मनाची स्थिति काय झाली होती कोण जाणें. पण माझ्या मनाचें मात्र विलक्षण स्थित्यंतर झालें होतें. आमच्या दिवसाच्या वर्तनक्रमांत ज्या ज्या गोष्टी घडत, त्या सगळ्याच मला नवलपरिच्या वाटत; मी त्या रात्रीं लिहून ठेवूं लागलें. आज असें झालें, बबूताईची गांठ पडली, त्यांची माझी अमूकतमूक बोलणीं झालीं; दादाला हें सांगितलें; दादानें ऑफिलांतली मजा सांगितली. मॅनेजरनें असा चावटपणा केला, त्याची तशी आम्हीं खोड काढली! एकना दोन–सगळें सगळें होईल तें लिहून ठेवी. दादाला दाखवीं; बबूताई आपण वाचून पुन्हां भाईला दाखवायला नेई. बबूताईच्या सांगण्यावरून आतांशा मी लिहिलेलें वाचण्याशिवाय, आणि त्याची मनमुराद स्तुति करण्याशिवाय भाईला दुसरा विषयच नव्हता! माझ्या लिहिलेल्या लेखावर दादाची आणि बबूताईची गांठ पडली म्हणजे तासच्यातास वादविवाद होई! चांगली खडाजंगी उडे! बबूताईनें माझी बाजू घ्यावी. दादानें मुद्दाम तिच्या उलट बोलावें. "सुगंधाताईला काय कळतंय? काय येतय? लेखिका व्हायचं म्हणतांच कांहीं होता येत नसतं! त्याच्या करितां आयुष्याच्या आयुष्य वेंचावें लागतें! तपेंच्या तपें घालावीं लागतात! बबूताई, तुम्हीं सुगंधाताईला उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवून ठेवूं नका! नाहींतर ती शेफारून जाऊन कायमचीच कुचकामाची होईल! अहो, आम्हीं हमालखान्यांत बारानू बारा चोवीस तास हाडांचीं काडें करतों, तर आम्हांला धड पोटभर खायला देत नाहींत, कीं, 'अरे चे अहो' म्हणत नाहींत. तर लेखक व्हायचें काय तोंडाचें लागलें आहे?" असें दादानें म्हटलें कीं बबूताई चिडायची, वैतागा-

यची ! दादावरच रागावयाची ! शेवटीं हटून, रुसून दादाकडून मला जेव्हां चांगलें म्हणवून घेई, तेव्हां तिला बरें वाटे ! दादाही जसें मला एकदां वाईट तर खूप वाईट म्हणायला लागायचा! तसेंच चांगलें म्हणायला लागला, म्हणजे बेसुमार चांगलें म्हणायला लागायचा ! मग जगांतले असतील नसतील तितके गुण माझ्यावर लादायचा ! एकदां दादानें माझी स्तुति चालविली म्हणजे मग काय? मेरीकॉरेली काय?-भगिनी निवेदिता काय ? तरुलतादत्त काय ? किंवा जगांतल्या या सगळ्या ग्रंथकर्त्या किंवा ग्रंथकर्ते जणूं काय माझ्यापुढें शरणांगतासारखे पुढें हात जोडून उभे आहेत—असें बबूताईला भासवी ! या उलटसुलट बोलण्याचें बबूताईला अगदीं विलक्षण—वाटे ! दादाच्या बोलण्याकडे ती आपलें सर्व लक्ष लावी ! दादानें असें विलक्षण-गंमतीचे बोलत रहावें म्हणून प्रत्येक बबूताईच्या व दादाच्या भेटींत बबूताई नाना युक्त्या योजी ! दादा हें ओळखी. व बबूताईच्या ह्या कल्पनेची पूर्ती खरोखरच अनंत चमत्कारपूर्ण नवलकथा—सांगून करी.

आतांशा आतांशा बबूताईच्या आणि माझ्या भेटींत जितका काळ जाई, त्यांत बहुतेक माझी, माझ्या लेखांची, तिच्या भाईनें केलेली अवास्तव स्तुति, आणि दादाचें, त्याच्या स्वभावाचें, त्याच्या बोलण्याचें, कोट्यांचें, मनसोक्त वर्णन, याचाच भाग जास्ती असावयाचा—असो !

अशी आमच्या आयुष्यक्रमाला सुरवात झाली होती. असें चाललें असतां, एक दिवस सहज एक गमतीची गोष्ट घडली ! त्या गोष्टीनें मला आणखी कांहीं नव्या गोष्टी कळल्या. कित्येक गोष्टींचें अधिकच गूढ पडलें ! कित्येक गोष्टींबद्दल नुसतीच चिंतेची छटा उठली. ती गोष्ट म्हणजे अशी:—

त्या दिवशीं आम्हीं दोघी, मी व बबूताई शाळेंतून बरोबर आलों. आईची प्रकृती साधारणच होती. झेपेल तसें व होईल तसें स्वतःच्या मनाच्या करमणुकीसाठीं, व समाधानासाठीं कसली तरी पोथी आई वाचीत असे. आम्हीं शाळेंतून आलों. आईनें फोडणीचे पोहे बसल्या बसल्या करून ठेवले होते. ते घ्यायला सांगितलें. ते आम्हीं दोघींनीं खाल्ले ! आणि आईला विचारून मी बबूताईच्या बरोबर तिच्या बंगल्यावर जायला निघालें ! रत्नु बरोबर यायचाच ! बबूताईच्या वडिलांना—कां कोण जाणें—रत्नूचा

ळळा विलक्षण लागला होता ! रत्नूला बरोबर घेतला आणि आम्हीं गेलों !

बंगल्यावर चहापाणी, फराळाचें झालेंच. भाई आमच्यांत गप्पागोष्टी करायला मिसळला. माझ्या नव्याजुन्या लेखनाची चौकशी, आईच्या प्रकृतीची पूसतपास झाली. रत्नु आमच्यांत कशाला बसतो आहे ? मोटारींतून उतरतांच त्यानें थेट बबूताईच्या वडिलांना गांठलें होतें. दोघांचें बरें जमत असे ! शेटजी मोठें नवकोट असले तरी रत्नुला त्याची काय कल्पना ? तो म्हाताऱ्याच्या अंगाखांद्यावर खुशाल तेथें असेपर्यंत खेळे लोळे ! शेटजींनींही हा मजुराचा–दरिद्र्याचा मुलगा म्हणून कधींही तिरस्कार केला नाहीं ! मुलाच्या मनानें मुलाशीं खेळण्यांत म्हातारा तासचे तास रंगून जाई ! असो. रत्नु या वेळीं तिकडे होता !

" सुगंधाताई, त्या दिवशींच्या मूर्च्छितपणाची हकीकत अगदीं जशीच्या तश्शी लिहिली आहेस ! मला फार आवडली ! तूं लिहिलेलें वाचतांना मला वाटलें तो प्रत्यक्ष प्रसंग पुन्हां आतांच जसा कांहीं घडतो आहे ! तसाच मॅनेजरच्या भेटीचा प्रसंग ! वाचतांना खूपच खूप हंसूं येतें ! विनोदीसुद्धां तूं चांगलेंच लिहितेंस कीं ! " भाईची ही भाषा होती !–
" कसलें विनोदी लिहिते आहे ही !–" बबूताईनें मध्येंच तोंड घातलें ! " भाई, तूं संतूदादाला पाहिलें नाहींस ! संतूदादाच्या विनोदी बोलण्यांतला एकशतांश तरी हिच्या लिहिण्यांत आहे का ?–काय ग ताई ? मी म्हणतें तें खोटें आहे का ? "

" अगदीं खरें आहे ! " मी म्हणालें " भाईना माझी स्तुति करायची संवयच झाली आहे झालें ! "

" काय सुगंधाताई ! मला जें वाटलें तें सांगितलें तर स्तुति केली वाटतें ?—बरें तर, तूं आतां कांहीं लिहिलेलें बबूताईनें वाचायला तर आणूं दे–मी नुसत्या चुकांचा ताईपुढें व तुझ्यापुढें असा ढीग रचून ठेवतों पहा ! सुगंधाताईनें तयार केलेलें शब्दचित्र तुमच्यापुढें अगदीं उलटें धरतों म्हणजे झालें ! मग काय ? ताईच्या शब्दचित्रांत तुम्हांला आणि मला नखशिखांत चुकाच चुका दिसतील !–"

" वा ! भाई ! तुमच्या या विनोदी बोलण्याइतका जर मला विनोद लिहितां येईल—"

" तर काय बहार होईल म्हणावें ! " भाईच बोलला ! यावर आम्हीं सर्वच हंसलों ! आमच्या सर्वांच्या एकदम हंसण्यानें सर्व दिवाणखाना दुमदुमून गेला !—आमच्या हास्यानें जो छत तयार झाला होता, तो वितळण्याच्या आंत त्या दिवाणखान्यांत अकस्मात् व अकल्पित दोन व्यक्ति आल्या !

एक मॅनेजर खुशालचंद, व दुसरा आमचा संतूदादा ! ते दोघेही आमच्याकडे व आम्हींही त्यांच्याकडे अर्धघटकापर्यंत नुसते 'आ !' करून पहात होतों !

" अरे, सुगंधाताई, बबूताई, दोघीही इथें कुठें ?—" संतुदादानें आम्हां दोघींना एकदम पाहून आश्चर्यानें विचारलें !

" इथें कुठें म्हणजे ? संतुदादा, मी आमच्याच बंगल्यांत आहें ! मी दररोज नाहीं का सुगंधाताईला माझ्याकडे आणीत ?—रत्नुही आला आहे ! तिकडे बाबांच्याकडे आहे !—भाई, हाच संतुदादा बरें का ! सुगंधाताईचा, माझा, आणि म्हणून तुझाही भाऊच ! "

" म्हणजे हा तुझा बंगला ? हा तर आमच्या गिरणीच्या मालकाचा ईच्छारामशेटजींचा बंगला ! म्हणजे तूं ईच्छारामशेटजींची मुलगी तर ? ताई, सुगंधाताई, ऊठ ऊठ तिथनं ? कुठें बसली आहेस तूं ! आपल्या मालकाच्या, धन्याच्या, गादीवर त्यांच्या बरोबरीनें बसतेस ? ऊठ ! पिंडीला पाय लावूं नये ! आपल्या स्वामीच्या बरोबरीनें बसूं नये ? स्वामी सेवकांचें नातें विसरूं नये !—मॅनेजरसाहेब, हे आपले छोटे शेट ना ? ( दादानें त्यांना जमीनीला पडून साष्टांग नमस्कार घातला ! ) छोटे शेट, माझा—आपल्या गिरणींतल्या गरीब मजुराचा हा आपल्याला प्रेमाचा दंडवत आहे ! आमच्या ताईला कांहीं कळत नाहीं ! अडाणी आहे ती ! म्हणून तिच्या हातून आपल्या बरोबर बसण्याचा अपराध झाला आहे ! एकवार तिला माफ करा ! पुन्हां ती असें करणार नाहीं ! मी तिला करूं देणार नाहीं ! " दादा हें बोलतांना गोंधळून जाऊन मी खरीच उभी राहिलें होतें !

" संतूदादा बोलायचें थांबल्यावर दोन तीन मिनिटें अगदीं शांत होतें. माझें तर मस्तक अगदीं बधीर होऊन गेलें होतें ! पण ती शांतता

फार वेळ टिकली नाहीं. बबूताई हंसत हंसत जाग्यावरून उठली, दादाजवळ गेली, व त्याला म्हणाली, " संतूदादा, झालं तुमचं बोलून ? कां आणखी कांहीं आहे ? असेल तर बोलून घ्या. ( बबूताई माझ्याकडे वळून. ) ताई, बैस ग तूं ! तूं कां उभी आहेस ? संतूदादा, इथें नोकर धन्याचा काय संबंध ? शिवाय सुगंधाताई कुणाची नोकर आहे ? आणि तूं नोकर असलास तरी कुणाचा ? गिरणीचा ! इथें काय त्याचें ! तूं आमच्याकडे कधीं येणार नव्हतास तो आला आहेस. ताई तिथें माझ्याजवळच बसायची ! ती माझी बहीण आहे ! तसेंच तुम्हीं पण आमच्या भाईजवळ जाऊन अगदीं भावाच्या नात्यानें बसलें पाहिजे ! भाई, संतूदादा माझे म्हणजे तुझे सुद्धां भाऊ आहेत ना ? मग इथें त्यांनीं तुझ्याजवळ नको का बसायला ?–बस दादा तिथें. बसलेंच पाहिजे !–" बबूताईनें संतूदादाच्या हाताला धरून भाई ज्या कोचावर बसला होता तेथें नेलें. भाईही उठला. त्यानें संतूदादाचा हात धरून म्हटलें, " संतुराम, आमची बबूताई म्हणते तेंच खरें आहे. तुम्हीं आम्हीं भाऊच आहोंत. माझ्याजवळ बसायला तुम्हांला कांहींच हरकत नाहीं ! तुम्हीं आमचे मजूर असलां, तर मीही तुमचा मजूरच आहें ! या नात्यानें आपण सारखेंच नाहीं काय ? " असें म्हणून दादाला आपल्याजवळ नेऊन बसविलेंही !

" बसा हो खुशालचंद ! बसा असे ! " भाईनें मॅनेजर खुशालचंदालाही बसावयाला सांगितलें. पण ते बसले नाहींत. प्रस्तुत प्रसंगाचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला असला पाहिजे. बाह्यतः ते जरी शांत होते, तरी तोंड काळें ठिक्कर पडलें होतें. इतरांना कदाचित् तसें दिसलें नसेल, लक्षांत आलें नसेल, पण मला मॅनेजरांचा चेहरा त्यावेळीं फारच भेसूर, विद्रूप, क्रुद्ध, त्वेषयुक्त असा दिसला !

" छोटे शेट, " मॅनेजर न बसतांच बोलत होते, " शेटजी कुठें आहेत ? मी त्यांच्याकडे कांहीं महत्वाच्या कामाकरितां आलों होतों."

" बाहेर गेले आहेत. बाहेर जातांना त्यांनीं तुम्हांला टेलिफोन दिला होता ! तुम्हीं ऑफिसांत हजर नव्हता ?–"

" मग मी टेलिफोन पोंचण्यापूर्वींच निघालों होतों तर !–बरें, रात्रीं साडेआठाला पुन्हां येईन. नाहीं तर सकाळीं भेटेन म्हणून सांगा !–चल संतू–" मॅनेजर म्हणाला!

"जी सरकार!" असें म्हणून संतुदादा मॅनेजर बरोबर जायला निघाला. मॅनेजरचा आवाज इतका बद्बद् करीत होता, कीं, त्या बद्बद्पणानें माझें काळीजच फाटल्यासारखें झालें !

" कां ? संतूदादा, तसें नाहीं, असें तरी यावें लागलेंच कीं नाहीं माझ्याकडे ?" बबूताई हंसत उद्गारली !

" काय करणार ? हुकमाची तामिली मजुरांनीं केलीच पाहिजे ! बैस म्हटलें बसायचें, ऊठ म्हटलें उठायचें. छोट्या शेटांनीं सांगितलें बसलों. मजूरच मी ! न बसून सांगतों कोणाला ? साहेबांसारखा मॅनेजर असतों, तर शेटजींनीं सांगितलें असतें तरी बसलों नसतों ! चला साहेब," म्हणून, व पुन्हां एकदां भाईला लवून वंदन करून दादा बंगल्याच्या बाहेर पडला. मॅनेजरही गेले !–

मी आपली गोंधळून गप्प बसलें होतें ! माझ्याकडे पाहून बबूताई म्हणाली.

" अशी ग कां गप्प बसली आहेस ? "

" आतांचा ' कादंबरींतल्यासारख्या योगायोग ' लिहावा कसा याचा सुगंधाताई विचार करतें आहे !–नाहीं ताई ? " असें म्हणून भाई हंसला. बबूताई हंसली, मी हंसलें ! " हाच का आमचा खुशालचंद मॅनेजर तुझ्या त्या प्रकरणांतला ?–अगदीं हुबेहुब स्वारीला रंगवला आहेस पहा! आजचासुद्धां प्रसंग असाच रंगव ! फारच इफेक्टिव्ह प्रसंग आहे नाहीं ?" भाई म्हणाला व हंसला !" भाईनें संतूदादाला आतांच पाहिलें होतें. पण तेवढ्यांत त्याच्या मोकळ्या स्वभावाची पारख भाईनें चटकन् केली ! व त्याची वाखाणणीही केली !

आतांच्या प्रसंगाचा ठसा बबूताई किंवा भाई यांच्यापेक्षां माझ्या मनावर कितीतरी विलक्षण उठला असेल, याची खरोखरीच त्या बहिण भावंडांना कशी कल्पना येणार ? नंतर मी फारच थोडावेळ तेथें होतें.

शेटजी बाहेर गेले होते; त्यांच्या बरोबरच त्यांच्या मोटारींतून रत्नुही गेला होता. रत्नु येतांच मला व रत्नुला बबूताई पोंचविण्यासाठीं तयार झाली !—आम्हीं त्या दिवशीं बाहेर, चौपाटीवरून फोर्टमधून, बबूताईच्या आग्रहानेंच फिरलों. तिकडून परततांना बबूताईनें आम्हांला धोबीतलावावर सोडलें, आणि ती घरीं गेली !



## प्रकरण ९ वें.

# संकटाचीं पाउलें.

" काय ग सुगंधा, किती वाजले बरें ! " आईनें मला हांक मारून विचारलें. मी दारांत उभी होतें.

" साडेआठ वाजून गेलें आहेत वाटतें !" मी दत्तासाहेबांच्या ऑफिसांतल्या घड्याळाकडे डोकावून पाहून सांगितलें !

" होय ? मग अजून संतूबाळ कां बरें आला नाहीं. इतका उशीर कधीं बाहेर राह्यचा नाहीं.बरें सकाळीं सांगून तरी गेला होताका जातांना कीं, उशीरां येणार आहे म्हणून ? " आईला दादाबद्दल जास्तच काळजी वाटूं लागली. " का बरें बाळाला उशीर लागला ? दुपारीं जेवला तरी होता का पोटभर ? घाईघाईनें सकाळीं जेवण जात नाहीं त्याला–जेवणा कडे लक्ष असत नाहीं !–तितकेंच कांहीं महत्वाचें काम असल्याखेरीज बाळ बाहेर राह्यचा नाहीं म्हणा !–तूं काय ताई दारांत उभी राहून करते आहेस ? "

" मी दादाचीच वाट पहात उभी राहिलें आहें ! " साचिंतपणानें मी उत्तर दिलें.

" वाट पाहून काय होणार ? आला तर काय बाहेरच बसेल ? ये आंत !–रत्नुला जेवायला घातलेंस का ! नसलेंस तर घाल. तो मग नाहीं तर जेवल्याशिवाय निजायचा ! तुला भूक लागली असली तर तूं पण खाऊन घे ! संतूबाळ आल्या —" आईचें वाक्य पुरें होण्याच्या आंतच जिन्यांत पावलें वाजलीं. दादाच आला. आज उशीर झाला होता, तरी दादाच्या संवयीप्रमाणें दादा जिन्यावरून येतांना पाय वाजवीत, जिना गाजवीत आला नाहीं. अगदीं धिमेपणानें तो आज जिना चढला होता. दादा आला, मी दारांतून दूर झालें. टोपी ट्रंकवर फेंकली. कोट सदरा काढून वळकटीवर फेंकला. आणि हातांची गोफण मानेच्या भोंवती घालून अंगाला आळोखे पिळोखे देत सतरंजीवर वळकटीला टेकून बसला-!"

दादाचा नूर आज बदलेला दिसत होता. रोजच्याप्रमाणें जिन्यांतल्या पायऱ्यांचा दादाचा आवाज, आणि " ताई—रत्नु " अशा मला नी रत्नुला हांका मारण्याचा आवाज एकाच वेळीं यायचा! मला पाहातांच दादा हंसला नाहीं, कांहीं तरी थट्टा विनोदाचा नवीन मासला मला ऐकविला नाहीं, किंवा पुढें गेलेल्या रत्नुचे गालगुच्चे. आणि मुके घेऊन त्याची संभावना केली नाहीं, असें कधीं सहसा होत नसे! पण आजचा रंग कांहीं वेगळाच होता. दादानें आज आईला सुद्धां हांक मारली नाहीं. कीं, तिच्या प्रकृतीची चौकशी केली नाहीं.

" संतूबाळ आलास का ?—"आईनेंच अखेर विचारलें.

" हो आत्तांच ! " दादानें तुटक उत्तर दिलें.

" उशीर झाला फार ! "

" होय ! " पुन्हांही तुटकच उत्तर आलें.

" संतुबाळ, आज असा कां बोलतो आहेस ! जितक्यास तितकेंच उत्तर देतो आहेस. सचिंत झाला आहेस !—हें रे काय ? प्रकृती कां तुझी ठीक नाहीं ? " आईनें घाबरून जाऊन विचारलें. दादाच्या आजच्या वर्तनानें मी पण घाबरून गेलें होतें.

" तसें कांहीं नाहीं आई ! माझी प्रकृति चांगलीच आहे ! " आईच्या आवाजांतली कातरता " प्रकृती का तुझी ठीक नाहीं, ? " या वाक्याच्या वेळीं दादाच्या एकदम लक्षांत आली. आणि त्यानें झटकन् उत्तर दिलें. इतकेंच नाहीं,तर त्यानें आपली धारण केलेली म्हणा,नाहींतर आपोआप आलेली गंभीरवृत्तीने झटकन् बदलून टाकली.आणि चेहरा प्रफुल्लित केला.आळसटपणानें सतरंजीवर पडला होता, तो ताडकन उठला;आणि मलाच म्हणायला लागला, " ताई, अजून नाहींना मला पाय धुवायला पाणी ठेवलेंस ? अग मला जेवायचें आहे! मी उशीरां आलों म्हणून काय बाहेरूनच कुठून च्याब्या मारून आलों? अशी तुझी कल्पना झाली कीं काय ! तूं जेऊन घेतलयस वाटतें ! म्हणूनच अशी शांत आहेस !— आई, तूं कांहीं खाल्लेंस का ? आज कांहीं अंगांत तापबिप नव्हता ना ?—अन रत्नू निजला वाटतें ? ताई, तो रत्नु तिथें तसाच पेंगत बसला आहे, जेवायला घात-

तरास त्याला, तसें त्याला अंथरूण नाहीं का टाकून द्यायचें? दिवसें दिवस ताई, तूं हीच होत चाललीस बघ!—"

"वा: दादा! आपण बाहेरून यायला उशीर केल्याचा अपराध—अशा रीतीनें आमच्यावरच लादतो आहेस वाटतें? वा: छान! आम्हीं जेऊन—तूं आल्याशिवाय बसलों आहोंत वाटतें? रत्नुसुद्धां अजून जेवला नाहीं. दादाबरोबर जेवणार म्हणून हटून बसला आहे—तसा पेंगतो आहे. पण जेवेना कीं जागेवरून हलेना सुद्धां!-रत्नू जेवला नाहीं तुझ्याशिवाय तो मी जेवीन का?—" मी किंचित् कठोरपणानेंच म्हटलें!

"असें? मग आहांतच तशीं शहाणीं मुलें तुम्ही! मी उगाच का म्हणतों?-बरें, चल घे वाढून, दे, पाणी दे पाय धुवायला!-आई, तूं तरी खाल्लंसना? का तूंही माझीच वाट पहात बसलीस? अजारी माणसाला तो नियम लागू नाहीं बरें का?" असें म्हणत दादा उठला. पाय धुतले. मी तितक्यांत पाटपाणी करून झटपट आम्हां सगळ्यांचें वाढून घेतलें. जेवण होईपर्यंत लागणाऱ्या सगळ्या जिन्नसा मध्यें आणून ठेवल्या. आणि सगळे एकदमच जेवायला बसलों. रत्नुच्या डोळ्याला पाणी लावलें तो जेवायला बसला. त्यानें पण दादाला विचारलें कीं, "आज दररोजच्या सारखा लवकर कां आला नाहींस? नवी ताई मोटार घेऊन आली होती. आज आम्हीं तुला मोटारींतून फिरायला नेणार होतों. पण तूं आलाच नाहींस! मग ताई जाईना—मलाही नेलं नाहीं ताईनं! अशी झाली दादा गम्मत!"

अशा रीतीनें आमचें जेवण हंसत खेळत—खेळीमेळीनें सुरू झालें. आम्हीं पुष्कळदां असें जेवायला बसत असूं. त्यांत दादाला असा एखादे वेळीं यायला उशीर झाला—त्याच्या ऑफिसाला सुट्टी असली, म्हणजे नेहमीं आमचें त्यावेळीं असेंच जेवण होई.

दादाची उदासवृत्ति मावळली. त्याची स्वाभाविक वृत्ती खुलली. मग मी जेवतांना हलकेंच विचारलें. "तें सगळें झालें. पण दादा, तुला यायला आज उशीर कां लागला? आलास त्यावेळीं अगदीं उदास कां होतास? तूं सांगितलें नाहींस? का विचारल्याशिवाय सांगायचें नाहीं, असें कांहीं ठरविलें आहेस कीं काय?"

" हो, ते सांगायचें आहेच नाहीं का अजून ? पण त्याच्या करितां पहिल्या सारखा मला पुन्हां गंभीरपणा आणला पाहिजे. कारण गंभीरपणा आल्याशिवाय गंभीर गोष्ट सांगतां येत नाहीं. तेव्हां करितां तर जिना चढतांना राखून आणलेला गंभीरपणा मुद्दाम धारण केला होता. त्याच वेळेला त्याच गंभीरपणानें सांगणार होतों. पण आईनें सगळें तें आमचें फिसकटाविलें. तिनें माझ्या गंभीरपणाचा भलताच अर्थ घेतला. मग काय करणार ? त्यावेळेला त्याचा त्याग करावा लागला ! हं ! आतां चारदोन मिनिटें थांब ! पुन्हां आतां त्या गंभीरपणाला आमंत्रण करितों–आणि मग तुला आजची हकीकत सांगतों–"

हें सांगून दादा खाकरून खोकरून गप्प बसायला लागला. मला जास्त हंसू यायला लागलें. मी हंसत होतें. मिनीट दीड मिनीट स्वस्थ राहून पुन्हां मला दादानें वजावलें, " हं, तई, हें नाहीं उपयोगाचें बरें का ? तूं अशी हंसत राहिलीस तर मला गंभीर लवकर होतां येणार नाहीं. आणि अर्थातूच कांहीं सागतां येणार नाहीं !—रत्नु, झालें जेवायचें. मग असा टिवल्याबावल्या काय करतो आहेस ? जेवायचें झालें असलें, तर हात धुवून आईच्या पाठीशीं जाऊन पड ! का तुला आमच्या गंभीर गोष्टी ऐकायच्या आहेत ? पण तुला त्या कळणार कशा ? नाहीं कळल्या तरी ऐकून ठेव. ऐकायची संवय अंगू दे तुझ्या कानाला ! पुढें त्या संवयीचा उपयोग होईल ! बाकी, आईच्या पाठीशीं पडल्यापडल्या ऐकलेंस तरी चालेल. "

रत्नुचें जेवण झालेंच होतें. तो हात धुवून दादाच्या सांगण्याप्रमाणें आईजवळ जाऊन निजला. आम्हां दोघाचें जेवण रमतगमतच चाललें होतें. थोडावेळ जाऊं दिला नी मी दादाला हंसतच विचारलें " झालास का गंभीर ? "

" Oh yes ! " दादा हंसतच उत्तरला. " तुला आजची हकीगत सांगायची नाहीं का ? "

" उशीर कां झाला हें सांगणार ? का उदास कां होतास हें सांगणार अगोदर ? "

" तेंच अगोदर सांगतों !" दादा खरेंच धीरेधीरे बोलूं लागला. " ताई, तुला आमच्या खुशालचंद मॅनेजरनें पसंत केली आहे !—"

" हें तर फार जुनेंपुराणें झालें आहे !" मी म्हटलें ! " बरें मग ?"

" त्यानें तुला माझ्याजवळ मागणी घातली आहे !"

" हेंहीं तूं मागें पुष्कळदां मला सांगितलें आहेस !"

" नाहीं पण त्यानें माझ्यावर त्या बाबतींत निकराचाच हल्ला चढविला आहे ! मी कबूल केलें—"

" काय तूं कबूल केलेंस ?" मी एकदम चपापून विचारलें.

" नव्हे ग. मी जर कबूल केलं-" दादा सांगूं लागला.

" तर काय होणार आहे ?-" मी तिरस्कारानें दादाला प्रश्न केला.

" माझें बरेंच कल्याण होण्याचा संभव आहे !"

" मग काय ठरविलें आहेस तूं ?" माझें डोकें गरगर फिरायला लागलें. दादाला काय विचारायचें, काय बोलायचें हेंही मला सुचेना. तोंडांतला घांस-तोंडांतच फिरायला लागला.

" तूं काय मॅनेजरला सांगितलें आहेस ?"

" मी सांगितलें आहे कीं, ताईकडून कबूल करवितों !-ज्यांत माझें आणि तुझें कल्याण आहे, तें कबुल करायला ताई मागें घ्यायची नाहीं !" दादा उद्गारला.

" तर रे बाबा !"

" म्हणजे माझ्या आणि तुझ्या हिताची गोष्ट करायला तयार होणार नाहींस ? नाहींच व्हायचीस तूं तूं तयार होणार नाहींस, ती तुला तयार कशी करावी या विचारांत असतांनाच मी त्या वेळीं उदास झालों होतों समजलीस." दादा निर्विकार चित्तानें म्हणाला.

" म्हणजे तूं त्या मॅनेजरला मला देऊन टाकणारच वाटतं ?" मी अगदीं संतापून विचारलें.

" काय हरकत आहे ? असें काय त्याच्यांत वैगुण्य आहे ? आपल्या सारख्या स्थितींतल्या माणसाला तें स्थळ मिळायचें म्हणजे नशीब पाहिजे! एवढ्या मोठ्या गिरणीचा मॅनेजर आहे-"

" असेल–दादा यापेक्षां तूं जास्त या बाबतींत बोलूं नयेस हेंच बरें! समजलें तुझें बहिणीवरचें प्रेम! तूं आपल्या फायद्यासाठीं बहिणीचा बळी द्यायला तयार झालास?--आई, पहा बरें दादा किती दुष्ट झाला आहे तो?" माझ्याच्यानें यापेक्षां कठोर बोलवेना. माझ्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या, जेवतां जेवतां ताडकन मी उठलें--पण इतक्यांत दादानें माझा हात धरला, आणि म्हटलें—

" अरेरेरे! ताई, ' गंगा सिंधु सरस्वतीच यमुना--गोदावरी नर्मदा'--किती नद्यांना पाचारण केलेंस हें? खुळी कुठली! तुला जसें कांहीं खरेंच वाटलें! तुझ्यासारख्या हिरकणीला त्या मंकीब्रँडच्या हवाली करीन काय मी कधीं स्वप्नांत तरी?

बैस. पानांत टाकून, उपाशी काय उठतेस? पानांत टाकून उपाशी उठायला अजून आपल्याला तशी कांहीं माजुरी श्रीमंती आलेली नाहीं!" दादाच्या या बोलण्यानें, माझा राग, रडूं चटकर नाहींसें झालें, इतकेंच नव्हे तर उलट हंसूं आलें!

" हें रे काय दादा? भलतीच कशी थट्टा करतोस? माझ्याकडून उगीचच दुष्ट खट्याळ म्हणून घेतलेंस कीं नाहीं?"

"चालायचेंच! पाहिलें आपलें तुझा तुझ्या दादावर विश्वास किती आहे तो! समजला. दुष्ट खट्याळ मला म्हटलें तेंव्हांच तुझा विश्वास कळला!"

" खरें सांग दादा, खुशालचंदानें खरीच तुझ्याजवळ माझी मागणी घातली?"

" न घालायला काय झालें? त्या दिवशीं तुला शेटजींच्या बंगल्यावर भाईशीं गप्पा गोष्टी बोलतांना पाहिलें. त्यावेळेपासून त्याला वाटायला लागलें आहे कीं, तूं त्या भाईच्याच गळ्यांत विवाह माळा घालणार आहेस आणि—"

" इश्श!" दादा, आतां तिसरीचकडे वाहवला! मला अगदींच चमत्कारिक झालें. मी तो विषय बदलून त्याला विचारूं लागलें. " मग तूं त्याला शेवटचें काय उत्तर दिलेंस?—निकाल काय लावलास?—

" मी त्याला सांगितलें कीं, आमच्या आईच्या मैत्रिणीच्या मुलाशीं माझ्या बहिणीचा वाङ्‌निश्चय झाला आहे ! " दादानें उत्तर दिलें.

" मग ? " मी उत्सुकतेनें पुढें विचारलें.

" मग काय ? त्यानें विचारलें, तो मुलगा केवढा आहे, कुठें आहे, माझ्या इतका श्रीमंत मोठा--कर्तबगार आहे का ? तुला त्याच्यापासून फायदा झाला आहे का ? होणार आहे का ? "

" बरें पुढें ? तूं काय सांगितलेंस ?—"

" मी म्हटलें तो फार मोठा माणूस आहे. कॅप्टन आहे. दोन अडीच हजार रुपये पगार आहे, झांझिबारला असतो. चार पांच वर्षांत इकडे येणार आहे ! " दादा म्हणाला.

" मग तो काय म्हणाला ? "

" काय म्हणणार ? तो म्हणाला, तो झांझिबारहून परतच आला नाहीं तर ? नाहीं तर परत येतांना बोट बुडून समुद्रास्तृप्यंतुच झाला तर ! " दादानें त्याचें म्हणणें सांगितलें. " आजची माझ्या बाबतींतलीं सोन्य सारखी सधी कां वायां घालवता आहेस ? खरें म्हटलें तर आपलें शेटजीच माझ्या पाठींमागें लागलें आहेत, त्यांची मुलगी–आपली बबूताई करून घेण्याबद्दल ! पण तिच्यापेक्षां तुझीच बहिण माझ्या पसंतीस उतरली आहे म्हणून म्हणतों !---"

" हं ! इतका पाजी, नीच, हलकट, पशू आहे का ? " मी म्हटलें !
" मग काय त्याच्या बाबतींत बोलणेंच संपलें. तूं तर त्याला वाटाण्याच्या अक्षता चिकटविल्यास ना ? "

" होय ! पण, " दादा आणखी कांहीं बोलणार होता.

" पण दादा, तो तुला कांहीं तरी त्रास देईल नाहीं ? " मी विचारलें.

" काय होईल तें खरें ! " दादा म्हणाला " आमच्या मॅनेजरला कुणीही नीटनेटकी, थोडीशी व्यवस्थित नाकाडोळ्यांनीं तरतरीत, झुळझुळीत एवढेसें ठाकठिकीनें ल्यालीनेसलेली मुलगी पाहिली कीं ती आपल्याला योग्य आहे, असेंच वाटतें. मग ती एकादी तूं ऐस, नाहीं तर शेटजींची बबुताई असो. जगांतल्या सुंदर स्त्रिया आपल्या योग्य आहेत,

हीच त्याची समजूत. आपण त्यांच्या योग्य आहोंत कीं नाहीं, याचा कधीं तो विचारच करीत नाहीं! असा आमचा मॅनेजर मजेदार माणूस आहे!"

"इतका आहे तरी तुला तो मजेदारच वाटतो का?" मी पृच्छा केली.

"आपण आपलें मजेदारच म्हणावें! आपल्याला काय करायचें?— कोणी, कसा ही असला, तरी आपण त्याच्याकडे चांगल्याच दृष्टीनें पहावें, त्यांच्यांतला मजेदारपणा पहावा, आणि आपल्या मनाची, व दुसऱ्याची घटकाभर करमणूक करून घ्यावी! दुसरें काय?" दादानें समारोप केला.

"दादा, इतकें हें कांहींच्या कांहींच सांगितलेंस—मला रडविलेंस, दुष्ट, खट्याळ म्हणून घेतलेंस, पण शेवटीं, उशीराचें, आणि खरें उदास होण्याचें कांहींच कारण सांगितलें नाहींस!—" माझी त्या बद्दलची रुखरुख कुठें राहिली होती? म्हणून मी विचारलें. आमचीं जेवणें झालीं होतीं. आम्हीं हात धुतले मी उष्टीं गोळा केलीं, शेण लावलें. दादाला सुपारी दिली. दादा सांगेना तरी त्याला सारखी तेंच तेंच विचारीत सुटलें. तेव्हां दादा म्हणाला—

"तूं आज कांहीं वर्तमान पत्रें वाचलीं नाहींस वाटतें? 'नवा काळ' 'केसरी,' 'लोकमान्य,' 'क्रॉनिकल,' 'टाइम्स," व्हाईस,' कांहींच पाहिलें नाहींस का? "मुंबईंतल्या बऱ्याच गिरण्या संप करताहेत ना? सगळ्या वर्तमानपत्रांतून आलें आहे हें!" दादा सांगू लागला." आज पांच वाजतां परळला चारपांच गिरण्यांतल्या मजुरांची सभा होती. मी तिकडे सभेला गेलों होतों! कदाचित् एकदोन आठवड्यांत आमच्याही गिरणींत संप पुकारला जाईल—नव्हे जाणारच!" दादानें शांतपणानें, सावकाशीनें आणि खरोखरच गंभीरपणानें सांगितलें. या वेळच्या त्याच्या गंभीरपणाचा माझ्या मनावर खरोखरीच विलक्षण परिणाम झाला!

"अगबाई, म्हणजे? संप होणार? कशासाठीं पण तो?" मी उतावीळपणानें विचारलें.

" पगारवाढी साठीं–बोनससाठीं–आणि कामाचे तास कमी होण्या-साठीं ! " दादानें माहिती दिली.

" मग रे ? मग तूं काय करणार ? तुला आतां बढती मिळाली आहे. तूं कांहीं मजूर नाहींस ! " मी हलके हलके एकएक शब्द उच्चारला !

" नाहीं ताई, मी मजूरच आहें ! माझ्या बढतीची काय प्रतिष्ठा आहे ? मजुरांच्या हितासाठीं–मजुरांच्या कायमच्या कल्याणासाठीं–मी नुकत्याच मिळालेल्या बढतीवर लाथमारून संपांत सामील कां होऊं नये ?–याचा विचार करतों आहें. आज परळच्या प्रचंड मजुरांच्या जाहिरसभेंत मजुरांच्या बाजूनें जे मुद्दे पुढें आले आहेत, ते खरोखरच विचार करण्यासारखे आहेत, असें माझें मत आहे ! आणि मी जसजसा त्या गोष्टींचा विचार करूं लागलों आहें, तसतसा मजुरांनीं एकवटून संप करून आपली दाद लावून घेतलीच पाहिजे–मजुरांचा सत्पक्ष आहे असेंच माझें ठाम मत बनत चाललें आहे ! " दादाचा यावेळीं चेहरा इतका निराळा दिसत होता, कीं ओळखूं न येण्याइतका त्यांत बदल झाला होता. बोलतांना त्याच्या नाकपुड्या फेंदारल्या होत्या श्वास जोरानें चालला होता. आणि माझ्याशीं जरी एकेक–तुटक–मुद्देसूद रीतीनें शब्दाची योजना करून बोलत होता, तरी त्याचें लक्ष कुठें तरी गूढ–अतीशय गूढ विचारांत गुंतलें होतें, असें दिसलें.

मी तर दादाच्या सांगण्यानें दिङ्मूढच झालें होतें. माझ्या डोक्यांत अनेक चांगल्या वाईट विचारांची सारखी धांवपळ चालली होती ! एकं दरींत आमच्यावर येणाऱ्या संकटांचीं पावलेंच मला वटूं लागलीं. दादानें संपांत शिरायचें म्हणजे संप संपेपर्यंत खायचें काय ? आई अजारी–रत्नु लहान–कुटुंबाच्या पोषणाची तजवीज काय करावयाची ? माध्यान्हीची वेळ कशी भागवावयाची ? दादा संपांत शिरणार–बबूताईला, भाईला, काय वाटेल ? आमच्याविषयीं त्यांची सहानुभूति, सलोखा, स्नेह, वाढत चालला आहे, त्याची काय वाट व्हावयाची ? माझ्या मागणीबद्दल दादानें मॅनेजरला नकार दिला आहे. तो दुष्ट चिडला असेल, तो काय करील ? एक ना दोन ? हजारों विचारांनीं माझ्या मस्तकांत काहूर–थैमान चालविलें होतें ! दादा शांत होता. मी शांत होतें. माझ्याच विचारासारखे

दादाचे विचार होते कीं, त्यापेक्षां निराळे होते, आणि माझ्याच प्रमाणें दादाही गडबडून गेला होता; हें माझ्या या मनाच्या स्थितींत अजमावतां येणें शक्य नव्हतें ! दादाच्या बुद्धीची शक्ति अजमावणें पुष्कळ प्रकारानें माझ्या अटकेबाहेरचें होतें !

पुष्कळ वेळानें मी घोगऱ्या पण खालच्या आवाजांत म्हणालें, "दादा, कांहीं झालें आणि कांहीं म्हटलें तरी, आजच्या आपल्या परिस्थितीच्या मानानेंही संकटांचीं आपल्याकडे वळणारीं पाउलें हेंच खरें !"

"संकटांचीं पाउलें तर खरींच !" दादाचा या वेळीं गंभीर आणि निश्चयी आवाज ऐकून तशाही स्थितींत माझ्या अंतःकरणांत अननुभूत अशा श्रेष्ठ प्रतीच्या संवेदना झाल्या ! ज्याला मोठें व्हायचें आहे, त्यानें या संकटांच्या पावलांना भिऊन, आणि पाठ दाखवून भागायचें नाहीं ! मोठे होणारानें, आपलें, आणि दुसऱ्याचें–आपल्या बरोबरीच्याचें कल्याण करूं पाहणारानें, असल्या संकटांचीं पाउलें वाजलेलीं ऐकावयाचें म्हणजे, आपल्या कर्तबगारीला, कर्तव्याला, जीवितसार्थक्याच्या संधीला, अवसर दिला गेला आहे, असेंच समजलें पाहिजे !"

"कांहीं कर ! पण आईच्या आज्ञेबाहेर कांहीं करूं नको !" मी सुचविलें.

"आईचा आशिर्वाद, ईश्वरी प्रेरणेच्या आड खचित यावयाचा नाहीं! मी जर संपांत सदिच्छेनें, न्यायबुद्धिनें, सत्याच्या सिद्धीसाठींच पडलों तर आईचा आशिर्वाद कां मिळणार नाहीं ?" दादा एवढेंच म्हणून गप्प बसला होता. या वेळीं आम्हीं दिवा मालविला असून, आपापल्या अंथरुणावर पडूनच बोलत होतों–आईची झोंप आमचा वादविवाद चालू असतांच लागली होती !

नंतर आम्हीं कांहींच न बोलतां, आपल्या घरीं भावी स्थितीचा विचार करीत व झोंपेची आराधना करीत स्वस्थ पडलों. दादाची केव्हां झोंप लागली समजलें नाहीं. मला मात्र लवकरच झोंपेनें घेरलें. पण झोंपेंत सीनेमा फील्मप्रमाणें, "दादा, मॅनेजर, भाई, बबूताई, बबूताईचा बंगला, गिरणी–संप–" यांचींच सारखीं स्वप्नें पडत होतीं !!

---

## प्रकरण १० वें.

# दादाला आईचा आशिर्वाद.

दादाला आज विशेष गडबड होती. मजुरांच्या सभा संध्याकाळीं गिरण्या सुटल्यावर दोन तीन ठिकाणीं व्हायच्या होत्या. सर्व सभांला दादाला हजर राह्यचें होतें. म्हणून दादानें मला रोजच्यापेक्षां लवकर उठविलें होतें. गिरण्यांचे 'संप' वगैरे व्हावयाचे आहेत, इथपर्यंत रात्रीं आईनें घुरमळतां घुरमळतां ऐकलें होतें. त्याबद्दल आईनें दादाला सकाळीं विचारलेंच. दादानेंही तिला शक्य तितक्या साध्या, सोप्या, शब्दांत सर्व परिस्थिति समजावून देण्याचें चालविलें होतें. दादा सांगत असतां आई मध्यें कांहींही बोलत नव्हती. तिचें नुसतें 'हं, हं,' एवढेंच चाललें होतें आईच्या अंतःकरणाला दुखवेल, तिची भलतीच कांहीं समजूत होऊन धक्का बसेल आणि तिच्या प्रकृतीवर आणखी परिणाम होईल याकरितां जें सांगावयाचें, तें कसें काय, याकरितां दादा अतिशय सावधगिरी ठेवीत होता. तरी पण दादाच्या आजवरच्या वागण्या बोलण्यांत आणि आजच्या वागण्या बोलण्यांत फार फरक पडला होता. आजचा दादा निराळाच दिसत होता. दादाला जेवढें सांगावयाचें होतें, तेवढें सांगितल्यावर किंवा आईला जेवढें दादापासून समजाऊन घ्यावयाचें तेवढें आईनें समजाऊन घेतल्यावर आई अगदीं निश्चल आणि शांत मनानें म्हणाली कीं,

"बरं तर! जसे दिवस येतील तसेही काढले पाहिजेत. हे असे दिवस वांट्याला येतील असें कधीं कुणाला वाटलें होतें? आलें नशिबाला भोगतोंच आहोंत कीं नाहीं! बाळ, तूं कांहीं केलेंस, कसाही वागलास तरी माझें म्हणणें नाहीं. मला पुरतें माहीत आहे कीं, कधींही, आणि केव्हांही अनुचित, आपल्या कुलाला, शीलाला, लांछन आणील असें कांहींही व्हायचें नाहीं! आपणां सर्वांनाच यामुळें—या संपाच्या वावटळींत सांपडलास तर पोटापाण्याचे हाल भोगावे लागतील.—नाहीं

तरी सध्यां तरी काय कमी हाल भोगावे लागत आहेत म्हणा ! पण सुगंधेचें, रत्नाचें कसें होईल, त्यांना कसें निभेल, याची थोडी काळजी वाटते आहे. दुसरें काय ! होईल पण त्याचें कसेंही ? तूं जर कांहीं चुकीनें, महत्वाकांक्षनें, इर्षेनें द्वेषबुद्धीनें कांहीं करणार नाहींस, तर देव तरी त्याची उपेक्षा कां करील ? ”

म्हातारीचा कंठ बोलतां बोलतां दाटून आला ! माऊलीचें अंतःकरण तें ! बिचारी माझ्या आणि रत्नुच्या मध्यान्हींच्याबद्दल कष्टी होते आहे. पण स्वतःबद्दल—अगदीं मृत्यूशय्येवर लोळत असतां, कसें होईल, आपल्याला खायलाप्यायला कसें मिळेल ? याबद्दल बिचारीनें ब्र काढला नाहीं. दादाबद्दलही तिच्यानें बोलवेना ! हें बोलतांना, माझ्याबद्दल आणि रत्नुबद्दल बोलतांना आईचा जसा कंठ दाटून आला होता, तसेंच दादालाही अगदीं गहिंवरून आलें होतें.

“ जा, कांहीं कर. तुझ्या हातून चांगलेंच होईल. जें करायचें तें पूर्ण विचारानें कर म्हणजे झालें. माझा तुला आशिर्वाद आहे. ईश्वर तुझें मंगल करील ! ” एवढेच आईचे शब्द ! पण त्यांनीं, आई, दादा, मी यांचे मनःसागर नुसते हलून गेले होते ! तिघांच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा वाहात होत्या ! तिघेंही तिघांशीं बोलत नव्हतों, कीं एकमेकांकडे पाहण्याचें धाडस करीत नव्हतों ! प्रत्येकाला वाटत होतें कीं, आपल्याकरितां पुढें कालचक्रानें जबरदस्त वाढून ठेविलें आहे, तें सुख आहे कीं दुःख आहे, यश आहे कीं अपेश आहे, याचें कुणालाच ज्ञान असणें शक्य नव्हतें. पण आपल्याला—दादाला ज्या मार्गानें जावें लागणार आहे, तो मार्ग तरी बरोबर आहे कीं, चुकीचा आहे याचा तरी नक्की अंदाज कुणाला होता ?

तरीपण भावी कार्याकरितां दादाला आईचा प्रेमळ आशिर्वाद मिळाला होता. आई समाधान वृत्तीनें निश्वास सोडीत होती. तर दादाच्या चेहऱ्यावर सात्विक उल्हास झळकत होता !

माझा स्वयंपाक झाला. मी पाटपाणी केलें. दादा आणि रत्नू जेवायला पाटावर येऊन बसले. अगदीं हीच वेळ. खुशालचंदची स्वारी जिन्यावरून दाणदाण पाय आपटीत आणि ‘ संतु, संतुराम ’ अशा

आरोळ्या ठोकीत दाराजवळ येऊन धडकली. दार उघडलें. मॅनेजर आंत आले! माझ्या आणि दादाच्या कपाळाला आठ्या चढल्या!

" हं, संतू, " मॅनेजर आपण होऊनच आसनाची वाट न पाहतां दाराजवळच्या खिडकींत उडी मारून बसत म्हणाला, " काय कालच्या परवाच्या मजुरांच्या सभेचा पोरखेळ काय—रिपोर्ट सांग मला. काल तूं गेला होतासच! "

" होय गेलों होतों साहेब!–" दादा उत्तरला.

" शेवटपर्यंत होतास का?—आजच्या सभांना जाणार आहेस ना? जा, जरूर जरूर जा. पाजी लोक! काय पाजीपणा करताहेत–बोलताहेत, हें आपल्याला सगळें माहिती पाहिजे. जरूर तर त्याचे लेखी रिपोर्ट घेऊन चल! समजलास! " दादाला आज्ञा दिली.

" तें करणारच आहें मी! " दादानें सांगितलें.

आजचा दादाचा सौम्यपणा मॅनेजरसारख्या चाणाक्षाच्या ध्यानांत यायला अशक्य नव्हतें.

" कायरे संतू " मॅनेजरनें पृच्छा केली. " तूं आज विशेष सभ्य दिसतो आहेस? नेहमीसारखा ऐसपैस बोलत नाहींस! काय आहे हें? "

" कांहीं नाहीं साहेब! परिस्थितीचा विचार करतों आहें? " दादानें उत्तर दिलें.

" कुणाच्या परिस्थितीचा? " मॅनेजरनें भिंवया चढवून, आणि नाक मुरडून प्रश्न केला.

" आम्हां मजुरांच्या! " दादानें पहिल्या इतकीच शांतता ठेवून उत्तर दिलें.

" म्हणजे? तूं मजुर कुठें आहेस? तुझी आतां मागली स्थिती मी ठेविली नाहीं! ' छाती वर करून, मान बगळ्यासारखी ताठवून मॅनेजरनें प्रौढी मिरविली!

" खरें आहे तें साहेब! मी इतक्यांत तरी तें विसरणार नाहीं! " दादाची शांतता कायमच होती.

" संतृ, तूं जरासा विचित्र माणूस आहेस. दुसऱ्याचें—निदान माझें ऐकत नाहींस. त्यामुळें माझा नाइलाज आहे. सतु, you have no idea about my heart, and you dont no how I lone you ! पण तूं धमेंडीनें मला फार दुखवितोस !" असें म्हणून आपल्या बोलण्याचा परिणाम दादावर, आणि माझ्यावरही काय होतो, हें पाहण्यांत त्यानें चारदोन मिनिटें घालविलीं !

मॅनेजरची लेक्चरबाजी कशासाठीं होती, हें दादाला समजलें. माझ्या ध्यानांत आलें. तो तर जाणूनबुजूनच बोलला होता ! त्याच्या अपेक्षेचें अनुकूल उत्तर त्याला आम्हां दोघांच्याही चेहऱ्यावर मिळालें नाहीं. त्यामुळें किंचित् चेहरा बदलला. पण लगेच त्यानें तो विषयच सोडून दिला. लगेच मध्यें झालें हें कांहींच नाहीं, अशा प्रमाणें मॅनेजर मूळपदावर गेले

" संतू, आपल्याला कांहीं काळजी नाहीं. आपल्या गिरणीच्या मजुरांना आपण संप करूं देत नाहीं. त्याची काळजीच नको ! आपले शेटजी गडबडले आहेत. पण मी त्यांना स्पष्ट सांगून ठेविलें आहे कीं, आपण निश्चिंत असा. मी संप होऊं देत नाहीं. आपल्या गिरणींतल्या मजुरांना 'संपाची नुसती भाषा तर काढूं द्या ! कीं दाखवितों एकेकाला मारे पाठीची चामडी लोळवीन ! दोन दोन महिन्याचा पगार बुडवीन ! आणि दहा तासांच्या ऐवजीं बारा बारा तास काम चोपून घेईन !—अशी दहशत घालतों म्हटलें कीं, ज्याचें नांव तें !—संप न होऊं देण्याची रिस्पांसिबिलिटी माझ्यावर मी घेतली आहे ! काय समजलास ?—" मॅनेजरांनीं उच्चस्वरांत गर्जना केली ! " आणि, आणखीं सांगतों तुला, या वेळीं तुझ्या साह्याची मला विशेष जरूर लागणार आहे. तूं माझ्या पाठीवर ऐस. संपाची भाषा बोलणाऱ्यांना ऐसें चोपून काढूं या—शेटजींच्या घरीं तुझा घरोबा चांगला जमला आहे. प्रेमचंदभाई तुला आतां चांगले मानतात. माझ्याजवळ मी त्यांच्या इथें एकदां दोनदां गेले असतांना तुझ्याबाबत चांगले उद्गार काढले होते, त्या दिवशीं प्रेमचंदांनीं तुला आपल्याबरोबर भाई या नात्यानें बसवून घेतलें, आणि तूंही छातीठोकपणानें बसलास—आपल्याला तुझें कौतुक वाटलें ! तुला मला सांगा-

यचें तात्पर्य असें आहे—कीं, हा घरोबा टिकवायची, आणि वाढवायची संधि तुला अनायासें आली आहे! शेटजींना मी सांगेनच तुझ्याबद्दल! तुझ्याकडून संपांत शेटजींच्या बाजूनें कामगिरी करवितों, आणि शेटजींना तुझ्या मुठींत आणून सोडतों, आहेस कुठें तूं!—मजुरांचे इन्स अॅन्ड आउटस एवढ्याकरितां तुला कळायला पाहिजेत. म्हणून त्यांच्या सभांना तूं हजर राहिलें पाहिजेस, असें माझं म्हणणं आहे! काय समजलास?—"

"सगळें ऐकलें साहेब, आणि समजलेंही!" मॅनेजर बोलायचें थांबल्यावर दादानं सुरुवात केली. मॅनेजर बोलत असतां जरी त्याच्याकडे लक्ष होतें, तरी जेवणही झपाट्यानें त्यानें चालविलेंच होतें. आतां त्याचा शेवटचा भात संपला होता. परन्तु मॅनेजरच्या रूपाला पहिल्यापासूनच भीत असल्यामुळें तो आल्यापासून इकडे तिकडे न पाहतां, भरभर जेवण आटपून चूपचूप आईच्या पाठीमागं आपली पाटी घेऊन मी दिलेला नवा धडा गिरवीत जाऊन बसला होता! मॅनेजरचें माझ्याकडे आज विशेष लक्ष दिसत होतें. दादाचें लक्ष नाहीं असें पाहून मॅनेजर आज माझ्याकडे अशी खोचक आणि शोधक दृष्टी लावी कीं, विचारूं नका! दादानें त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या होत्या. माझ्या विषयींची त्याची निराशा झाली होती, मग याची अशी खोचक आणि अंतर्भेदी दृष्टी का? मी एक दोनदांच त्याच्याकडे सलक्ष पाहिलें होतें. एकदां तर त्याच्या तीव्र रोखाला मी भ्यालें! त्याचा हेतु मात्र कांहीं ध्यानांत येणें शक्य नव्हतें! आतांचें त्यानें लांबच लांब लेक्चरवजा भाषण केल्यावर दादाप्रमाणें पुन्हां एकदां माझ्याकडं विजयी मुद्रेनें पाहिलें. त्या पाहण्याचा अर्थ मी एवढाच घेतला कीं, 'कसा मी तुझ्या भावाला प्रौढ उपदेश करून मोठेपणाच्या पदवीला नेलें आहे आणि नेणार आहें!" असो.

"साहेब," दादा थोडा वेळ थांबून बोलूं लागला, "मी आपलें म्हणणें सगळें ऐकून घेतलें आहे. तें पूर्ण ध्यानांतही आहे! काल मजुरांच्या सभेला मी गेलों होतों, आज जाणार आहें. आणि आणखी जितक्या सभा होतील तितक्यांना मला हजर अव्वल अखेर राहण्याशिवाय गत्यंतर नाहीं! पण आपल्याला अगोदरच नम्रपणानें सुचवावयाचें

आहे,–आणि तसें सांगण्याचा ओघ आपणच येथें येऊन आणून दिला आहे–आपल्या गिरणीचा संप व्हावयाचा आहे. कालच्या परळच्या सभेंत जवळ जवळ हें निश्चित झालें असून, मला, संपांत सामील व्हावें लागणार आहे!" दादाचे हे शब्द ऐकतांच मॅनेजर खुशालचंद उसळीसरसे खिडकींतून उठून ताडकन उभे राहिले, आणि मुलुख मैदान तोफेसारखें तोंड वासून दादाकडे पाहूं लागले!

"यू फूल! काय हा पागलपणा मनांत आणला आहेस?–संपाचें वारें तुझ्या माथ्यांत कुठून शिरलें?–माझ्या विरुद्ध–इच्छेच्या, कृतीच्या विरुद्ध वर्तन करणार? उपकार कर्त्यांवर उलटणार? ज्याचें अन्न खातोस त्याच्याशीं निमकहरामी करणार? तुला कोणी सांगता सवरता आवरता नाहीं? शेटजींच्याजवळ शिफारस करून तुला बढती देववून अजून चार दिवस झाले नाहींत, तोंच तुला हे ढंग आठवले? मूर्ख! संपांत शिरून काय करणार? तुझ्या बहिणीला, भावाला, अजारी आईला खायला काय घालणार? कां खाण्य पिण्याशिवाय मारून टाकणार काय?" मॅनेजरनें सारखा तोंडाचा पट्टा सोडला!

"साहेब," दादा अति थंडपणानें म्हणाला "नाइलाज आहे. तुमच्या कृपेला मी पात्र नाहीं, हें तर ठरलेंच आहे. दोघांनाही दिसलें आहे. त्याचा आतां विषाद कशाला? पण माझ्या आई–भावा–बहिणींची जर आपल्याला काळजी असेल–तर संप विकोपाला जाणार नाहीं. संपाचे काम कदाचित् चिडीला जाऊन वादीला लागलें, तर तें तुमच्या मुळेंच लागणार आहे. अशी माझी समजूत आहे. मी काल मजुरांच्या संपाच्या वेळीं मागण्या काय काय मागावयाच्या आहेत त्या ऐकल्या आहेत. त्यांचीं मागण्या मागतांना जीं कारणें म्हणून पुढें करणार आहेत, तीं मलाही पटलीं आहेत.कारण तीं कारणें माझ्या स्वानुभवाचींच आहेत, माझ्याचप्रमाणें सर्व मजुरांच्या मनांत एकच तऱ्हेचे विचार आहेत–होते. त्यांच्याचप्रमाणें माझी स्थिति होती–आहे. मग मला वाटायला लागलें आजपर्यंत संप कां झाले नाहींत कां होऊं नयेत?"साहेब,मजुरांनीं संप केला म्हणून तरी काय बिघाडणार आहे,त्यांचें म्हणणें ऐकून घ्यावें-रास्तगैररास्त पहावें.त्यांच्या मना

सारखें करावें. मोकळें व्हावें. कशाला राहतो आहे मग संप ? तुम्हीं आणि गिरणींच्या मालकांनीं मजुरांचीं सर्व गाऱ्हाणीं जर ऐकलीं—"

"नॉनसेन्स ! एक अक्षर बोलूं नकोस ! मी केवढ्या आशेनें तुझ्याकडे आलों होतों. तुझ्यासारखा हुषार, चलाख, तरतरीत तरुण पहिला, हाताशीं धरावा म्हटलें, पण तूं इतका भकलेला असशील याची मला काय–कल्पना ? जा, तूं आणि तुझें नशीब ! मी काय करणार ? माझ्या आणि शेटजींच्या विरुद्ध उठून संपवाल्यांना मिळून, चिथावून, तूं खाल्या घरचे वांसे मोजणार–आपल्याच हातांनीं आपल्या पायावर धोंडा पाडून घेतो आहेस खुशाल घे !–अगदीं सांगून सवरून माझें शत्रुत्व संपादन करतो आहेस–माझ्याशीं गांठ आहे, लक्षांत आहे ना ? तुझें अगदीं नक्की ठरलें ? नक्की ठरलें ? त्रिवार विचारतों ! स्पष्ट विचारतों, स्पष्ट उत्तर दे 'ठरलें नक्की ? कां माझ्यामागें येणार ? माझ्या चांगूलपणाच्या छत्राखालीं राहून आपलें कल्याण करून घेणार ?"

"सॉरीसाहेब ! " मी माझ्या बाबतींत एकदां जें ठरविलें तें ठरविलेंच ! साहेब, हा प्रश्न माझ्या एकट्याचा नाहीं. आणि मी एकट्याकरितां पुढेंही आलों नसतों. पण ज्या माझ्या मजुर बांधवांच्या पाठीवर संपाची भाषा बोलण्याबद्दल फटके देणार आहां, त्यांच्या पोटाचा हा प्रश्न आहे–शिवाय तो न्याय्य आहे. म्हणून अगदीं नाइलाजानें तुमचा अनुयायी होतां येत नाहीं. अशा वेळीं मला मोठें होण्यापेक्षां धाकटेंच व्हावेंसें वाटतें !–" दादानें पण तितक्याच खणखणीत शब्दांत सडेतोड उत्तर दिलें !

"ठीक आहे ! तुझ्या माझ्या बरेपणाचा हाच तर शेवटचा रामराम ! आतां तूं आपल्या मार्गाला, मी माझ्या रस्त्यानें जाईन ! पश्चातापाची वेळ आली, तर मात्र मला विसरूं नकोस ! माझ्याकडे ये ! आणि माझी खात्री आहे कीं, तूं माझ्याकडे येशील ! माझ्याखेरीज तुला सत् ना गत आहे. लक्षांत ठेव ! " मॅनेजर पाय आपटीत म्हणाला.

"होय साहेब ! मजुरांच्या इच्छेप्रमाणें आपण केलेंत व करविलेंत तर आम्हीं जवळ आहोंतच कीं तुमच्या ! जातों आहोंत कुठें ? तुमच्याशिवाय आम्हांला खरोखरच सत् ना गत आहे ! आम्हीं कबूलच करतों

आहेत हें ! हा तत्वाचा प्रश्न आहे. तत्वाकरितां-पोटाकरितां प्रेमानें भांडायचें आहे हें प्रेमाचें भांडण म्हणजे आम्हां मजुरांचा संप ! दुसरें काय ? आम्हा मजुरांचा भांडून पोटाला पोटभर मिळवायचा धर्म आहे ! पोटाला भरपूर देणें गिरणीवाल्यांचें कर्तव्यकर्म आहे ! त्यांत काय विशेष आहे ? आणि तुम्हीं तरी इतके संपाला डरतां काय म्हणून ? आणि सतापतां तरी काय म्हणून ? " हें बोलतांना दादानें जी शांतता व सौम्यता धारण केली होती, ती त्याच्याजवळ नांदत असेल, अशी मी त्याची बहीण असून मला कधीं कल्पना झाली नहीं. दादाच्या या विचित्र उत्तरानें हो, मॅनेजरच्या दृष्टीनें दादाचें तें उत्तर विचित्रच होतें-मॅनेजर अधिकच चिडला " डॅम इट ! डॅम इट ! " करीत त्यानें तडक जिना पकडला. मागें देखील वळून पाहिलें नाहीं. तोंडानें सारखी बडबड चालू होती ! आज दादाला त्यानें आपल्या गाडींत बसायला बोलविणें शक्यच नव्हतें !

मॅनेजर गेल्यावर दादानें कपडे केले. आणि जायला निघाला. निघतांना मात्र मला बजावलें, ' आज केव्हां येईन, केव्हां नाहीं, याचा नेम नाहीं. वेळ होतांच जेऊन घ्या. माझें वाढून ठेवीत चला. आणि आतां संप होऊन त्याचा निकाल लागेपर्यंत असेंच चालायचें आहे. माझ्या आयुष्याच्या पतंगाला आजच हवेंत गती मिळाली आहे खरी. पहायचें काय कसें होईल तें. आईजवळच ऐस. या बाष्कळाच्या बडबडीनें तिचें चित्त चलबिचल झालें असेल तर गोडीगोडीनें स्थिर कर. नाहीं तर पोथी पुस्तकांत गुंतीव " असें सांगून दादाही बाहेर पडला !

आतां हें असें रोजचेंच चालायचें होतें.पण या नव्या धामधुमीचा आज पहिला दिवस होता. आमच्या चमत्कार युगांतल्या खऱ्याखुऱ्या महत्वाच्या भागाला आज सुरवात होत होती ! मन घटकेघटकेला निरनिराळ्या विचारविकारांनीं भरून येत होतें. प्रत्येक विकार-विचाराच्या शेवटीं मन अडे तें इथें-" आपलें पुढें काय ? "

दादा उघड उघड संपांत मिसळल्यावर काय किंवा मिसळण्याचें ठरविल्यावर काय; वास्तविक जरी नसला तरीं व्यावहारिक अर्थानें दादा बबू-


ताईचा, भाईचा शत्रूच बनला होता; असेंच जर बबूताईनें मानलें तर ? अकारण जमलेल्या निर्मल मैत्रीचा शेवट कसा होणार? बबूताई आपल्याशीं आपण बबूताईशीं कसें वागूं ? या विचारांची लांबण डोक्यांतून कांहीं केल्या संपेना !

आईनें हांक मारली. "दादा गेला ना ग ?" म्हणून विचारलें. मी संचित मनानें इकडून तिकडे तिकडून इकडे, बाहेरून आत आंतून बाहेर करीत होतें. आईजवळ बसावें. तिचे पाय चेपल्यासारखें करावें. तिथून उठून बाहेर गॅलरींत जाऊन बाहेरच्या–सडकेच्या गर्दीकडे, क्राफर्ड मार्केटाकडे, व्हिक्टोरिया स्टेशनच्याकडे, मुंबई कार्पोरेशनच्या अगदीं इंग्लंडच्या इमारतीच्या धर्तीवर बांधलेल्या इमारतीकडे, नाहींतर फोर्टकडे–फ्लोरा फौंटन, टेलिग्राफ ऑफिस, हायकोर्ट, यांकडे जाणाऱ्या रस्त्याकडे पहात रहावें; मन गुंतविण्याचा प्रयत्न करावा. मोटारी, व्हिक्टोरिया, सायकली, ट्रॅम, याकडे पहावें. तिथेंही मन रमूं नये. पुन्हां आंत यावें. असें माझें एकसारखें चाललें होतें. आईकडे पाहिलें, तर बाह्यता तरी तिच्यात कसली चलबिचल दिसत नव्हती ! शांत–धीर–गंभीर आणि समाधानी अशीच तिची वृत्ति दिसे. मला वाटलें, दादावर खूप रागावून चडफडून आरडाओरड करून पाय आपटून मॅनेजर गेला, त्याचा परिणाम आईवर कांहीं झाला असेल ? पण त्याचाही मागमूस लागला नाहीं, माझ्यानें रहावेना म्हणून मी आईजवळ जाऊन बसून तिला विचारलेंच, "आई, दादाचें नी आपलें कसें होईल ?"

"काय व्हायचें आहे ! चांगलेंच होईल ! बाळ अगदीं स्वारीसारखा महत्वाकांक्षी आहे. त्याच्या आयुष्यांतली महत्वाची हीच वेळ आहे. स्वारीचें लक्ष त्याच्यावर होतें. पुरुषांनीं साहस केलेंच पाहिजे. आणि बायकांनीं प्रेमळपणानें त्याला उत्तेजन दिलें पाहिजे. आम्हीं आमच्या क्षुद्र लाभाकरितां, आणि एवढ्या तेवढ्या ऐष आरामाकरितां पुरुषांचे पाय मागें ओढून, आपल्या घाबरेपणानें त्यांना गांगरून टाकून उपयोगाचें नसतें ! स्वारीप्रमाणें माझ्या बाळाच्या मस्तकावर माझाही हात आहेच ! बाळाचें कधीं वाईट व्हायचें नाहीं ! पण–पण–त्याचे सुखाचे दिवस पहायला—स्वारी असती तर ?–मी तरी पहातें आहें कीं नाहीं

कुणास ठाऊक!—ताई, बाळ तुझेंही कल्याण करील बरें का? त्याच्या संबंधानें तूं मनांत हें आणूं नकोस! एवढें बरीक करा. बाळानी तूं माझ्या रत्नुची हेळसांड करूं नका! बाळाप्रमाणें तुह्मां दोघांवरही माझा आशिर्वादाचा हात आहेच! रत्नु लहान आहे, म्हणून त्याच्याबद्दल मला जरा हें वाटतें!"

बोलतां बोलतां आईच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या पाण्यानें तिची उशी भिजली. आज आई इतकी कां बोलली कोणास ठाऊक! माझे गाल ओले झाले होते. आईच्या बोलण्याकडे सर्व जग विसरून जाऊन लक्ष लावून बसले होतें.



## प्रकरण ११ वें.

## संप !

मुंबईस गिरण्यांच्या संपाचा धूमधडाका उठला होता ! आज अमूक गिरण्या बंद पडल्या, काल त्या गिरण्या बंद राहिल्या. अमूक हजार मजूर कामावरून घरीं राहिले. ' गिरणीवाले ' मजुरांच्या म्हणण्याकडे-गाऱ्हाण्याकडे—मागणीकडे लक्ष देत नाहींत. मजुरांचा अरेरावीपणा जिरविण्याचा गिरणीवाल्यांनीं आपला निश्चय जाहिर केला आहे ! कामावरून खालीं झालेले बेकार मजूर निरुद्योगीपणामुळें टोळ्या टोळ्यांनीं शहरांतून फिरत असून, लोकांना त्यांच्याबद्दल भीति वाटत आहे ! "

अशा बातम्या दररोज वर्तमानपत्रांतून मोठ्या टाईपांत छापलेल्या येऊं लागल्या होत्या ! गिरण्यांचे संप ! बेकार मजुरांची शोचनीय स्थिती, बेकार मजुरांचे अत्याचार ! गिरणीवाल्यांनीं आपल्या मोटारी मजुरांच्या गर्दींत घालून त्यांना दुखापती केल्या ! चवताळलेल्या मजुरांनीं गिरणीवाल्यांच्या मोटारीवरून आणि बंगल्यावरून दगड फेंकले ! बेकार आणि उपासी मोकळे मजूर दुकानें, घरें लुटण्याचा संभव आहे, सरकार योग्य बंदोबस्त ठेवीत आहे!" अशा सारखीं वर्तमानपत्रांतलीं ठळक छापलेलीं वाक्यें मोठ्यानें ओरडत वर्तमान पत्रें विकणारीं मुलें सर्व मुंबई हदरून सोडीत होतीं !

' संप ! संप ! चोंहीकडे संपाचीच भाषा ! संपाचीच चर्चा ! कोणी गिरणीवाल्यांची बाजू घेत व मजुरांना मूर्ख ठरवीत. तर कित्येक गिरणीवाल्यांच्या अरेरावीला, उद्दामपणाला, कठोरपणाला, निर्दयपणाला लाखोली वाहात, आणि मजुरांची कींव करीत; त्यांच्या शोचनीय परिस्थितीचें यथास्थित वर्णन करून हळहळत ! कोणीं म्हणत गिरणीवाल्यांना—भांडवाल्यांना हार खावी लागणार. मजुरांचें म्हणणें त्यांना मान्य करावें लागणार ! तर कोणीं बोलत मजुरांनाच शरण यावें लागेल ! भांडवलवाले त्यांना अशीतशी भीक घालीत नाहींत. त्यांना मजुरांची

पर्वा नाहीं. संपाच्या चुकीचें माप कुणी मजुरांच्या पदरीं बांधित तर कुणी या धामधुमीचें खापर भांडवलवाल्यांच्या माथीं फोडीत !

संप संपण्याला जो तो आपापल्या बुद्धिशक्त्यनुसार उपाय सुचवीत असे ! अशी संपांची तुफान लाट मुंबईच्यापरिस्थितीच्या दर्यावर उसळून राहिली होती ! ज्या मजुरांच्या जवळ उपाशी पोट मारून वेळेला उपयोगीं पडावा म्हणून ठेवलेला पै-पैसा शिल्लक होता, ज्यांना संप संपेपर्यंत मुंबईस राहणें अशक्य होतें; संप संपण्याची अनिश्चितता ज्यांना कळण्यासारखी होती, ज्यांना देशावर, आपल्या छोट्याशा शेतवाडीच्या ठिकाणीं जाऊन राहण्याची साय होती, ते भराभर मिळेल त्या गाडीनें मुंबई सोडून पसार होत होते ! या परत जाणाऱ्या मजुरांची स्टेशनवर गर्दी पाहून मनुष्य थक्क होत असे !

गिरण्याप्रमाणेंच रेल्वे, ट्रॅम, पोस्टमन, यांच्याही संपांची लाट मिसळत होती ! जिकडेतिकडे, रात्रींदिवसा प्रत्येकाच्या तोंडी संपाशिवाय दुसरी भाषा नव्हती ! कांहीं वर्तमानपत्रें भांडवलवाल्यांच्या बाजूनें, तर कांहीं पत्रें मजुरांच्या बाजूनें अगदीं अभिनिवेशपूर्ण लिहीत !

याप्रमाणें सर्व मुंबई संपमय झाली होती ! कोणी संपांत मिसळत, कोणी मिसळत नसत ! भांडवलवाले आणि त्यांचे हस्तक मजुरामजुरांत फंदफितुरी करून पक्षपात करून, संपांतून निसटवून कित्येकांना भुलावणीनें आणीत ! 'संप मोडला ! मजूर शरण आले !' असा आपणच उगाच ओरडा करीत !

संपाच्या सत्राला सुरवात झाल्यापासून दादाच्या पायाला चक्र बांधलें होतें. त्याला दोन दोन दिवस खाण्यापिण्याची शुद्धि नव्हती ! चार चार रात्रीं झोंप त्याच्या डोळ्याला माहीत नव्हती, कीं विश्रांति म्हणजे काय हें त्याला कळत नव्हतें ! दादा मध्येंमध्यें तर बिऱ्हाडीं चार चार दिवस आला नाहीं ! मजुरांच्या मोहल्यांत जाऊन, त्यांना नीट सांगून संवरून, धीर देऊन, शांत राह्यला सांगून, अत्याचारापासून अलिप्त राहण्याची सद्बुद्धि शिकवून, फंदफितुरी न होण्याबद्दल, बंधुद्रोह न होऊं देण्याबद्दल, सांगण्याचें काम करावयाचें. आपल्या गिरणींत काम करतांना आपल्या कामांत कसूर करावयाची नाहीं, किंवा गिरणींतील कोणाही

मजुराला कसूर करूं द्यावयाची नाहीं. आपल्या गिरणीचा संप होण्याची घटका येईपर्यंत कोणीही कामगारानें, कामांत ढिलाई, दुर्लक्ष, बेपर्वा, किंवा चुकारपणा करावयाचा नाहीं, अशाबद्दल दादानें अविश्रांत श्रमानें शिस्त राखली होती. त्याकरितां आपल्या गिरणींतील जवळ जवळ प्रत्येक मजुरांकडे जाऊन त्यानें तयारी केली होती ! त्यामुळें खुशालचंदासारखा मॅनेजर दादाविरुद्ध कितीही तडफडला-धडपडला तरी त्यांचें कांहीं चालत नव्हतें ! त्याच्या गुरगुरण्याकडे, अपशब्दाकडे, किंवा एकाद्या फटक्या-कडेही केवळ दादाचें सांगणें ध्यानांत ठेवून, आणि त्याच्याकडे पाहून, कोणीही मजूर ढुंकून पहात नव्हता किंवा शिस्त मोडत नव्हता !

मुंबईतल्या संपाला सुरवात होऊन पंधरा दिवस होऊन गेले होते ! दादाच्या 'इच्छाराम भाई—मिल' चा संप आज व्हायचा होता ! दादा घरांतून पहाटे पांच वाजतांच स्नान वगैरे आटोपून बाहेर पडला होता ! मॅनेजर खुशालचंदाची तर तिकडे त्रेधा तिरपीट उडाली होती. आपल्या गिरणींत दंगाधोपा होतो कीं काय ? हाणमार होती कीं काय ? आपल्यावर कोणी गदा आणणार नाहीं ना ? संतूराम काय करील ? कां आपणच त्याचा नक्षा उतरावा ? अशाही कदाचित् तो विचारांत असेल. त्याच्या हालचालीची दादानें बित्तंबातमी ठेविली होतीच ! त्याच्याशीं आपण कसें वागावयाचें, आपल्या गिरणींतल्या मजुरांना कसें वागवाव-याचें याबद्दल त्यानें योग्य प्रकारें ठरविलें होतें.

खुशालचंदानें सरकारची मदत मागवून ठेविली होती. पोलिस बंदो-बस्त कडेकोट होता ! गिरण्या संपांत शिरत असता, त्या अशा तऱ्हेनें कीं, संप केलेले मजूर आपल्या मुख्य पुढाऱ्याबरोबर, ज्या गिरणीचा संप करावयाचा त्या गिरणीच्या मुख्य दरवाजापुढें उभे राहत ! त्या गिरणीचे कामगार लोक आंत जाऊं लागले, म्हणजे त्यांना त्या संपवाल्याचा मुख्य संपवाल्याच्यातर्फें म्हणून हात जोडून नम्र विनंती करी, "बंधु, आपले मालक, दिवसगत पाहून आपला रोजमुरा वाढवीत नाहींत, आपल्या 'बोनस'चा हक्क कबूल करीत नाहींत, आपल्याला जनावरा-पेक्षांही हलक्या प्रतीचे समजून कामाचे तास कमी करण्याचा विचारही करीत नाहींत. अशा स्थितींत आपण आपल्या पोटाला चिमटा घेऊन बायकामुलांना

कपडयाशिवाय, आणि अन्नाशिवाय ठेऊन आतां किती दिवस धन्याची चाकरी करावयाची? धन्याचें याकडे लक्ष जात नाहीं. तें लक्ष आपल्याकडे लागावें, आपलीं गाऱ्हाणीं ऐकावींत-आपलें म्हणणें त्यांनीं कबूल करावें, म्हणून आपल्याला कांहीं दिवस कामावरूनच दूर राहिलें पाहिजे. तर आपल्या धन्याचे आपल्याकडे लक्ष जाईल, व आपल्याबद्दल तें विचार करतील, त्याला संपाशिवाय दुसरा उपाय नाहीं. म्हणून आम्हीं काम सोडून गिरणींतून बाहेर पडलों आहोंत. आमची आणि तुमची स्थिति एकच आहे! तुम्हींही आम्हांला मिळावें; आपण जर सर्व एक जुटीनें काम सोडून घरीं राहिलों, तर आपले जास्त हाल होतील खरे, पण त्याशिवाय उपायच नाहीं. गिरण्याबंदच राहिल्या, आपल्या धन्याचें प्रत्यक्ष नुकसानच होऊं लागलें म्हणजे, ते आपल्याकडे खात्रीनें लक्ष देतील अशी आशा आहे! तर कृपा करा. आणि आपण आपली दाद लावून घ्या. तुह्मीं जोंपर्यंत आम्हांला मिळाला नाहीं तोंपर्यंत आपल्या धन्याचें डोळे उघडावयाला तितकाच उशीर लागेल!" या प्रमाणें सांगावयाचें, त्यांनीं ऐकावयाचें, आपापल्या कामाच्या जागीं जाउन उभें राहावयाचें, त्यांचा जो कोणी मुख्य असेल, त्यानें मात्र मॅनेजरकडे जाऊन आपल्या सर्व मजुरांचें म्हणणें सांगावयाचें व त्यांनीं 'तें कबूल नाहीं' म्हणून सांगितलें कीं, काम करण्याला सुरवात करण्याऐवजीं गिरणीच्या बाहेर पडावयाचें, मालाची नासधूस करावयाची नाहीं. यंत्रांना हात लावायचा नाहीं. गर्दी करावयाची नाहीं, कीं आरडाओरडा करावयाचा नाहीं!

याच क्रमानें अगदीं शिस्तवार संप दादाच्या खटपटीनें, उद्योगानें, चिकाटीनें घडून आला! दादाच मजुरांच्या तर्फे मॅनेजरपुढें (खुशालचंदापुढें) मजुरांचा विनंती अर्ज मांडावयाला आला होता. या संपाच्या वेळीं पोलीस बंदोबस्त जय्यत होता. पोलिस अधिकारी मॅनेजर, तर होतेच, पण खुद्द शेटजी इच्छारामभाई त्या ठिकाणीं आज हजर होते. इतकेंच नव्हे तर प्रेमचंदभाई, आणि आमची प्रेमळ मैत्रिण बबूताईसुद्धां तिथें आपल्या मोटारींतून संपाचें दृश्य पाह्यला आली होती! संपाचें काम शांत रीतीनें धिमेपणानें होत होतें! पोलिस बंदोबस्ताचा शोभेपेक्षां अधिक उपयोग झाला नाहीं! मॅनेजराच्या अंगाला अंगार लागला होता!

इच्छारामभाईंची भव्य मूर्ति अत्यंत शांत, विचारमग्न, आणि पुष्कळशी उदास दिसत होती. भाईप्रेमचंद अत्यंत काळजीपूर्वक संपाचा ठाव काढण्यांत—सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करण्यांत चूर झाला होता! बबूताईची स्थिति तर विचारावयालाच नको! ती आळीपाळीने इच्छारामभाई, प्रेमचंदभाई, मॅनेजर, पोलीस अधिकारी. आणि संतूरामदादा यांच्याकडे पहात राहिली होती. तिची अगदीं कींव येण्यासारखी स्थिती होऊन गेली होती! दादा संपांत कां शिरला? तो इतका गंभीर—शांत कसा? त्याचा हंसरेपणा—मनमोकळेपणा कुठें गेला? आमच्या बाबांचें नुकसान होण्याकरितां दादनेंच तयारी करावी हें कसें?—दादाचा आपला इतका स्नेह दादाच्या ध्यानातच आला नाहीं काय?" एक का दोन? अनंत विचार त्या वेळीं बबूताईच्या मनांत उद्भवले असताल! तिची केवीलवाणी अवस्था झाली होती. तशाही स्थितींत दादाविषयीं बबूताईच्या अंतःकरणांत तिरस्कार, द्वेष, राग उत्पन्न होत नव्हता! ती सदयतेनें, प्रेमानें, अनुकंपेनें दादकडे पहात होती! "दादानें असें कां करावें?" हा बिकट प्रश्न मात्र तिला सुटत नव्हता! पण विचारणार कुणाला? भाईला विचारण्याची सुद्धां त्या वेळीं तिची ताकद नव्हती! ती अगदीं हतबुद्ध होऊन गेली होती!

गेल्या पंधरा दिवसांत, संपाची वावटळ उठल्यापासून आणि दादा संपाच्या भरीस पडला आहे, हें कळल्यापासून बबूताई आमच्याकडे दररोज निदान चार दोन वेळां तरी येत असे. पण गंमत अशी कीं त्या पंधरा दिवसांत दादाची आणि तिची एकदांही गांठ पडली नाहीं! दादाला ती विचारणार होती, पण गांठच नाहीं, तर काय करणार? आणि पडणार तरी केव्हां आणि कशी? बरें, बबूताई मला किंवा आईला काय विचारणार? आणि आम्हांला सांगतां तरी कसें येणार?

दादा संपांत शिरला आहे, त्यानें संपाचा पुढाकार घेतला आहे, हें जाहिर झाल्यापासून बबुताई आमच्याकडे आली म्हणजे मला अगदीं चोरट्यासारखें होई! तिच्याशीं मन मोकळेपणानें बोलायचें कसें? बोललें तरी बबुताईला तें पटेल का अशी शंका येई! तिचा चेहरा उदास—कींवलवाणा असा दिसे. तरीपण आईशीं किंवा माझ्याशीं बोलण्यावागण्यांत

पहिल्या इतकाच प्रेमळपणा तिचा असे ! ' संपाच्या बातम्या ' आम्हीं दोघीही एकत्र वाचित असूं. आईला वाचून दाखवीत असूं, पण गंमत ही कीं ' दादाविषयीं चर्चा ' करावयाची दोघीही सावधगिरीनें आणि हेतूपूर्वक टाळीत असूं ! ' दादा करीत आहे हें त्यानें करूं नये-निदान नाहीं केलें तर नाहीं का चालणार ?' असा भाव एकादेवेळीं तिला न जुमानतां तिच्या चेहेऱ्यावर उमटे ! पण ' दादाचें आहे तें अगदीं बरोबर करणें आहे ! असें जाणविण्याची एकादें वेळीं मलाही उबळ येई ! पण मी ती अट्टहासपूर्वक दाबीत असे !

असा आमचा वर्तनक्रम चालला होता !

झालें ! आज दादाच्या गिरणीचा संप जाहिर होऊन अमलांतही आला ! गिरणी बंद झाली ! पोलिस अधिकारी निघून गेले ! शेटजी इच्छारामभाई, आणि प्रेमचंदभाई मिलओनर्स-असोसिएशनच्या ऑफिसकडे चालते झाले ! गिरणीच्या व्यवस्थेसाठीं खुशालचंदाला तिथेंच थांबावें लागले होते. मजुरांचा समुदाय असाच दुसऱ्या गिरणीचा संप घडवून आणण्यास चालला होता !

मिलओनर्स-असोसिएशनमध्यें पुढें स्टेप कशी घ्यावयाची याची वाटाघाट चालू होती ! आणि संपाच्या सांथीमुळें आतां ती वाटाघाट विशेष नेटानें करणें प्राप्तच होऊन बसलें होतें ! मजुरांच्या मागण्या व म्हणणें त्यांनीं विस्तृत-मुद्देसूद-साग्र लेखी मागितलें असून, मजुरांनींही विचारपूर्वक खलिता तयार करून तो नुकतांच " असोसिएशन"कडे रवाना केला होता !

दादा आज अत्यंत थकला होता. आज आठ दिवस अहोरात्र आलोचन त्याला जाग्रण पडलें होतें. आठवड्यांत तीन चार वेळां तरी त्याच्या पोटांत कांहीं पडलें होतें कीं नाहीं, याची शंका होती ! संप झाला आणि आपल्या मजूर बांधवांना आपापल्या ठिकाणीं पाठवून " संध्याकाळीं संप संपेपर्यंत कठिण काळ कोणत्या प्रकारानें कोणत्या धोरणानें कंठावयाचा याचा एकत्र बसून विचार करण्याकरितां यतों, म्हणून सांगून दादा बिऱ्हाडाकडे यायला निघाला.

बबूताई परत बंगल्यावर निघाली होती. पण तिच्यानें राहवेना. तिनें आपली मोटार आमच्या बिऱ्हाडाकडे वळविलीच ! दादा ट्रॅमधून धोबी तलाव स्टँडवर उतरण्याला आणि बबूताईची मोटार तिथे येऊन थांबायला एकच गांठ पडली !

काकदृष्टी मॅनेजरचें लक्ष तशाही गडबडींत दादा, आणि बबूताई यांच्याकडं होतेंच. 'दोघे परस्पराकडे पाहाताहेत कीं काय ? पाहून त्यांच्या विकारविकारांचेंच प्रतिबिंब कांहीं पहावयाला मिळतें कीं काय ?' अशा तऱ्हेचा शोधकपणा चालविल्याचें त्या वेळीं जर कोणी मॅनेजरकडे पाहिलें असतें, तर त्याच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नसतें ! त्याचें, दादा आणि बबूताई तेथून आपापल्या मार्गानें दूरवर जाईपर्यंत लक्ष होतें. बबूताईनें आपल्या बंगल्याचा रस्ता सोडून दुसऱ्या रस्त्याला मोटार वळवीपर्यंत मॅनेजरच्या नजरेचा पल्ला पोंचला होता, अशा शंकेस जागा होती. कारण तसें नसतें, तर बबुताईची मोटार थांबली त्यावेळीं मॅनेजरच्या ऑफिसमधून एक पोऱ्या मोठ्या सावधगिरीनें निघून कोणाला संशय येणार नाहीं अशा रीतीनें येऊन मोटारच्या मागें उगाच उभा राहिला नसता ! आणि मोटारची दिशा बदलतांच, तो पोऱ्या मोटारच्या पाठीमागें ठेवलेल्या टायरमध्यें चटकन् उडी मारून बसला नसता ! मोटार चालली होती ! टायरला लटलेल्या पोऱ्याकडे पाहून रस्त्यानें जाणारे रिकामटेकडे लोक—त्यांत मोकाट सुटलेले मजूरही असतील—हंसत आणि टाळ्या पिटीत ! त्या हंसण्याचा आणि टाळ्या पिटण्याचा अर्थ बबूताई आपल्याकडे अशा रीतिनें लावून घेई कीं –मी गिरणीवाल्याची मुलगी म्हणून—आणि आम्हीं गिरण्या कशा बंद पाडल्या !—आणि कशीं गिरणीवाल्यांची नाकें ठेंचलीं! कसें चिमणीसारखें हिरमुसलें तोंड करून पळायला लावलें आहे !—अशा अर्थानें आपला उपहास, उपमर्द करण्याकरितांच रस्त्याचे लोक हंसत असावेत,आणि टाळ्या पिटीत असावेत.यामुळें धोबीतलावावर मोटारींतून उतरतांना बबुताई जास्तच खिन्न झाली होती. मोटार थांबतांच मागील पोऱ्या टणकन् उडीमारून दूर गेला. आणि उगीच या–त्या दुकानाकडे पाहण्याचा बहाणा करीत घुटमळूं लागला !

दादा–बबूताई दारांतच भेटलीं ! दोघांनीं दोघांकडे पाहिलें ! दादा-

नेंच बबूताईचा पुढें होऊन हात धरला ! "चल ताई वर ! आमच्याकडेच आली आहेस ना ?" दादाचा स्वर अत्यंत स्वच्छ, सरळ, प्रेमळ, असाच बबूताईच्या कानीं पडला !

"होय दादा !" एवढेंच ताईनें उत्तर दिलें ! पण या वेळीं ताईचा कंठ किती रुद्ध झाला होता, हें तिचें तिलाच माहीत ! दादाला तिच्या मनःस्थितीची कल्पना आली होती, पण त्यानें मुळींच त्याबद्दल जाणीव दिली नाहीं ! बबुताई मुकाट्यानें दादाच्या हातांत हात देऊन वर आली ! दोघे वर आल्यावर थोड्याच वेळानें रस्त्यावर घुटमळणारा मुलगाही जिना चढून वर आला—पण तडक वर न येतां मध्येंच दत्तासाहेबांच्या ऑफिसच्या दारांत पुन्हां घुटमळला !

दादा ट्रॅममधून आणि बबूताई मोटारींतून उतरल्याचें मी वर गॅलरींतून पाहिलें. त्या वेळीं मी गॅलरींतच होतें ! दोघे वर आलीं. मी दार उघडलें ! आई शुचिर्भूतपणानें—स्वच्छ पांढरी धाबळी अंथरून 'गुरुचरित्र' वाचीत बसली होती ! यावेळीं तिच्यापुढें "पदरीं मूठ दीडमूठ धान्य असलेल्या आणि गुरूची सेवा करणाऱ्या बुद्धीहीन भक्ताचा अध्याय होता ! तो अध्याय आई वाचीत होती.

दादा—बबूताई दोघे आंत आली. दादानें कपडे काढले, आणि फाटक्या सतरंजीवर अंग टाकलें. बबूताईनें माझा हातांत हात घेतला ! आम्हीं दोघी आईच्या पोथीपुढें बसलों ! आईचा अध्याय वाचून संपला ! तिनें वर दादाकडे आणि बबूताईकडे पाहिलें ! आणि दीर्घ निश्वास सोडला !

"काय ?" आईनें दादाला क्षिण-खोल आवाजांत विचारलें !

"आज आमच्या गिरणीचा संप झाला !" दादानें मोजक्या शब्दांत उत्तर दिलें !

पुन्हां कांहीं वेळपर्यंत अत्यंत गंभीर अशी शांतता पसरली !

"बबूताई," दादानें त्या शांततेचा भंग केला. "बबूताई, आज तूं इथें कशी ? कुणाकडे, कां म्हणून आली आहेस ?"

" मी होय !" बब्रूताईनें तितक्याच शांतपणें उत्तर दिलें ! " नेहमीं-प्रमाणें, माझ्या सुगंधाताईकडे–आणि संतुरामभाऊकडे–भेटायला आलें आहें ! "

" पण मी आज तुझ्या बाबांचा उघड उघड शत्रू म्हणून झालों आहें " दादा म्हणाला.

" मला नाहीं तसें वाटत!" बब्रूताईनें आपलें मत दिलें !

" कां बरें ? आज तूं प्रत्यक्ष पाहिलेंस ना ? शेटजींच्या देखत–मजुरांचा पुढारीपणा स्वीकारून आपल्या गिरणीचा संप घडवून मी आणला आहे !–शेटजींच्या दररोजच्या हजारो रुपयांच्या नुकसानीला मी कारण झालों आहें !" दादा आणखी पुढें गेला !

" होय! मी तें प्रत्यक्षच पाहिलें आहे. तरीपण माझें पहिलें मत अजूनही कायमच आहे ! आणि म्हणूनच मी इथें आलें आहें !–"

" पण शेटजींच्या तुझ्या–वडिलांच्या, आणि भाईच्या कानावर मी तुमचा शत्रू झालों आहें–खाल्ल्या अन्नावर उलटलों आहें–असे रिपोर्ट गेले आहेत–" दादाचें चालूच होतें !–

" होय, आणखी सुद्धां पुष्कळ ऐकलें होतें !" बब्रूताईनें सांगितलें.

" काय ?" दादानें हंसून चौकशी केली !

" कीं संतुराम, माझे बाबा जर संपाच्या वेळीं गिरणीवर आले, तर मुंबईच्या मवाल्यांकडून मोटारीवर दगड फेंकावयाला लावून मारणार आहे ! "

हें ऐकून माझ्या अंगावर शहारे आले ! माझें आंग थर्र झालें !

" श्रीराम ! श्रीराम ! श्रीराम ! " आईच्या मुखांतून धीर गंभीर उद्गार निघाले !

" असें ?" दादा हंसून म्हणाला, " इतकी माहिती मिळाली असून शेटजी, भाई, आणि त्या बरोबर तूं पण कशी आलीस ? -तुला भीति नाहीं का वाटली ? तुझ्या आंगावर, शेटजींच्या बरोबर आणि भाईच्या बरोबर दगड पडले असत म्हणजे ?"

" पण पडले नाहींत, हें आतां सिद्धच झालें आहे ना ? " बब्रूताई चटकन् उत्तरली !

" हें झालें ! " दादाला मनापासून बबूताईच्या उत्तरानें आनंद झाला ! पण तो आणखी मुद्दाम म्हणाला, " निघतांना असा अनुभव येईल अशी कशी कल्पना केली होतीस ? "

" केवळ तुझ्यामुळें ! दादाच्या हातून असें व्हायचें नाहीं ! कदाचित् तितक्यांतून ठरलें असेल तरी बाबांच्या आणि भाईच्या बरोबर मला पाहून तरी संतदादाला निश्चय बदलावा लागेल. लाचीन ! आणि आलाहि च अनुभव या विश्वासानें आलें होतें ! " बबूताईनें सरळ उत्तर दिलें ! या प्रेममय उत्तरानें आम्हां सर्वांचच–प्रेमाचे हृदयसागर उचंबळून आले !

" बब्बूबाळ ! तूं प्रत्यक्ष देवता आहेस ! ईश्वर तुझें अखंड कल्याण करील ! " दादावरील बबूताईचें अकारण, अढळ, निर्मल, निश्चयाचें आईनें प्रेमपाहून सद्‌गदीत अंतःकरणानें आशीर्वाद दिला !

" बबूताई आम्हीं इतकी डेंजरस माणसें आहोंत, अशी शेटजींची, भाईची समजूत आहे काय ? " दादानें चौकसपूर्ण अर्थानें विचारलें !

" मुळींच नाहीं ! " बबूताई उत्तरली !

" तुझें मत किंवा तुझें वाटणें सांगूं नकोस ! " दादा म्हणाला, " शेटजींचें–भाईचें मत माझ्याबद्दल काय आहे ? "

" बाबांच्याबद्दल मला आजच सांगतां येणार नाहीं. पण वाईट मात्र नाहीं, इतकें मी सांगूं शकेन ! भाईचें मत सकाळपर्यंत जवळजवळ माझ्याच प्रमाणें होतें–आतां सर्वस्वी माझ्याचप्रमाणें झालें असेल !" ताईनें सांगितलें.

" तें कसें आणि कां ? " दादानें फिरून विचारलें.

" भाईच्या कानावर तुझ्याबद्दलच्या ज्या कंड्या गेल्या होत्या, त्यांनीं थोडें तरी त्याचें मन गढूळ झालें असेल, तें प्रत्यक्ष अनुभवानें निवळलें ना ? " ताईनेंच दादाला प्रश्न केला. व पुढें म्हटलें, " बरें, संतूदादा, बाबा काय करतील––मजुरांच्या बाबतींत कसें वागतील असा तुझा समज आहे ? "

" शेटजींच्या एकट्याच्या हातीं काय आहे ? मिलओनर्सअसोसिएशन काय ठरवील, त्यावर अवलंबून राहणार ! " दादा म्हणाला.

" तें खरें, पण बाबा काय करतील ! असोसिएशनमध्यें बाबा काय पक्ष घेतीलसें तुला वाटतें ?–" बबूताईनें पुन्हां विचारलें.

" मजुरांच्या म्हणण्याला मंजुरी देतील असा माझा अंदाज आहे ! " दादानें आपला कयास सांगितला.

" तसेंच करणार आहेत ! " बबूताईनें माहिती दिली. "आणि भाई हेंच बोलत होते ! मी ऐकलें हें. आणि म्हणूनच तुझ्या विषयीं त्यांच्या कानावर कांहीं जरी कुणी वाईटसाईट घतलें असलें, तरी आजचें तुझें संपाच्या वेळचें सभ्यतेचें, शहाणपणाचें, शिस्तीचें, मोकळेपणाचें वर्तन पाहून त्यांच तुझ्याविषयीच दूषित पूर्वग्रह बदललेच असले पाहिजेत ! "

" ईश्वर करो आणि तसें असो ! " दादानें चालू विषयाचा समारोप केला. दादा व बबूताई या प्रमाणें बोलत असतां, मी दादाकरितां खायचें तयार केलें. आई बसून कंटाळली होती, ती कलंडली ! रत्नु, दादा व बबूताईचा संवाद दोघांच्यामध्यें बसून एकाग्र चित्तानें ऐकत होता. गुला माला जसें कांहीं सगळें त्यांचें बोलणें कळतच होतें ! दादाला जेवायला उठायला सांगितलें. दादा उठला. कपडे काढले. दादानें खुंटीवर कपडे ठेवायच्या वेळेला—खिडकीच्या दाराजवळ—बाहेरच्या बाजूला कांहीं तरी खडखडल्याचा आवाज झाला ! कांहीं तरी लुकलुकल्याचा भास झाला ! आमचें कोणाचेंच फारसें लक्ष गेलें नाहीं. ' काय खडखडलें ? ' म्हणून आईनें विचारलें. तिचें लक्ष गेलें होतें. कायसेसें लुकलुकल्यासारखें झालें रे ! "

दादानें इकडे तिकडे पाहिलें; त्याला कांहींच दिसलें नाहीं ! " असेल उंदीर ! मुंबईला उंदीर कांहीं कमी नाहींत. माणसाला भीत नाहींत; कांहीं नाहीं ! " दादा म्हणाला. पाटावर येऊन दादा बसला. बबूताईनें दादाला वाढावयाला घेतलें. मी घेणार म्हणाली वाढायला ! दादाला वाढण्यांत तिला धन्यता वाटत होती !

जेवण चालू असतांच बबूताईनें दादाला विचारलें, " दादा, तुला एक विचारूं का ? तुला राग नाहीं ना येणार ? "

" अरे वा ! माझ्या रागाची बरीच भीति वाटते आहे कीं तुला ? बरें, विचार तर खरें. रागालोभाचें पुढें पाहूं !—" दादा उत्तरला.

" हा संपाचा वणवा चालणार किती दिवस ? " बबूताईने विचारलें.

"कोणास ठाऊक! भांडवलवाले किंवा मजूर दोहोंपैकीं कोणी तरी एक हटतील तेव्हां!–कां?"

"नाहीं म्हटलें, संप संपेपर्यंत, आई, सुगंधाताई, रत्नु, यांना माझ्याकडे घेऊन जाऊं का? म्हणून विचारणार होतें–विचारणार आहें–विचारतें आहें ह्मण पाहिजे तर!" बबूताईनें आपला हेतु प्रदर्शित केला!

"शाबास ताई! आणखी? माझ्या मंडळींना एक नेशील. आमची चार दिवसाची चंदी संपल्यावर–आणि संप नाहीं लवकर संपला तर आमचें काय होईल म्हणून तुला काळजी पडली आहे! वा! खूप आहेस! पण मुंबईतल्या लाखो मजुरांनीं–आणि त्यांच्या कुटुंबियांनीं संप संपेपर्यंत काय करावें? त्यांच्याकरितां काय करशील? वेडी तर नाहींस बबूताई!–बबूताई, तूं आमच्यावरील निर्हेतुक प्रेमाची आणखी किती आणि कशी परमावधी करणार?" ताईच्या बोलण्यानें दादा सद्गदीत झाला!

"दादा," बबूताई डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, "खरेंच, मग तुमचें कसें होईल?"

"जें आज लाखो संप करून स्वस्थ बसलेल्या मजुरांचें होईल, तेंच माझें होईल! जनता जनार्दनावर माझा विश्वास आहे! मजुरांचा महादेव आम्हांला उपाशी कां आणि किती दिवस ठेवील? शिवाय, बबूताई, एरव्हींची गोष्ट निराळी, आतांची निराळी! तुझ्या घरीं तरी माझ्या मंडळींनीं कां आणि किती दिवस यायचें? अशा येण्यानें–तुझें आमच्यावरचें प्रेम अजरामर होईल खरें. पण त्यानें चालू कार्याचा शेवट होईल काय? आतां तर काय? सामान्यव्यवहारदृष्ट्या तुम्हीं आम्हीं शत्रू आहोंत. या दृष्टीनें विचार कर! ताई, मी आतां कसा झालों तरी, मजुरांचा पुढारी झालों आहें! ज्या हजारो मजुरांच्या मालीकेंत म्हणून बसलों आहे–आणि जी त्यांची तीच माझी स्थिति, असा माझ्याबद्दल ज्या मजुरांचा विश्वास आहे, त्यांना त्याच अवस्थेंत टाकून, मी माझ्या मंडळींना पाठवून तुझ्याकडे देऊं? आणि आरामांत चैन चमन करायला लावूं?–मग तूं तरी काय म्हणशील? तुला बरें वाटेल काय तें?"

यावर बबूताई बिचारी काय बोलणार! मुकाट्यानें बसली. थोड्या वेळानें दादाच म्हणाला, "तें सगळें जाऊं दे! आम्हीं या प्रसंगांत पडलों आहोंत, आम्हीं तपश्चर्येला सुरुवात केली आहे, ती आमची आम्हीं पाहून घेऊं. पण मला सांग, तूं आमच्यावर इतकें निर्हेतुक, एकनिष्ठ, प्रेम कां करावेंस ?"

"कुणास ठाऊक! मला कांहींच सांगतां येत नाहीं!" बबूताईनें एकदम उत्तर दिलें.

"आई म्हणते तेंच खरें! तूं देवकन्याच असली पाहिजेस!" दादा उद्गारला! दादाचें जेवण झालें. मग मी बसलें. बबूताईला बसविल. आमची मीठ भाकर बबूताईनें एकाद्या पक्वान्नासारखी मिटक्या मारीत मटकावली.

"दादा" मध्येंच ताईनें विचारलें, "बाबांना भेटायला येशील ?"

"मजुरांच्यामार्फत–मजुरांचा मुख्य म्हणून–मजुरांचा मजूर म्हणून शेटजींच्या पुढें यायला माझी केव्हांही तयारी आहे!"

"मग मी भाईकडून तशी तजवीज करवीन! म्हणजे बाबांचा स्वभाव तरी तुला कळेल! तुझ्याशीं बोलणें झाल्यावर–चुकून वाईटपणाचा अंश राहिला असेल तर धुवून जाईल! दादानें तें कबूल केलें. ताई जायला निघाली. दादाला पण मजूर संघाकडे जायच्या वेळेपर्यंत मिळेल तेवढी विश्रांति घेणें अवश्य होतें, म्हणून तो तसाच पडला. बबूताई मोटारींत जायला बाहेर पडली! तेव्हां दारांतून चटकन् कुणी बाजूला झालें. ताईची मोटार गेली. ती जाईपर्यंत मी गॅलरींत उभी होतें. आंत यायच्या वेळीं सहज लक्ष गेलें, तों आमच्या जिन्यांतून मॅनेजर खुशालचंदाचा एकदां गिरणीच्या ऑफिसमध्यें मी पाहिलेला बॉय उतरून तडक चालला होता! बबूताईच्या मोटारीच्या टायरमधून आला तो,–तो बॉय होता!

---

## प्रकरण १२ वें.

# आईचा मृत्यू !

" आई ! आई ! असें ग काय करतेस ?–आई !–डोळे उघडून बघ बरें ! "

" काय म्हणतेस सुगंधा ! असें तोंड वाईट कां केलें आहेस !–बाळ कुठें आहे ? "

" आई, मी तुझ्याजवळच आहे बरें का ?"

" आणि रत्नु ?–रत्नुला मला भेटव बरं ! सुगंधाताई, असें काय बरें वाईट तोंड करावें ?–बाळ, तूं देखील असा हिरमुसला होऊन बसला आहेस का ? वेडा का आहेस तूं ?–तूं असा बसल्यावर सुगंधाताईची समजूत कुणी बरें करायची ? तुमच्या तोंडाकडे पाहून माझ्या रत्नुराजानें कसें चिमणीसारखें तोंड केलें आहे पहा बरें ? "

आईची अखेर वेळ होती ! आम्हीं सगळीं तिच्या भोंवतीं बसलों होतों. आज दोन रात्रीं दिव्यानें उजाडल्या होत्या ! आईची अखेर वेळ आहे, हें आम्हांला कालच कळून चुकलें होतें. पण दगडासारखीं मनं घट्ट करून आंतल्याआंत येणारे उमाळे गिळून टाकीत होतों !

सकाळीं दहा वाजून गेले होते. तरी कोपऱ्यांतल्या कंदीलाला निरोप द्यायचें कुणालाच भान नव्हतें ! दिवसाच्या प्रकाशानें बिचारा निष्प्रभ झाला होता ! पहाटेंपासून आईची आशा सुटली होती. आजचा दिवस-दिवस कसचा? दुपार देखील उलटायची मारमार आहे, असें पक्केंपणीं कळून चुकलें होतें. दादा माझ्याकडे पहात नव्हता. मी दादाकडे पहाण्याचें धाडस करीत नव्हतें !

आमच्या जागेंत घोर शांतता विहार करीत होती ! आम्हां सगळ्यांचें आईच्या मुखाकडे लक्ष खिळून राहिलें होतें. अखेरच्या वेळीं आईनें आमच्याशीं कांहींतरी सारखें बोलत रहावें, असें वाटत होतें; तर आईनें

एक दोन शब्द बोलतांच तिला ग्लानी आली–क्लेश होऊं लागले म्हणजे तिनें बोलूं नये असं वाटे !

" रत्नुनें कांहीं खाल्लय का ? त्याला खायला घाला ! नी बाळ, तूं, सुगंधा देखील खाऊन घ्या ! " आईनें आम्हांला सांगितलें. " खरेंच, ऊठ, सुगंधा, चूल पेटवून तांदूळ धुऊन टाक ! कांहीं खाऊन घ्या, सगळींच ! "

मी उठलें नाहीं. जागेवरून हलवेचना ! उठायला माझ्या अंगांत शक्तीच राहिली नव्हती ! मस्तक सुन्न झालें होतें. मी उठलें नाहीं. दादा पण कांहीं बोलला नाहीं. भूकतहानेचें भान कुणाला होतें ? जेवणाची आठवण कुणाला होती ? नी कांहीं केलें असतें तरी तोंडांत घांस तरी कसा जाणें शक्य होतें?–

" असें गे काय करतेस सुगंधा ! " मी उठलें नाहीं, हें पाहून जरा वेळानें आई म्हणाली—

" असं करूं नये बाळ ! ऊठ म्हणून मी सांगतें आहें ना ? कांहीं करून खा ! बाळ माझ्याजवळ आहे तंवर! किनई, माझे आतां पाय गार पडत चालले आहेत ! पोटांत कांहीं असल्याशिवाय दम कसा निघेल तुम्हांला ! म्हणून सांगतें आहे कांहीं खा !–संतू बाळ. सांग बरें सुगंधा-ताईला उठायला ! " आईला बोलवत नव्हतें, तरी एक--एक शब्द हेंच बोलत होती !

माझ्या हातून कांहीं होणें शक्यच नव्हतें ! पण जीव मुठींत धरून उठलें. म्हटलें रत्नुला तरी कांहीं द्यावें. दूध रात्रींचें होतें. कपात घालून रत्नुला बोलावून त्याला प्यायला दिलें. पण तो घेईना. आम्हीं अशी आईजवळ मुक्याचें व्रत घेऊन बसलेलों. त्याचा परिणाम त्याच्या मना-वरही फार फार झाला होताच ! मी अगदीं त्याच्या पाठीसच लागलें तेव्हां त्यानें कप उचलून तोंडाला लावला–एक घोंट घेतला असेल नसेल तोंच त्यानें कप खालीं ठेवला, नी उठून चालता झाला. दादाच्या पाठीशीं जाऊन बसला ! मी उठलें ! चुलीकडे मला नुसतें पहावेना देखील !

मी आईजवळ पुन्हां येऊन बसलें ! आतां आईची घालमेल जास्तच वाढली होती !

" बाळ, तुझी मांडी देतोस ना रे आतां ? " आई दादाला म्हणाली !

दादा चटकन् उठला. त्यानें आईचें मस्तक मांडीवर घेतलें !

" आतां किनई, चमच्या-चमच्यानें माझ्या तोंडांत दूध घाल अं थोडं ! पाणी घाल !-तुझ्या मांडीवर डोकें ठेऊन-हं असं-तुझ्या हातानें मला पाणी मिळालें म्हणजे—"

मी दादाजवळ दुधाचा प्याला-चमचा दिला ! दादानें दोन चमचे आईच्या तोंडात दूध घातलें !

" हं ! आतां बरें झालें ! बाळ, सुगंधाताई, माझ्या बद्दल कुणी रडूं नका बरें का ? रत्नुला रडूं देऊं नका ! त्याला भीति वाटेल. दत्तासाहेबाच्या माणसांत त्याला नेऊन सोडा मग हं ! अशा वेळेला रडलें म्हणजे किनई, जात्या जिवाला कष्ट होतात ! देवाघरीं त्याला मग चैन पडत नाहीं ! "

आई एकेक शब्द बोलत होती ! माझ्या डोळ्यांतल्या पाण्याचे बांधच फुटले होते ! दादा मात्र शांतीब्रह्माचा अवतार बनला होता ! त्याच्या डोळ्यांत पाण्याचा टिपूस नव्हता ! ब्रह्मांडांतला त्यानें शांतपणा आपल्या ठिकाणीं एकवटावला होता !

" बाळ, कालपासून तुमची ती बबूताई आली नाहीं, नाहीं ? तिला पण शेवटचें पहावेसें वाटत होतें मला. ती आपल्या सुगंधासारखीच मला वाटायला लागली होती ! बरें ! एवढी मोठी थोरामोठ्याची पोर ! पण तुमच्यावर तिचा केवढा लोभ आहे. देव तिचें मंगल करो ! "

आई पुन्हां थांबली ! मला किंवा दादाला बोलावत नव्हतें !

" बाळ, स्वारीला जाऊन पांच वर्षे झालीं. आज मी चाललें ! माझे डोळे मिटायच्या आंत तुझं बस्तान थाऱ्याला लागून-तुझे दोन हाताचे चार हात झालेले दिसले असते !-सुगंधा सुस्थळीं पडून तिचें चांगलें चालल्याचें ऐकायला मिळालें असतें-रत्नुच्याला अवकाश होता—पण एवढें जरी दिसलें असतें-पाहाण्याची इच्छा होती-जाऊं दे ! देवा-

जीची मर्जी अशी होती! देव किनई जें करतों तें चांगलेंच असतें बरं का?

हरे! राम! राम! बाळ, सुगंधाताई, राम-राम म्हणा बरं आतां! वाईट वाटूं देऊं नका! रडूं नका! माझें चांगलें होतें आहे! सोनं होतं आहे! इतक्या गरीबींत, इतक्या हालांत–पण इतक्या सुखांत, इतक्या समाधानांत, सद्गुणी मुलाच्या मांडीवर, त्याच्या हातचें पाणी मिळून–मरणसुद्धां फार थोड्यांच्या वांट्याला येत असतं! भाग्याशिवाय हें कुणाला मिळत नाहीं! हें भाग्य मला लाभलें आहे! म्हणून सांगतें! रडूं नका! माझं चांगलं झालें आहे, तुमचें मंगल होईल!"

प्रत्येक शब्द आई सावकाश, पण स्पष्ट बोलत होती! जीभ अडखळत नव्हती! कीं तिला मृत्यूची भीति वाटत नव्हती!

"संतूबाळ," आई आणखी बोलूं लागली, "स्वारीच्या मागें पांच वर्षांत, रोजच्या संसारांत तुला एका रीतीनें नुसती भारच होऊन बसलें होतें! आजार–आजार सारखा माझा आजार तुझ्या पाठीशीं लागला होता! माझ्या हातून तुझ्या चणचणीच्या काळांतच तुला कसलेंच सुख मिळालें नाहीं, तुझ्या ऐन कठीण काळांतच माझ्या मृत्यूची आणखी भर पडते आहे! पण काय करणार? आलें देवाजीच्या मना! देवाच्या आज्ञेला मान दिलाच पाहिजे! पण किनई, माझ्या मृत्यूनें तुझा धीर खचूं देऊं नकोस! ज्यांत पाऊल पुढें टाकलें आहेस, तें मागें घेऊं नकोस! देव तुला कधीं उणं पडूं द्यायचा नाहीं, देवावर पूर्ण निष्ठा-अढळ विश्वास--दृढ विश्वास ठेव म्हणजे झालें! कायेनें वाचेनें मनानें दुसऱ्याचें अकल्याण करूं नकोस, बोलूं नकोस, चिंतूं नकोस! सद्बुद्धीनें चांगलें करीत रहा, चागलेंच होईल!--अहाहा! आतां थोडें पाणी पाज!--हं पुरें. यापेक्षां मला जास्त कांहीं सांगावचें नाहीं. सुगंधेचा नी रत्नूचा भार तुझ्यावरच आहे! एकमेकाला विसरूं नका! अंतर देऊं नका!–जगाला आपलें म्हणा! म्हणजे जग तुम्हांला आपोआपच आपलें म्हणेल! मंगल करीत रहा, मंगलच होईल! राम! राम! राम!–जातें हं आतां! मंगल चिंता--राम म्हणा! राम-राम-राम!--रत्नुला जवळ आणा बरें! त्याला अखेरचं डोळे भरून पाहूं द्या! मुका घेऊं द्या!"

मी रत्नुला आईजवळ केलें ! तिनें त्याच्या अंगावरून हात फिरविला त्याचा मुका घेतला. ' हा गुलामा ! जातें अं मी ! रडूं नको !– संतूदादा, अन् सुगंधाताई संभाळील तुला अं !–जातें बाळांनो–राम ! राम ! राम ! "

झालें ! संपलें ! आईची प्राण ज्योत मालविली ! आम्हीं पोरकीं झालों. दिवसाढवळया आमच्या जागेंत अंधार पडला ! बाप गेला, आई गेली ! वर आकाश, खालीं जमीन ! दादा--मी--रत्नू ! तिघांना एकमेकांना आतां एकमेकाशिवाय, आपलें म्हणायला, भलें बुरें म्हणायला, कोणत्याही केल्या कार्याचें कोडकौतुक करायला, उत्तेजन द्यायला–गोड बोलायला कीं, अधिकारानें रागवायलादेखील कोणी–कोणी राहिलें नाहीं ! आईच्या प्रेमाचें छत्र दुष्ट कालानें आज आमच्या हातून हिरावून घेतलें ! आम्हीं भावंडें असहाय, अनाथ, होऊन उघडीं पडलों !

आईनें डोळे मिटले ! एकच आकांत झाला !

" आई ! आई! गेलीस आम्हांला टाकून तूं!" एवढेंच म्हणून दादानें एकदांच हंबरडा फोडला ! माझ्या आकांताला पारावार उरला नाहीं ! माझ्या दादाच्या रडण्यानें रत्नू मोठ्यानें रडायला लागला !

कुणी कुणाला समजावयाचें ? कुणी कुणाला रडूं नको म्हणून सांगावयाचें ? पण दादानें स्वतःचें स्वतःलाच आवरलें ! आम्हांला रडूं नका म्हणून सांगण्याच्या भानगडींत पडला नाहीं ? मी रत्नुला कडेवर घेतलें ! मुक्तकंठानें आम्हीं दोघें रडत होतों ! जवळपासचें तरी कोण येणार ? कोणी जवळपास नव्हतें, मुंबई ती ! केव्हांच शेजारपाजारची मंडळी उद्योगाला निघून गेली होती ! दत्तासाहेब तिथें नव्हतेंच ! कोणी आलें नाहीं. कुणी येण्यासारखें नव्हतेंही !

दादानें रत्नूला खालीं ठेवायला सांगितलें. मी आणि दादानें आईला घोंगडीवर ठेविलें.

आतां पुढची व्यवस्था !

शिलकेंत तांबडा पैसा शिल्लक नव्हता! महिन्याची अखेर आली होती. चार दिवसापेक्षां जास्त पुरण्याइतकें धान्य देखील शिल्लक नव्हतें. मग पैसा कुठून येणार ?

दादा कपडे करून बाहेर जायला निघाला, आमचा पाहिला आवेग कमी झाला होता. " मी येतों पुढली व्यवस्था करून ! " एवढें सांगून दादा बाहेर पडला.

कठोर परिस्थिति डोळ्यापुढें दत्त म्हणून उभी राहिली ! मुंबईची वस्ती. पैशाशिवाय बसतां येत नाहीं उठतां येत नाहीं ! पाषाणमय परिस्थितीच्या जाणीवेनें क्षणभर आईच्या चिरवियोगाच्या दुःखाला खालीं पहावयाला लावलें ! दादा बाहेर गेला आहे खरा ! पण पैशाचें काय–कसें करणार ? या विचारानें मस्तक बधीर झालें ! डोळ्यांतले अश्रु डोळ्यांतच थांबले. परिस्थितीच्या या जहरी कडवट घोटानें मला निमिष मात्र मूर्च्छा आली !

रत्नुला कडेवरून खालीं सोडला होता, आणि मी खिडकीच्या बाहेर शून्य मनानें पहात होतें ! दादा बाहेर गेला. माझें रडूं थांबलें होतें. रत्नु पण रडायचा थांबला होता. आतां तर तो खुशाल आईजवळ बसून, हातालगतचीं खेळणीं घेऊन खेळायलाहीं लागला होता ! त्या अर्भकाला काय कल्पना होती ? मी–दादा रडायला लागलों म्हणून तोही रडायला लागला होता इतकेंच ! मरण्याची त्याला काय कल्पना होती ! कांहीं नाहीं ! खेळतांखेळतां, तो आईच्या आंगावरही आपलें आंग टाकीत होता. आईच्या आंगावर आंग टाकून, हंसायला लागे, आईच्या तोंडाकडे पाही; त्याला वाटे आईनेंही हंसावें ! आई आज हंसेना ! तो नेहमीं असे करी ! बाहेरून येई. आईच्या आंगावर जाऊन लोळ ! आणि आई रागावली कीं काय ? हें अजमावण्याकरितां तिच्याकडे पाही. आपण हंस. आपण हंसतांच आई हंसली म्हणजे त्याला बरें वाटे ! मग त्याची खात्री होई कीं आई रागावली नाहीं. कारण एकादेवेळीं तो अंगावर लोळायला लागला म्हणजें तिला तें सोसत नसे. ती म्हणे, नको रे रत्नु मला असा त्रास देऊं ! मला सोसत नाहीं पहा ! "

पण आई आज तसें कांहींच करीना ! हंसेना कीं रागवेना ! म्हणून रत्नु आईजवळून उठला ! माझ्याजवळ आला. मी बाहेरच पहात होतें. माझ्या पदराला धरून ओढून मला आंत पहावयाला त्यानें लावलें. मी आंत पहातांच रत्नु अगदीं नेहमींच्या आवाजांत—हंसत विचारतो:—

"ताई, आज आई अशी ग का गप्प-चीप निजली आहे? बोलेना कां? रागवली आहे होय आपल्यावर! माझ्याकडे पाहून आज हंसेना बघ ती! कां ग? मी तिच्या अंगावर लोळून त्रास देतों म्हणून का? बरें तर आतां नाहीं तिच्या आंगावर लोळत अं! मग रागावेल का? हंसेल ना मग आई?—आईच्या अंगावर पांघरूण ग कां घातलें नाहींस? घाल कीं! तिच्या आंगावर माशा बसताहेत बघ! मी घालूं का?"

रत्नुच्या या बोलण्यापुढें मी काय बोलणार? त्याच्या बोलण्यानें फिरून पोटांतून खळबळायला लागलें! मी कांहींच बोललें नाहीं! आईच्या मुखाकडे पाहिलें! आईनें—शांतपणानें हंसत जगाचा--आमचा कायमचा निरोप घेतला होता! तिच्या मुखावर मंगल हास्य विलसत होतें! पावित्र्यमूर्तिमाता मृत्यु शय्येवर पहूडली होती तरी—आपल्या शुभ हास्यमुखानें त्या जागेंत पावित्र्याचा परिमल सोडीत होती! मी देहभान विसरून एकाग्रतेनें आईच्या मंगलमय महानिद्रेंतही असलेल्या प्रशांत हास्यमुखाकडे पाहाण्यांत तल्लीन झालें होतें!—

"ताई! ताई!" मला हलवून रत्नु म्हणाला, "तूं बोलत कां नाहींस? आईला पांघरूण कां घालीत नाहींस! मला कां घालूं देत नाहींस! आई जागी झाल्यावर मी तिला सांगेन बघ कीं, तुला माशा चावत होत्या तरी, ताई तुला पांघरूण घालीना कीं मलाही घालूं देईना! तिला रागें भर!"

रत्नूच्या या अजाण बोलांनीं कुणाला रडूं आलें नसतें? पण मी त्या वेळीं भानावर कुठें होतें? रत्नु बोलत होता, आणि मी त्याच्याकडे वेड्यासारखी पहात उभी राहिलें होतें! मला या वेळीं कशाचीच जाणिव राहिली नव्हती. मी स्वप्नांत आहे कीं जागी आहें, बाहेर दिवस आहे कीं रात्र आहे? आपण आहोंत कुठें? आपल्याला कुणी जगांत आहे कीं नाहीं? आपण कुणाच्या आहोंत? जग तरी काय आहे? आपण--आपण तरी कोण- कुठें--कशा आहोंत? मला त्या वेळीं वेडाच्या भ्रमाची किंवा भ्रमाच्या वेडाची लहर आली होती यांत शंका नाहीं!

"ताई! ताई!" रत्नुनें पुन्हां गदगदां हलविलें! मी त्याच्याकडे

पाहिलें. मी बोलेना म्हणून रत्नु हिरमुसलेला दिसला. मी त्याला ओढून जवळ घेतला. तेव्हां त्याला बरें वाटलें !

कांहीं वेळ मध्यें गेला ! रत्नुनें, माझ्या हनवटीला एका हातानें धरून आणि मला खालीं आपल्याकडे पहावयाला लावून विचारलें, " ताई, दादा,--तूं-मी मघाशीं रडत ग कां होतों ?"

काय उत्तर देऊं ? रत्नुच्या रडूं आणणाऱ्या प्रश्नाला माझ्या डोळ्यांतील पाण्यानें उत्तर दिलें ! पुन्हां घटकाभर माझें रडूं मला थांबवितां आलें नाहीं. मीं उत्तर न देतां रडायलाच लागलेलें पाहून 'आपणच कांहीं चुकलों' असें वाटून बिचारा रत्नू गप्प बसला !

काल किती मंदपणानें चालला होता ! चोहींकडे उदासीनता आणि भयाणतेचेंच साम्राज्य पसरलें होतें ! माझ्या आईच्या दुःखद मृत्यूनें आजच्या दिवसाला देखील असह्य शीण झाला होता ! त्याचे पाय पांगुळले होते. तो जागचा हलतच नव्हता असें मला वाटलें ! किती किती वेळ झाला, तरी बाहेर गेलेला दादा अजून परत आला नव्हता ! मी दारांतच दादाच्या येण्याकडे लक्ष लावून बसलें होतें ! अश्रु गालावरच वाळले होते ! डोळे तारवटले होते. केस अस्ताव्यस्त झाले होते. देहावरच्या वस्त्राची दुर्दशा तर विचारायलाच नको ! पळ घटके सारखा, आणि घटका युगासारखी चालली होती !

जिन्यांत धडधड झालें, मी दुसरीकडे पहात होतें, तो जिन्याकडे पाहिलें. बबूताई हंसत हंसत वर आली ! वर येतांयेतांच—"क्षमाकर ताई, दोन दिवस यायला झालं नाहीं त्याबद्दल ! आज दारांतच बसली आहेस! दादा आहे का?-आज त्याला बाबांच्या मुलाखतीला याय-" इतकें म्हणत ती जिन्याजवळून धांवतच माझ्याजवळ आली. माझ्याकडे तिचें लक्ष गेलें! शेवटचं शब्द तिचेतोंडांतच राहिले! माझें उतरलेलें तोंड आणि विद्रुपता पाहून बबूताईचें तोंड खर्रकन् उतरलें. आवाज बदलला !—माझा हात हातांत घतला—एक पाय उंबऱ्याच्या आंत एक बाहेर-मला विचारलें,"कायग,आहे? मी रडूं येऊं नये म्हणून पदराचा बोळा तोंडाला घालीत—ताईच्या हाताला घट्ट धरीत म्हटलें—

" बबूताई, आई आपल्याला टाकून गेली बरें, टाकून गेली !" बबूताई मटकन् खालीं बसली ! आम्हीं गळ्यांत गळा घालून किती रडलों —किती वेळ रडलों. याची दाद कुणाला? दादा येईपर्यंत रडतच होतों ! आमच्याबरोबर रत्नुनेंही आक्रोश केला !

" माझी जन्म देणारी आई मेली त्यावेळीं मी अगदींच—पाळण्यांत होतें.त्यावेळीं माझें आईच्या मृत्यूच्या दुःखानें रडायचें राहिलें होतें! तें या आईनें-रडायला लावलें !

बबूताईला आमच्या आईचा किती अल्प काळांत लळा लागला होता! बिचारी तिच्याशीं कधीं एक दुसऱ्या शब्दापेक्षां जास्त बोलली नव्हती; कीं कधीं आपल्या हातानें आईनें बबूताईला खायला जेवावयाला घातलें नव्हतें ! पण माझ्या आईवर आपल्या आईसारखें तिचें प्रेम! दुसऱ्याच्या दुःखाग्नीचा चटका लागणारीं बबूताईसारखीं माणसें किती तरी विरळा !

बबुताई किती हळहळली ! " मला जर कळलें असतें, कुणी नुसतां टेलिफोन दिला असतां तरी हजार कामें बाजूला सारून आई करितां आलें असतें ! शेवटची आईला पाह्यची माझी इच्छा पुरी झाली नाहीं. माझीच पुण्याई तितकी सबळ नव्हती त्याला कोण काय करणार ?" असें म्हणून आपल्याच कमनशीबाला ताईनें दोष दिला.

दादा आला. बबूताईला अशा वेळीं अशा स्थितींत पाहून त्याला डोळे पुसायला लागल्या खेरीज राहिलें नाहीं. पुन्हां आम्हीं मनमुराद डोळ्यांतून पाणी गाळलें. दादाचे डोळे लालबुंद झाले होते. जणूं कांहीं त्याच्या डोळ्यांतून आतां रक्ताचे थेंब पडताहेत ! दादाबरोबर माणसें बरींच आलीं होतीं. एकदोन करतां करतां कितीतरी माणसें झालीं. पण हे सर्व मजूर होते. संपांत सांपडलेले—कामावरून घरीं राहिलेले सगळे मजूर होते !

तयारी झाली ! आईला खालीं नेण्यांत आलें ! मी, बबुताई, वर गॅलरींतच उभ्या राहिलों होतों. आईला नेतांना रत्नु आरडून ओरडून गोंधळ करील—म्हणून खालीं दत्तासाहेबांच्या मंडळींत त्याला नेऊन सोडला होता.

आईची प्रेत यात्रा निघाली ! प्रेत यात्रेला मजुरांचा जमाव हजार

दीड हजारावर असेल ! आईला उचलतांना मी ओक्साबोक्सी रडायला लागलें. बबूताईच्या गळ्याला मिठी घातली. "ताई; गेली ना ग आई ? आई, आई. कुठें निघालीस तू ? पुन्हां नाहींना दृष्टीला पडायचीस ! पुन्हां आम्हांला तू भेटायला यायची नाहींस ना ?–आई, कां ग अशी आम्हांवर इतकी निष्ठुर झालीस ? "

बबूताई स्वतः रडत होती. मला रडूं नको म्हणून समजावीत होती ! झालें, आई गेली. आमच्या जागेंत आम्हांला जाववेना. तिकडे बघवेना. पण गेल्याशिवाय कांहींच सोय नव्हती ! आईच्या प्राणविसर्जनाच्या जागेवर दिवा ठेवायचा होता ! बबूताई त्या दिवशीं संध्याकाळ पर्यंत आमच्याकडे राहिली होती ! स्मशान यात्रेहून दादा परत आला. बबूताईनें आम्हां सगळ्यांना पाणी तापवून घातलें. संध्याकाळीं परत जातांना रत्नुला आणि मला आपल्याकडेच चलायला आग्रह करूं लागली. पण तसं करणें आज शक्य नव्हतें आणि इष्टही नव्हतें ! रत्नू त्या दिवशीं दत्तासाहेबांच्या मंडळींतच राहिला ! परत आल्यावर दादानें बबूताईला दोन दिवस कां आली नव्हतीस–आज कशी आलीस ?' वगैरे विचारतांना, तिनेंही सांगायचें तें सांगितलें. आणखी रात्रीं बाबांनीं तुला भेटायला बोलायलें होतें म्हणून मी सांगायला आलें होतें. संपाचा निकाल लवकरच आणि उभयपक्षीं बहुतकरून समाधानकारक लागेल, असें त्यांच्या बोलण्यावरून दिसलें. पण तुझ्याकडून एकदां मजुरांची बाजू नीट समजावून घ्यायची आहे-लेखी अर्जांत खरेंखोटें, जास्तीकमी असण्याचा संभव असतो, वगैरे ते म्हणत होतें ! पण–पण आज आतां शक्यच नाहीं. मी बाबांना सांगेन कीं आज बोलावणें पाठवूं नका म्हणून !–" त्यावर दादानें सांगितलें, " कां ? पाठवूं दे. मी अवश्य येईन. जें व्हायचें तें होऊन गेलें ! त्याच्याकरितां थांबायचें कशाला आतां ? जे हजारो मजूर माझ्या आईच्या प्रेतयात्रेला आले–त्यांच्या पोटाच्या प्रश्नाच्या वेळीं मी काय म्हणून दिरंगाई करीन ? रात्रीं अवश्य अवश्य येईन !"

'बरें' म्हणून, पण मी व रत्नु तिच्या म्हणण्याप्रमाणें तिच्याकडे गेलों नाहीं म्हणून खिन्न व उदास मनानें ती परत गेली !

रात्रीं रत्नु खालीच जेवला. मी व दादानें–वर ताटें आणलीं–तिथेंच

थोडें थोडें बसून खाल्लें! दादा व मी शक्य तितकें मनाला आवर घालीत होतों!

दादानें सतरंजीवर अंग टाकलें. मीही अर्धवट वळकटी उलगडून कलंडलें! आज आईच्या जागीं आई नसून 'दिवा' तेवत होता! त्याकडे डोळे पहात होते! मन दिनदुनियेंत मोकाट भटकत होतें! दादाच्या मनाची स्थिति त्याचा तोच जाणें!

## प्रकरण १३ वें.

# मॅनेजरची मजा !

संप चालूच होता. गिरणीवाल्यांचा निकाल बाहेर पडावयाचा होता. संपवाले अगदीं टेकीस आले होते ! संपवाल्यांना थोपवितांथोपवितां दादा बेजार होऊन गेला होता ! संपवाल्यांना थोपवावें, त्यांची समजूत काढावी, धीर द्यावा. कोणाची देशावर जाण्यासारखी स्थिती असली तर त्याला रवाना करावें. जे धनिक, उदारधी, मजुरांविषयीं सहानुभूति बाळगणारे असतील, त्यांच्याकडे हेलपाटे एकाच्याऐवजीं दहा घालून मजुरांच्या पोटासाठीं झोळी खांद्यावर घेऊन दादानें हिंडावें, आपल्याचप्रमाणें आणखी कांहीं उत्साही, होतकरू तरुणांना गरीब—अन्नान्नगत मजुरासाठीं घरोघर ' जनीं रामसेवा। वनीं रामसेवा ' असले समर्थांचे श्लोक म्हणावयाला शिकवून, मिळेल तें आणावयाला लावावें. कोणी कांहीं बोललें, उपहास केला, एकाद्या अरेराव्यानें दारीं गेलें असतां रट्टयाला धरून खेंचून कांहीं न घालतां हांकून लावलें, तरी त्याचा विषाद मानूं नये ! खेद वाटूं देऊं नये. ' ईश्वर आपल्याला सद्‌बुद्धि देवो ! ' असा त्यालाच आशिर्वाद देत, पुढलें घर पहावें, अशा रीतीनें दादानें संपवाल्या मजुरासाठीं अहोरात्र श्रम सायास चालविले होते ! एकादेवेळीं संपवाले दादावरच चिडत. त्यांचें समजुतीचें बोलणें ऐकून घेत नसत. ' थोडा दम धरा. जरा कळ काढा ' असें दादा सांगायला गेला तर कित्येक अप्रबुद्ध, कोपिष्ट, भुकेनें भडकलेले मजूर दादाच्याच अंगावर येत ! एक दोघांनीं तर दादाच्याच अंगावर हात उचलले होते. दादाच्या पाठींत दुखापत देखील झाली होती ! तरीपण दादा धीमेपणानें स्वकर्तव्य बजावीत होताच ! आमच्यावर जो प्रसंग, तोच सर्वांवर होता. जो सर्वांवर तोच आमच्यावर होता. आमच्या घरीं आज-उद्यांची पंचाईत होती! तीच अवस्था हजारो मजुरांची होती ! मजूरच मजूरांच्या सहाय्याला धावत होते–मजुरच मजुरांना धीर देत होते ! तरी अजून धनिकांचे—

मोठ्यांचे–गिरणीवाल्यांचे डोळे उघडावयाचेच होते! आमच्या घरीं आमची आई मेली! मजूर वेळेला धाऊन आले! असे मजूरांच्या घरीं दररोज कुठेंना कुठें तरी प्रसंग होतेच! एकाद्याची आई, एकाद्याचें मूल एकाद्याची बायको, तर एकाद्याची भाऊ–बहिण–पोटाला नाहीं म्हणून अन्नान करून प्राण टाकीत. दादा त्याही अनाथ अपंगांची जाऊन व्यवस्था लावी! असें चाललें होतें!

दादा याच मजूरांच्या सेवेंत आपला अष्टौप्रहर असला काळ कंठींत होता. एकसारखा आपल्या मनाला गुंतवीत होता. रात्रीं घरीं आल्यावर दमला–भागलेला जीव जमिनीवर अंग टाकतांच झोंप त्याच्यावर झडप घाली! दादाला यावेळीं आईविषयीं विचार करावयाला किंवा मनमुक्त रडायला सुद्धां फुरसद नव्हती!

आईला आज तीन दिवस होऊन गेले होते! त्या दिवशीं जरी दादा येईन म्हणाला होता, तरी शेटजींच्याकडून त्याला बोलावणें आलें नाहीं. बबूताई या दोन दिवसांत दिवसाचा सारा वेळ माझ्याकडेच काढीत होती. एकादे वेळ ती जेवायला देखील परत जायची नाहीं. मी जेवणार नाहीं, तशीच एकटी असलें म्हणजे आईची आठवण काढून रडत बसेन. म्हणून कांहीं तरी इकडल्या तिकडल्या हजार गोष्टी काढून माझ्या मनाला विरंगुळा होईल असें करी! आपल्या घरूनच कांहीं तरी खायला करून आणी. मला घाली. मी एकटी खाणार नाहीं म्हणून आपण मजबरोबर खाई! रत्नु तर आतांशा बबूताईची पाठ सोडीत नसे! बबूताई त्याच्याबरोबर खेळे! शक्य तितकी आईची आठवण त्याला कशी न होईल, याची ती सावधगिरी बाळगीत असे. कांहीं तरी केलें, कांहीं तरी खेळायला दिलें. गॅलरींत उभे राहून हंसायला येण्यासारखें दिसलें, म्हणजे बबूताईनें रत्नुला दाखवावें. तो हंसला म्हणजे मला हांक मारावी. त्याच्या हंसण्यानें मी हंसावें. अशी तिची इच्छा असे! कधीं सफल होई, कधीं सफल होतही नसे! बबूताईच्या या साऱ्या आटोकाट प्रयत्नावर मधूनच "ताई, आपली आई कुठें ग गेली आहे? गांवाला का? मला कां टाकून गेली? मी तिच्या अंगावर लोळून त्रास देईन म्हणून? आतां

केव्हां येणार आहे ? दिवाळीला येईल ना ? नाहीं तर आपणच जाऊंया तिच्याकडे ! " असें कांहीं तरी विचारून पाणी पाडी !! असो.

दादाला आज शेट इच्छाराममाईंच्या मुलाखतीला जायचें होतें. मुलाखतीची वेळ रात्रीं नवाची निश्चित झाली होती. शेटजींच्याकडून 'संपाचा शेवट' कधीं आणि कसा लागावयाचा आहे, याचा अंदाज लागण्याचा भरंवसा असून अधीर झालेल्या मजुरांना त्यानें तसें सांगितलेंही होतें.

आठ वाजतां मजूरमंडळांतून दादा परत आला. मी खायचें तयार करून ठेवलें होतें, तें कसं बसें खाल्लें. आणि बिऱ्हाडाच्या बाहेर बरोबर साडेआठला दादा निघाला. ट्रॅमनें शेटजींच्या बंगल्यावर जायला वीस पंचवीस तरी मिनिटें लागतच ! त्या बेतानें दादा निघाला ! एक दुमजली ट्रॅम आली ! दादा सरळ वर गेला. खालीं गरदी होती. वर कोणी तितकेंसे नव्हतें ! पाठीमागच्या सीटवर दादा बसला ! त्याच्याच पुढें दोन तीन सीट्स् सोडून दोन माणसें दादाच्या दृष्टीस पडलीं. दादाच्या कानावर ओळखीचा आवाज पडला म्हणून दादानें तंद्रेंतून जागृत होऊन निरखून पाहिलें, तों दादाला आपला मॅनेजर खुशालचंद, आणि त्याचा बॉय असल्याचें आढळून आलें. दादाला अगोदर कोणाशीं ओळख काढून लोचटपणा करण्याची संवय नव्हती. आणि आतां तो मॅनेजरला भेटला असतां तरी त्याला काय त्याचें बरें वाटलें असतें ? तसें बाह्यतःसुद्धां रहस्य राहिलें नव्हतें. भेट झालीच असती तर एकादवेळ खात्रीनें कांहीं तरी तोंडातोंडीच व्हायची ! दादानें बाहेर तोंड काढून दुसरीकडे लक्ष गुंतविण्याचा प्रयत्न केला ! ट्रॅम पुढें निघाली-तसे जेरमहालाकडे बोट दाखवून बॉय म्हणाला, " साहेब, आपला संतूराम येथें राहतो ! तुम्हीं सांगितलें त्या दिवशीं मी मोटारीच्या मागून येऊन येथें किती तरी वेळ होतों ! "

" होतास खरा पण गद्धया, त्याचा उपयोग काय ? तिथें काय झालें ? मंडळी काय बोलली, हें कुठें तूं सांगितलेंस ? " "पुष्कळ बोलणें झालें म्हणून नाहीं का साहेब सांगितलं तुम्हांला !" बॉय उत्तरला !

" हत् मूर्खा ! गद्धा म्हणतो तो उगीच का ? पुष्कळ बोलणें झालें-

पण काय झालें हें सांगितलेंस का ? " मॅनेजरनें पोऱ्याची अक्कल बाहेर काढली. ट्रॅमची लाईन कांहीं घोंटाळयानें ब्लॉक झाली होती. ट्रॅम अजून जागच्याजागींच उभी होती !

" साहेब, त्यांचं इतकें अवघड फक्कड बोलणें मला कळतें, तर असा तुमची खेटरें खात कशाला तुमच्याजवळ राहिलों असतों ! तुमच्या सारखाच एखाद्या गिरणीचा मॅनेजर होऊन नसतों का तुमच्या खुर्चीला खुर्ची लावून बसलों ! " बॉय बोलला. बॉयनें तोंड चुकविलें नसतें, तर त्याचें आतां थोबाडच रंगलें असतें ! मॅनेजरला राग आलासा पाहून बॉय दुसरेंच बोलूं लागला !—

" साहेब, संतरामाची आई तेरवाच्या दिवशीं इथेंच मेली ! "

" चांगलें झालें ! " खुशालचंद कपाळाला आंठ्या घालून म्हणाला!

"मग साहेब,तुम्हीं केव्हां मरणार? " बॉय बोलला,पण यावेळीं त्याचें मुस्कट खरोखरच फुटलें ! दादा दुरून पहात होता. कंडक्टरचें किंवा दुसऱ्या कोणाचें—त्यांच्याकडे फारसें लक्ष नव्हतें.—काय असायचें कारण ?

" साहेब," लाल झालेला गाल चोळीत बॉय म्हणाला, "हें हो काय साहेब, संतूरामाच्या आईचें चांगलें झालें म्हणून तुम्हीं म्हणाला. म्हणून मी तुम्हांला म्हटलें, तुमचें तसें कधीं चांगलें व्हायचें ! तुमचें चांगलें व्हावें असं मला वाटतें ! तुमचें चांगलं चिंतलें तरी तुम्ही आमचें थोबाड फोडतांच-न्याय झाला कीं नाहीं ? "

ठण् ठण् ठण् ठण्, करीत ट्रॅम सुरू झाली !

" संतूरामाच्या आईला न्यायला खूप खूप गर्दी झाली होती साहेब ! हजार दोन हजार मजूर आले असतील पहा!"बॉयची चर्पटपंजरी मुस्कटांत खाऊनही चालूच होती !

" असेल, झाली असेल, तुला काय करावयाचें आहे ? " मॅनेजरनें तुच्छता दर्शविली !

" तसें नव्हे साहेब ! चार दिवसांत पुढें आलेल्या संतुरामाच्या आईला न्यायला जर इतकी गर्दी जमली–तर–" बॉय इतकेंच बोलून मॅनेजरकडे पाहूं लागला.

" तर काय गाढवा ? " खेकसून मॅनेजरनें विचारलें.

" तुम्हीं संतूरामापेक्षां किती तरी मोठे—आणि कित्येक वर्षांचे मोठे आहांत ! तुमच्या आईच्या वेळेला, त्याच्यापेक्षां नाहीं का जास्त लोक जमणार ? जमलेच पाहिजेत ! माझी खात्री अ हे ! "

बॉयच्या या बोलण्यापुढें मॅनेजर काय रडणार?त्याची अक्कलच तितकी त्याला त्यानें काय करावें ? पोऱ्या कांहीं का बोलेना, पण त्याला आपल्या बद्दल खराखरा अभिमान आहे, याबद्दलच मॅनेजरला जास्त वाटलें!"असें गध्यासारखें बोलूं नये. अक्कल अशी पाजळूं नये" एवढेंच म्हणून मॅनेजरनें त्याचें तोंड बंद केलें. बॉय काय बोलला हें जर कळून—मुद्दाम जर बोलला असतां तर मॅनेजरसारख्या क्रूर माणसानें बॉयला चालत्या गाडींतून फेंकून दिलें असतें !

आणखी जरा वेळ गेला. बॉयला बोलण्याची पुन्हां हुक्की आली.

"साहेब," तो म्हणाला, "मला तर काळजीच पडून राहिली आहे!"

" कशाची रे ? " मॅनेजरनें विचारलें. मॅनेजरचा हा बॉय फार-फार आवडता होता. कारण खालच्या जातींतला असला तरी हुषार होता—मॅनेजरचा हरकाम्या होता. मॅनेजरच्या सगळ्या आर्डरी हा बिनबोभाट अमलांत आणित असे, मॅनेजरला लागणारें मद्य—मटन मासे—नेहमीं याच बॉयच्या आंतल्याखिशांतून मॅनेजरनें दाखविलेल्या गुप्त ठिकाणीं येऊन पडत असे. शिवाय कधीं या कानाची दाद त्या कानाला बॉयच्याकडून लागायची नाहीं. मग कां नाहीं मॅनेजर बॉयवर खूष असणार ?कां नाहीं बॉयचा एकादा अधिकउणा शब्द ऐकून घेणार ? कां नाहीं तो मॅनेजरचा आवडता असणार ? " कशाचीरे काळजी एवढी पडली आहे तुला ? असा लब्धप्रतिष्ठतासारखा विचारतो आहेस तो ? " मॅनेजरनें पुन्हां बॉयला प्रश्न केला !

"साहेब, संतुरामाची बहिण तर तुम्हांला मिळत नाहींच म्हणतां ! चांगली होती हो तुम्हांला बायको, अन् तुमच्यापेक्षां मला धनीन चांगली शोभली असती बघा! शिवाय तिच्या हातांखालीं मला सुख लागलें असतें.ती गरींब! मी गरीब ! साहेब, गरीबच गरीबांचें दुःख अन् हाल जाणतात बघा !दुसऱ्याचें काम नव्हे तें !आतां तुम्हीं म्हणता शेटजींची मोटार उडविणारी पोरगी तुमची

बायको अन् माझी धनीन होणार-झाली तर संतुरामाच्या बहिणी इतकी सुख देईल का नाहीं मला, हें कांहीं आतां सांगतां यायचें नाहीं!-पण तिच्या बद्दलही मला अजून शंकाच आहे!"

"कां? शंका कसली लेका?" मॅनेजर बॉयच्या तोंडाकडे क्रुद्ध दृष्टीनें पाहूं लागला!

"शंका म्हणजे अशी, तुमचें शेटजींच्या जवळचें वजन कमी झालें आहे, असें तुम्हींच म्हणतां. तुम्हीं संप होऊं दिला नसता कीं नाहीं, नाहीं तर आतांपर्यंत संप मोडला असता तुम्हीं—तर मग शेटजीवर तुमचें वजन बसलें असतें-कमी झालेलें बसलें असतें! तसें तर कांहीं अजून झालें नाहीं. शिवाय दुसरी गोष्ट, शेटजींची ती उडाणटप्पु पोर--त्या आपल्या संतुरामाच्या—मजुराच्या नादीं लागली आहे!! तुम्हांला माहितच आहे! तेव्हां म्हणतों, जर शेटजींच्या पोरीनें, तुम्हांला ढकलून त्या संतूला माळ घातली, तर मग मी काय करूं? तुम्हाला बायको नाहीं, मला मालकीण नाहीं! असें व्हायचें. म्हणून मी बघा काळजींत आहें; दुसरें कांहीं नाहीं! नाहीं तर साहेब, असें करा ना? त्या दोन्हीं पोरींचा नाद द्या सोडून. तिसरीच बघा एकादी! तुमच्या सारख्याला या मुंबईत बायकांना काय तोटा गेला आहे हो?"

"पोऱ्या, माझ्या संगतीला राहून बराच हुशार झाला आहेस कीं! शाबास! चांगला होशील पुढें! पण मोठा झाल्यावर त्या संतू सारखे शिंगशेंपूट फुटूं देऊं नकोस समजलास! माझे उपकार ध्यानांत राखून माझ्याशीं वागत जा! माझ्या बायकोची तुझ्या धनिनीची तूं काळजी करूं नकोस! बघूं या कीं शेटजींच्या बंगल्यावर आज काय फार्स उडतो आहे तो! रागरंग तर पाहूं! मग तुला उद्यां सांगेन! आजच पण संतूची शेटजींची भेट ठरली आहे ना—आतां नऊ वाजतां! लेका एवढें तरी आज ध्यानांत राखून मला येऊन सांगितलेंस हें बरें केलेंस!"—मॅनेजर उद्गारला. रात्रींच्या शांत वेळीं, व वर कोणी जास्त नसल्यामुळें, दादाला अक्षरन् अक्षर ऐकायला आलें! बोलण्याच्या भरांत मॅनेजर किंवा बॉय यांनी एकदांही मागें वळून पाहिलें नाहीं, व संतुदादानें ही आपला चुकू-

नही चेहरा, त्यांनीं मागें वळुन पाहिलें तरी दिसूं नये म्हणून हातांत वर्तमानपत्र घेऊन वाचीत असल्याचा बहाणा केला होता !

" साहेब ! आजच म्हणजे आजच्याच तारखेला रात्रीं नऊ वाजतां ! मोठे- छोटे शेट बोलत असतां मी ऐकलें, म्हणूनच तडक तुमच्याकडे दादरला आलों—आजच तुमच्याकडे मी आलों ना ? आजच दादरहून आपण दोघे शेटजींच्या बंगल्यावर संग्राम आणि छोट--मोठे शेट काय बोलतात--संवरतात, हें ऐकण्याकरितां निघालों आहोंत ना ? मग झालें तर, मग ती मुलाखत आजच ठरली आहे तर ! " बॉयन सांगितलें.

ट्रॅम शवटच्या स्टेशनवर थांबली ! मंडळी उतरून ट्रॅम खालीं झाली मॅनेजर बॉय पुढच्या पुढें उतरले. संतू दादा, मागच्या मागें उतरला ! मॅनजरचा व बॉयचा संवाद दादाच्या डोक्यांत सर्व उतरला होता ! त्याचे धागेदोरे दादा झटपट आपल्या डोक्यांत जुळवित होता ! मॅनेजरचे आपल्या विरुद्ध कांही तरी जबरदस्त प्लॉट चालले असावेत, यांत तर दादाला शंकाच राहिली नाहीं. पण त्या विचाराला जास्त अवसर द्यायला दादाच्या डोक्यास या वेळीं तितका वेळ नव्हता. व त्याच्या दृष्टीनें तूर्तास तरी महत्त्व वाटलें नाहीं. ट्रॅममधून उतरतांच शेटजींच्या बंगल्य कडे मॅनेजर व बॉय सरळ निघाले. दादा मधल्याच बोळानें झटकन घुमून त्यांच्या पुढें झाला. दादाला त्याच्या अगोदर बंगल्यावर पोचणें भाग होतें. शिवाय मध्येंच ट्रॅम थांबल्यामुळें आतां मध्यंतरी थांबायला वेळही नव्हता. नवाला १।२ मिनिटें कमी असतील. दादा तीरासारखा निघाला. शेटजींच्या बंगल्याच्या आसपास, दोनतीन मजुरांच्या लहान लहान टोळ्या दादाला दिसल्या. दादाजवळ येतांच ती मंडळी पुढें आली. दादाला एकदम आश्चर्य वाटलें ! त्यानें मंडळींना ओळखलें. त्यानें " कां आलांत ? " म्हणून विचारलें. त्यांनी सांगितलें. संपाचा निकाल ऐकायला ! सर्वांच्या अगोदर संपाचा शेवट कळला पाहिजे आणि आमच्याकडून सगळ्या आपल्या गरीब मजूर भावांना आनंदाची बातमी कळली पाहिजे, म्हणून आलों आहोंत ! " यावर 'बरें तर, तुमच्याप्रमाणें आपले मॅनेजर देखील संपाचा निकाल ऐकायला येताहेत !"

वगैरे सांगून त्यांना एक दोन शब्दांत चांगला धीर देऊन दादा बंगल्यांत शिरला.

मॅनेजर, बॉय, इतक्यांत दुरून येतांना मंडळींना दिसले. मॅनेजरनेंही पण मजुरांच्या टोळ्यांना पाहून हातपाय गाळले! कदाचित् आपल्याला ओळखून आपली इथल्या इथें कंबक्ती तर काढणार नाहींत? पोलिस हेल्पही ऐनवेळेला आपल्याला नाहीं! बॉय, मजूरांच्या टोळ्या दिसताहेत रे इथें!" "मग?" दोघांचीं प्रश्नोत्तरें होताहेत, तोंपर्यंत मजूरानीं मॅनेजरला वेढलेंही! आपली झटदिशीं तरी आळख पटूं नये—व परस्थ म्हणून निसटता आलें तर पहावें याकरितां खुशालचंदानें आपली साहेबी टोपी बरीच पुढें ओढली! मॅनेजरच्या भोंवती वेढा पडतांच पोऱ्यानें प्रसंग ओळखला, आणि मजुरांच्या गर्दीतून-याच्या, त्याच्या तंगड्यांतून शिरतशिरत उंदराच्या पिटकुल्याप्रमाणें डोळ्याचें पातें लवण्याच्या आंत कुठें पोबारा केला कोणाच्या लक्षांतही आलें नाहीं!

"साब, वाइच विडीमाचिस द्या की!" एका मजुरानें मॅनेजरपुढें हात पसरला!

"चल हट्!" करीत अवसान धरून खुशालचंद मार्ग काढूं लागला!

"असं का करतायसा! बिडी नसली तर तुमची शिगरट द्या! आह्मास्नी का न्हवशी हाय व्हय!" दुसऱ्या मजुरानें सुचविलें!

"अरे कशाची घेतो ह्यो मर्दा तुह्मास्नी बिडी न् शिगरट! गावठी साह्येब ह्यो! तुमीच द्या त्येला बिडी!—"

"यू ब्लडी फूल! मुव्ह असाईड!" मॅनेजरला वाटलें इंग्रजी बोललें म्हणजे लोक दूर होतील!

"साह्येब, आपली मऱ्हाठी बोली बोला कीं! आह्मास्नी कां कळतय तुमचें ह्य यस् फयस्! तुह्मांवाणी आम्ही त्यो कराया शिकलूं हाय व्हय?" तिसरा मजूर म्हणाला.

"अरे त्या गांवठी साहेबाला वाटलें कीं, यस् फयस् केलें ह्मंजी आपून भिऊन जाऊं—अन् वाट देऊं!—पर साह्येब, आह्मास्नी आतां, या तुमच्या टोपीची, तुमच्या इज्जरीची, अन बुटाची बघा अक्षी भ्या वाटत नाहीं!"

" ह्याखी का भ्यायचं हाय ! " चवथ्या मजुरानें पहिल्याला दुजोरा दिला.

" ह्ये आपून एकच नव्हका ! आपल्यापक्षी चार बुकें शिकल्याती, वाईच यस् फ्यस् करत्याती, हातं असलं हंजी, ह्ये असलं साहेबी स्वांग आणत्याती, ह्येच्यावर जाऊं नगस. आपल्यावाणी आपल्या देशावर जात्याती कनाय, तवा आपल्यावाणीच शेतामंदी नांगूर धरत्याती–कूळ-वकाठी करत्याती–मोटा धरत्याती--माळ्यावर बसून गोफणीनें शेता-वरची पाखरें बी हाकत्याती !-न्हायव साह्येब ?" आणखी एका मजु-रानें माहिती दिली.

मॅनेजरची मात्रा इथें आतां मुळींच चालण्यासारखी नव्हती ! यांच्या तावडींतून सुटावें कसें या घोरांत तो होता ? मनांतल्यामनांत गांगरून गेल्यानें, त्यांच्या तोंडांतून एक शब्दही फुटेना !

" अरे, ह्यो सायेब बिडीमाचिस बी दीना ! बोलना बी ! " ज्या मजुरानें मॅनेजरच्या हाताला धरून जागच्याजागीं डांबून ठेवले होतें, तो सगळ्यांकडे पाहून म्हणाला–

" जाऊं द्या. द्या सोडून, दारूपाणी करून झिंगलाबिंगला असेल— जाऊं द्या त्येला त्याच्या वाटेनें ! " एका मजुरानें दुसऱ्याकडे डोळे मिच-कावून कींव दाखविली !

" अं ? जाऊं द्या ! मोठा बाजीरावच पडलास का नाहीं ? जाऊं द्या म्हनं ! बिडीशिगरट घेतल्या बगार जाऊं द्या कुठें ?–साह्येबा, काड आम्हां समद्याखी एकेक बिडी न्हाईतर शिगरट ! अन् जा गुमान आपल्या वाटेनें ! कोण तुझ्या आंगाला धक्का लावीत नाहीं बघ ! लावला तर माझं नांव सांग ! मला ये विचाराला ! " दुसरा एक मजूर पुढें येऊन सावाचा आव आणून म्हणाला !

" देईल ! देईल! ना द्याला का झालं! असं सरळ्याखालीं मागून घ्या कीं ! बिडी द्याला कां साहेब न्हायह्मनतुया का ? का तुम्हीं तरी त्येला त्येच्या खिशांतले पैसे मागतायसा ! दे, सायबा, दे बिडी अन् हो चालता! ह्ये कांहीं कुनी च्वार नव्हत ! आपले गरीब गिरणबाबू हायती ! घरांत खायला प्यायला न्हाय म्हणून समिंद्राची हावा खायला मजेनें फिरत्याती!

भिऊं नगस बघ !–" आणखी एका मजुरानें त्याला सहानुभूति दाखवून, निर्भय करण्याचा प्रयत्न केला !

मॅनेजरचें डोकें गरगर फिरायला लागलें.

" ह्या गांवठी सायबाजवळ कांहींच नाहीं जणूं. त्यो काय देतोय अन् तुम्हीं काय घेताया ! त्यातनं त्यो चांगलाच झिंगलाय ! सायबा ! वाट-बीट तर चुकला नाहींस ? बरा अजून गटार सोबती झाला नाहींस. तुझ्यावाणी कैक साब गटारांत लोळत्याती–आम्हींच त्याखी गटारांतून काढून त्येंच्या मकाणाला पोंचवितों. रोज तुमच्या गंमती आम्हीं बघतों न्हव का !–पडचील बघ हातच कुठें गटारांत–गवसल का घर ? नाहीं तर कुठें राहतोस सांग–आम्हीं कुणी तुला नेतों तुझ्या घरला ! तिथें गेल्यावर विडी शिरगट–माचिस दिली तरी बी चालेल !–ये ह्या, जा सायेबाला घेऊन त्येच्या माळ्यावर ! सायबा, कुठें राहतोस रे ! तांबट गल्लींत, का उंबरखाडींत ? का मजगांवांत ? का चकल्यामोहल्यांत ? मग मर्दा, लई भकाणलास र ? हाकडे सायबा बाबूरनाथाला भेटायला निघाला हुतास का !-ये ह्या, जा ह्यला घेऊन ! "

मजूर चांगलेच कुलुशीला आले होते. हलकेहलके मॅनेजरला याच्या-वरून त्याच्यावर ढकलायला सुरवात केली. खुशालचंद रडकुंडीला आला. संतापला, पण करतो काय? त्याची अशी हबेलंडी चालली असतांच, एक मजूर म्हणतो, 'अरे, असे का साहेबाचे हाल करतां ? वरडल, गणेशटेब-लाला ( कॉन्स्टेबल. ) बवील–मग व्हईल तुमची गंमत बघा ! "

" वरडतुया व्हय ! एक मानेंत बुक्की घालीन, तर गप्प बस-वीन ! वरडतुया, मग निशापाणी करून झिंगावं कशाला ? " दुसऱ्यानें पहिल्याला उत्तर दिलें. ढकलाढकलीचा क्रम चालूंच होता. खुशालचं-दाची टोपी पडली ! कोट फाटण्याच्या बेताला आला ! अखेर गयावया करून तो मजुरांना म्हणाला—

" अरे बाबांनो, मी तुमच्या पायां पडतों ! माझे असे हाल करूं नका ! मी निशापाणी केली नाहीं. झिंगलों नाहीं. या समोरच्या बंगल्यांत कांहीं कामाकरितां मी निघालों आहें ! मजजवळ विडी काडी आतां कांहीं

नाहीं. नाहीं तर मी तुम्हांला खात्रीनें दिली असती ! हे चार आणे घ्या, आणि कुठेंही विड्या घ्या जा–"

एक मजूर त्याची टोपी पडल्यावर, व त्यानें बोलल्यावर ओळख-ल्याचा आव आणून पुढें आला; व म्हणाला " आँ ? ह्ये तर आमचं मांजरसाब न्हवका ? रामराम, रामराम, मांजरसाब ! आमी तुमच्या गिरणींतलं गरीब मजूर न्हवका ? काय राव ? त्वांड बी दावाना–आपली बोली बी बोलांना ! मग कसं वळखावं व तुम्हाल्ली ! नव्ह, पर मांजरसाब? अशा अवक्ताला हीकड कुठं व ? "

मॅनेजर सुटला ! एकदम त्याच्या जिवांत जीव आला ! त्याला हायसें झालें ! आतां त्याला बळही आलें. आणि बोलायचें अवसान येऊन युक्त्याही आठवूं लागल्या. तो म्हणाला, " ल्येकाहो, काय रे माझे हाल केलेत ! मी तर तुमच्याकरितां धडपडतोय ! हा आपल्या गिरणीच्या शेटाचा बंगला नव्हे का ! संप लवकर मोडा म्हणून मी शेटाकडे सांगा-यला निघालों आहें ! तुम्हीं गरीब लोक उपाशी मरता–आम्हांला काय तुमची काळजी नाहीं म्हणून समजतां काय ?—"

" व्हय ? जा, जा, जा, मग बिगीबिगी जा ! आमच्यासाठीं खटपट करतायसना! जा मग ! मांजरसाब, नवळखून-मुरखपणानें बाईच आमच्या हातनं बिघाडलंय त्येबद्दल गरीबावर माफी करावी !!–" एक मजूर हात जोडून पण हंसत म्हणाला !

खुशालचंद बंगल्यांत शिरला ! मजूर एकमेकांच्या हातावर हात मारीत–मोठ्यांदा ' कशी मांजराची मजा केली ' म्हणून खोखो करून हंसू लागले !

## प्रकरण १४ वें.

# मुलाखत !

नवाचे ठोके खालच्या दिवाणखान्याच्या मोठ्या घड्याळांत पडले. आणि संतूदादानें 'इच्छारामभाई टेरिसिस' मध्यें पाऊल टाकलें. नवाचा शेवटचा ठोका, आणि संतुदादाचें पाऊल शेटजींच्या दिवाणखान्यांत एकदमच पडलीं.

शेट इच्छारामभाई दादाची मार्गप्रतीक्षा करीतच होते. बाकीचीं सारीं कामेंधामें आटोपून टाकलीं होतीं. दोनघटका निर्बंधपणानें दादाशीं बोलायलाचालायला शेटजी अगदीं मोकळे होते ! शेटजी आपल्या शिसवीच्या लाकडाच्या- वारनिसनें तकाकणाऱ्या, जांभळ्या उंची मखमालीच्या आरामखुर्चीवर बसले असून त्यांच्यापाठीमागच्या तशाच एका उंची कोचावर प्रेमचंदभाई हातांत कसलेंसें वर्तमानपत्र घेऊन ऐसपैस बसला होता. त्याच्याजवळच्याच सुन्दर वेताच्या ऐटदार खुर्चीवर बबूताई अगदीं मोकळ्या अंगानें बसली होती. शेटजींच्या समोरच जिन्याचा कठडा असून तिथेंच चांगल्यापैकीं एक प्रशस्त कोच मांडलेला होता !

'इच्छारामभाई टेरिसिस मधला शेटजींचा खास आवडता हा दिवाणखाना असल्यामुळें, याची बांधणी, सजावट अप्रतीम होती यांत काय नवल ? प्रत्येक कापऱ्यांत एक नक्षीदार--मोरांच्या किंवा असल्याच कसल्या तरी तिकोनीं छोटे टेबल, त्याच्यावर मजेदार कलाकुसरींनीं युक्त काचेचे--मातीचे वगैरे फ्लॉवर पॉटस् ! प्रत्येक भिंतीला लागून अगदीं मध्यभागीं अशींच सर्पाकृती पायांची टेबलें, त्यापैकीं दोहोंवर समोरासमोर खणा एवढे बिलोरी आरसे, आणि दोहोंवर खुद्द शेटजींचा एक आणि त्यांच्या प्रियमृत पत्निचा- बबूताईच्या आईचा एक, असे दोन तेल्यारंगांचे फोटो ठेवलेले ! वरील सर्व तक्तपोशी अशीच प्रेक्षणीय तयार केलेली होती ! वर सर्वत्र राजा रविवर्मासारख्या प्रख्यात चित्र-

कारांचीं उत्तमोत्तम भव्य चित्रें टांगलीं होतीं, तशींच पाश्चात्य अनेक विख्यात चित्रकारांच्या हातचीं डोळ्याला आणि मनाला थक्क करून टाकणारीं अनेक चित्रें, त्या दिवाणखान्याची शोभा वाढवीत होतीं !

दिवाणखान्याच्या मध्यभागीं अष्टकोनी, चांदीच्या नक्षीदार पायाचीं, संगमरवरी दगडाचीं मनोहर टेबलें अगदीं प्रमाणशीर पद्धतीनें ठेविलीं असून, त्यावर शेटजींचे कामाचे कागद, वर्तमानपत्रें, पेपररॅक, काचेच्या बहुमोल किंमतीच्या दौती ! चांदीच्या होल्डरचे–आणि गोल्डानिबचे सुबक टांक चांदीच्याच शोभिवंत स्टँडवर व्यवस्थेनें ठेविले होते !

सारांश, दिवाणखाना इच्छारामभाईसारख्या वैभवशाली माणसाच्या हौसेला साजण्यासारखाच होता ! आणि यावेळीं विद्युत्तेजाच्या भरपूर झगझगटानें त्या दिवाणखान्याची रमणीयता, वैभव, आणखीच कांहीं खुलून दिसत होतीं !

दादा वर जाण्याबरोबर इच्छामभाई शेट किंचित् खुर्चीवर मागें रेलले होते,ते सांवरून नीट बसले,आणि जिन्याजवळच्या कोचाकडे बोट करून " या बसा " असे आदरपूर्वक दादाला म्हणाले !दादा शेटजींनीं दाखविलेल्या कोचावर बसला. प्रेमचंदभाई, आणि बबूताई पण आपआपल्या जागीं सावरून बसले.

" बरोबर वेळेला आलांत !" इच्छारामभाई दादाकडे पहात म्हणाले, " आम्ही आपली आतां अपेक्षाच करीत होतों. आपण येण्यापूर्वीं आम्हीं तिघेही तुमच्याचाविषयीं बोलत होतों ! "

शेटजींच्या प्रत्येक शब्दांत दादाला आपल्याविषयीं ओतप्रोत सहानुभूती आढळत होती ! दादा कांहींच बोलला नाहीं. आणि शेटजींच्या बोलण्यावरून दादानें कांहीं उत्तर दिलें पाहिजे असेंही नव्हतें !

शेटजींचा चेहरा भव्य, उमदा, प्रशांत, प्रेमळ असा दिसे. त्यांचे बहुतेक केश शुभ्रच झाले होते. त्या त्यांच्या केसांचा शुभ्रवर्ण देखील शेटजींच्या ठिकाणची भूतमात्राविषयींची स्निग्धताच दाखवीत होता ! भाईची तर काय छोटी शेटजींची प्रतिमाच होती ! शेटजींच्या प्रमाणेंच भाईचा वर्ण तांबूस गौर, गालफुगीर, डोळे मोठे, आणि पाणीदार ! नाक

सरळ, पण शेंडा थोडा जाडच ! भालप्रदेश विस्तीर्ण, कानाचीही ही ठेवण तशीच प्रमाणबद्ध !

दादाच्या अंगावर सगळी खादी होती, तर शेटजी, भाई, आणि बबूताई या तिघांनीं पण खादीनेंच आपल्याला भूषविलें होतें ! असल्या वैभवसंपन्न दिवाणखान्यांत खादीचें स्वागत म्हणजे दृष्टीप्रमाणें मनाची, आणि भावनेची चांगलीच सात्विक इच्छापूर्ति होती म्हणण्याला हरकत नाहीं !

" आपल्या विषयींच्या पुष्कळ चांगल्या चांगल्या गोष्टी आमची बबी मला सांगते ! " शेटजींनीं सुरवात केली, " भाईनेंही मला एकदोन वेळां सांगितलें. परवां संपाच्या दिवशीं गिरणीवर मला प्रथम तुम्हांला या दोघांनीं दाखविलें. त्याच्या अगोदर खुशालचंदाबरोबर इथें एकदां दोनदां आलां होतां तुम्ही, पण मी नव्हतोंच ! तुमची मातुःश्री दोनतीन दिवसाखालीं निर्वतल्याचें कळलें, वाईट झालें ! " शेटजी थांबले, त्यांनीं निःश्वास सोडला ! दादानेंही खालीं पाहून दीर्घनिःश्वास टाकला !

बबूताई किंचित् उदास झाली ! भाई सर्वांकडे सहानुभूतीच्या नजरेनें पहात होता.

" तुमच्या बहिणीला—आमच्या बबीच्या मैत्रिणीला, आणि तुमच्या त्या छोट्या भावंडाला आमच्याकडे पाठविलें असतें, तर चाललें असतें. बबी तर सारखा हट्ट घेऊन बसली होती ! तुमचा छोटा भाऊ -काय त्याचें नांव ! रत्नु ! हो रत्नु छान आहे मुलगा ! हुशार आहे ! चांगला निघेल पुढें ! बेटा कुणाजवळही राहतो ! माझ्याबरोबर एकदां दोनदां मोटारींतून आला होता एकटाच ! रडला नाहीं कीं कांहीं नाहीं ! मुलांना का नाहीं आमच्याकडे पाठविलेंत ?—"

दादा कांहीं बोलला नाहीं. शेटजींकडे पाहून पुन्हां खालीं पाहूं लागला. दादा काय उत्तर देतो हें ऐकण्यासाठीं बबूताई किती उत्कंठीत झाली होती !—"

" संपाचा प्रमुखपणा तुम्हीं आपल्याकडे घेतला म्हणून कीं काय बुजलांत ? अहो, त्यांत काय ? हें चालायचेंच ! संपाचा व्यवहार निराळा ! हें खाजगी निराळें ! तुम्हीं झालां तरी आमचीं मुलेंच आहांत ! मुलांनीं

बापाजवळ भांडायचें नाहीं—खायचा हट्ट घ्यायचा नाहीं, तर कोणाजवळ? माझ्या बबीनें, नेहमीं तुमच्याबद्दल सांगून—सांगून तुमच्या बदलची मला चांगली सहानुभूती वाटावयाला लावली आहे! आपलें चांगलें व्हावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. आपलें चांगलें होईल असा मला भरंवसा आहे! आणि आपलें चांगलें करीन, असें माझें आपल्याला आश्वासन आहे!"

शेटजींच्या या शब्दांनीं बबूताईचे डोळे पाण्यानें डबडबले, इकडे दादानें उपरण्यानें आपले डोळे पुसले!

" आम्हां गरीब मजुरांवर शेटजींची इतकी कृपा आहे, याबद्दल शेटजींचे उतराई कसें व्हावें, हेंच मला कळत नाहीं! आणि शेटजींच्या कृपाछत्राचे आभार कोणत्या शब्दानें मानावे हें समजत नाहीं! दादा उद्गारला. " शेटजींच्या सारखे सज्जन जर कांहीं तरी गिरण्यांचें मालक नसते, तर संपाच्या शेवटाची आशाजनक आशा आम्हां मजुरांना करायचेंही कारण पडलें नसतें!"

" हो, संतूराम," मजुरांचा आणि संपाचा विषय दादाकडून निघतांच, शेटजी म्हणाले, आणि दादानेंही तेवढ्या करितांच—शेटजींनीं मुलाखतीच्या मुद्यावर यावें म्हणून खाजगी विषयाचा समारोप करण्याची अप्रत्यक्ष सूचना दिली होती. " तुम्हांला सांगावयाचें म्हणजे संपाचा—समाधान—कारक निकाल लौकरच लावण्याचें निश्चित झालें आहे—!"

" समाधाकारक कोणाला? आपल्याला कीं, आम्हांला?" दादानें खोंचून प्रश्न केला.

" दोघांनाही।" शेटजींनीं गालांत किंचित हंसून उत्तर दिलें.

" निकाल केव्हां लागणार आहे? दादानें विचारलें!

" लवकरच!" शेटजी उत्तरले!

" लवकरला याला कांहीं मर्यादा आहे का! शेटसाहेब. श्रीमंतांचा डोळा उघडेपर्यंत गरीबांचे प्राण जाताहेत! गरीब मजुरांनीं अन्नपाण्याशिवाय किती दिवस जगायचें? किती दिवस मोठ्याचे 'लवकर' संप-

ण्याची वाट पहावयाची ?" शेटजींनीं सहज म्हटलेल्या 'लवकरच्या' मोघमपणाचा झटका दादाला सहन झाला नाहीं !

" संतुराम, संपाचा विषय निघाल्याबरोबर, आपण फार तापतां असें दिसतें ! मला वाटतें, गिरणीवाल्यांना खाऊं का मिळूं असें ' मजुरांना ' झालें असेल, होत असेल ! संतुराम, इतक्या संतापाच्या भरांत, संपाच्या ठिकाणीं, तुम्हीं आमच्यावर दगड फेंकणार होतां म्हणून ऐकलें होतें. फेंकले नाहींत ही गोष्ट सोडून द्या. पण फेंकले असते तर कांहीं नवल नव्हतें ?" शेटजींनीं सुरवात केली.

" खरेंच नवल नव्हतें ! शेटसाहेब, व्यक्ति संबंध सोडून द्या. पण आपण जर डोळे उघडून लाखों मजुरांच्या दैन्याकडे, दारिद्र्याकडे, अन्नान्नदशेकडे पहाल, किंवा पाहिलें असतें, तर मजुरांनीं आपल्यावर दगड फेंकले नाहींत, या बद्दल परमेश्वराचे आभारच मानले असते ! मजुरांनीं आपल्यावर दगड फेंकले असते, तर तें त्यांना सर्वस्वी क्षम्यच होतें असें आपल्याला कबूल करावें लागलें असतें ! शेटसाहेब, मजुरांच्या स्थितीची आपल्याला कांहींही कल्पना असूं नये, मजुरांचेंच अनेक जन्माचें दुर्दैव दुसरें काय ?"

" संतुराम," शेटजी बोलले, " खरोखरच ' मजुरां'च्या बाबतींत आम्हांला वस्तुस्थितिची माहिती असत नाहीं. आमच्या कानावर कधीं येत नाहीं. आम्हीं कधीं त्या–बाबत विचार करीत नाहीं, आणि करण्याचें कारण पडत नाहीं !"

" हर ! हर ! कोण शोचनीय स्थितिही ! ज्या आपल्या गिरण्यांत हजारो मजुर रात्रंदिवस राबतात, ज्यांच्या हाडाचीं काडें, आणि मांसारक्ताची माती आपल्या गिरणींत खपून होत असते, ज्या मजुरांमुळेंच, आपण वर्षाकाठीं कोटयवधी रुपयांचा फायदा घेतां–ज्यांच्या श्रमावरच, आपल्या टोलेजंग अनेक इमारती उभ्या राहतात, ऐश्वर्य भोगावयाला सांपडतें, ज्याच्या जिवावर, आपल्या मोटारीवर मोटारी उडत असतात, आपल्याच बरोबरीच्या खुशालचेंडू स्नेह्यां सोबत्यांना लाखों रुपये खर्चून गार्डनपार्ट्या झडत असतात ! ज्या मजुरांच्याच प्रत्येक घामाच्या थेंबापासून मिळालेले रुपये घोडयांच्या शर्यतींतून चक्काचूर करायला मिळतात;

ज्यांच्या श्रमाच्या पैशांनींच तुमची प्रति चांदरात झडत असते ! ज्या मजुरांच्या प्राणाला पिळवटून आपल्या हातीं पाण्यासारखा पैसा खेळत असतो, तो नाचरंग, बैठकी, मजलशींत उडत असतो ! ज्यांनीं आपले प्राण डोळ्यांत आणून क्रोडो रुपयांचा फायदा आपल्या हातीं दिला असतो, त्यांतून हजार पांचशांच्या नोटांच्या सिगार्स करून, धूर करून तुम्हांला मोकळें होतां येतें, त्या मजुरांची स्थिति कशी असते-काय असते, याचा दादपत्ता आपल्याला असूं नये, आपण पूसतपास करूं नये, या पेक्षां लांच्छनाची गोष्ट कोणती ?

शेटसाहेब, हीं 'मजूर' म्हणून असणारीं माणसें-चालतीं बोलतीं आपल्या सारखींच माणसें असतात, इतकें तरी आपल्या ध्यानीं मनीं येतें काय ? तीं माणसंच असतात हा ! शेटसाहेब, तीं माणसंच असतात ! त्यांना डोकें असतें ! मेंदू असतो. त्यांना बायका, मुलें, आप्तेष्ठ, सगे-सोयरे, आई बाप असतात ! त्यांना खायला माणसांचेंच अन्न लागतें, माणसांना लागणारें वस्त्रच त्यांना त्यांची लाज राखायला-त्यांचें थंडी वाऱ्यापासूनच रक्षण करायला लागतात ! असे ते मजूर आहेत ! हेच मजूर आपल्या गिरण्यांचा प्राण असतात ! हेच मजूर आपल्याला, बंगले, गाड्या, घोडीं, मोटारी आणि जगांतलें सर्व ऐश्वर्य प्राप्त करून देतात ! आतां त्या मजुरांच्या स्थितिकडे पहा जरा !

जो मजूर बारा तास तुमच्या गिरणींत उन्हांत, पावसांत थंडींत पांख्या टाकीत असतो, त्याला रोज मुरा किती आपण देतां ? तर जेमतेम त्या मजुराला एक वेळ कशी तरी भागवितां येईल इतका ? मग त्याच्या अंगावर आहे कीं नाहीं, त्याला, त्याच्या बायका मुलांना दुखणेंबाणें याची चौकशी तर दूरच ! मजुरांना निजायबसायला जागा घेण्याची-ऐपत मग कशी असणार ? त्यांतच पोटाला चिमटा घेऊन वीसवीस पंचवीसपंचवीस 'मजूर' एक अगदीं अगदीं लहान, पांचफूट लांब-चारफूट रुंदीची खोली जेवणाखाण्यापुरती घेत असतात ! हेच मजूर शेटसाहेब, आपल्या गिरण्यांतून दमून भागून आल्यावर, आपल्याला दुवा देत, सार्वजनिक सडकला उघड तर उघडे पडतात ! पाहिलें आहे का कधीं हें ? आपल्या मोटारी, त्या सार्वजनीक रस्त्यावर झोंप घेणाऱ्या

तुमच्याच मजुरांच्या पायांवरून नेहमीं जात असतात ! तरी आपल्याला दाद असत नाहीं! त्या मजुरांच्या पायाचा आपल्या मोटारीला सार्वजनिक रस्त्यांत अडथळा आला म्हणून भर रस्त्यांत आपणच त्या निरपराधी मजुरांच्या पाठींची चामडी लोळवितां ! "दादा थोडा वेळ थांबला ! शेटजींना दादाच्या थांबण्याचें आश्चर्य वाटलें. ते म्हणाले—

" खरोखरच मजुरांची अशी स्थिती असते ? खरेंच ते अर्धपोटी असतात ? "

" शेटसाहेब, खरें म्हणून काय विचारतां, जो हा संतुराम आपल्याशीं बोलतो आहे, ज्याला आपण आपल्या मुलाप्रमाणें समजला आहांत, तो आपल्या गिरणींत पांच वर्षें काम करीत आहे, मजूर–मजुराचा मोकदम म्हणून काम करीत आहे. पण शेटसाहेब, आपल्या गिरणींत बारा तास राबून मला माझ्या कुटुंबांतील साडेतीन माणसांचें पोट भरतां आलें नाहीं ! महिन्याकाठीं चार दिवस आम्हीं सगळीं एक भुक्त राहिल्याखेरीज सोयच नव्हती–आणि नाहीं ! आज, माझ्या घरीं दोन दिवसांपेक्षा जास्त दिवसांची बेगमी नाहीं, कीं काल आई स्वर्गवासी झाली, तर माझ्या कडोसरीला तिच्या अंत्यविधीला एक पैसा नव्हता ! मी मोकदम असून ही माझी स्थिति ! मग माझ्या हाताखालच्या मजुरांची काय दैना असेल बरें? त्यांना एकदां तरी दिवसांतून धडपणीं खायला मिळत असेल काय ? कीं आपला पगार पुरत असेल ? " दादा हें अगदी त्वेषानें उचंबळून येऊन बोलत होता !

" संतुराम, " दादा थांबल्यावर शेटजींनीं असें एक विचारलें, "राग येऊं देऊं नका, किंवा गैरसमजही करून घेऊं नका; पण मी आपल्याला असें विचारतों–आहे हें वाईट आहे, हें आपण दोघेही कबूल करूनच चाललों आहों, आणि चालूं या–मी दुसरें एक आपल्याला असें विचारतों की, आपल्याला, नुकतेंच मोकदमीवरून वर ऑफिसांत घेतलें असतांना–हायग्रेड दिली असतांना–"

" आग लागो त्या हायग्रेडला ! " दादा मध्येच संतापून म्हणाला, " शेटसाहेब, माफ करा ! मला त्याबद्दल एक अक्षरही विचारूं नका !

त्या प्रश्नाच्या उत्तराला अनेक बाजू आहेत; त्या सगळ्या मला आपल्याला सांगतां येण्यासारख्या नाहींत !"

" जाऊं द्या. द्या. सोडून. ज्या प्रश्नांनीं तुम्हांला त्रास-क्लेश होतील, त्यामी विचारीत नाहीं!-परवां आपल्या मातुःश्रींच्या अत्यंविधीचें म्हणालांत, त्याचें काय केलंत ? या प्रश्नानं आपल्याला राग येत नसेल, सांगायला तुम्हांला कांहीं हरकत नसेल तर मी आपल्याला विचारतों हें !" शेटजी शांतपणें व मधुरवाणीनं बोलले ! " आमच्या बबुमुळें आपला आमचा चांगला परिचय होता, तेव्हां-"

" होय शेटसाहेब ! पण तत्वाकरितां मला तें पसंतच पडलें नाहीं. आणि बबूताईच्यामार्फत तशी माझी सोय खास झाली असती, तरी मला ती नको होती ! त्यापेक्षां ज्या माझ्या मजुरांच्या कायमच्या सुखाच्या कल्याणासाठीं, मी मजुरांचा प्रश्न हातीं उचलून धरला, त्या मजुरांनीं आपल्या एक दिवसाच्या एक वेळच्या चणेकुरमुऱ्याला फाटा देऊन माझ्या आईच्या अत्यंविधीसाठीं चार-दोन आण्याप्रमाणें वर्गणी केली, ती थोड्याशा तरी अधिकारानें, आणि निःसंकोच मनानें घ्यावीशी वाटली ! आणि मी तीच घेतली ! मी मजुरांचा बंधु आहे, मजूर माझे बंधु आहेत. जी त्यांची स्थिती तीच माझी ! जी माझी मीठभाकर तीच त्यांची ! याच तत्वानें शेटसाहेब, यावेळीं मी माझ्या भावंडांना आपल्याकडे बबूताई अत्याग्रह करीत असतांनाही पाठविलें नाहीं ! हे मी बबूताईजवळ बोललों होतों. आणि मघाशीं आपण विचारलें असतांना, याचमुळें त्यावेळीं मला उत्तर देतां आलें नाहीं !" दादानें उत्तर दिलें.

" शाबास संतुराम ! शाबास तुमची ! तुमच्यासारखीं बाणेदार माणसें पाहिजेत. मला आपला बाणा फार पसंत पडला. या आपल्या बाण्याचें कधींनाकधींतरी चीज झाल्याशिवाय राहणार नाहीं, आपल्या अविश्रांत, व ऋषिकष्टाला मधुर फळेंही पण खात्रीने येतील ! आपण मजुरांच्या बाबत बराच सूक्ष्म विचार केला आहे यांत शंका नाहीं !" शेटजी म्हणाले.

" शेटसाहेब मी मजूरच आहें !" दादा उत्तरला.

" होय ! आणि मी आपल्याला आपलें मूल म्हटलें आहे ?" शेटजींनीं म्हटलें.

" शेटसाहेब, आपल्यासारखीं, आणि भाईसारखी माणसें फारच क्वचित् ! भाईही मागल्या एका वेळीं असेंच म्हणाले होते ! आम्हीं आपले मजूर आणि आपण आमचे मजूर ! शेटसाहेब, आपल्याकडून असे उद्गार कधीं ऐकायला मिळाले नसते, तर आपल्या पुढें मी इतका स्पष्ट, निर्भीड, आणि सडेतोड बोललों नसतों, कीं, माझ्या माथें फिरलेल्या मजूरभाईंना दगडधोंड फेकण्याच्या-लूटमार करण्याच्या अत्याचारापासून शिकस्तीनें परावृत्त करण्याच्या भानगडींत पडलों नसतों !"

शेटजी, आणि दादा यांचें बोलणें ऐन रंगांत येत होतें. बकूताईला ऐकायची इच्छा होती. पण शेटजी तिला जाग्रण करूं देत नसत ! त्यांनीं तिला, आणि भाईलाही उठवून झोंपायला जायला सांगितलें होतें. शेटजीच्या सागण्याप्रमाणें दोघेही उठून झोंपावयाला गेलीं ! दोघांचें-शेटजी व दादा याचे-बोलणें चालूच होतें !

" तुमची शिस्त, तुमचा समतोलपणा, तुमचा पोक्त विचार, तुमची लोकावर विश्वास टाकण्याची आणि लोकांच्या मनांत आपल्याविषयीं आदरयुक्त विश्वास उत्पन्न करण्याची हातोटी, माझ्या दृष्टीनें तर निःसंशय वाखाणण्यासारखीं आहेत ! आतां मला हें सांगाल का ? मजुरांनीं तींत निकराच्या मागण्या केल्या आहेत, त्या कां ? कितपत सयुक्तिक आहेत ? आजपर्यंत कधींच हें संपाचें बंड उपस्थित झालें नव्हतें, आणि आतांच कसें झालें ? आजवर आम्हांला 'मजूर' वर्ग दिसलाच नाहीं, याला कांहीं आमच्या आळसाशिवाय व हलगर्जीपणाखेरीज दुसरीं कारणें आहेत काय ? 'मजूर' आतांपर्यंत इतकी हालाकी असून आमच्यापर्यंत कसा आला नाहीं ? 'मजूर' म्हणविणाऱ्याला कुठें तरी थोडी बहुत शेतवाडी असते कीं नाहीं? मजुराच्या मागण्या आम्हीं कबूल केल्या तर अजून आमच्याशीं सहानुभूतीनेंच वागतील कशावरून ? आणि समजा घटकाभर, मजुरांच्या मागण्या फेंटाळून लावल्या तर काय होईल ? या सर्वांचा सांगोपांग विचार तुम्हीं केलाच असला पाहिजे. आणि तुम्हीं ते शक्य तितकें थोडक्यांत, स्पष्ट, आणि मुद्देसूद सांगाल अशी माझी खात्री आहे !" इच्छा-

राम शेट म्हणाले. यावर दादा किंचित् हंसला. आणि म्हणाला मी माझ्या कल्पनेप्रमाणें सांगेन. पण शेटजींना सर्वच पटतील, याची हमी मला घेतां येणार नाहीं !–पहिलें. मजूरांची मागणी अत्यंत सयुक्तिक आणि मर्यादित आहे. त्यांची पगार वाढ, त्यांच्या एक वेळच्याऐवजीं दोन वेळ म्हणजे पोट भरण्यास त्यांचीच ओलीकोरडी भाकर खायला त्यांना मिळावयाची आहे. कामाचे तास कमी करण्याची मागणी तरी मनुष्याला आल्या जगांत चार दिवस जास्त जगावेसें वाटते, कधींना कधीं आपल्या आयुष्यांत सुखाचे क्षण आपल्याला मिळतील ही आशा असतेच असते ! जनावरांपेक्षांही जास्त काम करून–कशी तरी आल्या दिवसाची गुजराण करायची, यापेक्षां जगांत 'मजूरांना' कांहीं आहे, आणि तें मिळावें, असें वाटूंही नये का ? हक्काचा बोनस मिळण्यानें मजुरांना, आणि त्यांच्या बायकामुलांना, कशीतरी जाडीभरडी त्यांची पिढीजाद खादी मिळवितां येण्यासारखी असते–त्यांतच, त्या मजुरांच्या देशावरील शेतवाडीचा सरकारदस्त, वर्षदोन वर्षांकांठीं अवर्षणानें दुष्काळ पाडला तरी भरावयाचा असतो, तो भरावयाला मिळतो ! नाहीं तर, वाडवडिलांनीं मिळविलेली जमीन सरकारदस्तापायीं सरकारच्या नाहीं तर सावकाराच्या घरीं जायची धास्ती असते ! झालें. आणखी काय पाहिजे ? मजुरांच्या रास्त मागण्या कबूल केल्या तर मजूर कस वागतील म्हणून विचारलेंत ? पोट भरल्यावर ढेंकर देणारा आत्माराम जेऊं घालणाराला आशिर्वाद दिल्याशिवाय, शुभचिंतल्याशिवाय राहील काय ? मजुरांना आपल्यापर्यंत आजवर ' आपण व प्रत्यक्ष मजूर ' यांच्यामध्यें जो आपला अधिकारी वर्ग नेमलेला असतो, त्यानें येऊंच दिलें नाहीं. मजुरांच्या कागाळ्या आपल्या कानावर घातल्या नाहींत ! हेंच खरें आहे ! त्या अधिकारी वर्गानें मजुरांना तुडवून, छळून, गांजून, आपली चैनचमन चालविली, आणि धन्याचा फायदा त्याच्या पदरीं बिनबोभाट टाकला, म्हणजे झालें, असेंच समजणारा आपला अधिकारी वर्ग असतो !"

" म्हणजे आमच्या खुशालचंद मॅनेजरप्रमाणेंच ना ? होतं खरें बुवा आमच्या हातून असें एकादे वेळीं ! तुम्हीं संपांत शिरल्याची मॅनेजरनें वर्दी दिली, आणि अवास्तव माहिती देऊन मला जें कांहीं भिववलें, तें

कांहीं पुसूं नका ! मी तर त्यांच्या सांगण्यावरून तुम्हांला भूतराक्षस, हैवानच समजूं लागलों होतों. पण माझ्या बबीनें, आणि भाईनें आपल्याबद्दल चांगली माहिती दिली—आतां तर काय खात्री झाली !-पहा असें होत असतें ! मजुरांचा पाठीराखा—वाली—पुढारी कोणीं तरी पाहिजे आहे !—" शेटजी थोडेंसें बोलले !

" झाले आहेत, पुढारीही झाले आहेत. आणि त्यांच्याच कृपेनें आम्हां मजुरांना ही संपाची शिस्तवार चळवळ उत्पन्न करतां आली, आणि इतक्या रीतीनें चालवितां येत आहे ! आमच्या पुढाऱ्यांनीं इथेंच काय पण केनिया, आणि मॉरिशससारख्या ठिकाणीं हालअपेष्टा सोसणाऱ्या आम्हां मजूरबंधुच्याबद्दलही जोरानें प्रयत्न चालविले आहेत. त्यांनींच आम्हांला जागृत केलें—आणि स्वस्थिती वेशीवर टांगण्यास शिकाविलें. त्याच पुढाऱ्यांनीं आपल्या अंगावर खादी चढवून तिला प्रतिष्ठा आणिली आहे ! केवळ बाह्य पोषाखाच्या विषमतेनें मजुरांना आपल्याजवळ—आपल्या पुढें यावयाची पंचाईत पडत होती ती खादीनें नाहींशी केली ! आतां आपण असें विचारलें कीं, मजुरांच्याकडे दुर्लक्ष केलें, आणि त्यांच्या मागण्या फेटाळल्या तर काय होईल ? कोंडलेल्या मांजराला निरुपाय होऊन जशी कोंडणारावर झडप घालाविशी वाटते, तो प्रकार ' मजूर ' करतील ! शेटसाहेब, क्षुधा आणि दारिद्य प्राणिमात्राला काय करावयाला लावणार नाहींत ? इतउत्तर गिरणीवाल्यांनीं मजुरांच्या बाबतींत जर असाच निष्काळजीपणा, बेफिकीरपणा, आणि डोळे झांक चालविली, तर दारिद्याच्या आणि भुकेच्या भट्टींत पडून तावून निघालेले मजूर तुमच्या डोळ्यावरील कातडें दूर करण्यास क्षणाचाही विलंब लावणार नाहींत ! दारिद्यानें, व क्षुधेनें गांजलेल्या मजुरांपुढें तुम्हीं कसा टिकाव धरणार ? मजूर तुम्हांला भिणार नाहींत, कीं सरकारालाही भिणार नाहींत ! मजुरांच्या कल्याणांत गिरणीवाल्यांचेंही कल्याण आहे, आणि त्यांच्या अकल्यणांतच गिरणीवाल्यांचें अकल्याण आहे, हें मजुरांचे लक्षांत यावें आणि गिरणीवाल्यांच्या लक्षांत येऊं नये, किंवा त्यांनीं

येऊं देऊं नये, हे मजुरांचें दुर्दैव तर खरेंच ! पण गिरणीवाल्यांनाही तें हितावह-सुखावह नाहीं ! हें मात्र कोणालाही सांगतां येईल !!"

"अगदीं बरोबर, अगदीं बरोबर ! संतूराम तुमच्या बोलण्यानें मला फार समाधान वाटलें. आपली 'मुलाखत' माझ्या अपेक्षेहूनही जास्त सुखदायक आणि परिणामकारक झाली ! आतां मी तुम्हांला सांगतोंः— "गिरणीवाल्यांनीं आपल्या अर्जाचा विचार तूर्तास तरी फारच चांगला केला आहे. बोनस, आणि पगार वाढ, या मागण्या त्यांनीं मान्य केल्या आहेत ! आजपासून तीन दिवसांनीं—बहुतेक येत्या सोमवारींच त्या जाहिर होतील. मजुरांनीं यावेळीं हें मान्य करून कामाला यायला पाहिजे ! आणि कांहीं कालानंतर अशाच शिस्तीनें आपल्या मागण्या पुढें केल्या पाहिजेत ! म्हणजे सर्वांचेंच हित ज्यांत आहे, अशा गोष्टी होत राहातील ! अशी तुम्हांला मी आतां आनंदाची बातमी सांगतों !"

हातीं घेतलेल्या कामांत यश आलें, हें ऐकून दादाच्या नेत्रांत समाधानाचे सात्विक अश्रू चमकले !

## प्रकरण १५ वें

# इच्छारामभाईचा खून !

इच्छारमभाई व दादा यांचें चांगलें दोन अडीच तास बोलणें चाललें होतें. दादाच्या बोलण्यानें शेटजींचें फारफार समाधान झालें होतें. ते दादाकडे दादा बोलत असतां अत्यंत कौतुकानें पहात होते ! आपलें प्रत्येक बोलणें शेटजी लक्षपूर्वक, कळकळीनें ऐकून घेत आहेत, हें पाहून शेटजींच्या संबंधांत अगोदरच असलेला आदर शतगुणीत होत होता ! शेटजींनीं दादाचें सगळें बोलणें--सगळा विचार ऐकून घेतल्यावर आनंदाची बातमी म्हणून गोड वर्तमान सांगितलें तेव्हां दादाला विलक्षण आनंद झाला ! असे शेटजी सारखे लोक आहेत, म्हणूनच मजुरांची दाद लागली.--मजुरांच्या विषयीं मत जरी आपल्याकडून काढून घेतलें, तरी त्याचा सांगोपांग विचार शेटजींनीं यापूर्वी केलेला आहे, त्यांना सर्व माहिती आहे, आणि शेटजी मजुरांचे कैवारी आहेत, " म्हणूनच हें झालें. म्हणूनच शेटजी आपल्यासारख्या अगदीं सामान्य पण माणसांशीं इतक्या सलगीनें, मोकळेपणानें शांतपणानें बोलले ! नाहींतर दुसरा एकादा असता, तर बंगल्यांत येऊं दिलें नसतें, मग बोलायची गोष्ट दूरच ! " या विचारांनीं दादाचें मन भरून गेलें होतें.

मुलाखतीचें मुख्य काम संपलें. दादा शेटजींचे आभार मानून जायला निघाला. बरीच आतां रात्र झाली होती. पण बोलण्याच्या नादांत--आणि दादासारख्या सामान्य पण चाणाक्ष, हुशार, सहृदय, तत्वनिष्ठ, बाणेदार तरुणाचें बोलणें ऐकण्याच्या नादांत शेटजी तल्लीन झाले होते. दादाचें बोलणें शेटजी ऐकत होते, तें एका सामान्य मजुराचें म्हणून नव्हे, तर आपल्या गिरणीच्या एका घटकाशीं आपलें बोलणें चाललें आहे या नात्यानें !

दादा जायला उठला ! पण शेटजींनीं पुन्हां बसवून घेतलें. फिरून खाजगी गप्पा काढल्या. रत्नुची, आणि माझी वाखाणणी, आपलें मुलां-

मुलीवरील प्रेम त्यांचें आपल्यावरील प्रेम यांची तपशीलवार माहिती दादाला अगदीं स्नेहभावानें देऊं लागले. आपल्या मुलीजवळ गरीब श्रीमंत लहान मोठा, हा भेद मुळींच नाहीं. आणि तिला तो कळतही नाहीं. मुलगी फार प्रेमळ, गुणी, पापभीरू, आणि सत्कार्यदक्ष आहे. आपला मुलगाही विलायतेला जाऊन आला आहे, पुष्कळ ज्ञान संपादन करून आला आहे, पुढें लवकरच त्याला इथल्या मिल--ओनर्स--असोसिएशनचा अध्यक्ष निवडण्यांत येणार आहे. तो आपल्या कारकीर्दींत तर 'मजुरां'ना चांगले दिवस आणील, अशी माझी खात्री आहे! मजुरांच्या सद्यःस्थितीबद्दल साद्यंत माहिती आणि खरोखरच गिरणीवाल्यांनीं मजुरांच्या बाबतींत काय केलें पाहिजे, हें आमच्या भाईनेंच मला नीट समजावून सांगितलें, वगैरे वगैरे म्हातारा अगदीं घरोब्याच्या नात्यानें सांगत होता. दादाला तें ऐकून घेणें भाग पडलें होतें. आपल्या मुलामुलींच्या अनेक लहान मोठ्या गोष्टी सांगण्यांत, दादाचें कल्याण चिंतावें खुशालचंदासारखीं माणसें आपल्या पदरीं असतात, आपल्याला त्यांच्या स्वभावाची कल्पना होत नाहीं, म्हणून पुष्कळ वाईट गोष्टी होतात, निष्कारण गैरसमज वाढत असतो! पुढें मागें तुमच्या आंगचे गुणच तुम्हांला श्रेष्ठपदाला चढवतील, तुमच्यासारखे जबाबदारीचें काम करावयाला खुशालचंदासारख्याच्याऐवजीं मिळतील, तर असले मजुरांच्या त्रासाचे, आणि गिरणीवाल्यांच्या निष्कारण नुकसानीचे प्रसंग फारच कमी यावयाचे!—याप्रमाणें म्हातारा सारखा बोलत राहिला होता!

बंगल्यांतल्या मोठ्या घड्याळयांत एकाचा ठोका पडला! "अरे! एक वाजला! बोलण्याच्या नादांत खूप वेळ झाला! बरे आहे, संतुराम, उठूं या आतां! येत चला वरचेवर!" शेटजींनीं उद्गार काढले! शेटजी उठले. दादाही पण उठला!!

आईचें सुतक नसतें, तर दादानें शेटजींच्या पायांवर निघतांना आपलें डोकें ठेविलें असतें. पण त्याचा नाईलाज होता. त्याबद्दल दादाला फार वाईट वाटलें! शेटजींचा निरोप घेऊन दादा निघाला. जिन्याच्या एक दोन पायऱ्या उतरला. शेटजी खुर्चीवरून आपल्या निजायच्या जागेकडे निघाले; शेटजींची जिन्याकडे पाठ वळली—दादा जिन्यांतून चालला

होता, त्याचें लक्ष पुढें होतें, त्याची पण शेटजींकडे पाठ झाली होती !

हीच वेळ. हीच शेटजींची, आणि दादाची पोझिशन ! तोंच एकदम फाड्–फाड्—असा आवाज झाला !

"बापरे ! मेलों ! मेलों ! मेलों !" म्हणून शेटजींच्या तोंडून उद्गार निघत शेटजी धडपडत चार दोन पावलें पुढें चालत जाऊन प्रेमचंदभाई बसला होता, त्या कोचापर्यंत कसें तरी जाऊन त्यावर पालथे पडले ! ! पडले ते " अगाई ! मेलों–हें काय झालें ? धांवा ! धांवा ! भाई, बबे ! राम ! राम ! "

डोळयाचें पातें लवण्याच्या आंत शेटजींचें प्राणोत्क्रमण झालें ! फाड् फाड् फाड् असा आवाज आणि 'मेलों–मेलों' हें शेटजींचे शब्द खालीं जाणाऱ्या दादाच्या कानांत घुसले ! तो चक्र होऊन वळून पहातों तों काय ? तों पर्यंत शेटजी कोचावर जाऊन पडले ! एकच निमिष ! दादा जागच्याजागीं उभा होता ! " हें काय ? हें काय ? कोण आहे ? शेटजी शेटजी, काय झालें —करीत दादा परत फिरून शेटजींच्याकडे धांवला ! बाराचा आवाज आणि शेटजींचें मेलों–धांवा ! चोर ! खून ! " असा भेसूर आवाज ऐकून, बंगल्यांतील नोकरचाकर–भाई, बबुताई जागी होऊन " काय ? काय ?–कोण ? " म्हणत दिवाणखान्यांत सर्व गोळा झाले ! !

पहातात तों काय ? इच्छाराम शेटजींचा खून झालेला ! ! !

भाई, दादा, नौकरचाकर सगळेच हतबुद्ध झाले ! सगळयांच्याच डोळयावरची झोंप पळाली ! एकदम वस्तुस्थितीचें भेसूर चित्र त्यांच्या डोळयापुढें उभें राहिलें ! बबूताई " बाबा, बाबा, " करीत शेटजींच्या अंगावर पडली ! प्रेमचंदभाईनें एकदम ओरडून नोकरचाकरांना " खिडक्या, दारें, लावायला सांगितलीं ! " चोर, खुनी, पकडा ! जाऊं देऊं नका ! " म्हणून सांगितलें! दादाची विचारशक्ति नष्ट झाली होती! बबुताई, शेटजींच्या शवावर धाडकन् पडली, तेव्हां दादा दगडीपुतळया-प्रमाणें जागच्याजागीं तटस्थ उभा होता ! नोकरचाकर खिडक्या दारें लावायला धावले ! खिडक्या लावल्या. मुख्य दारें तर अगोदरच लावलीं!

सडकेच्या बाहेर कुणी चाकरांनीं डोकावून पाहिलें ! रस्त्याला कोणीही फारसें दिसलें नाहीं !

बंगल्यांत एकच हाः हाः कार उडाला ! शेटजींच्या पाठींत तीन–चार पिस्तुलाच्या गोळ्या घुसल्या होत्या. खादीचा सदरा फाटून पाठींतून भळभळा रक्त चाललें होतें ! !

प्रेमचंदभाईनें झटपट भानावर येतांच टेलिफोन जवळ जाऊन पोलिस स्टेशनवर टेलिफोन दिला !"Help ! Murder ! help ! at once ! Bungalow, No ! x x x "

" संतूराम, आपण अजून इथेंच होतां ? किती ? एक वाजलाका ? काय कसें झालें ? कुणी–कुठून बाबांच्यावर गोळ्या झाडल्या ? पाहिलेंत का तुम्हीं ? ओळखलें का कोण होते ते तुम्हीं ? " भाईनें दादाला विचारलें ! दादा बापडा काय बोलणार ? त्यांच्या इतकाच तोही या अघटित, अमानुष,अकल्पित प्रकाराबद्दल अनभिज्ञ होता ! त्याला कांहीं बोलतांच येईना ! तो भानावरही किती तरी वेळ नव्हता ! तो झोपेंत कीं जागृतींत होता, मुंबईस कीं बाहेर ठिकाणीं होता, याबद्दलही त्याची विचारशक्ति नष्ट झाली होती !

खुनी बदमाषाला शोधण्यासाठीं नौकरचाकरांनीं बंगल्यांतील प्रत्येक कोपरान् कोपरा धांडोळला ! कोणी कुठेंही आढळलें नाहीं ! ! बंगल्यांत, आंतबाहेर, प्रत्येक ठिकाणीं भरपूर विद्युद्दीप होतें, त्यामुळें कोणालाही दडून लपून–छपून बसावयाला सांधि सवड नव्हतीच !

भाईनें खिडकींतून बाहेर पाहिलें तों आपल्या बंगल्यांत कसला तरी आवाज झालेला पाहून कांहीं गरीब दरिद्री लोक, सडकेवर फिरत होते, ते कावरेबावरे होऊन चटकन् पावलें उचलून शक्य तितकें दूर जाण्याच्या धांदलींत दिसले ! !

बबूताईला रडता भुई थोडी झाली ! भाईलाही रडूं कोसळलें ! !

कोण हा चमत्कारिक प्रसंग ! बबूताई, भाईसारख्या सालस, प्रेमळ, उदार, सुखी, देवमाणसावर–निरपराध माणसावर केवढा घोर–प्रसंग ! केवढा दुःखाचा आकस्मिक डोंगर कोसळला होता हा !

भाई, आणि त्यांचे नौकर सर्व बंगल्यांत कोणी आल्या गेल्याचा— दडून बसल्याचा छडा काढीत होते ! दादा ज्या कोचावर बसला होता, त्याच्या डाव्या हाताला,-जिन्यापासून दोन फूट अंतरावर एक नुकतेंच उडवून पडलेलें पिस्तूल भाईच्या नजरेस पडलें ! त्यानें तें उचलून न्याहाळून पाहिलें. येथें तर हें पिस्तूल पडलेलें आहे ! संतूराम, हे पाहिलेंत का पिस्तूल, इथें जिन्याच्या दारांत पडलेलें आहे !–आपण आतां कोचावर बसला होता ना ?–

" होय ! " दादा या वेळीं पूर्ण भानावर आला होता ! ही सर्व परिस्थिती त्याच्या डोक्यानें आकलन केली होती. भाईच्या प्रश्नाला त्यानें उत्तर दिलें !––

शेटजींच्या शवाला नीट उचलून त्यांच्या आवडत्या आराम खुर्चीवर ठेवण्यांत आलें ! बबूताईचा अविरत अश्रूवर्षाव चालला होता ! नौकर-चाकरही स्फुंदूनस्फुंदून रडत होते ! कित्येक भयचकीत होऊन मरून चूर झाले होते ! दादाच्या मस्तकांत अनंत विचारांचें तुफान माजून राहिलें होतें !

" भाई ! देखतां डोळ्या हा काय भुताटकीचा प्रकार झाला, याची कल्पनाच होईना मला ! दिवाणखान्यांत आम्हां दोघांशिवाय कोणीही नसतां, कोठून कोणीं पिस्तूल झाडलें, येथें हें पिस्तूल; अगदीं मी बसलों होतों तिथें हें पिस्तूल कसें आलें ? हे अत्यंत गूढ चमत्कार—"

दादा हें बोलत आहे, तोंच पॉं पॉं करीत पोलिस इन्स्पेक्टरची मोटार येऊन धडकली ! सी. आय. डी. इन्स्पेक्टर, त्यांच्या हाताखालील दोन बडे अधिकारी, पोलिस इन्स्पेक्टर व त्याबरोबर चार सशस्त्र पोलीस, बंगल्यांत शिरले ! बंगल्याचें फाटक उघडलें ! मंडळी वर आली !

भाई मंडळीच्या पुढें झाला ! इन्स्पेक्टरद्वयांनीं भाईजवळ हलके हलके बारीक मोठ्या, जरूरी बिनजरूरीच्या आवडत्या नावडत्या बाबींबद्दल चौकशी सुरू केली ! पोलीसांना, बंगल्यांत चोंहीकडून फिरून वहिम येण्यासारखीं कारणें, खुणा, कांहीं मिळताहेत का पहावयाला सांगितलें ! शेटजींच्या शवाला जाऊन पाहिलें. पालथेंउलथें केलें ! भाईला, त्यांच्या सगळ्याच प्रश्नांची उत्तरें कशीं देतां येणार ? पिस्तुलाचा आवाज, व

शेटजींच्या ओरडण्याचा आवाज ऐकल्यावर जागे होऊन आपण आलों, आणि येथें पाहिलें, तों त्या वेळीं अशी-अशी स्थिती! आपल्याला काय काय दिसलें, एवढेंच भाईनें सांगितलें. व नुकतेंच सांपडलेलें पिस्तूल दाखविलें. पिस्तूल हातांत घेऊन, इकडून तिकडून निरखून पाहून 'निशाणी' दाखल ठेऊन घेतलें. नंतर बंगल्यांतील सर्व गडीमाणसांना समोर बोलावून त्यांचीं नांवेंगांवें, राहण्याचीं ठिकाणें, बंगल्यांत राह्यची मुदत, वगैरे बद्दल चौकशी केली.

भाईला "आपला कोणावर वहीम आहे काय ? शेटजींच्या वांकड्यावर कोणी होतें काय ? दिवसांत कोणीं शेटजींच्याकडे परिचित, अपरिचित विशेष कमी कामासाठीं आल्यागेल्याचें, वगैरेही विचारलें.

नौकराचाकरांची तारंबळ विचारावयाला नको ! त्यांना जरा दरडावून विचारतांच कुणाची बोबडी वळली, कुणी रडायला लागलें. तर कोणी मूर्च्छा येऊन खालीं पडलें !

आतां दादावर पाळी आली. 'हे कोण ?' म्हणून भाईला इन्स्पेक्टरसाहेबांनीं विचारलें. दादाबद्दलची स्पष्ट, व शक्य तितकी थोडक्यांत माहिती देऊन म्हटलें, "हे व बाबा रात्रीं नऊ वाजल्यापासून बोलत होते, आणि शेवटपर्यंत हे इथें होतेच !–आवाज झाल्यावर आम्हीं धाऊन आलों, त्यावेळीं बाबांना हेच सांवरीत होते. पण पिस्तूल कोणी झाडलें, कुठून झाडलें, याचा थांग लागला नाहीं, आणि यांना कोणी दिसलेंही नाहीं !"

आतां सरकारची संक्रांत दादाकडे वळली ! बाहेरची सरकारी मंडळी आल्यावर व खुनाच्याबद्दल चौकशीला सुरवात झाल्यावर "बयूताईला मोकळया कंठानें रडतांही येत नव्हतें ! भयचकित हरिणीप्रमाणें ती जागच्याजागींच मूढ होऊन बसली होती !

"तुमचें नांव काय ?" इन्स्पेक्टरसाहेबांनीं प्रश्न केला !

"संतूराम !"

"तुम्हीं इथें केव्हां आणि कां आला होता ?"

"मी रात्रीं नवाला–शेटसाहेबांनीं मुलाखतीला बोलावलें होतें म्हणून आलों होतों !" दादा उत्तरला.

" कशाबद्दल मुलाखत होती ? " इन्स्पेक्टर विचारीत होते.

" गिरणीच्या संपाच्या बाबतींत बोलायचें होतें ! शेटजींना कांहीं माहिती हवी होती. आणि शेटजी मला कांहीं सांगणार होते !"

" गिरणीच्या संपाशीं तुमचा काय संबंध ? "

" संपांत मी मजुरांच्या बाजूनें काम करीत असतों ! "

" तुम्हीं कोणत्या गिरणींत असतां ? "

" शेटजींच्याच ' उच्छारामभाई-मिलमध्यें ! "

" मुलाखतीच्या वेळीं आपल्या दोघांशिवाय कोणी नव्हते ? "

" सुरवातीला तास सव्वातास, शेटजींचे हे चिरंजीव आणि त्यांची ती मुलगी–दोघेंही होतीं ! "

" मग ? "

" मग शेवटपर्यंत आम्हीं दोघेच होतों ! "

" मुलाखत बरीच कडाक्याची झाली असेल ? "

" कोणत्या अर्थानें आपण विचारतां ? " दादा जरा या वेळीं चपापला!

" नाहीं म्हणजे–शेटजी गिरणीवाले–तुम्हीं मजूरपक्षाचे ! मुलाखत ' संपा'बद्दल ! म्हणून विचारलें ! मुलाखतीचा सामना–"

" सलोख्याचाच होता ! "

" मुलाखत किती वेळ चालली होती ? "

" एक वाजेपर्यंत ! "

" आणि मुलाखत चालली असतांच शेटजींवर पिस्तूल झाडलें गेलें का ? "

" नाहीं ! "

" मग कसें काय झालें ? तुम्हांला सांगतां येईल ? "

" आम्हीं एक वाजण्याचा ठोका ऐकून ' मुलाखत' संपविली आणि शेटजी झोंपावयाला जाण्याकरितां उठले ! मी उठून जिना उतरूं लागलों. तीनचार पायऱ्या गेलों असेन–नसेन इतक्यांत, पिस्तुलाचे तीन चार बार झाले ! आणि शेटजी ' अरे बापरे मेलों 'धांवा' म्हणून ओरडले ! मी मागें वळून पाहातों, तों शेटजी धडपडत जाऊन त्या कोचावर जाऊन पडले!! त्यांच्या ओरडण्याबरोबर मी निमिषमात्रच जागच्याजागीं थब-

कलों–आणि शेटजींच्या जवळ धांवत आलों. तोंच ही सगळी मंडळी जागी होऊन गोळा झालीच ! ”

“ बरें हें पिस्तूल—इथें प्रथम कोणी पाहिलें ? ”

“ मी !” भाईनें उत्तर दिलें !

“ कुठें पडलें होतें !–” भाईनें जागा दाखाविली !

“तुम्हीं तुमची मुलाखत चालली असतां कुठें बसला होतां?” दादाला विचारण्यांत आलें.

“ या ठिकाणीं ! ”

“ मुलाखतीचा शेवट कोणाच्या रागांत आणि कोणाच्या लोभांत झाला होता ? ”

“ दोघांच्या लोभांतच झाला होता ! ” दादा उत्तरला !

सी-आय-डी-चे इन्स्पेक्टर हें बोलणें चाललें असतां, जिन्याच्या तोंडाजवळ एक खिडकी होती, तिच्या जवळ जाऊन–आंत बाहेर, सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करीत होते. खिडकीपासून जमीन किती खालीं आहे, बाहेरच्या बाजूला उभें राहतां येण्यासारखी जागा आहे का ? बाहेरूनच खिडकीपर्यंत चढून येण्यास वाव आहे कीं नाहीं; याबद्दल ते मनाशीं पडताळा पहात होते ! तें पाहून त्यांनीं आपल्या मनाशीं कयास बांधलाही असेल !—

“ शेटजींचा तुमचा कांहीं खाजगी हेवादावा करण्यासारखासंबंध आहे काय ?

“ नाहीं ! ” भाईनेंच या प्रश्नाचें उत्तर दिलें. “ उलट यांचा आमचा चांगला घरोबा आहे ! ”

“ मग मुलाखतीला तुम्हांलाच का बोलावलें ? दुसऱ्याला कां कुणाला बोलाविलें नाहीं ? ”

“ मी त्यांच्या गिरणींतला प्रमूख म्हणून–आणि मजुरांच्या संपाचा निकाल माझ्याजवळ त्यांना सांगावयाचा होता म्हणून ! ”

“ संपाचा निकाल तुम्हांला अनुकूल आहे कीं प्रतिकूल ? ”

“ अनुकूल ! ”

"संतूराम! कांहीं असो, अशा बिनतोड परिस्थितींत–यावेळीं आम्हांला प्रत्यक्ष जरी खुनी नाहीं, तरी खुनाच्या बाबतींत संशयी म्हणून तुम्हांलाच पकडावें लागत आहे!" इन्स्पेक्टरसाहेबांनीं पिस्तूल आणि दादाला आपल्या हाताखालच्या अंमलदाराच्या ताब्यांत दिलें!

"काय खुनाच्या बाबतींत मी संशयीत?" दादानें विचारलें! त्याच्या डोळ्यापुढें अंधेरी आली! तो खालीं बसला!

"काय? संतूदादा खुनी? बबूताई ताड्दिशी बसल्या जागेवरून उठली! पण एवढेंच म्हणून फिरून ती जागच्या जागींच बसली!

"दादाला पोलिस अधिकाऱ्यांनीं गिरफ्दार केलें!

"आणखी हें काय झालें?" भाईबबूताईच्या तोंडांतून एकच उद्गार निघाला!

"भाईसाहेब, हें पिस्तूल, हे गृहस्थ, ही वेळ, इथें कोणीं आलें गेलें नाहीं, असें हेंच सांगतात–यावरून आम्हांला याच गृहस्थाला 'संशयी' म्हणून धरण्याशिवाय गत्यंतर काय? यांच्याशिवाय दुसऱ्या कोणावर आपला वहिम असला, त्याचें नांव सांगा, पुरावा गोळा करा! यांची चौकशी होईलच! आतां घेऊन जातों! आमचे सी. आय डी. इन्स्पेक्टर बरोबर आहेत, त्यांनी आपल्या बंगल्याची पहाणीही केली आहे. त्यांच्याही अभिप्रायाचा चौकशीच्या कामीं उपयोग होईलच!

दादावर एकापेक्षां एक किती विलक्षण आणि अनपेक्षीत प्रसंग हे? दादा इन्स्पेक्टर साहेबांच्या बरोबर चालूं लागला. बबूताई वेड्यासारखी पोलिसांच्या गराड्यांत सांपडलेल्या दादाकडे पहात राहिली होती! शेट प्रेमचंदभाई, खालीं मान घालून उभा राहिला होता!

इन्स्पेक्टर मंडळीसह निघून गेले.

# प्रकरण १६ वें

## ‘ दैवो दुर्बल घातकः ! ’

“ ताई–ताई दादा कुठें आहे ग ? इतक्या लवकर बाहेर गेला ? ’ सकाळीं सहा वाजले होते. मी आणि रत्नु अजून अंथरुणांतच होतो. रत्नु जागा होऊन दूर होता तो मला येऊन चिकटला ! रोज आम्हां दोघांला दादाच जागा करीत असे. आज ‘ जागें व्हावयाला दादानें हांक मारिली नाहीं. म्हणून रत्नुला नवल वाटलें. त्याला वाटलें आपल्याला हांक मारल्याशिवाय दादा गेला कसा ? ”

रात्रीं दादा घरींच आला नाहीं. मी किती तरी वेळ वाट पाहिली. दोन तीन वाजेपर्यंत मला झोंपही आली नाहीं. ‘ इतकें कसलें रात्रभर बोलणें चाललें असेल कोण जाणें ! ” असें मनांत येई. तर पुन्हां वाटे, फार रात झाली, तर शेटजी, भाई, बबूताई त्याला कसा येऊं देतील ? पण पुन्हां वाटे कांहीं झालें तरी दादा राह्यचा नाहीं. मग कां राहिला ? मनाची कशी तरी समजून करून घेतली. देवाचें नांव घेतलें. मी झोंपेच्या डोळे मिटून प्रयत्न करूं लागलें. झोंप आली. पण मनाच्या अत्यंत अस्वस्थतेमुळें अनेक वेडींवाकडीं भीतिदायक स्वप्नें पडत होतीं. मध्येंच एक अतीशय अमंगल–हिडीस–भीतिप्रदस्वप्नामुळें मी खडबडून जागी झालें!

स्वप्नानें जागी झाल्यावर मग पुन्हां झोंप लागली नाहीं. मन इकडच्या तिकडच्या विचारांत सारखे झोके घेत होतें. ‘ असें कां बरें वाईट स्वप्न पडावें ?” असें वरचेवर वाटावयाला लागून मनाला हुरहूर वाटूं लागली. देवाचें नांव घ्यायला लागलें, देवाचे नांव तोंडाला येईना. थोडा वेळ घेतल्यासारखें करावें पुन्हां नको वाटावें ! समोर आईच्या जागेचा दिवा दिसावा–वाटे, आईला चारपांच दिवस झाले आई एकदांही स्वप्नांतसुद्धां आली नाहीं, ‘ आतां आमचें कसें व्हायचें ? आम्हांला बरे दिवस कधीं तरी येतील काय ? असाही भुरकन विचार मनांत मधूनच येऊन जाई ! अलिकडे कित्येक दिवस अभ्यास नाहीं, पुस्तक वाचन नाहीं–

शाळेंत जाणें नाहीं, कांहीं नाहीं. अशी स्थिती होती. कधीं तरी अधून-मधून पोथी आई करितां वाचीत असें, तेवढेंच वाचन !

पहांट झाली ! पश्चिमेकडच्या खिडकींतून गारवाऱ्याची झुळूक यायला लागली. रस्त्याची गडबड, धडधड, सुरू झाली ! रत्नुही जागा झाला. आणि त्यानें विचारलें, "ताई. दादा कुठें आहे ? त्यानें मला उठविलें कां नाहीं ? इतक्या लवकर बाहेर कां गेला ?"

"रत्नु, रात्रीं दादा बाहेरून आलाच नाहीं !–मग तुला उठायला कशी हांक मारणार ?" मी रत्नुला सांगितलें.

"आला नाहीं दादा ?–कुठें गेला आहे रात्रीं ?" रत्नुनें विचारलें.

"आपल्या बबूताईकडे !" मी सांगितलें.

'नव्या ताईकडे ?–मग मला नाहीं नेलें ? तूं नेतेस पण दादानें नाही नेलें ?" रत्नुला दादाचा राग आला. मी कांहींच बोललें नाहीं !

"ताई, आपण नव्या ताईकडे जाऊं या. नव्या ताईला सांगूं कीं दादा आम्हांला चुकवून आला, पण आम्हीं कसे आलों ? आणखी किनई पुन्हां आपण जाऊं तेव्हां दादाला न्यायचेंच नाहीं बरें का नव्या ताईकडे !" रत्नुच्या या बोलण्यानें मला हंसूं आल्याशिवाय राहिलें नाहीं.

मी उठलें ! तोंड धुणीं, वेणीफणी झाली ! चहाची वेळ होऊन गेली. आठ वाजले तरी दादाचा ठिकाणा नाहीं. मला काळजी वाटायला लागली. रत्नु ताईकडे चल म्हणून हट्ट धरून बसला ! आणखी थोडा वेळ वाट पाहिली. त्याचें तोंड धुणें झालें. त्याचें खायचें करून घातलें. तो खाईना. अगोदर ताईकडे चल म्हणून हटून राहिला ! रडायला लागला. आतां काय करणार ? त्याच्या म्हणण्यासाठीं त्याला कपडे करून बबूताईकडे निघणें भाग पडलें. खालीं आलें फ्लोराफाउंटनकडून येणारी ट्रॅम मिळाली ! बबूताईच्या बंगल्यावर निघालों.

ट्रॅमच्या स्टेशनपासून बबूताईचा बंगला तरी बराच दूर पडला. रत्नुला, थोडा चालत, थोडा कडेवर, असें करीत करीत कशीतरी आम्हीं मजल गांठली ! या चालण्याला आणि कडेवर बसण्याला रत्नु कंटाळला ! त्याला वाटलें नव्या ताईकडे जायला मोटार असते, मग आजच कां नाहीं ?

बबूताईच्या बंगल्यांत शिरलों! बाहेर कुणीच दिसलें नाहीं. अजून आंत बाहेर कुठेंही झाडून काढलें नव्हतें! बंगल्यांत शिरतांच नेहमीं सारखी प्रसन्नता वाटली नाहीं. सकाळची वेळ असून बंगल्यांत प्रसन्नता कां दिसेना? कोणी गडी माणूस सुद्धां कां आढळेना?—जसजसें इकडे तिकडे डोकावून पाहूं लागलें, तसतसें बंगल्यांत उदासवाणेंच दिसावयाला लागून मनाला कसेंसेंच वाटावयाला लागलें!—

नंतर मी तशीच पहिल्या दिवशीं या बंगल्यांत आलें असतां, ज्या जागेंत बबूताईनें आम्हांला बसविलें होतें, त्या जागेकडे गेलें. तिथें कांहीं मंडळी असावीसें वाटलें. आंत जाण्यापूर्वीं मी डोकावून पाहिलें. तों बबूताई कोचावर अस्ताव्यस्त स्थितींत पडली असून, पलिकडच्या खुर्चीवर भाई, पाय वर घेऊन हात छातीवर स्वस्तीकाकार घेऊन, मान खालीं घालून बसला असून, दोघांचींही तोंडें अगदीं सुकून गेलीं आहेत! माझ्या काळजांत धस्स झालें! आमच्या पावलांचा आवाज झाला! म्हणून दोघांही भावडांनीं वर आमच्याकडे पाहिलें—आम्हीं दोघांनीं आंत पाऊल टाकलें! आम्हांला भाईनें पाहिलें पुन्हां मान खालीं घातली! बबूताईनें आमच्याकडे पाहिलें—तशीच पहात—राहिली—पण नेहमीं सारखी आम्हांला पाहतांच उठून धांवत यायची, आम्हांला धरावयाची, रत्नुला उचलून कोचावर नेऊन ठेवावयाची तसें कांहीं झालें नाहीं! आम्हांला पाहिलें, आणि बबूताईच्या डोळ्यांतून घळघळ घळघळ पाण्याची धार लागली! ती आम्हांला नुसती ये देखील म्हणेना! भाई कीं बबूताई कोणीच बोलेना! भाईनीं तर तोंडच लपविलें. मी तरी काय बोलूं? बबूताई कां रडते? मी अशा वेळीं-अवेळीं आजवर, आणि आपण होऊन बंगल्यांत कधींच आलें नसतां, आज आलें, तर याचें देखील बबूताईला कांहीं वाटलें नाहीं!

"ताई—" अखेर धीर करून मीच खोल आवाजांत हांक मारली—बबूताई उठून बसली.

"ताई, अशी कां तुम्हीं बसलांत? तूं कां रडतेस? मला नाहीं का सांगण्यासारखें?" मी विचारण्याचें धाडस केलेंच!

" ताई–ताई–" बबूताईला हुंदका आवरेना! " ताई, काय सांगूं तुला ? "

" काय झालें ताई ? " बबूताईच्या डोळ्यांतील पाणी, आणि तिची ती केंविलवाणी स्थिती पाहून माझ्या डोळ्यांतूनही पाणी यावला लागलें! आईच्या वियोगानें अधू झालेलें आधींचें मन–एवढ्या तेवढ्या प्रसंगानेंही असल्या करुण प्रसंगांत विरघळून जात असे ! " काय झालें ताई ? सांग ना मला ? "

" ताई, माझ्या बाबांचा रात्रीं खून झाला !! " ताईनें एवढेंच कसें बसें बोलून दोन्हीं हातानीं आपलें तोंड झांकून घेतलें !

" अगबाई ! खून ?" मी जागच्या जागींच मटकन बसलें ! ! ध्यानीं मनीं, स्वप्नीं, नसतां हें झालें ! बबूताई रडते आहे, मी रडतें आहें, हें पाहून रत्नू दीनपणानें आमच्याकडे पाहूं लागला. बंगल्यांत येण्याच्या आधींच त्याची टवटवी पार नाहींशी झाली होती ! ताईला जाऊन जवळ घेतलें. तिचें मस्तक माझ्या खांद्यावर घेऊन दोघीही रडुं लागलों. भाई-च्यानें कांहीं बोलवेना ! त्याचेंही मूक रुदन चाललें होतेंच !

" ताई, हें कसें ग सहन करूं ?–" शोकातिरेकानें हुंदके देत बबू-ताई म्हणाली.

" काय करायचें बबूताई !"

" नाहीं ग ताई, देव आमच्यावर किती कोपायचा ग ? बबूताईला वेडें होण्याची वेळ आली.

" बबूताई हें काय ? तुझ्यावरचा प्रसंग—" बबूताईनें माझ्या तोंडा-वर मध्येंच हात ठेवला.

" ताई माझ्यावरील प्रसंगापेक्षांही तुझा कठीण हें मी जाणतें ! पण ताई काय करूं ?–किती मी दुर्भागी ! ताई तुझ्या माझ्या प्रेमाचा शेवट–बाबा गेले, आणखी–आणखी बबूताई काय बोलत होती, काय सांगणार होती ? मला कांहीं कल्पना येईना !

भाई खुर्चीवरून उठून जड पावलांनीं एरझारा घालूं लागला होता ! बबूताई काय बोलेल, सांगेल तें निमूट ऐकून घेण्याशिवाय सोय नव्हती !

हें झालें. पण दादा कुठेंच दिसेना, कुठें आहे, रात्रीं आला होता काय ? हें विचारावयाचेंही भान झालें नाहीं, कीं धीर झाला नाहीं !

आम्हीं असें बोलतों आहोंत, तोंच खुशालचंद मॅनेजर तेथें आले. त्यांचा चेहराही विचित्र–झाला होता. आम्हां सगळ्यांकडे त्यानें एकदां पाहिलें. भाईची एक फेरी संपून आतां, त्याच्याकडे तोंड झालें !

" आलांत ?––" भाईनें त्याच्याकडे पाहून म्हटलें.

" झालें कसें हें भाईसाहेब ? मला टेलिफोन पोंचतांच मी तडक निघालों !–शेटजींचा खून किती वाजतां झाला !–कोण दुष्ट–नीच–पाजी लोक असतात हे ? " बोलूं लागला. भाई कांहीं बोलला नाहीं !

" शेवटीं शेटजींचा खून हलकट संत्यानेंच केला ना ? भाईसाहेब, राग येऊं देऊं नका ! पण त्या पाजी माणसाला तुम्हीं आणि माईसाहेबांनीं जवळ केल्याचा परिणाम ! संत्या नुसता सर्प आहे ! दूध पाजणारावर उलटणारा--"

" काय ? संतुदादानें खून केला शेटजींचा ?" मॅनेजरचे कडकडीत शब्द माझ्या कानांत घुसतांच, मी ओरडलें ! या वेळीं माझी स्थिति कशी झाली असेल याची कल्पनाच केली पाहिजे !

बबूताईनें आपली अधिकच मिठी घट्ट केली !

" बबूताई, काय ऐकतें मी हें ? माझा दादा खुनी ? शेटजींचा दादानें खून केला ? दादा कुठें आहे ?·-मी बबूताईला एकसारखी विचारीत सुटलें.

" भाईसाहेब, मी जर खुनाच्या प्रसंगीं हजर असतों, तर खात्रीनें सांगतों, कीं तिथल्या तिथें त्या संत्याचा खून पाडला असता ! मग मागें पुढें काय झालें असतें पाहिलें असतें !--बाकी पापाचें प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज सुटत नाहीं म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं ! पोलिसांनीं संत्याला लागलींच "खुनी" म्हणून पकडून नेला ना ? बरा सांपडला, नाहीं तर बदमाष, ताबडतोब निसटायचा !--पण त्याला सुचलेंच नसेल ! खून झाल्यावर, तो भुलला असेल म्हणून सांपडला ! त्याच्या कर्माचें त्याला योग्य प्रायश्चित्त मिळेल, हें खरें, पण शेटजींचा लाखाचा प्राण हकनाक गेला कीं नाहीं ? हलकटाला हातीं धरलें म्हणजे असा प्रसंग यावयाचा

नाहीं असें होतच नाहीं ! भाईसाहेब, तरी मी संशय येतांच डायरेक्ट-इन्डायरेक्ट याबद्दल तुम्हांला वेळोवेळीं हिंट देत होतों ! तुम्हीं दुर्लक्ष केलें ! शेटजी तर काय? ईश्वरावतार ! जगांत त्यांना सगळींच माणसें आपल्यासारखींच दिसत असत ! ! हं ! या माजोरी मजुरांनीं अखेर शेटजींचा बळी घेतलाच !! तरी बरें, भाईसाहेब, शेटजी पहिल्या· पासून 'मजुरांचेच' कैवारी म्हणून होते ! मला हेंच आश्चर्य वाटलें कीं, संत्याला--दरिद्री, माजोरी, उर्मट मजुराला–शेटजींनीं मुलाखतीला कसें येऊं दिलें ?-सरकार संत्याला योग्य शिक्षा ठोठावील; पण शेटजींचा प्राण त्यामुळें येणार आहे थोडाच !--"

" खुशालचंद ! माफ करा ! तुम्हीं एक अक्षर देखील बोलूं नका !" मॅनेजरची टकळी, बबूताईनें बंद केली ! त्याच्या एकेक वाक्यानें इंगळ्याच्या विषारी वेदना होत होत्या ! मी तर त्या सर्व एकाहून एक अप· राधांच्या आरोपांच्या पर्वताखालीं चिरडून जाऊन बेशुद्धच झालें होतें !

" भाईसाहेब, कोण हा आपल्यावर अशा अल्पवयांत कठीण प्रसंग! मला मोठें वाईट वाटतें I really feel for it! करावयाचें काय ! जगरूढीकडे लक्ष दिलें पाहिजे ! तुमच्यावर आलेली जबाबदारी तुम्हांला शिरावर घेतलीच पाहिजे ! शेटजींचा लौकिक कायम ठेऊन वाढविण्याची कामगिरी तुमच्याकडे आहे ! " मॅनेजरचा मुरदाडपणा चाललाच होता! " मला कल्पनाच नाहीं ! आपला टेलीफोन आला त्या वेळीं मला तें खरेंच वाटेना ! कसें खरें वाटणार ? दुपारींच शेटजींना मी भेटून गेलों होतों ! भाईसाहेब, जसा तुमच्यावर तसा आमच्यावरही प्रसंग आहेच. आम्हीं आपल्या दुःखाचे भागीदार आहोंत. आतां, शेटजींच्या पाठीमागें आपल्याला कामाचा–व्यवहाराचा–लोकांचा पूर्ण अनुभव येईपर्यंत मला जास्त दक्षतेनें रहावें लागणार आहे. मी राहीन. माझें कर्तव्यच आहे तें ! शेटजींचें माझ्यावर तितकें ऋणच आहे ! "

" खुशालचंद, या गोष्टी आपण बोलूंयाच नको ! या गोष्टीचा विचार करायला लागेल तितका पुढें वेळ आहे. माझें या वेळीं डोकें नाहीं ठिकाणावर, तेव्हां—"

" yes ! right ! तुमचें म्हणणें बरोबर आहे ! डोकें ठिकाणावर असणार कुठून ? वडलांसारख्या वडिलांचा–बोलत चालत बदमाष मजुऱ्यांनीं जर खून केला–जाऊं द्या ! भाईसाहेब, आतां मन आवरलेंच पाहिजे. झाली गोष्ट परत येत नाहीं ! " मॅनेजरचें कांही केल्या तोंड थांबत नव्हतें ! कुठें खून झाला, किती वाजले होते–पोलिस केव्हां आले, संतुला पकडलें, हें योग्य झालें ! आतां मजुरांना दहशत बसेल–कदाचित् संप आणखी लांबेल– एक ना दोन–मोठ्या कळकळीचा आव आणून हजार बडबडी चालल्या होत्या !

शेटजींच्या खुनाची बातमी अल्पावकाशांत मुंबईभर झाली होती ! वाईट बातमी तेव्हांच पसरते. तिला मुळींच वेळ लागत नाहीं. मुंबईच्या दैनिकांतून " शेट इच्छारामभाईचा शोचनीय खून " " माथेफिरू मजुरांचा निंद्य अत्याचार ! " "गिरणीवाल्यांनो, आतां तरी सावध व्हा ! " इत्यादि मथळयाखालीं संध्याकाळपर्यंत शेटजींच्या खुनाबद्दल मजकूरही आला होता ! गिरणीवाल्यांचा पक्ष घेणाऱ्यांनीं मजुरांच्या या अत्याचाराबद्दल मजुरांच्या सगळ्या मागण्या फेंटाळून लावा–उपाशी मरूं द्या, वठणीवर असेच येऊं द्या ! असें लिहिलें होतें. तर मजुरांचे कैवारी म्हणविणाऱ्या पत्रांतून " शेटजींच्या खुनाची हकिकत ऐकून वाईट तर वाटलेंच पण असे खून होईपर्यंत, आणि मजुरांना खुनाला प्रवृत्त करीपर्यंत मजुरांचा अंत पाहिला, हेंच चुकलें. आतां तरी गिरणीवाल्यांनीं आपली चूक शुद्धीवर येऊन सुधारावयाला नको काय ! हाच हट्ट, आणि हीच बेफिकीरी इतउत्तर गिरणीवाले मजुरांच्या संबंधांत दाखवितील, तर आणखी मजुरांच्या संतापाला किती गिरणीवाल्यांना असेंच बळी पडावें लागेल, हें सांगतां येत नाहीं ! इकडे श्रीमान् गिरणीवाल्या बंधूंनीं आतां अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे ! व्यक्तिशः इच्छारामभाईबद्दल आम्हांला अत्यंत पूज्यभाव होता ! आणि त्यांच्यासारख्या दिलदार. उदार, निःपक्षपाती व्यक्तींचांच माथेफिरू मजुरानें खून केल्याबद्दल मनःपूर्वक आम्हांला वाईट वाटत असून, सदर खुनी मजुराबद्दल तिरस्कारच वाटत आहे ! "

एका नुसत्याच बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या पत्रानें विश्वसनीय म्हणून खुनाची इत्थंभूत बातमी खालीलप्रमाणें प्रसिद्ध केली होती !

" इच्छाराममाईचा खून करणारा माथेफिरू मजूर, त्यांच्याच गिरणींतला असून तोच संपांत मुख्य होता. संपाच्या वेळीं शेटजीवर दगड फेकण्याचा त्याचा विचार होता. पण तो साधला नाहीं. शेटजी त्याला फार भीत होते. त्याला टाळीत होते. परंतु वेळच आली—त्यांत संपांत हाल होऊन सदर मजुराची आई अन्नावांचून मेली ! याला कारण इच्छारामभाईच असें त्याच्या मनानें घेतलें ! आणि ज्यांच्या निर्दयपणामुळें आपली आई मेली—त्या शेटजींचा ' खून ' करावयाचें त्यानें ठरविलें ! आपले कांहीं मजूरसाथीदार बरोबर घेऊन बंगल्यावर गेला. या त्याच्या साथीदारांना पुष्कळांनीं बंगल्याच्या बाहेर घिरट्या घालतांना पाहिलें होतें ! शेटजी जेवणखाण करून आपल्या मुलामुलींशीं गोष्टी बोलत असतां, हा मजूर तिथें गेला. शेटजींना वेड्यावांकड्या शिव्या देऊं लागला. ' माझी आई संपांत उपास काढून ' मेली—तुम्हीं कां जगावें ? म्हणून शेटजींनाच विचारूं लागला ! शेटजींना तो जागचा हलूं देईना—त्यांच्या समजुतीच्या गोष्टी ऐकेना !—तुमचा बंगला पेटवून देतों—तुमच्या मुला माणसांना—आणि तुम्हांलाही त्यांत भाजून टाकतों—माझे पन्नास जवान् बाहेर उभे आहेत ! बडबड कराल तर खबरदार ! तशीच त्यांच्या मुलांनाहीं दशहत घातली ! कोण काय करणार तिथें? शेवटीं खिशांतून पिस्तूल काढून शेटजी आंत पळून जायच्या प्रयत्नांत असतां त्यांच्यावर रोखून झाडलें ! आणि काम होतांच पिस्तूल खालीं टाकून देऊन शेटजींच्या मुलापुढें जाऊन तो उभा राहिला ! मला पकडा ! मी पळून जात नाहीं! मला सरकारच्या स्वाधीन करा ! ' माझ्या आईच्या मृत्यूनें माझें मस्तक फिरून शेटजींचा खून केला ! मला आतां जगांत जगावयाचेंही कारण नाहीं ! ' असें म्हणूं लागला, पिस्तुलाचे बार होतांच, त्यांचे साथीदार जीवाच्या भयानें त्याला सोडून पळून गेले. पुढें काय झालें, हें बाकीच्या पत्रांतून सविस्तर आलेंच आहे ! पोलिसांनीं मजुराला पकडलें असून—त्याची रीतसर चौकशी एक दोन दिवसांत सुरूं होईल. शेटजीसारखा धीरोदात्त आणि गरीबांच्या सुखदुःखाकडे सहानुभूतीनें लक्ष पुरविणारा

गृहस्थ मजुरांच्या अत्याचाराला बळी पडला, याबद्दल अत्यंत वाईट वाटतें! शेटजीसारखा नागरिक नाहींसा झाल्याबद्दल मुंबईला हळहळ वाटल्यावांचून राहणार नाहीं! शेटजींच्या खुनाचा परिणाम चालू 'मजुरांच्या संपावर' कसा काय होतो पहावें! ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो!

हर! हर! काय गहजब हा!! गरीबांचावाली जगांत परमेश्वर देखील कसा असत नाहीं? संकटपरंपरा तरी किती गरीब–पापभीरूंनीं सोसावयाची? शेटजीसारख्या सज्जनाचा नाहक खून! निरपराधी, निरुपद्रवी, निःसहाय, असा दादा 'खुनी' म्हणून संशयीत-म्हणून पकडला गेला!! हेंच का जग? हाच का जगाचा न्याय?

बबूताई माझ्याकडे मी बबूताईकडे पहात बसलों होतों! मला वाटतें, मला वेडही लागलें होतें. भाबड्या बबूताईची माझ्याचसारखी स्थिति झाली होती. इच्छारामभाईच्या शवाची सरकारी रित्या पाहणी वगैरे काय व्हावयाची ती झाली. त्यांच्या अंत्यविधीला दुसरे दिवशीं संध्याकाळच्या सुमारास परवानगी मिळाली. व मग शेटजींच्या शवाला अंत्यसंस्कारा करितां उचलण्यांत आलें! आम्हांला मात्र परिस्थितीनें दाही दिशा शून्य झाल्या होत्या!!

## प्रकरण १७ वें

# तुरुंगांत भेट.

मी दोन दिवस ताईकडेच राहिलें होतें ! आम्ही एका दृष्टीनें सम दुःखी होतों ! रडून रडून आम्ही आतां दमलों होतों. डोळ्यांतलें पाणीच संपलें होतें ! काळीज करपून गेलें होतें. आमच्यावर संकटांची परमावधी झाली होती. आमची मैत्री ताईला घातक झाली, असें आमच्या मनांत येऊन आम्हीं आपल्या हतदैवाला दोष लावीत होतों. तरी " ताईची मैत्री आम्हांला या स्थितीला कारण झाली ! या कल्पनेनें ताईच्या जिवाला विचारांचे विंचू डसत होते ! आमच्या दारुण करुणाजनक स्थितीपुढें, ताईला आपलें दुःख फिकें वाटत होतें !

उजाडला दिवस मावळत होता–' दादाला ' फांशीची शिक्षा होणार, हेंच आपलें आमच्या मनाने घेतलेलें ! आतां मी–आणि रत्नु–! जगांत दोघेंच उरलों होतों ! कुठें जायचें ? कुठें उभें राह्यचें ? कुणाच्या तोंडा-कडे पाह्यचें ! कोण आम्हांला जवळ येऊं देणार ? खुनी भावाची भांवडें म्हणून जो–तो तिरस्कार करणार, दूर पळणार ! भिक्षा सुद्धां कुणी घालायला पुढें यावयाचें नाहीं ! कसे दिवस काढायचे ? जगायचें कसें ! मरायचें तरी कसें ?

होतें कसें ? झालें कसें ? कल्पना करीत होतों काय ? कोणत्या आशेनें हालांत, कष्टांत, सुखासमाधानानें रहात होतों, डोळ्यांतल्या पाण्याबरोबर शिळ्या भाकरीचा घांस गोड करून खात होतों–चिंतीत होतों काय ? आणि हें पुढें दैवानें वाढून ठेवलें काय ?

कोणत्या जन्माचीं पापें उभीं राहिलीं ? कीं त्यामुळें जन्मांत प्रत्येक गोष्ट सत्याला स्मरून, देवाला भिऊन, सज्जांनाना संतोष होईल, अशी करीत असतांना, त्याचा परिणाम असा व्हावा ?

हेच आणि असलेंच विचार एकसारखे मनांत येत होते ! बबूताई मला सांगत होती, मी बबूताईला सांगत होतें !

दुःखांत सुख इतकेंच होतें म्हणावयाचें कीं, 'शेटजीं'च्या खुनाबद्दल वर्तमानपत्रांत काय येत असेल तें येवो, सरकारी चौकशी कांहीं झाली असो, प्रत्यक्ष वस्तुस्थिति कितीही संशयास्पद असो, पण दादाबद्दल बबूताई आणि भाई, यांना शंका नव्हती. त्यांना तरी वाटत नव्हतें ! ते दादाबद्दल अजून सहानुभूतीच दर्शवीत होते, इतकेंच नव्हे, तर भाईनें बबूताईच्या सम्मतीनें व सल्ल्यानें दादाच्या बचावाची उलट जारीनें खटपट चालविली होती. दादाला जामिनावर सोडण्याची खटपट करून पाहिली होती ! दाहासाठीं बॅरिस्टर बी. सदाशिव देखिल नेमला होता !

दादा कच्च्या तुरुंगांत कोणत्या मानसिक स्थितींत कोणजाणें दिवस कंठीत होता.

भाईची व बबूताईची कोण अवघड मनाची परिस्थिति ! प्रत्यक्ष वडिलांचा खून झालेला ! सगळ्या बाह्य पुराव्यावरून दादावर 'खुना'चा आरोप शाबीत होण्यासारखा ! दादाला पकडलेला ! सगळ्या जगाची समजूत हीच ! गिरणीवाल्याचें जग आणि दुःखांत समाधान 'खुनी' सांपडला यांतच मानीत होतें ! पण भाई–आणि बबूताईला दादाबद्दल सहानुभूतीच होती! दादाच्या हातून खून झालाच नाहीं अशी खात्री दोघांचीही होती. आणि दादा सरकारी यंत्रांतून दोषमुक्त होऊन उजळ माथ्यानें सुटावा अशी त्यांची इच्छा होती. त्याकरितां पदरचे पैसे खर्चून प्रयत्नही त्यांनी चालविला होता ! खऱ्याखुऱ्या थोर अंतःकरणाशिवाय असें कुणाच्या हातून घडणार !

या परस्पर विरोधी जगाच्या एकाच वेळच्या घडामोडीबद्दल काय समजावें ? याबद्दल आमचीं मनें पूर्णपणें अज्ञानावस्थेंत वावरत होतीं. मला तर हरघडी वाटत होतें–आमचें सर्वस्व संपलें ! आम्हीं जगांतून उठलों !

आला दिवस जात होता ! आम्हांला जगण्यांत अर्थच वाटत नव्हता ! मी का भूभार जगलें आहें ? असा माझा मलाच राग येत होता ! पण मरेपर्यंत जगायलाच पाहिजे. मग तें कसेंही जगणें असलें तरी पत्करलें पाहिजेच ! त्याला उपाय काय ?

मन चिंती तें वैरी न चिंती ! आम्हांला जें वाटावयाला नको, असें

वाटे, तेंच पुढें उभें राहातें ' दादाच्या आयुष्याच्या अखेर घटकेचा क्षण आतां जाहीर होणार ! व्हावयाचा होता !

" दादा, आपल्या भेटीची आशा करीत असेल नाहीं बरें ? " मी ताईला म्हणालें ! माझ्यानें दम धरवेना !–

" ताई, आपल्यालाही त्याला भेटावेसें नाहीं कां वाटत ? थांब, मी भाईला सांगून आपल्याला भेटायला जाण्याची व्यवस्था करवितें !" बबूताईनें म्हटलें ! दादाला भेटायला ताई माझ्याइतकीच उत्सुक झाली होती.

" कशाला ताई ? " मी उत्तरलें ! " भेटायची परवानगी नाहीं मिळाली तर ?–पण कर खटपट तरी कर ! उद्यां काय व्हायचें असेल तें होईल.आज दादाला डोळे भरून पाहूं ये! तो आपण त्याच्या जिवंतपणीं एकमेकांचा निरोप घेऊं ! दोन शब्द बोलतां आले तर पाहूं या! "

" ताई अशी निराश कां होतेस ? " तशाही स्थितींत बबूताई मला शुष्क धीर देऊं लागली.

"आपण दिलेलें बॅरिस्टर बी. सदाशिवराव फार हुशार आहेत ! त्यांच्यामुळें संतूदादा दोषमुक्त होणार नाहीं कशावरून ? "

" हो–शेवटच्या क्षणापर्यंत तशी आशा तरी बाळगूं या ! " ही आशा निराशेंतही आमच्या डोळ्यांत डोकावत होती !

ताईनें भाईला सांगितलें. भाईनें जाऊन खटपट करून, आम्हांला तीन चार तासाच्या आंत परत येऊन परवानगी मिळवून दिली ! दादाला तुरुंगांत भेटावयाला, मी, रत्नु, आणि बबूताई निघालों !

" बबूताई, तुझे, आणि भाईचे हे उपकार आम्हीं कोणत्या जन्मीं आणि कसे फेडावयाचे ? इतकें झालें तरी तुम्हीं आमच्याकरितां इतके श्रम सायास करतां ? प्रत्यक्ष 'दादा'च बाबांचा संशयी खुनी म्हणून पकडला गेला असला तरी त्याच्यासाठींच तुम्ही प्रेमच बाळगतां ? आणि त्याच्या बचावाची तजवीज करतां ! काय म्हणावें तुम्हांला ? काय नांव द्यावें तुमच्या स्वभावाला ? ताई, आमच्या चामड्याचे जोडे जरी तुमच्या पायांत घातले—"

" ताई, असें बोलूं नकोस गडे !–माझी तुझी स्थिती निराळी आहे काय ! मी तुझ्या कारितांच करतें आहें का ? माझ्या कारितां नाहीं बरें

करीत ? बाबा गेले !—पण आतां त्यांच्यासाठींच संतूदादावर गदा कशासाठीं ही ? मी सांगतें, दादा निष्कलंक सुटणार ! बाबांचा खून दादाच्या हातून कधींच व्हायचा नाहीं—झालेला नाहीं !"—" पण काय-द्याची कचाटी,तर दादालाच खुनी ठरविणार—ठरविणार कसलं—ठरविलें !" मी हताश होऊन म्हटलें ! !

लवकरच आम्हीं तुरुंगाच्या दरवाज्यांत येऊन ठेपलों. दारावरच्या रखवालदाराकडून तुरुंगाच्या मुख्याधिकाऱ्याकडे आमची वर्दी पोंचविली. परवानगी मिळालीच होती. तुरुंगाच्या अधिकाऱ्यानें आमचा अंत घेतला नाहीं. आमच्याबरोबर दोन शिपाई देऊन, आमची दादाची जिथें गांठ पडायची त्या ठरलेल्या जागेकडे आम्हांला नेलें. आम्हीं गेल्यावर दादा-लाही थोड्याच वेळांत आणण्यांत आलें ! जिकडेतिकडे भयाण क्रूरतेचें साम्राज्य पसरल्याचा भास होत होता. पण आमचे इकडे—तिकडे कुठेंच लक्ष नव्हतें. दादा आम्हांला बसाविलें होतें, तिकडे येतांना दुरूनच दिसूं लागला त्या वेळीं आमच्या बरोबर दिलेला तुरुंगाच्या अधिकाऱ्याचा माणूस दादाकडे पाहून बडबडायला लागला ! त्याचें बडबडणें इतकें हिडीस—इतकें किळसवाणें होतें कीं आम्हां कुणालाच—दोघींना—ऐकवेना. पण आम्हीं वर पाहिलें नाहीं, कीं, हूं कीं चूं करून, त्याला उलट उत्तर दिलें नाहीं ! " आल्या साळकायामाळकाया भेटायला ! आतां भेटून काय करणार? खून करावयाच्या वेळला कुठें गेल्या होत्या.आतां आलेल्या आहेत त्या. किती बदमाषानें आतांपर्यंत खून करून पचविलें असतील-किती दरवडे गडप केले असतील—आतां आलें बाहेर !—इतक्या गुन्हांचा शेवट काय ? असाच व्हायचा ! कुणी सांगितलें होतें फंदांत पडायला असल्या?" एक कीं दोन, त्या माणसाच्या जिभेचा पट्टा चालला ! दादा आमच्याजवळ येतांच त्याला तो म्हणतो:—"ए बदमाष, या बघ तुझ्या छेलछबेल्या भेटायला आल्या आहेत तुला !—बोल त्यांच्यांशीं दोन शब्द—! "

हाय ! काय दादाची ती स्थिती ! वैऱ्यावरसुद्धां असा प्रसंग नसावा! रत्नूनें दादाला ओळखलेंही नाहीं; इतका दादाच्या चेहऱ्यावर त्या थोड्या काळांत इतका विलक्षण फरक झाला होता. आपण कुठें आलों आहोंत--हें काय आहे याचें त्या, अज्ञान बालकाला कांहीं तरी ज्ञान होतें का ?"

" दादा ! " हृदय दाटून येऊन मी हांक मारली. " काय बरें हें झालें ? "

" ताई, ही एक तपश्चर्येची पायरी आहे !--तपश्चर्येच्या या पायरीवर आहें मी यावेळीं ! तूं कां वाईट वाटून घेतेस ?--कां रडतेस ! " दादा संथपणानें बोलला !

" दादा--रडूं नको तर काय करूं रे ?--दादा, हें काय तुझ्या नशिबीं आलें?" काय बोलूं, काय विचारूं दादाला मी ?

" ताई, ' देशभक्तां प्रासाद बंदिशाला ! ' माझें हें भूषण आहे ! माझ्या प्रमाणिक प्रयत्नांचें हें पारितोषक आहे ! " दादाच्या स्वरांत चलबिचल मुळींच नव्हती !

" काय बोलतोस दादा हें ? तुझ्या आयुष्याची अखेर ही अशी व्हायची ?-- "

" होय--केव्हां तरी आणि कशी तरी व्हायचीच कीं नाहीं ? ती अशी होत आहे ! आल्या प्रसंगाला शूरासारखें सामोरें जायला नको काय ? " दादा उद्गारला.

" या प्रसंगाच्या वेदना सोसवताहेत तरी कशा दादा तुला ?"

" कां बरें ? मी शांतपणानें सोसतों आहें ! "

" पण तुझ्या हातून कांहीं झालें नसून—"

" म्हणूनच हा प्रसंग शांतपणानें सोसतों आहें—माझ्या हातून कांहीं अत्याचार झाला असतां, तर अशा वेळीं, इतक्या शांतपणानें तुझ्याशीं बोललों तरी असतो का मी ? माझी नाडी नेहमींप्रमाणेंच कशी ठोके देत राहिली असती ?—ज्याला कर नाहीं, त्याला डर कशाची आणि कां ?"

" पण संन्याशी सुळी जात नाहीं का या प्रकारानें ? "

" जाईल ! संन्याशाला काय त्याचें ? आणि त्याला कांहीं वाटलें तर तो मग संन्याशी तरी कसला ? "

" असें कसें तुला बोलवतयं ? इतका थंड शांत कसा तूं ?—आज इथें आहेस उद्यांची तुझी अवस्था—"

" आज या जगांत—उद्यां दुसऱ्या जगांत ? आपलें काय जातें ? ईश्वराच्या हुकुमाचे ताबेदार आहोंत आपण—रहा म्हटलें राह्यलें पाहिजे

जा म्हटलें निघालें पाहिजे ! ईश्वराच्या आज्ञेला कुरकुर करून काय उपयोग ? " दादा तात्विक विचार बोलत होता.

"संतुदादा किती कठोर बोलतां आहांत--इतकें कसें बोलवतें तुम्हांला?--असें बोलायला आपल्याला कुणी शिकविलें ?--संतुदादा " बबूताईच्यानें आतां राहवेना.

" बबूताई, इतकें कठोर बोलायला मला माझ्या कठोर परिस्थितीनेंच शिकवलें, बोलायला लावलें, आणि व्हावयाला लावलें, बबूताई, मजुराच्या वांट्याला मार्दव कुठून येणार ? पण बबूताई आपणही इकडे यायची तसदी कशाला घेतलीत ? आपल्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे--त्यांतून--"

" नका ! संतूदादा, असें बोलूं नका ! मी तुम्हांला बोलूं द्यायची नाहीं ! दादा, माझ्यावर दुःखाचा डोंगर आज कोसळला आहे--पण उद्यां आकाश कोसळणार आहे त्याची काय वाट ?--दादा, बाबांचा खून करणारा खरा खुनी—" बबूताईनें विचारलें.

" मी आहें, अशी ताई तुझी आणि भाईची समजूत--खात्री झाली आहे का ? " दादानें मध्येंच तिचारलें--

" शिव! शिव! असें दादा आम्हांला स्वप्नंस्वप्नांतरीं कसें वाटेल ?—पण कुणी चांडाळानें हें पापी कृत्य करून तुझ्यावर आणलें--" बबूताईच्या डोळ्यांतून पाणी गळायला लागलें.

"अस्तु! ताई, बबूताई, आतां एकदां नाहीं, तर दहादां आनंदानें फासावर लटकण्याची माझी तयारी आहे ! आतां मी कळीकाळाच्या दबकावणीला भीत नाहीं! बबूताई, याच एका आत्मविश्वासावर बेधडकपणानें बसलों आहें. मला या स्थितीचें कांहीं वाटत नाहीं. पण हेंच जर का माझ्याबदलचा तुम्हां भावंडाच्या मनांत किंतू आला असतां—तर माझ्यासारखा हतभागी त्रैलोक्यांत मीच असें मला वाटलें असतें ! आणि मरणाहून मरण वाटून प्राणांतिक वेदना झाल्या असत्या ! " दादा म्हणाला.

" दादा, तुझ्याकरितां भाईने बॅरिस्टर बी. सदाशिवाला दिलें आहे ! आज तुला भेटायला यावयाची आमची सर्व व्यवस्था भाईनें आणि बबूताईनेंच करविली ! मी सांगितलें.

" आमच्या सारख्या दरिद्री, हतभागी प्राण्यांबद्दल ईश्वरानें बबूताई सारख्यांच्या मनांत, प्रेरणा करून, त्यांना कष्ट कां द्यावेत, हेंच कळत नाहीं ! ताई, आतां माझें कांहीं होवो, मी मरणाला तयारच आहें ! आतां तुझें आणि रत्नुचें कसें होईल, याची पण मला धास्ती राहिली नाहीं ! जगानें कांहीं म्हटलें, आणि सरकारी चौकशी कसलीही होऊन मी फासावर लटकलों, तरी तुझें आणि रत्नुचें रक्षण कुठल्याही परिस्थितींत बबूताई करीलच !—बबूताई, माझ्या, नव्हे, तुझ्या भावडांना अंतर देऊं नकोस, हेंच तुझ्याजवळ या पामराचें अखेरचें मागणें आहे ! शेटजींनीं मला आपलें मूल म्हणविलें होतें—तूं तर या दोघांना बहिण भाऊ अगोदर पासून समजतेंसच आहेस. तेव्हां तुला अधिक काय सांगावयाचें आहे ? " दादा म्हणाला.

" दादा, असें निर्वाणीचेंच काय बोलायला लागलास ? " मला धड बोलवेनाही.

"ताई, वेडी तर नाहींस तूं? हें यावेळींही बोलायचें नाहीं तर केव्हां ? हीच आतां तुमची आमची शेवटची मुलाखत ! आपली आई पुढें गेली शेटजी चालते झाले—त्यांची स्वर्गांत सोय लागली आहे कीं नाही, हें पाहण्याकरितां जायला मी उद्यां निघणार ! आणि आतां बोलूं नको तर केव्हां ? मला या जगांत राह्यचें कारणही उरलें नाहीं. माझ्यासारखा फाटका माणूस केलें यापेक्षां जास्त काय करणार ? मजुरांचा प्रश्न सोड-विला ! त्यांना कांहीं काळ सुखी केलें. शेटजींनींच सांगितलें ! शेटजी मजुरांचे कैवारी होते—मी थोडे फार शरीर कष्ट केले—दोघांनीं गरी-बांना दोन चांगले दिवस दाखविले. आतां इथें राह्यचें तरी कशाला ? " दादा निर्भयपणानें बोलत होता !

" खरा खुनी सांपडला असता तर?—कां बरें दादांच्यावर आग चांडा-ळांनीं पाखडली ? " बबूताई म्हणाली !—तिला आणखी रडूं यायला लागलें.

" जाऊं दे बबूताई ! काळ कांहीं इतका खास खुळा नाहीं, कीं शेट-जींचा खून करणाराला अगदीं अमरपट्टा देईल ! शेटजींच्याप्रमाणें किंवा माझ्याप्रमाणें त्याला आज उद्यां पाळी ही द्यावी लागणारच ! ताई, खरा

खुनी इथल्या–जगांतल्या माणसांच्या न्यायमंदिरांत सुटला, तरीं ईश्वरी न्यायासनापुढें खास तो निर्दोषी ठरत नाहीं ! आणि आज आम्हीं जरीं जगाच्या कोर्टांत अन्यायी ठरलों, तरी ईश्वराचें वरिष्ठ न्यायासन खात्रीनें आम्हांला दोषी ठरविणार नाहीं ! मग कोणाला कां भ्या ? सत्याच्या स्वयंप्रकाशाला कशाची भीति आहे ? ”

“ दादा, दादा, हें तुला कुणी इतकें बोलायला शिकविलें तरी ? ” बबुताई गहिंवरून म्हणाली !

“ दारिद्र्यानें ! दारिद्र्यांतल्या निष्ठुर न्याय नीतीनें–आणि समाधानानें” दादा म्हणाला. झालें ! तुरुंगाचे लोक गडबड करायला लागले. चला बाहेर म्हणून सांगायला लागले. आमचा पाय तेथून हलेना ! रत्नुनें पुष्कळ उशीरानें–दादा बोलावयाला लागल्यावर ओळखलें होतें ! नंतर तो दादाला जाऊन बिलगला. तो त्याला सोडीना. ” याला कशाला आणलेंस ? ” दादा म्हणाला. “पण, असू दे, आतांपासून याची माहिती असूं दे. माझ्यापेक्षां त्याला कितीं तरी मोठीं–चांगली कार्यें करावयाचीं आहेत. तेव्हां त्याला किती वेळ या ठिकाणीं यावें लागेल कुणास माहिती ? तेव्हां तें झालें तें बरेंच झालें ! ” म्हणून रत्नुचा मुका घेतला; आम्हीं जायला उठला. ”

“ दादा, तूं चल ! तूं का इथें बसला आहेस ? ” रत्नु जास्तच दादाला चिकटूं लागला.

“ दादा, मी नाहीं तुला तोडणार ! तूं आल्याखेरीज मी जेवणार नाहीं ! चल ना ?–ताई दादाला बरोबर घेऊं या–घरांत आई नाहीं, दादा येत नाहीं. आम्हांला कसें करमणार ?–दादा मी रडणार नाहीं ! आई कुठें गेली म्हणून विचारणार नाहीं, खायचा हट्ट धरून बसणार नाहीं !–चल ना दादा !–” मीं, बबूताई, दोन्हीं हाताला धरून खेचूं लागलों. दादा सोडवून घ्यावयाला लागला पण रत्नु ऐकेना ! आम्हीं एकीकडे रडत होतों, आणि रत्नुला दादा जवळून ओढून घेत होतों. रत्नु सोडीना. रडायला लागला, आतां दादानें आवरलेलें डोळ्यांतलें पाणी, त्याला न जुमानतां त्याच्या गालांवरून ओघळूं लागलें ! मायामोह मोठा कठीण आहे !

" जा ! ताई, बबूताई, जा आतां ! किती बसलों–बोललों तरी अखेर ठरली आहे ! जातांना एवढेंच सांगतों तुला ! आजवर अधिकउणें बोललों असेन–लहान तोंडीं मोठा घांस घेतला असेन–तर तें सगळें विसरून जा ! तुमचा आमचा या जन्मींचा ऋणानुबंध सरला, त्याला–कुणाचाच इलाज नाहीं ! आतां गांठीं भेटी–स्नेह संबंध पुढल्या जन्मीं ! ईश्वराजवळ असें मागूं या कीं, या जन्मांतल्या या जन्मांतच काय हाल-अपेष्टा, यातना, क्लेश, दुःख, द्यायचें तें देऊन घे ! पुढल्या जन्मीं आमच्या,–तुमच्या स्नेहांत. आनंदांत, मैत्रींत, सुखांत असा हात घालूं नकोस ! भाईला विचारीत होतों म्हणून सांग ! आतां ताई, आणि रत्नु तुझाच आहे !! जा आतां–" दादाला जास्त बोलवेना त्यानें तोंड फिरविलें. दादाला जितकावेळ अधिकाऱ्यांनीं दिला होता तो खलास होतांच तुरुंगाच्या त्या निर्विकार माणसांनीं रत्नुला दादापासून खस्कन् ओढून आमच्याकडे लोटला, व दादाला 'चल' म्हणून सांगून चालावयलाच लावलें. आम्ही जड पावलांनीं, दुःख भारानें, डोळ्यांतून अश्रूंच्या नद्या वाहवींत परतलों ! मागें वळून पाहण्याच्या आंतच दादा आमच्या दृष्टीआड झाला होता ! भविष्यकालाच्या पडद्यावर आमच्या-करितां आणखी कांहीं वाढून ठेविलें आहे काय ? हें डोळे ताणून आम्हीं पहात होतों ! हेतुशून्य, भावनानष्ट मन 'उद्यां'कडे पाहावयाला, व कोसळणारी नवी आपत्ति सहन करावयाला तयार करीत आम्हीं दोघीही चाललों होतों. तुरुंगाच्या बाहेर येईपर्यंत रत्नु त्या राक्षसावतारांच्या दह-शतीनें गप्प होता, पण बाहेर आल्यावर रडायला लागला. दाबलेल्या रड-ण्याचे हुंदके रत्नूला एकसारखे यायला लागले !

## प्रकरण १८ वें

# पापाला वाचा फुटली

" भाई–प्रेमचंदभाई, आहेत काय ?—"

" कोण ? बॅरिस्टरसाहेब–या. "भाई बंगल्याच्या बाजूच्या बागेमध्यें येरझारा घालीत होते. रत्नु त्यांच्या पाठीमागें उगीचच फिरत होता. भाईंची फेरी संपून परत वळावयाला, आणि बॉरिस्टर, व त्यांच्या बरोबर सी. आय.डी इन्स्पेक्टर फाटकांत शिरून त्यांनीं भाईंना हांक मारायला एकच गांठ पडली. जवळ येतांच बॅरिस्टरांनीं बोलायला सुरवात केली:–

" भाई, मी–व इन्स्पेक्टरसाहेब आतांच संतुरामाची गांठ घेऊन आलों. आम्हांला जें विचारावयाचें होतें, तें विचारलें. त्यावरून तुमचा संतुराम निर्दोषी करावयाला आतां अतीशय सुगम झालें आहे. खरा खुनी-- आपली, संतुरामाची, आपल्या व संतुरामाच्या सिस्टर्सची सर्व हकीकत ऐकून घेतल्यावरून इन्स्पेक्टरसाहेब म्हणतात कीं वाहिमी १।२ दिवसांत पकडल्याखेरीज राहात नाहीं. इन्स्पेक्टरसाहेबांनीं संशयी माणसाभोंवतीं आपलें जाळेंही व्यवस्थित विणलें आहे. तुमच्या सांगण्यावरून संतुराम मी विचारीन त्याला उत्तरें देईल कीं,नाहीं याची मलाही शंका होती पण तसें कांहीं झालें नाहीं, ! "

" ठीक झालें ! " भाई आपल्या प्रयत्नाला यश येणार या भावनेनें साहजीकच उत्तेजक स्वरांत उद्गारला ! "आणखीही कांहीं आम्हां सर्वांला विचारावयाचें असेल, तर खुशाल विचारा !"

ही मंडळी आतां साहजीकच जेथें उभी राहिली होती, ती जागा– बंगल्याच्या माडीवर जाणाऱ्या जिन्याच्या बाजूला होती. उंबराचें बरेंच मोठें झाड तेथें होतें. दुसऱ्या मजल्याची जिन्याजवळची खिडकी अगदीं डोक्यावरच आलेली होती. भाई, बॅरिस्टर, व इन्स्पेक्टर आणखी 'केस' च्या बाबतींत तेथेंच बोलत उभे राहिले. रत्नुही एकदां वर सर्वांच्या तोंडा कडे पहात, एकदां जवळच्या फूलझाडावरील फूल काढण्याची खटपट

करीत, तर एकाद्याचें पान तोडण्याचा उपद्याप करीत, नाहींतर फुलपांखरें उडत त्यांना धरण्याचा प्रयत्न करीत—त्या मंडळींच्या भोंवतीच गुंडाळत होता. याच त्याच्या उद्योगांत—त्याला जवळच चकचकीत काय सेंसें दिसलें. त्यानें तें चटकन् उचललें; आणि आनंदून उड्या मारीत भाईजवळ येऊन त्यांच्यापुढें करीत "ही पहा मला गंमत सांपडली! कशी चकचकीत आहे!" म्हटलें भाई "रत्नूनें दिलें तें बोलण्याच्या नादांत होता. त्यानें तसेंच रत्नुनें हिरमुसलें होऊं नये या करितां घेतलें. इन्स्पेक्टरांची त्या जिन्नसाकडे तात्काळ नजर गेली. व त्यांनीं 'पाहूं' म्हणत आपल्या हातीं ती जिन्नस घेतली! निरखून पाहिली. आणि लगेच आनंदाच्या चढत्या स्वरांत बॅरिस्टरांच्या खांद्यावर हात ठेवीत म्हटलें, 'बॅरिस्टर-साहेब,' ही पहा एक गम्मत!—खऱ्या खुनी माणसाची संबंधि ही वस्तु तुमच्या लहान मुलाच्या हातानें 'चिट्टी उचलून' घेतल्याप्रमाणें हातीं आली! आपण उभे आहोंत हें ठिकाण, ही जिन्नस, झाली परिस्थिति—हें उंबराचें झाड, त्यावरून त्या खिडकीच्या गॅलरींत सहज चलाखीनें जाण्या येण्याचीं सोय पहा—"

'ठीक! ठीक' बॅरिस्टर उद्गारले. हा दुवा चांगलाच जमला. दादा-लाही ती जिन्नस पाहून आश्चर्य वाटलें! "भाईसाहेब, शेटजींच्या दुःखांत चूर असल्यानें तुमच्या बंगल्याच्या झाटलोटीकडे दुर्लक्ष झालें, त्याचा चांगलाच उपयोग संतुराम सुटायला व खरा खुनी मिळायला झाला! आतां तुम्हांला सांगतोंः—

"खुनी सांपडला! बॅरिस्टरसाहेब, आपण यावेळीं येथें आलों फार चांगलें झालें नाही? चला, आतां तुमच्या हातीं खुनी १।२ दिवसांत कसा देतों, हें तुम्हांला वाटेंत सांगतों." इतकें सांगून, व भाईचा निरोप घेऊन, व परत कोर्टांत आपण सगळे बरोबरच इथून जाऊं म्हणून सांगून दोघे चालते झाले!

आशा वेडी असते. मी—बबूताईनें जरी अगदीं धीर सोडला होता, तरी भाईनीं दादाकरितां आटोकाट प्रयत्न चालविले होतेच. आज जी रत्नुला जिन्नस सांपडली, तें एक सोन्याचें शर्टचें बटण मालकाचें त्यांवर

नांव असलेलें, असें होतें. सर्वांच्यामतें पापाला वाचा फोडणारी ती एक खास किल्ली होती. असो.

दादाच्या कच्च्या चौकशीच्या सुरवातीला आपण सगळेजण कोर्टांत बरोबर जायचें, .असें बबूताईजवळ ठरून रत्नुला घेऊन बबूताईच्या बंगल्यावरून दुसरें दिवशीं सकाळींच मी माझ्या बिऱ्हाडीं आलें होतें. त्या दिवशीं जी गेलें, ती तिकडेच आतांपर्यंत होतें. बबुताई नको म्हणत होती, तरी यायला पाहिजे होतें. बिऱ्हाड सोडून बाहेर किती दिवस राहावयाचें तर ?—अकरा वाजल्यानंतर पुन्हां बबूताई माझ्याकडे येणार होती. दादावरची केस दुपारी कोर्टांत सुनावणीला निघावयाची होती. ताई कोर्टांत येणार होती. कोर्टांत जायला बबूताई व भाई येईपर्यंत, मला, आणि रत्नूला जेवण आटपून तयार व्हावयाला पाहिजे होतें. तें कदाचित् माझ्या हातून वेळेवर होणार नाहीं, बिऱ्हाडांत गेल्यावर, आईची आठवण, दादावरील संकटें—आणि आपली भावी परिस्थिती, या सर्वांच्याच विचारानें मनाला आवरतां येणार नाहीं! आपली जागा तर खायला अंगावर येईल असें बबूताईप्रमाणें मलाही वाटत होतेंच. पण काय करणार ? आलें हें पाहिजेच होतें !

घरीं आलें. झाडलोट केली ! नळाचें पाणी जायच्या आंत भरून घेतलें जरूरी पुरतें. पाणी तापवून रत्नूला स्नान घातलें. मी आंग धुतलें! शेगडी पेटविली. आणि तांदूळ धुवून टाकले. आईच्या सुतकांतच अजून आम्हीं होतों. तिच्या ठिकाणचा लावून ठेवलेला दिवा विझला होता!—मध्यंतरीं कुणी नव्हतेंच मग लावायचा कुणी ? दिवा विझलाच होता. तो दिवा पुन्हा लावला. भाताला कढ आला होता—रट्‌रट्‌रट् वाजत होतें, वर ठेविलेल्या झांकणाला वर उडवीत वाफ बाहेर पडतांना 'सुंईऽऽ' करीत होती —त्याकडे अर्थशून्य दृष्टीनें मी पहात बसलें होतें ! रत्नू दादाच्या वळकटीवर पालथा पडून उगाच कुणीकडे तरी टक लावून पहात होता- मी उदास होतें. रत्नुवर माझ्या उदासीनतेची छाया स्वाभाविकच पसरलीं होती ! तोंडांत देवाचें नांव येत नव्हतें—कीं कांहीं दुसरें आठवत नव्हतें !

" दादाला भयंकर शिक्षा होणार ! " याच कल्पनेभोंवती मन आणि

विचार घोंटाळत राहिले होते ! पुढचें दार मुंबईच्या रिवाजाप्रमाणें लोटून ठेविलें होतें. दत्तासाहेब बाहेर गांवाहून अजूनही आलेच नव्हते. त्यांना आमची स्थिती कळली असेल का ? वर्तमानपत्रावरून कळलीही असेल ! अजून कसें कळल्याखेरीज राहील ? आमच्याबद्दल त्यांना काय वाईट वाटत असेल ? दादा वाहवला, निष्कारण त्यानें आपल्यावर 'मजुरांच्या' भानगडींत पडून प्रसंग ओढवून घेतला, असें ते समजून, त्यांच्या मनांतून तो उतरला असेल. आतां आम्हांला ते येथें राहूं देतील का ? पण आम्हांला राहून तरी काय करायचे ? मग जायचें कुठें ? करायचें काय ? बबूताई सोडणार नाहीं, पण तिच्याकडे काय म्हणून राह्यचें ? तिच्यावर दोघांचा भार काय म्हणून घालावयाचा ? मग काय करावयाचें ?" एका मागून एक, हे विचार यायला लागले होते. हे विचार आले कीं थांबले ! अमुक करूं, तमुक करूं, असे दिवस काढूं, तसा चरितार्थ चालवूं ! " असा विचार डोंक्याला करतां येत नव्हता ! पुढें अफाट जग पसरलेलें, पण पण त्याचा काय उपयोग होता ? हेंच अवाढव्य जग 'दादा'चा–निरपराध दादाचा–अहोरात्र पोटासाठीं जगाला भिऊन, वागून हाडांची काडें करणाऱ्या दादाचा बळी घ्यावयाला तयार झालें होतें ! तें हें जग मला कसें जगविणार ? माझी काय कींव करणार ? भविष्याबद्दल मला सर्व अंधारच दिसला होता. एक पाऊल पुढें टाकायला जागा दिसत नव्हती ! मी सर्व बाजूंनीं हताश झालें होतें !" आतां आमचें पुढें कसें ? याला कांहीं उत्तर नव्हतें !–

दहा वाजून गेले असतील. भात झाला. खालीं उतरून ठेवला. पिठलं करायच्या तयारीला लागलें. इतक्यांत लोटलेलें दार कुणी उघडल्याचा आवाज झाला. मी वळून पाहिलें, तों दार उघडून खुशालचंद मॅनेजर आंत आला !

मी त्याला पाहून दचकलें ! अंगावर कांटा उभा राहिला ! त्याला आलेला पाहतांच रत्नु वळकटीवरून झटकन् माझ्या बाजूला येऊन बसला ! रत्नूची बावरलेल्या सशासारखी स्थिति झाली ! हा यावेळीं इथें कां आलाय ? 'दादाला पकडल्याचें जाहिर झालें आहे.' मग इथें कशा-

साठीं, कुणासाठीं, आणि काय उद्देशानें आला—माझी कांहीं कल्पना चालेना! मी त्याच्याशीं बोललें नाहीं कीं, पुन्हां त्याच्याकडे पाहिलें नाहीं! बसा म्हणून सांगितलें नाहीं, कां आलांत म्हणून विचारलें नाहीं!' त्यालाही माझ्या विचारण्याची जरूरी दिसली नाहीं. त्यानें आंत येतांच दार लोटलें, वर बोल्टही लावला, आणि त्या खिडकींत चढून बसला!

"सुगंधा!" थोडा वेळ मी बोलतें कीं नाहीं, याची वाट पाहून त्यानेंच सुरवात केली! मी त्याच्याकडे पाहिलें. कांहीं बोललें नाहीं!

"सुगंधा! मीं तुझ्या समाचाराला आलों आहें! काय तुझी ही स्थिति झाली आहे दोन दिवसांत? डोळ्यांत प्राण येऊन बसला—हा गुटगुटीत गुलाम कसा जरत्कारु झाला पहा! खरोखर I pity for you!"

तरीही मी कांहींच बोललें नाहीं. मला त्यांच्या येण्यानें, आणि बोलण्यानें कसेंसेंच वाटायला लागलें. मनांत वेड्यावांकड्याच कल्पना यायला लागल्या.

"बोलत नाहींस सुगंधा तूं! मी तुझ्या समाचाराला आलों. तुझी आई गेली म्हणून कळलें. त्यांत संतूनें हा भयंकरच प्रसंग ओढवून घेतला! कोणती गोष्ट करतांना मागचापुढचा विचार केला नाहीं, म्हणजे असेंच व्हायचें. आपण हें करतों, पण पुढें काय होईल, आपलीं दोन भावंडें आहेत, त्यांनीं काय करावें? याचा कोणचा कांहीं विचार तरी घेतला का?—आज त्याला जन्म ठेपची शिक्षा झाली म्हणजे—आणि ती होणारच—पुढें तुमचें कसें होणार?"

माझ्या मनांत जे विचार चालले होते, ते शब्द फोनेच्या प्लेटसारखे खुशालचंदाच्या तोंडांतून बाहेर येऊं लागले! माझ्या डोळ्यांतून आपो-आपच पाणी येऊं लागलें!

"नको! सुगंधा, रडूं नकोस! मी तुला रडविण्याकरितां आलों नाहीं! तुला हंसविण्याकरितां-तुझ्यावरची परिरिस्थिति दूर करण्याकरितां संतु-वरील संकटाची—"

"काय? दादावरचें संकट दूर करण्याची खटपट करतां आहांत?—मी पट्कन् जाग्यावरून त्याला विचारलें!

" तुझा गैरसमज झाला सुगंधा ! मी संतूला संकटमुक्त कसा करणार? त्याचें जें कांहीं व्हावयाचें तें होणारच ! पण त्याच्यावरील संकटाची झळ-तुला लागूं नये—तुझे हाल होऊं नयेत. याच्या व्यवस्थेसाठीं मी आलों आहें ! हें तुला सांगत होतों. I must take care for you and your younger brother !Its my duty I suppose !"

मी घोंटाळ्यांत पडलें ! माझी निराशा झाली ! मी खालीं मान घालून जागच्याजागीं उभी राहिलें.

" सुगंधा, माझें म्हणणें, आणि मी तुझ्याकरितां काय करणार आहें, हें तुझ्या अजून लक्षातच आलें नाहीं ! तें मी तुला आतां सांगणार आहें ! तुला आणि तुझ्या या भावाला, इथून नेऊन आमच्याकडे—आमच्या घरीं खुशाल मजेंत—आणि सुखांत ठेवण्याचा माझा निश्चय झाला आहे ! आज तुम्हांला घेऊन आईन. आणि उद्यां परवाकडे, नाहीं तर महिनाअखेर इथलें तुमचें सगळें चंबुगबाळें सावकाश घेऊन जाऊं. त्याचें कांहीं आजच अडत नाहीं ! " मॅनेजरनें अंतस्थ हेतु व्यक्त केला. मी त्याच्याकडे पहातच राहिलें ?

" अशी आश्चर्यानें माझ्याकडे पाहूं नकोस ! " मॅनेजर पुढें बोलूं लागला, I must do this! I must help you! माझ्या घरीं जाऊन पडल्यावर तुला कशाचीच काळजी नाहीं ! तेव्हां म्हणतों, लवकर आटप. गाडी आणायला सांगतांच, आणतों आणि निघूं. तुझें खायचं झालेंच आहे वाटतें, आतां तें खाऊन घ्या ! अगोदर आलों असतों तर तुला मुळीं करूंच दिलें नसतें ! आपल्या घरीं गेल्यावरच केलें असतें ! आतां असूं दे !—केलेलें खा—आणि चला ! "

यावर काय बोलूं ! आंतल्या आंत गुदमरल्यासारखें झालें ! इतकी याची लगट कां ? इतका लाघावीपणा कशासाठीं ? दादाला खुनी म्हणून पकडून नेला म्हणून भाईजवळ काय दादाला शिव्या देण्यास हा तिकडे होताच आणि—आज हें याचें काय वर्तन ?

" आटोपतेस ना लवकर ? मग उशीर कां ? झालें आहे ना सगळें ? ए, मुला, चल ऊठ जेवायला बैस !—"

" मी कुठें इथून हलणार नाहीं ! मला कुठें जायचें नाहीं ! जीव मूठींत धरून मी म्हटलें !

" म्हणजे ? कां ?" मॅनेजर गडबडीनें म्हणाला. "मूर्ख आहेस का वेडी आहे ! इथें राहून करणार काय तूं ? उद्यां तुझ्याजवळ खायला नसेल ? उद्या महिना झाला कीं घरभाड्याचें काय करशील ? घरवाला हाकून देईल तेव्हां ! म्हणून नीट माझ्या कडे नेतों आहें !–एकाद्यावर उपकार करायला जावें तर–"

" तुमचे मला कोणाचे उपकार घ्यावयाचे नाहींत ! दाखविली इतकी कळकळ पुष्कळ झाली ! आभारी आहें मी त्यावद्दल ! आपण आलांत तसे परत जा—" मी सांगितलें-

" वा ! तें कसें शक्य आहे ? तुला घेतल्याखेरीज मी कसा जाणार ? शिवाय, आणखी तुझ्या संबंधांत मी काय ठरविलें आहे, त्याची तुला काय कल्पना आहे ? मी काय तुला माझ्याकडे चार दोन महिने ठेवून मग सोडून देणार आहें, असें समजतेस कीं काय तूं ! छट् ! मी तुला जन्मभर सोडणार नाहीं ! तुझ्याशीं लग्न करायचें ठरविलें आहे ! रत्नू आपल्याजवळच राहील ! आणखी दोन तीन वर्षें तो पडेल आपल्या अंगावर ! मग चिकटवींतच आहे गिरणींत त्याचें पोट बाहेर निघालें म्हणजे झालें ! असा मी बेत केला आहे ! संतु जरी आज फांसावर लटकला–"

" गप्प बसा ! एक अक्षर बोलूं नका !–आल्या वाटेनें चालते व्हा पाहूं ! " मॅनेजरचे स्वैर प्रलाप ऐकून माझें मस्तक भणाणले ! मी एक-दम त्याला चालतें व्हायला सांगितलें.

" माझ्याबद्दल कोणी सहानुभूती दाखवायला नको कीं, माझ्यावर कोणी उपकार करायला नको ! "

" राहिलं ! उपकाराची भाषा सोडून दिली ! माझ्याकडे यायचें कबूल करून तूंच माझ्यावर उपकार कर, असें वाटेल तर म्हणतों. मग तर झालें ! " मॅनेजर अधिकच पानचटपणा करूं लागला ! " सुगंधा, असें तसें कांहीं करूं नकोस ! माझ्या इच्छेच्या विरुद्ध जाऊं नकोस ! मी म्हणतों त्या प्रमाणें नीट ऐक ! मला माहित आहे, कीं

तुझा वाग्दत्तवर (?) झांझिबारांत आहे तोंपर्यंत काम करणार ? कदाचित् तो तिकडच्या तिकडे खपलाच असला तर ? आणि कधींकाळीं—तूं एका खुनी भावाची बहिण आहेस असें कळल्यावर, तो आपल्या लहानपणच्या वचनाला जागेलच असें कशा वरून ?—असा कांहीं दूरवर विचार करशील कीं नाहीं ? अशा स्थितींत मी होऊन तुझ्याकडे, तुझ्या जाग्याची सोय लावायला—तुझ्या संबंधाची माझी सहानुभूति—" मॅनेजरचा कांळेपणा अधिकाधिक बाहेर यायला लागला !

" तुमची सहानुभूति मला अंथरायची नाहीं कीं पांघरायची नाहीं ! कां उगीच मला सतावतां ! " त्रासातिरेकानें मला अधिक बोलवेना !

" हें पहा, मी अजून तुला सौजन्यानें सांगतों आहें. आणि माझ्या बाबतींत दुसरें असें एक आहे, मी एकदां एक कांहीं अमूक—असें असें हें करायचें असें ठरलें, एकदां निश्चय केला; कीं मग केलाच. तें करायचेंच ! मग कांहीं होवो ! दुसऱ्याकडे मी लक्ष देत नाहीं. दुसऱ्याचें ऐकत नाहीं ! कोणी आड आलें, तर त्याला कापून काढायला मागेंपुढें पहात नाहीं. आतां हेंच; तुला एकदां घेऊन जायचें, आणि तुझ्याशीं लग्न करायचें ठरविलें आहे ना ? झालें, वज्रलेप झालें आहे हें ! तुला घेऊन जाणार म्हणजे जाणार ! तुझ्याशीं लग्न करणार म्हणजे करणार ! तें सगळें कांहीं मी माझ्या मनासारखें करणारच पहा ! हं, आतां त्यांतून तूं म्हणशील कीं, " मीं लग्न करणार नाहीं, तशीच तुमच्याजवळ राहीन ! " तर अशावेळीं तशी सवलत देईन फार तर ! समजलील ! पण माझा निश्चय म्हणजे मग निश्चयच तो ! त्याच्या आड कोणी येऊं नये भल्यानें!

मी:—तुम्हीं मनुष्यच आहांत का ? कां राक्षस आहांत ?

मॅनेजरः—तुझ्या सोयीला, व आवडीला वाटेल तसें तूं समज ! मी-मला तूं, काय समजावेंस हें तुझ्याच आवडीनिवडीवर ठेवतों—मग तर झालें ?

मी:—चालते व्हा इथून—मी साफ येणार नाहीं !

मॅनेजरः—तुला घेतल्याशिवाय मी इथून मुळींच हलणार नाहीं !

मी:—मी नाहीं आलें तर ? काय कराल ?

मॅनेजरः—जबरदस्तीनें घेऊन जाईन ! माझ्या निश्चयाकरितां जबर-दस्ती करावी लागेल !

मीः–आरडून ओरडून मला गोंधळ करितां येणार नाहीं काय ?–लोक सोडविणार नाहींत काय ?

मॅनेजरः—हंः लोकांना सांगेन हिला वेड लागलें आहे. वेडाच्या भरांत ही असेंच करते ! सुगंधा, मी एकदां ठरविल्यावर, माझ्याविरुद्ध कोणींच येऊं नये. माझ्या इच्छेप्रमाणेंच प्रत्येकानें वागलें पाहिजे. नाहीं तर सुगंधा, तुला माहीत नाहीं, मी तसा फार विचित्र माणूस आहें. परिणाम फार भयंकर करीत असतों ! Mind well! That much I tell you !

मीः–पशू ! तुम्हांला देवाची–निदान इथल्या कायद्याच्या कचाटीची तरी थोडी भीति आहे काय ?

मॅनजरः—मुळींच नाहीं ! भीतीचें कारण काय ? देव आणि कायदा मला काय करणार ? जे देवाला भिऊन जन्मभर वागले, आणि काय-द्याची ज्यांनीं पर्वा बाळगिली, त्यांचें तरी काय होतें ? देवाला भिणारा सज्जन—आमचा इच्छारामभाई, तुझ्या मैत्रिणीचा बाप—कां त्याचा शेवट कसा झाला ? कायद्याच्या कट्यारीच्या धारेवर कसरत करणारा तुझा प्रतिष्ठा मारणारा संतू, आज कुठल्या स्थितींत आहे ?— अग भित्या पाठींच ब्रह्मराक्षस लागायचा ! मला कशाचीच भीति वाटत नाहीं ! मला कोण काय करणार ? हं, रिकामा काथ्याकूट नको ! माझ्या निश्चयाच्या आड येऊं नकोस ! निघायच्या तयारीला लाग कशी ! खुषीनें नाहीं आलीस, तर सक्तीनें उचलून नेणार म्हणून मघाशींच सांगितलें आहे ! पण म्हणतों, तुझी शोभा, आणि मला तेवढे कष्ट कां ?

आतां या संकटाला काय करायचें ? कसें सुटायचें यांतून ? दुर्दैव आम्हांला आणखी किती छळणार आहे ? पळून जाईन म्हटलें—दार लावून टाकलेलं—तिथेंच. दाराजवळ बसलेला ! कसें सांगून याला बाहेर घालवूं ? दुःखा–त्रासानें हृदय जळतें आहे—आज दादाच्या केसचा निकाल होऊन त्याची भयंकर शिक्षा डोळ्यापुढें थयथया नाचून अंगाची लाही करते आहे—आणि त्या उण्याला म्हणून हें वर !

" बाकी, खरी संतुची बहिण आहेस, अगदीं त्याच्या इतकीच हट्टी, आणि चढेल आहेस ! माझ्या सरळ सांगण्यानें एकादें जनावर वळलें असतं ! विनवणीनें दगडाला घाम फुटला असता ! पण तूं आपल्या वळणावरच जाते आहेस ! सुगंधा, अजून तुला कल्पना नाहीं, मी किती डेंजरस आहें त्याची ! माझ्या इच्छेच्याविरुद्ध गेलें–मला चिडविलें, मला दुखविलें, माझी मानहानी केली, म्हणजे मी काय करतों, काय करीन याची जर तुला थोडी जाणिव देईन—तर तुझा हा हट्ट केव्हांच तुला सोडून जाईल ! सुगंधा, मी तुझा, तुझ्या आयुष्याचा सुगंध लुटणारच ! हें आजच नाहीं ठरविलें ! तुला पहिल्यांदा पाहिलें त्या दिवसापासून ठरविलें आहे ! या माझ्या निश्चयांत आजपर्यंत पुष्कळ अडथळे आले—पण मी ते दूर केले. तूं शेवटीं इतका त्रास देशील असें मला वाटलें नव्हतं ? माझ्या सहनशीलपणाचा जास्त अंत घेतलास—माझें मुकाट्यानें ऐक—"

मी:—काय तुझ्यासारख्या चांडाळाच्या पापी इच्छेला बळी पडूं ?

मॅने०—होय. तेंच मीं मघांपासून सांगतों आहें !

मी:—पापी राक्षसा, तूं शुद्धीवर आहेस का ?

मॅनेजर:—मुळींच नाहीं. असलें कांहीं करावयाचें असलें म्हणजे मी शुद्धीवर असत नाहीं ! मी अशा वेळीं तयारीनेंच असतों ! शुद्धीवर असल्यावर माझ्यांत ताकदही असत नाहीं, आणि युक्तीही सुचत नाहीं ! माझ्या इच्छेच्या, मनाच्या, निश्चयाच्या आड येणाराला धुळीला मिळवितांना जाणूनबुजून मी गैर शुद्धीवर राहतों !

मी:—छात्‌ ! माणूसकीचा गळा दाबणाऱ्या सैताना-चांगली तुझी तयारी असते–आहे म्हणावयाची ? आजवर असें काय आणि किती अमानुष अत्याचार केले असशील ?

मॅनेजर:—पुष्कळ ! पुष्कळ आजपर्यंत केले आहेत ! आतां सांगतों तुला वाटेल तर नव्या गोष्टी ! केवळ तुझ्यापायींच काय केलें आहे तें ? तुझ्याचपायीं तुझ्या संतूला आजची वेळ प्राप्त झाली आहे ! त्या स्थितींत मलाच त्याला घालावें लागलें आहे ! तुझ्याबद्दलची माझी मागणी त्यानें फेटाळून लावली नसती–माझ्या इच्छेच्याविरुद्ध मजुरांचा पुढारी झाला

नसता–संतूनें माझी मानहानी करून माईजवळ आपलें वजन वाढविलें नसतें, तर सुगंधा, तुझ्या भावावर आजच प्रसंग खात्रीनें आला नसता-मी आणला नसता ?

मीः—काय म्हणतां ? काय सांगतां ?—

खुशालचंद—अगदीं खरें तेंच सांगतों ! आणि तें एवढ्याचसाठीं कीं, यापुढें तूं आपला हलकट हट्ट सोडून देऊन माझ्या इच्छेला मान द्यावास म्हणून ?—सुगंधा, आणखी ऐक ! माझ्या प्रत्येक लहानमोठ्या इच्छेच्या आड संतू आला, म्हणून जसें मी जन्माच्या मोलाचें प्रायश्चित संतूला भोगावें लागलें—तसेंच, इच्छारामशेटजीनें, त्यांचा जन्मभर मी फायदा करून देत आलों असतांनाही—शेवटीं, संपाच्या वेळीं संतू-लाच मान दिला ! संतूजवळ माझी मानहानी केली—माझी मॅने-जरची जागा संतूला देऊं केली—मला पशूंत काढलें—मला पाडलें, संतूला चढवलें—त्याचें प्रायश्चित इच्छारामभाईला जागच्याजागीं मीं त्याच्यावर पिस्तूल झाडून द्यावयाला लावलें आहे ! समजलीस ! माझ्या तावडींत सांपडतांच, एका पिस्तुलानें शेटजी, आणि संतू, यांना उड-विलें ! पुन्हां अशा शिताफीनें कीं, त्यांना पत्ता ना मुद्दा ! देव कांहीं करीत नाहीं—करणार नाहीं—केलेंही नाहीं! तुझ्या संतू , कायदा पर-स्परच आहे. फांसावर लटकावितो आज असा मी डेंजरस माणूस आहें !

पापाला वाचा फुटली होती ! भरभर पाप पापी कृत्यें ओकीत सुटलें होतें ! पण त्याचा उपयोग काय होता ? माझ्यापुढें–माझ्या बिऱ्हाडीं–दाराला बोलट कडी लावून तें बाहेर येत होतें !

" आणि आतां जसा मी पूर्ण गैरशुद्धी आलों आहें ! तसाच त्यावेळीं पिस्तूल झाडतांना पूर्ण गैरशुद्धींतच होतों समजलीस ? त्याशिवाय त्या बंगल्याच्या अवघड ठिकाणीं चढतांच आलें नसतें मला !—कीं खिडकीबाहेर उभें राहतां आलें नसतें ! कीं, गैरशुद्धींत नसतों, तर शेटजींचें आणि संत्याचें बोलणें ऐकून चिडलों होतों तरी शेटजीवर ऐन-वेळीं पिस्तूल झाडून–तिथें अगदीं संत्याच्या पायाजवळ पिस्तूल फेंकून बिनबोभाट–कोणी पाहण्याच्या आंत तिथून शुद्धीनें निसटतां आलें नसतें ! आतां जसा सुरवातीला शुद्धीवर आलों, म्हणूनच सामोपचारानें बोलत

होतों—तसा, त्या दिवशीं ( शेटजींच्या खुनाच्या रात्रीं ) संतूच्या साथीदारांनीं मजुरांनीं शेटजींच्या बंगल्याच्या बाहेर मला गराडा घातला होता तर गैरशुद्ध व्हावयाचा होतों म्हणूनच त्यांच्या हातून सामोपचारानेंच सुटलों !—पण शुद्धींत आल्यावर 'शेटजी आणि संतू' माझ्या पिस्तुलाला बळी पडले—तसेंच आतां मी पूर्ण गैरशुद्धींत आहें—-या वेळीं तुला माझ्या इच्छेला बळी पडल्याशिवाय तुझी सुटका नाहीं !! माझ्या गैरशुद्धीचा प्रभावच आहे हा !! आतां माझ्या आड कोण येणार आहे ? तुझ्यावर प्रेम करणारा बावळट बहाद्दर प्रेचचंद तुझ्या माझ्या लग्नानंतर माझ्यावर रागावेल—मला मॅनेजर ठेवणार नाहीं—पण मी त्याचा कांटा त्याच्या बापासारखाच एक दिवस असाच बिनबोभाट सफाईनें काढून टाकीन !! समजलीस !! चल. फार उशीर झाला ! मला जास्त बोलायला लावलेंस ! यापेक्षां मी जास्त गैरशुद्ध झालों म्हणजे आणखी भलतेंच कांहीं—आणि याच वेळीं करीन !" असें म्हणून तो उलट्या काळजाचा सैतान माझ्याजवळ आला—आणि त्यानें माझा हात धरला ! "निर्वाणीच्या पांडुरंगा धांव आतां !" देवाचें नांव या वेळींच मला न कळत आठवलें !! खरोखरीच निर्वाणीची वेळ ती !! आणि ती पांडुरंगाला एकच माझी हांत पण ऐकावयाला गेली !


त्या सैतानानें माझा हात धरला ! आणि दारावर कुणी जोरानें थाप मारली !!

"कोण आहे ?" मॅनेजर चिडून माझा हात न सोडतांच ओरडला रत्नूला या वेळीं कसें सुचलें कोण जाणें ! त्यानें धांवत जाऊन दाराची कडी आणि बोलट काढला ! आणि दार उघडलें तों दारांत बबूताई बॅरिस्टर प्रेमचंदभाई, पोलिस सी. आय. डी. इन्स्पेक्टर सर्व जण आंत आलीं ! खुशालचंदानें माझा हात सोडला ! त्याचा हात आपोआप गळूनच पडला !

"तुम्हीं माझ्या स्वाधिन झालें पाहिजे." सी आय डी इन्स्पेक्टरनें ऑर्डर दिली !

मला कोर्टांत नेण्याकरितां, बबूताई, भाई, बॅरिस्टर, वगैरे मंडळी मोटार

घेऊन आली होती. इन्स्पेक्टरसाहेबांचा मनुष्य खुशालचंदाच्या पाळतीवर दाराच्याबाहेर उभा होता, त्यानें वर येणाऱ्या मंडळींला खूण केली, व हलकेच सांगितलें. त्यामुळें बाहेरची मंडळी स्वाभाविकच आंतील संभाषण सर्व ऐकतच होती. ती वर म्हटल्याप्रमाणेंच ऐन वेळीं आंत आली. मॅनेजर गिरफदार झाला; व आम्हीं प्रेमचंदभाई, बहुताई, मी रत्नु, एका मोटारमध्यें, व खुशालचंद सी. आय.डी इन्स्पेक्टर, व बॅरिस्टर दुसऱ्या मोटारींत चढले !! कोर्टाकडे मोटारी फुलस्पीडनें निघाल्या.



# प्रकरण १९ वें

## कोर्टांत सुटका !

कोर्टाच्या कामाला रीतसर अकरा वाजतां सुरवात झाली ! पहिलीच केस दादाची निघाली ! केस पाहायला खूप गर्दी होती ! केसचें स्वरूप विलक्षण–गुंतागुंतीचें–असें जरी नसलें, तरी मजुरांच्या संपाच्या धामधुमींतली केस असल्यामुळें भांडवलवाले आणि मजूर यांच्यामध्यें या केसला बरेंच महत्त्व आलें होतें ! भांडवलवाल्यांना दादाच्या केसमुळें बरेच बूरें उद्योग करण्याची संधि मिळाली असून, मजुरांनीं इतक्या पद्धतशीर रितीनें संपाची वावटळ उठवून धोरणानें, मुत्सद्दीपणानें शहाणपणानें चळवळ चालवून यशस्वी करीत आणली होती— नव्हे केली होती, इतक्यांत अचानक हा प्रकार घडला होता. संपाच्या धामधुमींत दादाचें नांव पुढें आलें. त्याच्या कर्तबगारीची वाखाणणी झाली ! एकाद्या ताऱ्यासारखाच 'चक्कन्' दादा एकदम चमकला. मजूरपक्षांत दादाची चांगलीच बोलबाला होऊन छाप पडली ! इतक्यांत दादावरील संकटानें मजुरांचे हातपाय मोडून पडले ! आज कोर्टांत दोन्हीं पक्षाचे लोक 'केस' ऐकावयाला, खूप आले होते ! मजूर दादाला खुनी म्हणून पकडलेलें कळतांच हातपाय गाळून बसले होते ! आपण केलेली चळवळ, सोसलेले हाल, केलेले कष्ट सारीं मातीला मिळून सोसत आलों त्यापेक्षां, अन्याय जुलूम, आणि दारिद्र्य या पेक्षांही अधिक भांडवलवाले सोसायला लावणार –असें मजूरवर्ग पुरेपूर कळून चुकला होता ! दैव व देव अजून आपल्याला अनुकूल नाहीं ! म्हणून आपल्या नशीबाला दोष लावून आगामी अनेक आपत्तीशीं अनुकूल कालाच्या प्राप्तीपर्यंत झगडत राहिलेंच पाहिजे म्हणून मनाची तयारी करीत निःस्तब्ध दिसावयाला लागला होता.

कोर्टाच्या कामाला रीतसर सुरवात व्हावयाला अगदीं थोडा अवकाश होता. दादाची आज कच्ची चौकशीच व्हावयाची होती. दादाच्या बाजूची हकीकत, व पोलिस अधिकाऱ्यांनीं मिळविलेली हकीकत, ही

पुढें येऊन केसचें स्वरूप निश्चित व्हावयाचें हेंच आजच्या दिवसाचें काम ! दादाला आरोपीच्या पिंजऱ्यांत आणून उभे करण्यांत आलें. पहिलीच केस, दादाची निघाली. चौकशीच्या सुरवातीलाच आम्हीं कोर्टांत दाखल झालों होतों. गडबड एकसारखी चालली होती. हायकोर्टचा हेडसायलेन्सर "शूः चॉप" शब्द उच्चारण्याची डयूटी व्यवस्थितपणानें बजावीत होता. बॅरिस्टर बी. सदाशिवराव आपल्याजागीं गेले. मी, बबूताई, भाई, आम्हांला दाखविलेल्या जागेवर जाऊन बसलों. खुशालदाला इन्स्पेक्टरसाहेबांनीं गिरफ्दार केल्यामुळें त्याचें तोंड उतरलें होतें. त्याला इनस्पेयटरसाहेबांनी जिथें बसावयाला सांगितलें होतें, तो तेथें बसला होता. त्याची कदाचित् 'अबलेवर बलत्कार' करण्याच्या अपराधाकरितांच आपल्याला इन्स्पेक्टरसाहेबांठीं अशी तंबी दिली असावी, एवढेंच तो समजत असेल, असें त्याच्या त्याही स्थितींत घमेंडखोर चेहऱ्यावरून, व दादाकडे पाहाण्याच्या त्याच्या तिरस्कारपूर्ण दृष्टीवरून कोणालाही वाटण्यासारखें होतें.

"आतां काय होतें ?" या कल्पनेनें बबूताईचा व माझा जीव खालींवर होत होता. दादाकडे आम्हीं करुणापूर्ण नजरेनें पहात होतों. दादा निश्चल, निर्विकार गंभीर दिसत होता ! त्यांतच ताई 'दादा सुटणार' म्हणून मला धीर देण्याचा व स्वतःला घेण्याचा प्रयत्न करीत होते. सी. आय्. डी.च्या इन्स्पेक्टरसाहेबांची मुद्रा जशी नेहमीं–गंभीर–खोल–चौकस खोंचक दिसावययाची, तशीच दिसत होती, म्हणावयाला हरकत नाहीं. पोलिस इन्स्पेक्टरांची ठरावीक धांवपळ चाललीच होती. मजुरांच्या जमावांत, त्वेष, उदासपणा, दुःख, इत्यादिकांच्या लाटा दृग्गोचर होत असत, तर इकडे भांडवलवाल्यांच्या जमावांत बेफिकीरी, उद्दामपणा, असल्याचा भास होत होता ! 'भाई'कडे सूक्ष्मपणें पाहिलें, असतें, तर, 'संतूदादा' केव्हां आपण सुटलेला पहातों, असें त्याला झालें आहे असें दिसलें असतें असो.

कोर्ट येऊन स्थानापन्न होतांच चोंहोकडे शांत झालें. कामाला सुरवात झाली. केस सुनावणीला निघतांच पोलिस इन्स्पेक्टरांनीं खुनाच्या वेळीं सांपडलेलें पिस्तूल पुढें आणिलें, आणि संतुदादाच्याबद्दलच्या संश-

याची कारणें मांडण्यांस सुरवात केली. त्यांचें पहिलें बोलणें संपतांच सी. आय. डी. इन्स्पेक्टरांनीं आपल्या जवळच्या कांही जिन्नसा बाहेर काढल्या–मजूर मंडळींतील आठदहा इसम एक बाजूस काढले. आणि स्वतः उभे राहून कोर्टाला सांगितलें.

" इच्छारामभाई शेटजींचा खुनी संशयी म्हणून जरी संतुरामाला प्रथम पकडून अटक करण्यांत आली, तरी आतां आमच्या हातांत 'खरा' खुनीच पत्त्यामुद्यासह लागला आहे ! " एवढें सांगतांच प्रेक्षकसमुदायांत एकच खळबळाट उडाला ! ' मजुरांना आपला पुढारी सुटणार म्हणून जितका आनंद झाला, तितकीच उत्सुकता ' खराखुनी ' कोण ? ऐकण्याबद्दल, व पाहण्याबद्दलही वाढूं लागली.

" खरा खुनी–" इन्स्पेक्टर बोलूं लागेल, " इच्छारामभाई मिल्स-चे हे खुशालचंद मॅनेजर आहेत, अशी आमची पूर्ण खात्री झाली आहे. या बाबतींत, संतुरामाची बहिण, खुशालचंदाचा बॉय, त्यांच्याच गिरणींतले १०।१२ मजूर, यांना साक्षिदार म्हणून पुढें आणीव आहों. आणि आरोपीचीं कांही कृत्यें आणि भाषा, स्वतः मी पाहिली, व ऐकिलीही आहेत ! "

' खुशालचंद खुनी ! खुशालचंद खुनी ! संतुराम निर्दोषी ! संतुराम निर्दोषी! 'असा एकच गलगला झाला ! सायलेन्सरला शांत करतांकरतां नाकी नऊ आले.

खुशालचंद काळा ठिक्कर पडला, त्याला इन्स्पेक्टरच्या ऑर्डरीनें केव्हांच पोलिसांच्या ताब्यांत जावें लागलें होतें !

झालें. केसचें स्वरूप सुरवातीस असें अचानक बदललें ! नंतर व्यवस्थितपणानें 'खुशालचंदा'वर खटला भरण्यांत येऊन–दादाची सुटका त्याच दिवशीं इन्स्पेक्टरसाहेबांनीं कोर्टाकडूनच रीतसर करविली !

× × ×

आम्हां सर्वांला अत्यंत आनंद झाला ! दादा आमच्यांत येऊन मिसळला ! मजुरांनीं 'दादा'चा एकच जयजयकार केला ! मजूरपक्षांतील कित्येक कार्यकर्ती माणसें गर्दीतून पुढें घुसून दादाला येऊन भेटली. सर्वांनीं दादाचें अभिनंदन केलें. दादाच्या सुटकेबद्दल मजूरपक्षांत ठिक-

ठिकाणीं पानसुपाऱ्या, अभिनंदनार्थ जाहिरसभा, व्याख्यानें, यांची मारें सर्व मुंबईत आठवडा दीड आठवडा झोड उडून राहिली ! निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून खटल्याविषयींची विविध मनोरंजक हकीकत, दादाचें स्वागत, मजूरपक्षाचें अभिष्टचिंतन, यांनीं कॉलमच्या कॉलम भरून जात होते.

\+ \+ \+

खुशालचंदच्या पुढील हकीकतींची आतां आपल्याला फारशी जरूरी नाहीं. बॉय, मी, मजूर यांच्या साक्षी, रत्नुच्या हातांत मॅनेजरच्या शर्टचें सोन्याचें त्याचें नांव असलेलें बटण, व स्वतः सी. आय. डी. इन्स्पेक्टरनीं स्वतः ऐकलेलें पाहिलेलें त्याचें घाणेरडें कृत्य—या सर्वांनीं खुशालचंदाच्या बाबतींत जें योग्य तेंच केलें इतकें सांगितलें म्हणजे पुरें !

\+ \+ \+

आतां भांडवलवाल्यानीं मजुरांच्या संपाचा निकाल जाहिर केला ! निकाल काय इच्छारामभाईनीं दादाजवळ अगोदर सांगितला होता तोच होता. मजुरांच्या दोन अटी—पगारवाढ, आणि बोनस, या अटी मान्य करून कमी तासाच्या मापणीचा पुढें मागें लवकर विचार करूं म्हणून आश्वासनही मिळालें होतें ! ! ! आणि मजुरांनीं कामावर रुजूं व्हावें; म्हणून सामोपचाराच्या भाषेंत जाहीर झालें ! मजूर कामावर रुजूं व्हावयाला लागलें असून गिरण्याच्या कामाची सुरवात अगदीं धूम–धडाक्यानें व्हावयाला लागली !

लवकरच भाई मिलओनर्स—असोशिएशनचे अध्यक्ष झाल्याचें जाहिर झालें. दादाकडे अर्थातच भाईच्या कृपेनें म्हणा कीं, त्यांच्या आजवरच्या थोड्याच दिवसांतल्या पण अतिशय महत्त्वाच्या यशस्वी कार्यामुळें, म्हणा, कीं त्याच्या ठिकाणच्या उपजत हुशारीच्यामुळें समजा, बरीच गिरण्यांच्या सृष्टींत महत्त्वाची कामगिरी मिळाली.

आम्हीं दत्तासाहेबांची जागा सोडून दिली. आणि बबूबाईच्या बंगल्यावरच राहावाला गेलों. बबूताई कांहीं केल्या ऐकेचना. आणि आम्हांला दुसरे ठिकाणीं राहूं देईना !

संकटाचे राक्षसी काळेकभिन्न मेघ वितळून जाऊन दादा आपल्या चारित्र्यानें पवित्र्यानें पोर्णिमेच्या पूर्ण चंद्राप्रमाणें, धवल यशानें प्रेमळ, स्निग्ध, आचरणानें समाजांत तळपूं लागला! प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर देऊन परिस्थितीलाच छिन्नविच्छिन्न करून टाकलें. कुठल्याही कठीण परिस्थितीच्या आहारीं दादा गेला नाहीं! तर परिस्थितीलाच आपल्याकरितां त्यानें बदलावयाला भाग पाडलें!

दादाशिवाय भाईचें पान हालेना, आणि भाईशिवाय दादाला क्षणभर चैन पडेना. बबूताई–आणि मी–आमचें साम्राज्य तर काय विचारावयालाच नको! रत्नूची खरी गम्मत! आम्हां दोघीला जितका वैताग आणण्याची पाळी आणी तितका जरी दादा व भाई यास नसे, तरी त्यांचा पिच्छा पुरविल्याखेरीज सोडीत नसे! दिवसभर हंसे काय, नी खिदळे काय? एकाद वेळीं ' त्याचा जास्तच उच्छाद वाटला, तर मी त्याला धाक दाखविण्याचा आव आणी, पण हेंही बबूताईला किंवा भाईला खपत नसे!–' असूं दे ग मूलच आहे. चालायचेंच एवढाही दंगा त्यानं करायचा नाहीं तर काय आतां आपण करायचा?"

एकंदरींत दादाची उजळमाथ्यानें कोर्टांत सुटका झाली, आणि आमच्या आयुष्यक्रमाची दिशा एकदम बदलली! सूनाच्या वृथारोपापासून दादा सुटला नसता तर आम्हां सर्वांच्याच आयुष्याची इतिश्री झाली होती म्हणण्याची! पण ईश्वराच्या मनांतून आम्हांला कांही निराळेंच दाखवावयाचे होतें यांत शंका नाहीं!

## प्रकरण २० वें

# ऋणानुबंध.

जशीं आजवर आमच्या आयुष्यांत संकटें येतां येतां अगदीं परमावधी झाली तशीच आमच्या सुखाला सुरवात होतां होतां–आमच्या कल्पनेचा प्रांत आम्हांला मिळणाऱ्या सुखांनी केव्हांच ओलांडला ! 'आतां कीं घटकेनें सर्वस्व नाश होतो आहे–असा काळ गेला, तर आतां सुखाच्या संबंधांत, एकाहून एक अशीं विलक्षण स्त्यंतरें दर घडीला आमच्या आयुष्यांत घडत चाललीं होतीं !

आमचा आयुष्यक्रमच विलक्षण योगायोगानें भरलेला होता, यांत शंका नाहीं ! वाईटाच्या वेळीं वाईटाचा कळस करणारे जसे योगायोग होते–तसेच त्याच्या अगदीं उलट स्थितींत असतांनां तसेच योग पाव-लागणीके येत असत !

अशाच योगांपैकीं आमचा योग–म्हणजे आतां या योगाची हकीकत सांगायलाही मला लाज वाटत आहे ! हा योग कोणत्या भाषेंत सांगावा, याची मला पंचाईत पडली आहे ! म्हणजे मला माझी योग्य मर्यादा राखून सांगतां येईल, आणि सर्वांना स्पष्ट कळेल !

" हो ! विलक्षण योग म्हणजे असा. आतां आम्हीं पूर्वींच्याच सारखे राहिलों नव्हतों ! अशाच कांहीं दैवी घटनेनें–अदृश्य आकर्षणानें, बबू-ताई, आणि मी नुसत्या मैत्रिणी- मैत्रिणीच राहिलों नव्हतों ! तर एक-मेकींच्या वहिनी झालों होतो !! संतुदादाला पहिल्याप्रमाणें मी हांक मारतें तशी बबुताईला हांक मारतां यायचे बंद झाले होतें; तर तिच्या बंधूराजांचें—हश्च ! हे म्हणतांना देखिल आतां मला लाज वाटते, आणि जीभ अडखळते आहे !--मी नांव घेत नव्हते !

बबूताई दादाच्या भविष्याची भाग्यदेवता बनली होती, तर तिकडच्या पदरीं पडून मी पवित्र झालें होतें !!

दादा बबूताईला, पहिल्याप्रमाणें आतां कसा हांक मारणार ! 'अग जाग' देखील तो आर्धी म्हणावयाला फारसा धजत नसे ! आतां तो बबूताईला "श्रीमंत" म्हणून हांक मारी ! आणि तिकडून मला नुसतेंच "अहो," म्हणावयाचें होई !

आमच्या आयुष्याच्या सुखाचा प्याला भरून त्याचा फेस भराभर उसळत होता ! आमच्या या पूर्ण सुखांत केव्हां, कधीं, कांहीं वैगुण्य वाटलें तर, आमची आई, आणि बबूताईचे 'बाबा' आम्हांला या स्थितींत पहावयाला नाहींत हेंच !

आम्हीं सगळेजण एके ठिकाणीं बसून हंसत खेळत असतां, मध्येंच असा विषय निघाला कीं, तत्क्षणीं आम्हांवर रम्य अशी उदासीनता येई !

एक दिवस आम्हीं सगळीं बंगल्यांतल्या बागेंत-बबूताईनें तयार केलेल्या-बागेंत खुर्च्या टाकून बसलों होतों ! सूर्योदय नुकताच झाला होता. त्याचीं सोनेरी किरणें बंगल्यावर, फुलांवर, वेलिंवर, कारंजावर पडून चोहींकडे सुन्दर सौंदर्याचा विहार नेत्रांना दिपवीत होता-मनाला आल्हादवीत होता-स्फूर्तीला उत्साह देत होता ! फुलें हंसत होतीं ! लता मंदवायु लहरींनीं प्रेमभरानें डुलत होत्या ! नीलाकाशांत पांखरें उडत होती ! जणूं काय आमच्यावर त्या मंगलमय प्रातःकाळीं आकाशांतून दिव्य देवता फुलेंच उधळीत होत्या ! आमचा बंगला-हो आतां आमचा होता तो-बराच उंच असल्यानें बागेंत बसलें म्हणजे समुद्रशोभा सहज दिसे ! या वेळीं भरतीची वेळ होती ! समुद्राच्या चढत्या लाटांची वाढती शोभा, आमचें लक्ष आपल्याकडे आकर्षण्याचा प्रयत्न करित होती !

बबूताई आपलें रेशमी-अस्मानी पातळ नेसली होती, मी माझें मोतिया रंगाचें पातळ परिधान केलें होतें.दोघींच्याही बुचड्यांत आमच्या त्या बागेंतलींच गुलाबाचीं सुंदर फुलें येऊन बसलीं होती !

आमचें सकाळचें चहापान इथेंच आज झालें ! सकाळचीं वर्तमान पत्रें इथेंच पाहिलीं.

"दादा," तिकडून दादाला 'दादाच म्हणायाचा परिपाठ पडला होता. दादाही भाई म्हणूनच हाक मारी. तिकडून दादाला म्हणायचें

झालें! "तुमचें सारें Life मोठें क्युरीअसच झालें नाहीं! तुमचें चरित्र तर लिहिण्यासारखें आहे!"

"मग लिहावयाचेंच आहे नाहीं तरी! ताईनें लिहावयाला सुद्धां सुरवात केली आहे! किती ग झालें आहे?" बबूताईनें माझ्याकडे वळून विचारलें!

"अजून तुम्हीं एकमेकींना पहिल्याच नांवानीं हांका मारतां का? वहिनी–वहिनी नाहीं का म्हणत?"

"तें जातच नाहीं! भारी घोंटाळा होतो!" बबूताईनें सांगितलें, "भाई. ताईच्या चरित्रांत, आपण सगळे येतों आहोंत!"

"येणारच! तुझें तर 'नायिका' म्हणूनच त्यांत महत्व असेल!" तिकडून म्हणायचें झालें.

"यांत काय संशय!" दादा म्हणाले!" माझीं बहीण माझें चरित्र लिहिणार--म्हणजे मला नायक म्हणूनच रंगविणार! अर्थात् 'श्रीमंत'च नायिका! शिवाय त्यांत वावगेंही कांहीं नाहीं! 'नायिके'चीं कार्यें यापेक्षां काय जास्त असतात? 'नायिका' 'नायकासाठीं आपला प्राण हरघडी धोक्यांत घालते--आणि देते शेवटीं! 'श्रीमंतां'नीं तसेंच नाहीं का केलें? त्यांनीं आपला मजसारख्या मजुराच्या स्वाधीन आपला प्राण सुद्धां दिला! 'ताई, या दृष्टीनें श्रीमंताच्या वर्णनांत उणेपणा ठेऊं नकोस अं! आमचें काय? आम्हीं बोलून चालून मजूर!"

"हं! श्रमिंत मजूर असा उल्लेख केला म्हणजे झालें!" स्वारी उद्गारली!

"तें ही कांहीं चुकीचें नाहीं· दादा बबूताईला श्रीमंत म्हटलेंच नाहीं तरी!" मी म्हटलें!

"हो, ताई, माझा देशभक्त म्हणून ठिकठिकाणीं उल्लेख कर बरें का?"

"ताई, बाकी आपलें म्हणजे खरें म्हटलें तर आपणां सगळ्यांचेंच चरित्र लिहावयाला, आपण हे दिवस पाहिले म्हणूनच कांहीं तरीं हें झालें, नाहीं ताई? बबूताई म्हणाली!

" तर ! यांत काय शंका आहे काय ! " ताईनें आपलें चरित्र लिहिण्यासाठींच तर इतकें हें घडून आलें ! मी फांसावर चढतां चढतां थांबलों कशासाठीं ? ताईच्या चरित्र लेखनासाठीं ? नाहीं तर ताईनें माझें चरित्र असें अपुरेंच कसें लिहिलें असतें ! बाकी, जगांत कसाही प्रसंग घडो, लेखकाच्या तो उपयोगीच ! आतां, आमची आई मेली, ती ताईच्या लेखनासाठीं, शेटजींचा खून झाला—गोष्ट वाईट खरी—पण तेंही ताईला लेखनाकरितां उपयुक्तच ! मी फासांवर गेलों असतों, तरी ताईला पाहिजेच होतों—म्हणजे ताई, भलता अर्थ घेऊं नकोस !—लेखकाच्या दृष्टीनें मी बोलतों आहे हें !-तसेंच आपल्या या ऋणानुबंधनाची कादंबरी लिहावयाला तिला चांगलाच मसाला मिळाला आहे ! नाहीं—आपल्या खुशालचंदाला तर ताई चांगलीच रंगवील—आणि ती स्वतःलाही पण तशीच रंगवून घेणार आहे !" दादाच्या या बोलण्यानें आम्ही सर्वत्र पोट धर-धरून हंसलों !

" पण ताई, " दादा किंचित् गंभीर होऊन म्हणाला " तूं आपल्या लिखाणाला नांव काय देणार आहेस ?"

" तिनें ' विलक्षण योगायोग ' असें नांव दिलें आहे " ताईनेंच सांगितलें !

" छेः ! हें कसलें जुनें पुराणें नांव ?—मला विचारलेंस तर मी सांगेन मलाच त्यांत ' नायक ' केला आहेस ना ? मग तुझ्या लिखाणाला नांव मी सांगतों—"मजूर" असें दे !--

" छान आहे हें नांव ! " ताईचा व तिकडचा एकच उद्गार आला !

रत्नू अशा वेळीं आमच्यांत कधीं बसावयाचा नाहीं. बागेंत झाडा-फुलांतून हिंडत असायचा !

आम्हांला आतां अशा प्रत्यही सुन्दर—काव्यमय नवजीवनमय, प्रातःकाळाचा लाभ होऊं लागला होता !

बबूताई—मी देहानें भिन्न पण मनानें एकच होतों ! दादा व स्वारी यांचेंही तसेंच झालें होतें !

बबूताईनें आम्हांला हे दिवस दाखविले होते! आईचा आशिर्वाद, आणि शेटजींचे सद्धेतू पूर्ण फळास आले! आमचें सर्व रीतीनें मंगलच होत होतें!

अशाच एक दिवस सकाळीं बागेंतल्या बैठकींत, दादानें, स्वारीच्या सहाय्यानें—सल्ल्यानें, आणि मदतीनें आपल्या जन्मभूमीच्या जिल्ह्यांत--सातारा जिल्ह्यांत–बबूताईच्या आईच्या नांवची " आनंदी--शुगरमिल " आणि स्वतःच्या वडिलांच्या नांवची--त्यांच्या महत्वाकांक्षेचें द्योतक म्हणून--' विनायक--पेपर--मिल ' काढून आपलें कार्यक्षेत्र विस्तृत लवकरच करणार असल्याबद्दल गोड हृद्गत आम्हां सर्वांना सांगितलें!

आम्हां सर्वांना दादाचें हृदगत् ऐकून अत्यंत आनंद झाला!!

\+ \+ \+ \+

प्रिय वाचक, बंधुभगीनी, आमची कहाणी आज इथेच संपली. या नंतर दादाच्या ' आनंदी शुगरमिल ' आणि ' विनायक पेपर मिल'च्या स्थापनेच्या भरभराटीच्या वाढीच्या, त्यावरील अडचणींच्या, आणि त्या सर्व वेळीं आमची बबूताई दादाला कशी सहाय्यक झाली, आणि ' उद्योग, उत्साह, आत्मोन्नती, आणि आनंद ' यांची कशी लयलूट केली, ही लवकरच सांगण्यासाठीं भेटण्याचें अभिवचन देऊन आतां आपला सर्वांचा प्रेमाचा निरोप घेतें!

---

**यत्कृतं यत्करिष्यामि तत्सर्वं न मया कृतं।**
**त्वया कृतं तु फलभुक् त्वमेव मधुसूदन॥**



# भावंडांच्या भेटी.

**कुलाब्याची दांडी**—( लेखक प्रो. ना. सी. फडके एम्. ए. प्रकाशक:- विजय साहित्य माला, पुणें शहर ) " ......कॉलेजांतलें आयुष्य......ह्मणजे तरुण विद्यार्थ्यांच्या मार्गांत कोणते धोके व त्यामुळें केवढा नाश होण्याचा संभव असतो, **याचें नमुनेदार चित्रच** हें पुस्तक आहे, असें पुस्तकांतीलच एका जबाबदार पात्राकडून कर्त्यांनीं वदविलें आहे. आणि तें अगदीं खरें आहे, असें आमचें ठाम मत आहे. प्रो. फडक्यांनीं आपल्या 'जगदीश' ला कॉलेज-लाईफ मधील मजेदार कहाणी सुन्दर रीतीनें सांगावयाला लावली आहे.

**कै. श्री. रमाबाई रानडे**—( हिंदमहिला पुस्तकमाला, पुष्प १ लें. लेखक **उमाकांत.** प्रकाशक, वि. प. नागपूरकर-हिंदमहिला कचेरी, मुंबई नं. ४) महाराष्ट्र-महिलांची आदर्शमूर्ति ह्मणजे कै. श्री. रमाबाई रानडे. यांचें छोटें-कांहींसें त्रोटकच 'चरित्र' उमाकांतांनीं, आपल्या सरळ, सरस, आणि तळ-मळीच्या भाषेंत रंगविलें आहे. श्री. उमाकांत यांनीं कै. श्री. रमाबाई रानडे यांचें चरित्र लिहून महाराष्ट्र महिलांना, **मुलगी, बहिण, जाऊ, नणंद, मैत्रिण, धनीण, सासू, आई** कशी असावी, आपण तसें कसें व्हावें, याबद्दल विचार, उत्कंठा व कळकळ उत्पन्न करण्यास भाग पडेल अशी महत्वाची कामगिरी बजावली आहे. या चरित्राचें सान्निध्य प्रत्येक स्त्रीस भूषणास्पद आहे, यांत मुळींच शंका नाहीं.

**गीत द्विदल**—( कवयित्री व कवि श्री. कमलाबाई देशपांडे, व श्री. यशवंत. ) श्री. कमलाबाई यांच्या कविता अंतःकरणाला चटका लावणाऱ्या आहेत, तरी त्यांतल्यात्यांत, ' बालकाकडे पाहून ' ' जीवितकोडें ' ' तल्लीनता ' या नितांत रमणीय, खऱ्या जिव्हाळ्याच्या, आणि जिवंत उमाळ्याच्याच आहेत. श्री. कमलाबाई या एवढ्याच कविता लिहून बसल्या तरी त्या श्रेष्ठप्रतीच्या कवयित्री अजरामर म्हणून रहावयाला सर्वस्वी योग्य आहेत ! कवि यशवंत यांची कविता नवमतवादी, नवशब्द व कल्पनांची भुकेली, व सृष्टीसतीच्या सह-वासांत काल कंठूं इच्छिणारी, अशी दिसते. ' गीतद्विदला ' च्या शुद्ध, सात्वीक, साध्या, रमणीय अंतरंगाला जरा विसंगतच असें पुस्तकाचें बाह्यांग वाटतें ! अंतरंगींच्या साधेपणाला बाह्यांगाचा इतका भपका नसता तर चाललें नसतें का ?

**दुटप्पी कीं दुहेरी**—( लेखकः-गुरुवर्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर प्रकाशक-गो. गो. अधिकारी, सारस्वत प्रसारक मंडळ पुणें शहर. ) गुरुवर्यांचें हें नूतनापत्य, कवि, कादंबरीकार, नाटककार, टीकाकार, निबंधकार,—किंबहुना कोणाही सरस्वतीचा सेवक होऊं इच्छिणारांस गुरुस्थानीच शोभेल असें आहे. संपादक हरिहरराव, व संपादिका चंद्रिकाबाई—या मंडळींच्या संगतींत आपण असतांना ' वस्तुस्थिती ' च्या रखरखीत वाळवंटांत असली मंडळी आढळत नाहींत म्हणून मनाला हें Real नाहीं असें वाटून खिन्नता यावयाची, परंतु तसें न होतां, अशी मंडळी आपल्याकडे पुष्कळ असावी, आपणही तसें असावें-व्हावें इतकें वाटावयाला लावण्याचें सामर्थ्य हरघडी असल्याचा प्रत्यय येतो. ' दुटप्पी कीं दुहेरी ' ही खरी कादंबरी नव्हे कीं खरी गोष्टही नव्हे—परंतु उत्कृष्ट वाङ्मय निर्मिति कशी होईल, याचीं निरनिराळ्या अंगांची सूक्ष्म-भारदस्त चौकस, व्यापक चर्चा आहे. असें असलें तरी ही चर्चा कादंबरी घाटांत बसविली आहे, गोष्टीच्या वेशांत नटविली आहे. आणि सुभाषित, विनोद, अलंकार, काव्य, कोट्या, कल्पना या सर्वांची अथपासून इति-पर्यंत नुसती खैरात करून सांडली आहे ! साहित्य सेवेची शक्ति आपल्याजवळ उपजत असल्याचें ज्यांना समजलें आहे, व तत्प्रीत्यर्थ तपश्चर्या करण्याची ज्यांना इच्छा सवड, सामर्थ्य, व संकल्प आहे, त्यांनीं दुटप्पी कीं दुहेरी अष्टौप्रहर हृदयाशीं, घट्ट धरलें पाहिजे

**सुनीतावलिः**—( लेखक व प्रकाशकः- गो. गो. अधिकारी, सारस्वत प्रसारक मंडळ पुणें शहर. ) सुनीत हा जो एक काव्य प्रकार मराठी काव्यांत आतां बरीच भवतीनभवती होऊन, आणि यथास्थित साधकबाधक चर्चा होऊन दृढमूल होण्याच्या मार्गास लागला आहे, त्या ' सुनीत ' विषयीं स्वमत प्रतिपादनाची साधार, युक्ति-जुक्तीला पटवून देण्यासारखी रा. गोपाळरावांनी सुन्दर प्रस्तावना जोडली असून ' सुनीताची ' ' **थिअरी** ' एकवास ' सुनीतें ' लिहून ' प्रॅक्टिकल' करून दाखविली आहे."रायगडावर काय आहे ?" तो अस्पृश्यमाला ' ताजमहाल आणि यमुना ' 'एक स्मृती' ' मार्गप्रतिक्षा ' ' एक प्रसंग ' ' रसिकास—' आणि ' मी आज निराशापुजतों ' हीं सुनीतें **विशेषच** चटका लावणारीं, तशींच ' सुनीत काव्यप्रकाराला ' दृढमूल करण्यास कारणीभूत होण्या सारखींच आहेत.

‘ **पुरुषोत्तमयोगः**—( श्रीमद्भगवद्गीतांतर्गत ‘ पुरुषोत्तमयोग ’ अथवा श्री ज्ञानेश्वरींच्या पंधराव्या अध्यायावरील **प्रवचन**. संग्राहक व प्रकाशक रा रा. नारायण विष्णु आठवले; पुणें शहर. ) ‘ महाराष्ट्र कुटुंब माले ’ चें अतिशय थोर भाग्य कीं ‘ पुरुषोत्तमयोग ’ या प्रासादिक, श्रेष्ठ, व महत्तम भावंडाची भेट अकल्पित व अनपेक्षित झाली. सुरवातीस हा ‘ माले ’ ला शुभशकुनच झाला आहे, असा विश्वास वाटतो ‘ पुरुषोत्तमयोग ’ मालेला मङ्गलप्रद होवो, व तो ज्यांना लाभेल त्यांनाही होवो, अशी आशा व होईल अशी खात्री प्रगट करण्यापलीकडे या सर्व श्रेष्ठ भावंडाविषयीं अधिकउणें लिहिण्याचा ‘माले’ ला अधिकारच नाहीं !

**गडकरीः**—( लेखकः– श्री. स. वा. जोशी, व डॉ. के. वा. साठे. प्रकाशक शां व रानडे. c/o बुक सप्लाइंग कं सांगली. ) एकाद्या ग्रंथकर्त्याच्या सर्व लिखाणाचें परिशीलन करून व त्यांचा सर्व बाजूनीं ऊहापोह करून त्यावरून त्या ग्रंथकर्त्याचा दर्जा किती उच्च प्रतीचा ठरतो व त्याच्या कृतीकडे कोणकोणत्या दृष्टीनें पाहतां येण्याजोगें आहे, हें विशद करून सांगणाऱ्या पुस्तकांची मराठी वाङ्मयांत जरूरी आहे. व ही जरूरी कै० गडकरी यांच्या नाट्यवाङ्मयापुरती तरी या पुस्तकानें बरीचशी नाहींशी होईल असें वाटतें. या पुस्तकांत कै. गडकरी यांच्या पूर्ण नाटकांचा व दुर्दैवानें अपूर्ण राहिलेल्यासुद्धां नाटकांचा अभ्यास करून, शक्य तितकी समतोल वृत्ति ढळूं न देतां, नाटकांचे व नाटककाराचे गुणदोष, स्पष्ट व निर्भिडपणानें पण सहृदयतेनें पुढें मांडले आहेत.

**कांहींतरीः**—( लेखक श्री. ह. स. गोखले. संग्राहक श्री. दि. गं. केळकर प्रकाशक—अनंत सखाराम गोखले पुणें ) प्रो. लागू यांची प्रस्तावना वाचली म्हणजे श्री गोखले यांचें ‘ कवी ’ म्हणून किती महत्व आहे, हें सांगण्याची जरूरीच राहत नाहीं श्री. गोखले यांनीं विकारांना विचाराचा आळा घालून मुफिदार पण साध्या भाषेत आपले काव्य लिहिले आहे. प्रो. लागू यांनीं आपल्या प्रस्तावनेंत जें लिहिलें आहे कीं, “ गरीबीचाच संसार तरी त्यांत उत्तम टापटीप आहे ”. हें या पुस्तकांतील बऱ्याच कविता वाचतांना मनाला चांगलें पटतें.

# मेहेंदळे ब्रदर्स.

## बुधवार पेठ, पुणें शहर.

आमचेकडे क्रीकेट, टेनीस, फुटबाल हॉकी, बॅडमिन्टन व पींगपांग वगैरे देशी व विलायती खेळ सामान, शिवाय फाउंटनपेने, सेफ्टी व साधे रेझर्स, प्रायमस स्टोव्हज् व घड्याळें माफक दरानें मिळतील.

क्याटलॉग मागवा.

फुटबॉल्स.

ब्लॅडर सह.

तॅग्रेगर पॅटर्न किं. रु. १०॰८

टी शेप फुटबॉल नं. ५ किं.रु. ८॰८

न्यू डीझाईन. किं. रु. ७॰८

मॅच नं. ५. किं. रु. ६॰८

प्रॅक्टीस. नं. ५. किं. रु. ५॰८

,, नं. ४. किं. रु. ४॰८

,, नं. ३. किं. रु. ३॰८

ब्लॅडर्स.

नं. ५ फर्स्ट क्वालीटी. रु. १॰१२

नं. ४ व नं. ३ किं. रु. १॰४

पंप किं. रु. ३, व २॰८

हॉकी

लेहर बाऊंड, ५॰८

डबलस्प्रींग

लेदर स्यून ५॰८

डबलस्प्रींग.

थ्रेड बाउंड.

डबलस्प्रींग. ४॰८

टेप बाऊंड २॰८

प्रायम स्टोव्ह. नं. १०० रु. ७॰८

,, नं. ५ किं. रु. ७॰८

,, नं. १ किं. रु. ७

,, नं. ५१ ७॰८

शिवाय सुटें सामान माफक दरानें मिळेल.

जिलेट रेझर्स

बोस्टोनियन् किं. रु. १४

टक अवे किं. रु. १४

गोल्ड सेट किं. रु. ६॰८

बेकन सेट लेदरकेस. रु. ३॰८

जिलेट ब्लेडस्. १० चें पॅकेट. किं. रु. २॰८

ब्लॅकेट सेट. 'सी' मॉडेल. रु. ४॰८

,, नं. ९९ किं. रु. २॰८

( स्थापना १९२१ )

# श्रीसरस्वती मंडळ

४९५ शनवार पेठ, पुणें शहर.

### कै. वा. ब. केळकरकृत

| | |
|---|---|
| त्राटिका | १–०–० |

### कै. राम गणेश गडकरीकृत

| | |
|---|---|
| संगीत वेड्यांचा बाजार | १–०–० |
| संगीत भावबंधन | १–४–० |
| वाग्वैजयंती | २–०–० |

### कॅप्टन लिमयेकृत

| | |
|---|---|
| विनोदी लेखसंग्रह | १–८–० |

### श्रीयुत ल. ब. भोपटकरकृत

| | |
|---|---|
| ! नवरत्नांचा हार | १–०–० |

### श्रीयुत शं. या. पोंक्षेकृत

| | |
|---|---|
| * ! हिंदुस्थानची शासनपद्धती | १–८–० |

### प्रो. शं. वि. सोवनीकृत

| | |
|---|---|
| ! सचित्र फुटबॉल | ०–८–० |

### श्री. चिं. वि. वैद्यकृत

| | |
|---|---|
| शिवाजी व चंद्रराव मोरे | ०–४–० |

कै. राम गणेश गडकरी यांची इतर पुस्तकें छापत आहेत.

* मुंबई सरकारनें मंजूर केलें आहे.

! मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारनें मंजूर केलें आहे.

# टृथ आणि कंपनी.

Poona City.

आमचेकडे **छापखान्यास** लागणारी

मशिन्स, टाइपाची व लिथोची काळी व रंगीत शाई व इतर सर्व सामान योग्य भावानें मिळेल.

कॅटलाग मागवा.

# रुस्तुम ॲन्ड कंपनी

६५० कसबा पेठ पुणे शहर.

छापखान्यास लागणारा सर्व प्रकारचा कागद, मशीनरी व हरएक तऱ्हेची शाई

पुरविणारे

पुण्यांतील जंगी

व्यापारी

**Printing Ink of all kinds & Colours a Speciality.**

कॅटलाग मागवा

शुद्ध स्वदेशी ताजा.

# अमोनियम सल्फेट !

नायट्रोजन २० टक्के

उंसास घालून थोड्या खर्चांत

## जास्त उत्पन्न काढा.

मिळण्याचा पत्ता:—

जरूर लागतांच कोठेंही चौकशी करा—

म्हणजे तुम्हांस आढळेल.

कारखान्याचे तज्ञ इंजिनिअर.

रा. गुरुनाथराव ओगले.

# जर्मनीला कां गेले?

# प्रभाकर

# कंदिल

# घरोघर

प्रकाश देण्यास उत्तम प्रकारें उपयोगी पडावा

म्हणून यंत्रसामुग्री आणण्यासाठीं !

**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड.** भांडवल रुपये

१००००० दहा लाख.

## शेअर्स घ्या ! !

Post-**ओगलेवाडी.**

**(संस्थान-औंध.) जि. सातारा.**

Karad

M. S. M. Ry.

## गरिबांना श्रीमंती—

## श्रीमंतांना श्रीमंती शाबूद राखून

## काटकसर–कशानें साधते ?

# ‘ श्रीगजानन मिल्स ’

## सांगली येथील

### सुती, सुंदर, लांबरुंद भरपूर, पक्क्या रंगाचीं


### दिखाऊ व टिकाऊ लुगडीं घेतल्यानेंच !

श्रीमंतांच्या बायका, गरीबांच्या बायकांना, ‘गजानन मिल्स ’चीं लुगडीं नेसलेल्या असल्या म्हणजे, बरोबरीच्या नात्यानें वागवतात. ‘ अल्पमोली बहुगुणी ’ म्हणून श्रीमंत बायका ‘ गजानन मिल्स ’चीं लुगडीं पाहिजेतच म्हणून ‘तिकडे’ हट्ट धरून बसतात !

एकदां नमुना मागवून वापरून पाहिला पाहिजे, असें तुमचें म्हणणें ना ? मग द्या तर ऑर्डर.

—श्रीगजानन मिल्स–सांगली.

# आनंद व इनव्हिक्टा छापाचीं



## शिवण्याचीं यंत्रें.

ह्रीं यंत्रें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं हप्त्यानें व रोखीनें विकत मिळतात. सर्व ठिकाणीं एकच भाव.

**पुणें एजंट**—मे. व्ही. एन्. अॅन्ड को.-अप्पा बळवंत चौक, बुधवार पेठ.

**सातारा एजंट**—आर. एच. भाकरे-सोमवार पेठ.

**कऱ्हाड एजंट**—एस. जी. भुगे.

**कोल्हापूर व सांगली एजंट**—जी. आर. गोखले.

| | रोखीनें | हप्त्यानें |
|---|---|---|
| शिवण्याचें यंत्र हाताचें होडीशटल किंमत रु. | ९७ | १२५ |
| कव्हरसह | ११० | १४५ |
| जावीशटल | ११० | १४५ |
| कव्हरसह | १२५ | १६५ |
| पायाचें जावीशटल | १३५ | १८५ |
| कव्हरसह | १५० | २०३ |

**आनंद अँड कोः पूना सिटी,**

पुण्यांत पहिली व एकत्र

# रात्रीं व दिवसा

## फोटो काढण्याची जागा.

एस. जी. नाईक आणि कंपनी

आर्टिस्ट फोटोग्राफर्स.

लक्ष्मी रोड, पुणें शहर.

संगीत

# माईसाहेब

नवीन आवृत्ति तयार.

श्रीदत्त एजन्सी

३९१ नारायण पेठ, पुणें,

## डी. नाथ आणि कंपनी

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कादंबरीकार श्री. नाथमाधवकृत.

**वीरधवल**.( पृष्टें ६५०; किं. रु. ३॥

**रायक्लब** (सोनेरी टोळी पूर्वार्ध व उत्तरार्ध किंमत प्रत्येक भागास १॥रु.

**श्रीशिवाजी महाराजांचें आरमार अथवा सांवळ्या तांडेल** सचित्र ( किंमत दीड रुपया.)

**स्वयंसेवक** मद्यपानाचा दुष्परिणामावर.झणझणीत (किं.सव्वा दोन रु.

**स्वराज्यबोध** (कवि संतविहारकृत.) काव्य. ओवीवृत्त.किं.सहा आणे

**श्रीरामकृष्णमाला** मुलांचे आवडते लेखक:-श्री. कृ. गो. किनरेकृत. किंमत सहा आणे. ) **मुलांचा शीलशिक्षक**—( किंमत आठ आणे.)

---

स्वस्तपणाची कमाल !! टिकाऊ ऑफिस वर्कींगला सतत लागणारे निरनिराळे २० स्टँपाचे पेटीस अवघे ३ रुपये पेड, क्यानसलड, आरजंट, डुप्लीकेट, फाईल, रिमायंडर, पोस्टेड कॉपीड इनव्हरटेड, म्यानेजर, प्रोप्रायटर, व्हेरी, अडवान्स, ब्यालन्स, बुक-पोस्ट, व्ही. पी. पी. फॉर रिप्लाईड. स्टँपड, रॉजस्टर्ड, ओरीजनल. शिवाय वाटेल त्या डिझाईन स्टँपास २॥ रु. जाड पेटी शाई सह कंप्लीट देऊ काम ग्यारंटीनें करून मिळेल अनुभव हिच खात्री.

**टी. डी.भोसले शाईचे व रबरीशिक्याचे कारखानदार**

७६४ सदाशिव पुणें-सिटी.

---

### तुमच्या आवडत्या, लाडक्या, प्रेमाच्या माणसाचा


# मोठा फोटो

तुमच्या बसावयाच्या जागेंत नेहमीं तुमच्यासमोर दिसेल असा ठेवावा असें तुम्हांला वाटतें ना ?

## -आपली ही हौस-

१० X १२ इंचाचा फोटो फक्त ५ ( पांच ) रुपयांत देऊन आम्हीं पुरवूं. लहान फोटो व पांच रुपये पाठवा. व्ही. पी. नाहीं.

**वसंत आर्ट वर्क्स. ९८७ सदाशिव, पुणें.**




**बाजाच्यापेट्या.** ( पॅरिस केझरील) व कलकत्त्याच्या. मुंबई अमृतसर वगैरे ठिकाणच्या.

**फोनोग्राफ.** प्लेटस्, ऑलबॉस्.

**शिवण्याचीं यंत्रें.** व त्याचे सर्व सुटे भाग सिंगरचे यंत्राला सुद्धां लागणारे. सुया, वाद्या, इत्यादि व

**डेक्कन के. वर्क्स मुंबई.** यांचा ओटो डी रोज. कोकोनट आईल, लाईमज्यूस बाम वगैरे माल विकत मिळेल. फोनोग्राफ, बाजाच्यापेट्या व शिवण्याचीं यंत्रें हे जिन्नस हप्त्यानेंहि मिळतील.

**व्ही. एन, आणि कंपनी**

आप्पा बळवंत चौक, पुणें सिटी.

---

राजकीय, धार्मिक व सामाजिक विषयांवर चर्चा करणारें साप्ताहिक

# चिकित्सक

वा. व. ट. हं. सह रु. दोन,

आमच्या कारखान्यांत इंग्रजी, कानडी, मराठी व संस्कृत छपाईचें काम सुबक व वक्तशीर केलें जातें. आमच्या बुकडेपोंत सर्व प्रकारचीं पुस्तकें विकत मिळतात.

**दत्ताजीराव आबाजीराव सावंत,**
**मालक व संपादक**

श्रीरामतत्त्व–प्रकाश प्रेस व चिकित्सक ऑफीस

**बेळगांव**

---

**वा. वर्गणी व्ही. पी. सह चौदा आणे.**

# पूर्णानंद.

अत्यंत अल्प किंमतींत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, मासिक आजपर्यंत कोणीही दिलेलें नाहीं. नमुन्याचा अंक १ आण्याचीं तिकिटें पाठवून मागवा.

पत्ता:—**पूर्णानंद—कार्यालय, बेळगांव**

# पैसाफंड

# कांचशाळा

## तळेगांव दाभाडे

स्थापना १९०८

कांचशाळेंतील माल घेण्यापासून

## विशेष फायदे

१ स्वदेशांतच पैसा राहतो.

२ स्वदेशी उद्योग धंद्यांना मदत मिळते.

३ धंदेशिक्षणास मदत व उत्तेजन मिळतें, तरी विलायती बरण्या, कांचमाल घेऊं नका. कांचशाळेंत झालेल्या बरण्या व कांचमाल वापरा.

## डी. गणेश & कंपनी

३५१ सदाशिव पुणें.

# सुगंधी मालाचे व्यापारी

सोल एजन्टस्
' श्रीदत्त एजन्सी '
३९१ नारायण पेठ पुणें.

## श्रीदत्त एजन्सी

३९१ नारायण पेठ, पुणें.
(स्थापना. चैत्र शुद्ध प्रतिपदा श. १८४७)

आमच्याकडे ' महाराष्ट्र-कुटुंब-माले चे मुख्य संपादक ' माईसाहेब कर्ते ' रा. नारायण विनायक कुळकर्णी यांचीं खालील पुस्तकें मिळतील.

'माईसाहेब' ( उत्कृष्ट गद्य, सामाजीक तीन अंकी सचित्र नाटक. किं. १।

'डाव जिंकला'(पौराणीक गद्य, तीन अंकी सचित्र नाटक किं. ०१४

पार्थ प्रतिज्ञा ( पौराणीक-सचित्र संगीत चार अंकी नाटक. किं. १ रुपाया.

' कै. श्री. रमाबाई रानडे चरित्र ( ले. ' उमाकांत ' किं. १ रुपया.

---

## शास्त्रीय ज्ञान प्रसाराचा हा काळ आहे.

कै. प्रो बाळाजी प्रभाकर मोडक कृत.

शास्त्रीय व ऐतिहासिक ग्रंथांकरिता खालील पत्त्यावर लिहून सदर ग्रंथाचा उपयोग करण्यास चुकू नका.

विश्वनाथ बळवंत मोडक.

शास्त्रीय-ज्ञान-भांडार
स्टेशनरस्ता, शाहुपुरी,
कोल्हापूर नं. ३

## केवळ स्त्रियांकरितां

श्री. सौ. अवंतिकाबाई गोखले या विख्यात विदुषींच्या संपादकत्वाखालीं उत्कृष्ट रीतीनें चाललेलें

# ' हिन्दमहिला '

साप्ताहिक

तिसऱ्या वर्षांत विलक्षण सुधारणा.
प्रत्येक सुशिक्षीत स्त्रीनें ग्राहक व्हावेंच-

व्यवस्थापक प. वि. नागपूरकर.
हिन्दमहिला कार्यालय, आंबेवाडी
गिरगांव मुंबई नं. ४

# 'नवाकाळ'

## ची

# नवी व्यवस्था

आकार दीडपट, म्हणजे बारा पानांचा झाला. 'विषयांची विविधता वाढली. कार्टुन्स, ब्लॉक्स, येणार. वाङ्मयचर्चा, ऐतिहासिक माहिती, छोट्या गोष्टी, नाटकें, सिनेमा, याविषयीं भरपूर माहिती येण्यास पाडव्यापासून सुरवात.

कांग्रेस पक्षाचें

## मराठींतील सर्व दैनिकांत

# "नवा-काळ"

हें एकटें एकच दैनिक सर्वश्रेष्ठ आहे, हें महाराष्ट्र एकमुखानें कबूल करीत आहे.

मॅनेजर—नवा—काळ मुंबई, नं. २